

# तरंग

## लघुकथा संग्रह

सुधीर कारखानीस

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# तरंग

## लघुकथा संग्रह

## सुधीर कारखानीस

# तरंग


## लेखक: सुधीर कारखानीस

ए 902 एकता मेडोज

सिद्धार्थ नगर, मागाठणे

बोरीवली ईस्ट, मुंबई 400066

मोबाइल 9223298186

ई मेल sudhirkarkhanis@yahoo.com


## मुखपृष्ठ- सुधीर कारखानीस


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : २९ नोव्हेंबर २०२३

©esahity Pratishthan®2023

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

a

## लेखक परिचय :

# सुधीर कारखानीस



शिक्षण व अनुभव

शालेय शिक्षण एच डी हायस्कूल सोलापूर

एंजिनीरिंग ग्रॅज्युएट पुना एंजिनीरिंग कॉलेज,

पुणे, महाराष्ट्र

पावर सेक्टर मध्ये सुमारे 50 वर्षांचा उच्च पदस्थ अनुभव

टाटा पावर कंपनी, एल अँड टी, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

लेखन

अनेक तंत्रज्ञानविषयक पेपर व दोन तंत्रज्ञानविषयक पुस्तके प्रकाशित

मराठी लघुकथा संग्रह "प्रतिबिंब" प्रकाशित

स्टोरी मिरर मध्ये नियमित ललित कथा लेखन

लघुकथामध्ये शहरी शिक्षित मध्यम वर्गाच्या जीवनाचे हलके फुलके वातावरण. विदेशात राहणाऱ्या भारतीयांच्या जीवनचर्येवरही कथा लेखन केले आहे. या लघुकथा "कथा पैलतीरा पलीकडच्या" या आगामी कथा संग्रहात दिसतील.

# लेखकाचे मनोगत

ऑफिशियल कामास्तव आणि खाजगी कारणास्तव माझी देशात आणि परदेशात बरीच भ्रमंती झाली. बरीच माणसे भेटली, बरे वाईट प्रसंग पाहिले, अनेक किस्से ऐकले. आणि या सर्वांच्या मंथनातून या लघुकथा निर्माण झाल्या. बऱ्याच कथांमधे वाचकांना स्वतःच्या जीवनाचं प्रतिबिंबही दिसतं, त्यांच्या मनात कोठेतरी एक तार छेडली जाते. अशा अनेक मनांत जेव्हा अनेक तारा छेडल्या जातात तेव्हा लेखकाची वाचकांशी संलग्नता झाल्याची प्रचिती होते आणि या परिश्रमांचं सार्थक झाल्यासारखं वाटतं. वोट्स आप माध्यमातून आतापर्यंत प्रसृत केलेल्या बहुतेक सर्वच कथांचे कौतुक झाले आहे, हे मी माझे भाग्य समजतो.

एखादी नदी असो अथवा लहान ओढा असो, प्रवाहाला ओघ असतो, प्रवाहामध्ये छोटे मोठे भोवरे असतात, पाण्याला खळखळाट असतो.

मोठ्या जलाशयाची किंवा संथ वाहणाऱ्या नदीची गोष्ट थोडी वेगळी असते. वेगवान प्रवाहाच्या ऐवजी तेथे लयबद्ध तरंग असतात आणि नाजुक लाटाही असतात. किनाऱ्या वरची लव्हाळी या तरंगांच्या तालावर डोलतात, कधी वाकतात, दुमडतात पण लगेच सरळ होतात.

जीवनाच्या संथ प्रवाहाचं तसंच काहीसं आहे. या प्रवाहात उठणारे तरंग म्हणजे जीवनातल्या अनेक घटना, बरे वाईट अनुभव. काही तरंग आपल्या पासून दूर असतात तर काही आपल्या सान्निध्यात. जीवनातले काही तरंग, विविध अनुभव आपल्याला कधी शिकवून जातात तर कधी हसवून जातात. तर कधी आपल्याला

सावध व्हायला, थोडं सावरुन घ्यायला भाग पडतात; आणि अशाच लहान मोठ्या अनुभवांतून ललित साहित्य निर्माण होते.

दोन हजार सतरा साली माझा पहिला लघुकथा संग्रह "प्रतिबिंब" श्री जब्बार पटेल यांच्या सुहस्ते प्रकाशित झाला. त्या प्रकाशन समारंभाच्या वेळी श्री जब्बार पटेल म्हणाले होते, "उत्तम लघुकथा पूर्णपणे काल्पनिक असूच शकत नाहीत. लेखकाने त्याच्या जीवनामध्ये अनुभवलेल्या लहानशा का होईना, एखाद्या सत्य घटनेवर लेखक आपल्या कल्पनेचा मिनार उभारतो आणि त्यातूनच उत्कृष्ट लघुकथा निर्माण होते."

आजही या "तरंग" लघुकथा संग्रहातील कथा वाचताना, वाचकांना नक्कीच ही अनुभूती होईल. यातील प्रत्येक पात्र तुमच्या आमच्यात आहे, कदाचित तुम्ही स्वतःच असाल, जवळचे आप्तमित्र असतील, स्नेहीसंबंधी असतील. काही मजेदार तर काही भांबावून टाकणारे अनुभव एकत्रित करून थोडे सत्य, थोडे कल्पित अशी गुंफण करून या सर्व लघुकथा निर्माण झाल्या आहेत. वाचक वर्गाला या तरंगांमधून मनोरंजनाचा छोटासा उपहार देण्याचा हा प्रयत्न आहे.

-सुधीर कारखानीस

# प्रस्तावना

तरंग हा सुधीर कारखानीस यांचा दुसरा लघुकथा संग्रह योगायोगाने माझ्या हाती पडला. सुंदर बांधणी, सुबक डी टी पी यांनी सजलेला आणि मुखपृष्टाने अंतरंगात मन ओढून नेणारा असा लघुकथा संग्रह त्याच्या दृष्य अंगाने मनावर लगेच छाप मारून गेला आणि कथा वाचनात मी गर्क झालो.

पहिल्या दोन कथांवरून पुढील अंतरंगाची पूर्ण कल्पना आली. श्री सुधीर कारखानीसांच्या रसाळ भाषेत त्यांनी त्यांच्या मनातले व्यक्त केलेले संकेत “मनोगतात” व्यक्त होताना जाणवले आणि हा लघुकथा संग्रह वाचताना एका कसदार लेखकाच्या मनातल्या तरंगांचेच ठाई ठाई पडसाद पडलेलेही जाणवले. सर्वच कथांची भाषा अतिशय ओघवती आहे. कथेतील संवादांतून लेखकाची ताकद व अनुभव विश्व उलगडत गेले आहे. हा लघुकथा संग्रह वाचल्या नंतर एक अनुभव संपन्न पुस्तक वाचनात आल्याची अनुभूती मला मिळाली.

लेखकाच्या मनाच्या वैचारिकतेची प्रगल्भता प्रत्येक कथेत जाणवते. बारिक सारिक घटना, वस्तु यांतून अलगद कथा सादर करण्याची कला हे लेखकाच्या लेखणीने वैशिष्ट्य जाणवते. प्रत्येक कथा एका निर्णया पर्यंत नेऊन शेवट करते ही हातोटी लेखकाला साधलेली आहे यात शंका नाही. संपूर्ण पुस्तकातील कथानकांत एक वेगळाच तरंग जाणवतो. प्रत्येक कथेला एक कौटुंबिक पार्श्वभूमी लाभलेली आहे हे विशेष. एकदा वाचायला सुरुवात केल्यावर पुस्तक खाली ठेवूच नये अशी ओढ मनाला लागलेली जाणवली.

प्रत्येक कथेचे अंतरंग लेखकाच्या अनुभव विश्वाचे दर्शन घडवते. उदा. कथा "एका दगडात तीन पक्षी". यातही लेखकाच्या भाषेचा स्तर अस्सल मराठीच आहे. कथेची मांडणी वाखाणण्याजोगी आहे, शिवाय तुमच्या आमच्या बोलीतील भाषा आपलीशी वाटते आणि ती तशीच संवादांतून जाणवत राहते. वाचकाशी जवळीक साधली जावी म्हणून भाषेचा स्तर वरचा आहे हे मात्र खरे.

कथा लेखक हा माणसे वाचणारा रांगडा पुरुष असतो. माणसांच्या डोळ्यांत, बोलण्यात काय लिहिले आहे, रेखाटले आहे हे ज्याला वाचता येते तोच उत्तम कथा लेखक होऊ शकतो. माणसाच्या बोलण्यातून, डोळ्यातल्या बुबूळाआडच्या भिंगातून त्याचे पहाणे हे खरे असते पण कधी कधी चेहरा वेगळेच बोलताना जाणवतो. म्हणूनच, प्रथमदर्शनी चेहरे वाचून ती पात्रे कथेत उभी करणे यात खऱ्या कथाकाराचे कसब असते. अशी पात्रें जेव्हा वाचकांच्या मनाला भिडतात तेव्हा ती कथा यशस्वी झाली असे म्हणता येईल. आणि हेच कसब श्री सुधीर कारखानीस याना यशस्वी कथाकार करते.

लघुकथांमधे लेखकाने प्रेम हा विषय अत्यंत तरलतेने हाताळला आहे. त्यामुळे वाचकाला हे लिखाण आपल्या अनुभूतीशी निगडीत वाटते. लेखकाने योगायोगही समर्पकपणे हाताळले आहेत. यामुळे संग्रहाचा ओघ धावता राहिला आहे यात शंका नाही. कथालेखक नवखे वाटत नाहीत. लिखाणात परिपूर्णता जाणवते आहे हेच त्यांचे यश.

श्री कारखानीसांचा तरंग हा कथा संग्रह जरी बारा कथांचा असला तरी त्यात नऊ लघुकथा आहेत आणि तीन दीर्घ कथा आहेत. नवीन आवृत्ती मधे या तीन दीर्घ कथा संग्रहामधे शेवटी टाकण्याचे औचित्यही लेखकाने दाखवले आहे. दीर्घकथा

लिहिताना विषयाच्या मांडणीमधे परिपूर्णता येते. श्री कारखानीसांनी अशाच दीर्घकथा लिहित जावे आणि दीर्घ कथांचा संग्रह प्रकाशित करावा अशी सदिच्छा आहे.

या पूर्वी श्री कारखानीसांचा "प्रतिबिंब" हा कथा संग्रह प्रकाशित झालेला आहे. "तरंग" हा त्यांचा दुसरा कथा संग्रह आहे. त्यांच्या आणखीही काही अप्रकाशित कथा आहेत. नजीकच्या काळात या कथा पुस्तक रूपाने प्रकाशित होवोत आणि नजीकच्या काळात एक सशक्त कथाकार वाचकांना मिळो ही सदिच्छा.

— (ॲडव्ह) यशवंत कदम

ज्येष्ठ साहित्यिक

अभिप्राय-

1. श्री सुभाषचंद्र लेले, पुणे

श्री सुधीर कारखानीस यांनी लिहिलेला 'तरंग' हा लघुकथा संग्रह पूर्ण वाचून काढला किंबहुना पूर्ण वाचल्याशिवाय तो खाली ठेवताच आला नाही. कथांमध्ये आलेली बहुतांश पात्रे आपल्या आसपासचीच आहेत आणि आपण सुद्धा त्यात कुठेतरी आहोत असा सतत भास होत होता. या लघु कथासंग्रहामध्ये एक छोटीशी कादंबरी 'गरज', आणि ' तडजोड ' नावाची एक दीर्घ कथा सुद्धा अगदी चपखल पणे सामावून घेतली आहे. आणि ही बाब नक्कीच कौतुकास्पद आहे. आसपास नेहमी वावरणाऱ्या अनेक व्यक्तिरेखा नेटकेपणाने टिपण्याची आणि त्यांच्या स्वभावातील बारकावे व्यवस्थितपणे मांडण्याची आपली लकब खूप भावली.

'चौकोनी कुटुंब' ही कथा वाचताना खरं म्हणजे त्यातील ऋण स्वीकारण्याची भावना प्रकर्षाने बाहेर आली. 'साक्षात्कार' या कथेतून मनुष्याचा भाबडेपणा आणि ग्रामीण आणि शहरी मानवी स्वभावाचे अंतर आपण छान दर्शवले आहे. 'एका दगडात तीन पक्षी' ही कथा वाचताना आपल्या पावर हाऊस मधील कामगिरीची आणि त्यातील अनेक प्रकारच्या माणसांची वागण्याची तऱ्हा रेखाटण्याचा अनुभव दिसून आला. ' सामाजिक मिसळ' या कथेतील वसंतरावांना मिळालेली शॉक ट्रीटमेंट भन्नाट वाटली.

'पोहोचलेले लोक ही कथा वाचताना कधीतरी मला पण हा शेरा मिळाला होता त्याची आठवण झाली. माझ्या अगदी जवळच्या नातेवाईकांनी एका होतकरू स्थळाबद्दल त्यांच्या मुलींसाठी चौकशी केली होती. त्यावेळी मुलगा अजून

स्थिरावला नाही म्हणून यंदा कर्तव्य नाही असे त्यांना सांगण्यात आले होते. पण नंतर अगदी थोड्या दिवसानंतर त्याच मुलाने आमच्या मुलीसाठी मागणी घातली आणि ते ठरलं तेव्हा मला हा शेरा मिळाला होता त्याची आठवण झाली.

'भरारी'ही कथा वाचताना रत्नाकर मतकरी यांची शैली कुठेतरी जाणवली. ती पूर्ण कथा छान रंगवली आहे

एकंदरच पूर्ण कथासंग्रह अतिशय वाचनीय आणि संग्राह्य आहे हे निश्चित. सर्व कथांमध्ये मुंबई पुणे सोलापूर इत्यादी अनेक ठिकाणांची तपशीलवार वर्णने वाचून आपल्या निरीक्षण शक्ती आणि स्मरणशक्ती यांचे कौतुक वाटले. आपण एक कुशल इंजिनिअर असून सुद्धा एक उत्तम साहित्यिक पण आहात त्याबद्दल आपले नक्कीच खूप कौतुक वाटते आणि आपण मित्र आहोत त्याचा एक अभिमान पण वाटतो.

... सुभाषचंद्र लेले

a

2. डॉ. अनिल कारखानीस, मुंबई

सुधीर कारखानीस ( ज्येष्ठ बंधू- “दादा”, यापुढे उल्लेख -’’लेखक”) लिखित “तरंग” लघुकथा संग्रहातील सर्व बारा लघुकथा मी समग्र वाचल्या आणि त्यानंतर लेखका बरोबर या लघुकथांबाबत सविस्तर चर्चा ही केली. सर्वच लघुकथा खुमासदार आहेत यात शंकाच नाही. प्रत्येक कथेचा ओघ वाहता आहे आणि वाचकांची उत्कंठा वाढवणारा आहे. सर्वच कथा सुखांतिका तर आहेतच पण प्रत्येक कथेच्या शेवटी शेवटी कथानकाला दिलेल्या अचानक वळणामुळे कथा खूपच चटकदार झाल्या आहेत. प्रत्येक कथेमधे कथानकाला वळण लावणारे एखादे सूचक वाक्यही कोठेतरी दडलेले असते. ही सूचकता, तिच्या साधेपणाच्या आवरणामुळे गाफील वाचकाच्या नजरेआड होण्याची बरीच शक्यता आहे, पण तरीसुध्दा कथेच्या शेवटी वाचकाचा रसभंग झाल्या सारखे वाटत नाही.

या लघुकथांचे आणखी एक वैशिष्ट्य असे की चाणाक्ष वाचकाला प्रत्येक कथेतून काही ना काही तात्पर्य दडलेले दिसेल.

लेखकाने आपल्या मनोगतामधे नमूद केले आहे की या कथा पूर्णपणे काल्पनिक नाहीत. लेखकाच्या प्रदीर्घ व्यावसाईक जीवनात भेटलेल्या व्यक्ती आणि लेखकाने अनुभवलेले प्रसंग, याना थोडी फार कल्पकतेची जोड देऊन लघुकथांची ही रंगतदार रांगोळी तयार झाली आहे. तसे पाहिले तर, सामान्य, असामान्य व्यक्ती, प्रवृत्ती प्रत्येकाच्या जीवनात थोड्या फार प्रमाणात येतातच. पण त्याना कल्पकतेच्या आकर्षक कोंदणात बसवून लखलखीत दागिन्या प्रमाणे चमकणारी लघुकथा घडवणे सर्वांनाच जमेलसे वाटत नाही. कथा संग्रह मजबूत हार्ड कवर बांधणीचा आहे आणि

a

आकर्षक आहे. कथासंग्रहाची संपूर्ण रचना, मांडणी लेखकाने स्वत:च केली आहे आणि स्वयं वितरित मार्गाने सद्भावनेने निवडक मित्रवर्गाला भेट कॅापी दिली आहे. पण व्यावसायिक रित्या प्रकाशन केल्यास सुयोग्य किंमत देऊनही वाचक हा लघुकथा संग्रह आनंदाने जरूर विकत घेतील यात मला शंका नाही.

···.डॅा. अनिल कारखानीस

अर्पण पत्र

तरंग हा लघुकथा संग्रह  माझी पत्नी सौ ज्योती

आणि आमची कन्यारत्ने  सौ मीनल व सौ तेजल

यांस अर्पण

# अनुक्रम


| कथा क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १ | चौकोनी कुटुंब | १ |
| २ | साक्षात्कार | १५ |
| ३ | एका दगडात तीन पक्षी | ३० |
| ४ | सामाजिक मिसळ | ४६ |
| ५ | पोहोचलेले लोक | ५७ |
| ६ | मॅनेजमेंट गुरु | ७२ |
| ७ | बापूसाहेबांचा वारसा | ८३ |
| ८ | संशयित | ९६ |
| ९ | कोंकणातले तीन दिवस | १११ |
| १० | गरज | १२३ |
| ११ | तडजोड | १५७ |
| १२ | भरारी | १९३ |

# तरंग

## लघुकथा संग्रह

(या कथासंग्रहातील सर्व कथा काल्पनिक असून कोणाही वास्तविक नाव, गाव वा व्यक्तीशी साम्य आढळून आल्यास तो योगायोग समजावा)

# १

# चौकोनी कुटुंब

“डॅडी, आजीला पण न्यायचं नं आपल्या बरोबर महाबळेश्वरला”? चेतन ने डॅडीला विचारलं.

डॅडीने मम्मी ची नजर चुकवत छोट्या चेतनला आश्वासन दिलं. “हो तर, नक्कीच”.

चेतन उड्या मारत बाहेर गेला आणि डॅडीही पुढचा संभाव्य वाद टाळण्यासाठी की काय, साईडबोर्डवरचे पाण्याचे दोन रिकामे ग्लास उचलून, “भरून आणतो”, असं पुटपुटत बेडरूम च्या बाहेर पडला.

जरा आश्चर्याचीच गोष्ट होती खरी, पण बोरीवलीच्या त्या चार बेडरूमच्या घरात चार वेगळी वेगळी विश्वं नांदत होती.

डॅडीचं, म्हणजे राजेश केतकरचं बहुतेक सर्व विश्व त्याच्या राज मिश्रधातू फॅक्टरी व्यवसायाने व्यापलं होतं. त्यातून जे काही उरेल, त्यातला अर्धा वाटा पत्नी निशाचा आणि अर्धा चेतनचा.

मम्मी म्हणजे निशा केतकर, ती तिच्या ॲपेक्स सॉफ्टवेअरच्या व्यवसायात जवळ जवळ पूर्ण पणे दंग. पती राजेश आणि छोट्या चेतनला सुध्दा तिच्या विश्वात हमखास प्रवेश हवा असेल, तर तिच्या कॉम्प्यूटरच्या किंवा सेल फोनच्या महाद्वाराचीच घंटा त्यांना घणघणायला लागत असे.

बागडणाऱ्या छोट्या चेतनच्या जगात होती त्याची शाळा, टीचर, बालमित्र. आणि हो, त्याची आजी सुध्दा. आजीला म्हणजे कमलाताईंना त्या जगात अगदी भरपूर ऐसपैस जागा होती. आणि प्राधान्य होतं.

चेतनच्या आजीच्या, म्हणजे कमलाताईंच्या विश्वाने तर रूळच बदलले होते. आणि त्यांच्या या वर्तमानकालीन विश्वात सगळयात मोठा हिस्सा छोट्या चेतनचा होता. कुटुंबात घटक चार पण त्या कुटुंबाला चौकोनीपणा नक्कीच नव्हता. सैलसे एकत्र जोडलेले त्रिकोण.

राजेशच्या आई बाबांची कर्मभूमी वाई. पण राजेश अगदी लहानपणापासूनच शिक्षणासाठी पुण्या मुंबईला त्याच्या मामाकडे राहिलेला होता. मामाने अगदी सख्या मुलासारखं त्याला वाढवलं होतं. अगदी सुट्टीत सुध्दा राजेशला वाईला पाठवण्याऐवजी त्याच्या आई बाबांनाच मामा आपल्याकडे बोलावून घेत असे. त्यामुळे वाईशी राजेशचा संबंध तसा कमीच होता आणि नंतर परदेशी गेल्यावर तर विचारायला नको.

निशा मूळ बडोद्याची. त्यातून गेली दहा वर्षे सॉफ्टवेअर व्यवसायात घालवल्यामुळे वाई पेक्षा दिल्ली, कोलकत्ता, लंडन तिला जास्त जवळचं वाटत होतं.

आपापल्या परीने, कुटुंबातल्या तीन व्यक्तींची, म्हणजे राजेश, निशा आणि चेतन यांची आयुष्ये फास्ट ट्रॅकवर चालली होती. आणि कमलाताईंचा ट्रॅक फास्ट आहे की स्लो आहे, हे बघायची कोणाला सवडही नव्हती. सगळयाच गाड्या वेगवेगळया रूळांवर. प्रत्येकाची स्टेशनं वेगळी आणि लाल, हिरव्या बावट्यांच्या वेळा वेगवेगळया.

a

पण फास्ट ट्रॅकवर सतत धावून कधीतरी दमछाक होणारच. जीवनातल्या अडथळयांच्या शर्यतीत कधीतरी “टाईम प्लीज” म्हणावंसं वाटणारच. यात पहिला गडी बाद झाला तो राजेश. या सगळया उलट सुलट धावपळीच्या व्यापांमधून एक ब्रेक घ्यायची, चार दिवस आराम करण्याची शक्कल राजेशने काढली आणि निशानेही ताबडतोब त्याला दुजोरा दिला.

मग निशाने आपल्या त्रिकोणी जगाच्या हॉलिडे गेट-अवेसाठी सुबक प्लॅन तयार केला. पण सासू बाईंचं, म्हणजे कमलाताईंचं काय? मुंबईतल्या एवढ्या मोठ्या घरात चार दिवस एकट्याना ठेवायचं? शेवटी जरा अनिच्छेने का होईना, त्रिकोणाचा झाला होता चौकोन.

निशाने नेटवर संशोधन करून महाबळेश्वरच्या एका बऱ्यापैकी हॉटेलात दोन डबल रूम बुक केल्या होत्या. एक राजेश आणि स्वतःसाठीसाठी आणि दुसरी चेतन आणि त्याच्या आजीसाठी.

आणि लॉन्ग वीकेंडचा मुहुर्त साधून मंडळी एका सकाळी महाबळेश्वरला निघाली. मोबाईल वरच्या वाटाड्याचा नकाशा म्हणजे खात्रीलायक आधार. तो जवळ असल्यावर वाट चुकण्याची भीतीच नव्हती. दुपारपर्यंत मंडळी महाबळेश्वरला पोहोचली.

आज महाबळेश्वर मधली पहिली सायंकाळ.

महाबळेश्वर च्या थंड आणि प्रदुषण मुक्त हवेने उल्हासित वाटत होतं. समोर बॉम्बे पॉईंट वरून सुर्यास्ताची अवर्णनीय शोभा दिसत होती. राजेशला रिलॅक्स्ड वाटत होतं, निशासुध्दा सुर्यास्ताची मजा लुटत होती.

“चेतन, जास्त पुढे नको जाऊस”. राजेशने आवाज चढवला.

a

“अहो त्यानाही सांगा. कडमडल्या तर हाड मोडून बसतील”. निशा म्हणाली.

“अगं दोघांनाही लागू आहेत माझ्या इन्सट्रक्शन्स”. राजेशने सारवासारव केली.

थोडं इकडे तिकडे फिरुन मंडळी हॉटेलवर परत आली. हॉटेलचा मालक राजदीप रिसेप्शन लाऊंजमध्येच बसलेला होता. केतकर कुटुंब आत आलं तसा मालक ताडकन उठुन उभा राहीला आणि अदबीने नमस्कार केला. राजेशला आणि निशाला बरं वाटलं.

मंडळी डायनिंग हॉल मधे जेवून बाहेर आली.

हॉटेलमालक लाऊंजमध्येच होता. लगबगीने तो समोर आला आणि राजेशला एका बाजूला बोलावून तो म्हणाला, “सर, वरच्या मजल्यावर आमच्या सुपर डीलक्स रूम्स् आहेत. तिथे आपण शिफ्ट व्हाल का?... नाही एक्सट्रा चार्ज अजिबात नाही. याच रेट मध्ये सर.”

राजेशने आनंदाने ऑफर स्वीकारली.

“मला वाटतं माझा मागच्या महिन्यातल्या मेटॅलर्जी जर्नल मधला लेख आणि फोटो यांनी बघितला असावा”. वर शिफ्ट होता होता राजेश बोलला.

नव्या रूम्स् नांवाप्रमाणेच सुपर डीलक्स होत्या. सजावटही उत्तम दर्जाची होती.

“माय हिरो”. नवऱ्याकडे कौतुकाने पहात निशा म्हणाली.

दुसऱ्या दिवसाची सकाळ. नव्या रूम्सच्या खिडकीतून बाजुलाच असलेल्या खोल दरीचे आणि त्यामधे भरलेल्या कापसासारख्या ढगांच्या बिछायतीचे विहंगम दृष्य पहात राजेश, आणि निशा गरम गरम चहाचे घुटके घेत होते. निशाला हे सगळं दृष्य पाहता पाहता स्वित्झर्लंडच्या कुठल्यातरी अशाच दृश्याची आठवण झाली आणि मग जरा तुलनात्मक चर्चा झाली खरी, पण डाव्या उजव्याचा निर्णय लागू शकला नाही.

“चेतन आणि आई अजून उठलेले दिसत नाहीत. मी पाहून येतो. ब्रेकफास्टही मागवायचा आहे”, असे म्हणत राजेश शेजारच्या खोलीत डोकावून आला.

“अगं आई नाही दिसत आहे खोलीत”. राजेश परत येऊन जरा काळजीच्या सुरात निशाला म्हणाला.

निशा खिडकीतून खाली पहात होती. “अहो त्या बघा शाल पांघरून खाली फुलबागेत फिरतायत, आणि तो माळीही अदबीने त्यांना काहीतरी सांगतोय. या तुमच्या आई आहेत हे याला पण कळलेलं दिसतंय.”

तेवढ्यात कमलाताईंनी हसून त्या माळ्याचा निरोप घेतला आणि त्या वर यायला निघाल्या.

“अहो, त्याना सांगा, उगीचच सकाळच्या थंडीत नका फिरू म्हणावं. तापबीप आला तर निस्तरायचं कोणी “? निशा म्हणाली.

“हो, बरोबर आहे तुझं”. राजेश म्हणाला आणि तो विषय तेवढ्यावर थांबला.

कमलाताई वर आल्या. आंघोळी, ब्रेकफास्ट वगैरे उरकून मंडळी बाहेर पडली.

"डॅडी मला घोड्यावर बसायचंय". चेतनने मागणी केली.

विस्तीर्ण तलावालगतच्या पटांगणाजवळ मंडळी उभी होती. एक घोडेवाला त्याचा घोडा घेऊन जवळ आला. सर्वांना आदबशीरपणे नमस्कार करून त्याने राजेशला विचारलं, "साहेब, रपेट करायची आहे का"?

"मला नाही, पण या छोट्याला फिरवायचंय. जमेल का?"

"होय साहेब" घोडेवाल्याने उत्तर दिले.

चेतन आजीचा हात धरून उभा होता.

"काय रे नाव तुझं"? कमलाताईंनी घोडेवाल्याला विचारलं.

"मी बाबू शेलार". परत नमस्कार.

"हं. संभाळून ने बाबू याला". कमलाताई म्हणाल्या.

"हो, हो, अगदी काळजी करू नका". परत तीच नम्रता.

निशा हळुच राजेशच्या कानात पुटपुटली. "इथे काय सौजन्य सप्ताह वगैरे चालू आहे की काय?"

राजेशने एकदा हसुन तिला दाद दिली, आणि घोडेवाल्याकडे वळुन, "संभाळुन ने रे छोट्याला", असं सांगितलं.

तिघांनीही चेतनला टा टा केला.

"चला तिकडे बाकावर बसूया". राजेशने सुचवलं.

“त्यापेक्षा या हँडिक्रॅफ्ट बघुया जरा”. समोरच्या बाजूला ओळीने उभ्या असलेल्या दुकानांकडे निशाने बोट दाखवलं आणि रस्ता ओलांडला.

“आई तू बस इथे बाकावर. येतोच आम्ही “. असं म्हणून राजेशही तिकडेच गेला.

राजेश आणि निशा आजुबाजुला फिरत होते, रस्त्यावर शॉपिंग करत होते. कमलाताई शांतपणे बाकावर बसल्या होत्या.

अर्धा तास घोडदौड करून झाल्यावर चेतन आणि घोडेवाला परत आले. त्याना परतलेलं बघुन राजेश आणि निशासुध्दा परत आले.

“किती झाले रे?” राजेशने विचारलं.

“पन्नास रुपये साहेब”. घोडेवाला म्हणाला.

राजेश चमकला. तिथे रेट तर शंभर रुपये लिहिला होता आणि हा अर्धेच मागतोय! फारसा विचार न करता राजेशने पन्नास रुपयाची नोट काढून दिली.

हिल स्टेशनचे लोक आदबशीर, हॉटेलचा मालक आदबशीर. सगळी कशी, ‘राजा माणसं’.अगदी ‘दिल खोलके’ देणारी. राजेश आणि निशा महाबळेश्वरवर खूष होते.

“डॅडी, वॉटरफॉल बघायला जायचं”? तिसऱ्या दिवशी सकाळी चेतन विचारत होता.

“आज आपण गोकर्ण महाबळेश्वरला जाऊया बाळ. तिकडे खूप जुन्या काळचं देऊळ आहे आणि पाच नद्यांचा उगम पण तिथूनच होतो.” हॉटेल रूम मधल्या टेबलाच्या खणातलं महाबळेश्वर गाईड चाळता चाळता राजेश म्हणाला.

राजेशने हॉटेलच्या फ्रन्ट डेस्ककडे गोकर्ण महाबळेश्वरला जाण्याच्या रस्त्याची नीट चौकशी केली आणि मंडळी निघाली.

गोकर्ण महाबळेश्वरला देवळाच्या जवळ आल्यावर राजेशला तिथली पार्किंगसाठी ऐसपैस जागा आणि गर्द सावली बघुन बरं वाटलं. देवळाच्या वाटेवर दुतर्फा लावलेली हँडिक्रॅफ्टची दुकानं पाहून निशा खुष झाली.

राजेशने गाडी नीट सावलीत पार्क केली. सर्वजण खाली उतरले. छोटा चेतन उड्या मारायला लागला. निशाने चेतनचा हात धरला आणि ती देवळाच्या दिशेने पहात म्हणाली, “बऱ्याच पायऱ्या दिसतायत वर देवळाकडे जायला”.

राजेश म्हणाला, “अरे हो. खरंच की. आई, तुला कठीण पडेल एवढं वर चढायला आणि उतरायला. इथेच सावलीत बसायचंय का बाकावर तुला! छान गार वाटतंय इथेही.”

“होय बाबा, इथेच बसते मी.” कमलाताई बाकावर विसावत म्हणाल्या.

एक वयस्करसा दिसणारा, पार्किंग लॉट अॅटेंडंट पार्किंग स्लिप फाडत तिथे आला. जवळ आल्यावर सर्वांना नमस्कार करून राजेशला त्याने स्लिप दिली. राजेश पैसे देता देता त्याला म्हणाला, “आम्ही देवळात जाऊन येतोय, आई बसतील तोपर्यंत इथे बाकावर. चालेल नं”.

मनुष्य जरा हसला आणि म्हणाला, “अगदी काही काळजी करू नका, केतकर साहेब.”

“केतकर साहेब?” याला माझं नाव कसं माहिती? की हॉटेलवाल्यानी पुढे कळवलंय फोन करून याना मी येत असल्याचं? राजेश विचार करु लागला. पण

a

राजेशला काही स्पष्टीकरण विचारण्याची संधी मिळण्याआधीच अटेंडंट नवीन आलेल्या दुसऱ्या गाडीकडे निघून गेला आणि तो विषय तसाच राहिला.

राजेश, निशा आणि चेतन असं त्रिकोणी कुटुंब देवळाच्या पायऱ्यांकडे चालू लागलं आणि कमलाताई बाकाला मागे टेकून रिलॅक्स झाल्या. डोळे मिटले. मनात आठवणींच्या लाटां मागून लाटा येत होत्या, कमलाताई त्यांना निग्रहाने बांध घालत होत्या. खरं तर आयुष्यातलं ते पर्व संपलं होतं, वाई मधल्या माणसांची नाती, तो जिव्हाळा, हा भूतकाळ होता आणि मुंबईकरांशी अजून खेळ जमत नव्हता.

कमलाताईनी डोळे मिटून घेतले. मधुन अधुन वाऱ्याच्या झुळुका येत होत्या. छान वाटत होतं. तेवढ्यात एक अलिशान गाडी पार्किंग लॉट मधे येऊन थांबली. कमलाताईंनी डोळे किलकिले केले. माणसं गाडीतून उतरली. चार जणांचं कुटुंब होतं. मजेत, गप्पा मारत मंडळी देवळाकडे चालली होती.

“केतकर बाई?” कोणी तरी जवळच उद्गारलं. कमलाताईंनी आपलं नाव ऐकल्यावर डोळे उघडले. त्या सावरून बसल्या. त्या ग्रुपमधलाच एक उंचसा, थोड्या विरळ केसांचा मध्यमवयस्क गृहस्थ कमलाताईंच्या समोर उभा होता.

कमलाताई उभ्या राहिल्या. चष्मा सारखा करत त्या म्हणाल्या, “अं! ओळखलं नाही मी”.

गृहस्थ हसला. “बाई, मी दीपक देशमूख. तात्यासाहेबांचा दिपू”.

कमलाताई दिलखुलासपणे हसल्या. वाईला तात्यासाहेब देशमुख केतकरांचे शेजारी. दोन कुटुंबांचा अतिशय घरोबा. तात्यासाहेबांच्या प्रेरणेनेच केतकरांनी वाईला नूतन हायस्कूलचे रोपटे लावले आणि पुढे त्याचा वृक्ष झाला.

तात्यासाहेबांचा दीपक राजेश पेक्षा सात आठ वर्षांनी मोठा. दीपक लहानपणापासूनच अभ्यासात खूप हुशार आणि बाईंचा अतिशय लाडका शिष्य. पुढे कॉलेज शिक्षणासाठी दीपक बाहेर गेला, तात्यासाहेब कोल्हापूरला गेले आणि मग केतकर कुटुंबाचा देशमुख कुटुंबाशी काही संबंध राहिला नव्हता.

एकदा ओळख पटल्यावर कमलाताईही जरा मोकळ्या झाल्या. दीपक ने आपल्या बायकोची, मुलाची, बाईंशी ओळख करून दिली. गप्पा रंगल्या.

राजेश, निशा आणि चेतन देवदर्शन करून आले. निशाने लांबूनच कमलाताईंबरोबरचा" लोकांचा घोळका बघितला आणि ती राजेशला म्हणाली, "आता यांनी कोण मित्र मंडळी जमवलीत इथे?"

राजेशने जरा निरखून पाहिलं.

राजेश चपापला. "अगं हे तर इंडस्ट्रियालिस्ट डी पी देशमुख दिसतायत. पण आई बरोबर काय गप्पा मारतायत सगळे?"

कमलाताईंनी राजेशला जवळ आलेलं पाहिलं. कमलाताईंनी ओळखी करून दिल्या.

इतक्यात पार्किंग लॉट ॲटेंडंट दीपकला जवळ दिसला. "अरे श्रीधर, कसा आहेस?". दीपक ने हाक मारली आणि त्याला बोलावलं. ॲटेंडंट जवळ आल्यावर दीपकने त्याला हाताला धरून ओढलं आणि विचारलं, "अरे बघितलंस का कोण आलंय?"

श्रीधर म्हणाला, "हो, मी बघितलं बाईंना. खरं तर कालच मला बाबू शेलाराने फोन करून बाई महाबळेश्वरला आल्याचं सांगितलं होतं. आपल्या राजदीपच्याच हॉटेलात उतरल्यात म्हणाला."

a

राजेशच्या आणि निशाच्या डोक्यांत ट्यूब लाइट पेटली. गेल्या तीन दिवसांतल्या बऱ्याचशा घटनांचा संगतवार उलगडा व्हायला लागला होता.

दीपक सांगू लागला , "बरं का राजेश, मी बाईंच्या हाताखाली वाईला नूतन हायस्कूल मधे शिकलो, बोर्डाला पहिल्या दहात आलो. पण या श्रीधरची आणि बाबूची गोष्ट वेगळी आहे. बाईंच्या सद्भावना मंडळाने त्यांच्या कुटुंबाला वेळीच हात दिला होता आणि त्यामुळेच ही अशी सावरलेली कुटुंबं आज महाबळेश्वरात मानाने रहात आहेत."

दीपक पुढे म्हणाला, "आम्ही येतो दहा मिनिटांत देवदर्शन करून. थांबाल नं तुम्ही? गप्पा मारत बसू नंतर".

राजेश ने होकारार्थी मान हलवली. दहा मिनिटे काय, डी पी देशमुखांशी गप्पा मारण्यासाठी दहा तास सुध्दा थांबायची राजेशची तयारी होती. राजेश आणि निशा, दोघंही कमलाताईंबरोबर तिथेच बाकावर बसले. का कोण जाणे, सर्वांनाच जरा अवघडल्यासारखं झालं होतं.

पंधरा वीस मिनिटांनी दीपक आणि त्याचे कुटुंबीय देवदर्शन करून परत आले.

"चला, तिथे स्वागत हॉटेलकडे आरामात बसूया" दीपक म्हणाला.

आता स्वागत हॉटेलमधे एका गोलाकार टेबलाभोवती मंडळी बसली होती. दीपकने सर्वांसाठी जूसची ऑर्डर दिली होती आणि आरामात जूसचे घुटके घेता घेता दीपक राजेशला विचारत होता. "हं, तर राजेश, मला सांग आता तुझ्या या मिश्र धातू प्रकल्पाबद्दल".

राजेश या संधीची वाटच पहात होता. आपल्या नव्या प्रॉजेक्टची पूर्ण माहिती राजेशने दीपकला दिली. दीपकही मन लावून ऐकत होता, मधे मधे प्रश्न विचारत होता, अशा तऱ्हेने एक तास केव्हाच निघून गेला.

शेवटी दीपकने मान डोलावली. "वाः, प्रॉडक्ट तर छान आहे. आमच्या डेअरी मशिनरी मधे आम्हाला अशाच धातूचं सिलिंडर पाहिजे आहे. आणि एक चांगली गोष्ट म्हणजे किंमतही माफक आहे. पण याच्यावर आधी सर्व प्रकारच्या चाचण्या करायला हव्यात आणि तज्ञांकडुन सर्टिफिकेट मिळायला पाहिजे. करून घेऊ आपण सगळं ते."

"पण त्याच्या आधी मला एका महत्त्वाच्या कामाबद्दल बोलायचंय." असं म्हणून दीपक कमलाताईंकडे वळला.

"बरं का बाई, आमच्या वसईच्या फॅक्टरीत आम्ही तिथलेच जवळपासचे कामगार कामावर ठेवलेले आहेत. त्यांच्या कुटुंबियांच्या सेवेसाठी आम्हाला सद्भावना सारखी एक संस्था स्थापन करायची आहे. बाई मदत कराल नं मला या कामात?" दीपकने कमलाताईना विचारलं.

"तुझ्या मनात नक्की काय करायचा विचार आहे ते तरी सांग!" कमलाताईनी दीपकला विचारलं.

दीपक बोलू लागला. त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळीच झळाळी दिसू लागली. "असं पहा बाई, आमच्या कारखान्यात आजूबाजूचे कामगार कामाला येतात. आमच्याकडे त्याना चांगलं ट्रेनिंग मिळतं, कँटीनमध्ये सकस आहार मिळतो. पण त्यांच्या कुटुंबियांचं काय? मुलांना शिक्षण, वडील माणसांना औषधपाणी,

गृहिणींसाठी लहान सहान गृहोद्योग असे उपक्रम मला तिथे हाती घ्यायचे आहेत. बाई, एक प्रति सद्भावना संस्था तिथे उभी करायची आहे."

कमलाताई ऐकत होत्या. थोड्या वेळाने त्या म्हणाल्या. "दीपक तुझी कल्पना फारच सुंदर आहे. पण हे सगळं व्यवस्थितपणे करायला आणि सुरळीत चालवायला तुला व्यावसायिक लोकांची गरज आहे. मी तिथे काय करणार?"

दीपकने समजावले, "बाई, खरं आहे ते. हे खटलं चालवायला व्यावसायिक संच तर असणारच. पण बाई, हे काम करतांना मानवी मूल्ये कटाक्षाने पाळावी लागणार, आणि यासाठी त्या सर्वांवर करडी नजर ठेवायला अनुभवी, संयमी आणि प्रेमळ व्यक्ती पाहिजे आहे."

थोडं थांबून दीपक म्हणाला, "बाई, कराल नं मदत आम्हाला. व्हाल ना या नव्या सद्भावना च्या विश्वस्त?"

"पण आईला जमेल का, तुम्ही म्हणताय ते काम करायला, एवढी मोठी जबाबदारी घ्यायला?" राजेशने जराशा साशंकतेनेच विचारले.

"अरे राजेश, तुझ्या मिश्रधातूप्रॉडक्टवर चाचण्या कराव्या लागणार आपल्याला, पण राजेश, तुमची आई म्हणजे खणखणीत बंदा रुपया आहे, बंदा रुपया." दीपक बोलला आणि खळखळून हसला.

कमलाताई खाली पहात होत्या. त्या विचारात गढल्या होत्या. दीपक कमलाताईंकडे आशेने पहात होता. सर्वचजण कमलाताईंकडे पहात होते. त्या गोल टेबलाभोवती बसलेल्या व्यक्तींच्या मनात वेगळ्या वेगळ्या विचारांचा कल्लोळ माजला होता. पण कमलाताईंच्या विचारांची साखळी कोणीही तोडली नाही.

a

थोड्या वेळाने कमलाताईनी मान वर केली. दीपककडे वळून त्या म्हणाल्या, "असं पहा दीपक, हे काम काही मला अवघड नाही. मात्र, काम करणारी टीम सक्षम असली पाहिजे आणि त्यांनी सकारात्मक साथ दिली पाहिजे."

दीपकला आनंद झाला. "बाई, मला वाटलंच होतं की तुम्ही मला साथ देणार. अगदी पूर्ण सहकार्य मिळेल तुम्हाला."

"चला, या आनंदाच्या प्रसंगी जूसची आणखी एक फेरी होऊन द्या." दीपक कमलाताईंना आणि नंतर राजेशला, जोरजोराने हस्तांदोलन करत म्हणाला.

शेजारून एक मंजूळ आवाज आला, "सासुबाई".

कमलाताईंनी हा आवाज पूर्वी कधी ऐकला नव्हता. कोणीतरी आपल्याला उद्देशून बोलतंय हे कळायला त्याना अर्ध्या एक मिनिटाचा अवधी लागला. पण मग मात्र निशाकडे वळून कमलाताई म्हणाल्या, "काय म्हणतेस निशा?"

"नाही, सासुबाई, मी काय म्हणतेय," पुन्हा तोच मंजूळ आवाज. "तुमच्या प्रॉजेक्टसाठी काही सॉफ्टवेअरची गरज पडली तर सांगा हं मला. ॲपेक्स सॉफ्टवेअर आपलं घरचंच आहे."

कमलाताई हसल्या. त्रिकोणी कुटुंबांचे आता चौकोनातच नव्हे तर लवकरच पंचकोनात, षट्कोनात रूपांतर होणार या कल्पनेने मनोमन सुखावल्या.

-----X-----

# २

## साक्षात्कार

“केसोळी गाव, बरंका, अगदी डोंगराच्या कुशीत वसलेलं आहे. पुढे पठार आणि नंतर खोल दरी. तिथेच पुढे हा धबधबा आहे. निसर्गरम्य ठिकाण आहे अगदी. आपल्या हायकिंग ट्रिपला झकास.” साठे उत्साहाने बोलत होता.

दिवसभर सतत कामाचा पाठपुरावा करत असलेल्या मेन्टेनन्स मॅनेजरना लंच ब्रेकमधेच तेव्हढा एकत्र बसून गप्पा टप्पा मारायचा चान्स मिळत असे. पण गेला महिनाभर कंपनीत वार्षिक ओवरहॉल चालू होतं. कामाच्या रामरगाड्यात गळ्यापर्यंत गुंतलेलं असताना गप्पा टप्पा तर राहोच पण कधी कधी लंचसाठी ब्रेक घेणंही या मॅनेजर मंडळीना दुरापास्त व्हायचं. आत्ता कुठे त्या चक्रातून जरा सुटका झाली होती. श्वास घ्यायला फुरसत मिळाली होती. आणि त्यामुळेच जेव्हा साठेने हायकिंग ट्रिपला जाण्याचा विषय काढला तेव्हा या सळसळणाऱ्या रक्ताच्या सर्वच मंडळींनी कान टवकारले होते.

“अरे पण या केसोळीला जायचं कसं?” संजीव पत्कीने विचारलं.

“आसनगावपर्यंत लोकलनी जायचं. दीड तासाचा प्रवास आहे. मग पुढे डोंगरातल्या पायवाटेने रमतगमत जायचं. तासाभरात पोहोचू केसोळीला.” साठे सांगू लागला. “जेऊया तिथे. पोटभर, निसर्ग दर्शनाचा आनंद लुटुया आणि अंधार पडायच्या आत डोंगर उतरूया. सातला गाडी आहे आसनगाव वरून “.

“साठे, अगदी पूर्ण अभ्यास केलेला दिसतोय”. संजीव म्हणाला.

a

“अरे माझा ड्रायव्हर रामचंद्र तिकडच्याच कुठल्यातरी गावातला आहे. त्यानेच माहिती पुरवली सगळी.” साठेने कबुली दिली.

“पण, अरे, म्हणजे अगदीच थोडा वेळ असणार आपण तिथे.” मोहन राव उद्गारला, “इतकं निसर्गरम्य ठिकाण असेल, तर एखादा दिवस राहू या की तिथे”.

“छे, छे. रहाण्या बिहिण्याचा विचार नका आणू मनात,” साठेने खोडून काढलं. “तिथे काहीच सोय नाही “.

एक साठे सोडला तर ग्रुप मधल्या इतर मंडळींची ग्रामीण जीवनाशी तोंडओळख यथा तथाच होती. पूर्ण जन्म मेट्रो सिटी मधे काढलेल्या या मंडळींची, ग्रामीण भाग म्हणजे भरपूर सृष्टी सौंदर्य, शुद्ध हवा आणि ‘अवे फ्रॉम इट ऑल’ एवढीच सोईस्कर कल्पना होती.

“तिथे जास्त वेळ काढणं शक्य नसेल तर निदान खूपसे चांगले चांगले फोटो तरी काढू या.” संजीवने सूचना केली. “ कॅमेरा बरोबर घ्या चांगला. मोबाइलची फोटो कला अपुरी पडते बऱ्याच बाबतीत.”

संजीवची सूचना सगळ्यानाच पटली.

नंतरच्या दोन चार दिवसात लंच ब्रेक मधे हायकिंग ट्रिप बद्दल आणखी चर्चा झाली. निष्णात इंजिनियर मंडळीनी आपापल्या परीने डीटेलिंग केलं. रविवार तारीख पंधरा चा दिवस नक्की ठरला. कोणी काय आणायचं याची वाटणी झाली. बरेच दिवस कपाटाच्या खाली किंवा एका कोपऱ्यात सारून दिलेले हायकिंग शूज, काठ्या बाहेर आले. बॅक पॅकस् वरची धूळ झटकली गेली. डोंगर चढण्याचा स्टॅमिना आजमावण्यासाठी काही जणांनी सकाळी जॉगिंग आणि व्यायाम सुरु केले.

सगळ्याच टीम मेम्बरस्ना तयारी परफेक्ट व्हायला हवी असं वाटत होतं, नव्हे ती एक ईर्षाच होती.

“कॅमेरॅचं जमलं का?” संजीवने पुन्हा आठवण करून दिली.

सगळेच जण एकमेकांची तोंडं बघायला लागले. सेल फोन फोटोग्राफीच्या दिवसात कॅमेरा ही संस्था पूर्ण अस्तंगत जणू झाली होती.

“अरे साठे, मागच्याच महिन्यात युनिट ओवरहालिंगचं रेकॉर्ड ठेवण्यासाठी तुम्ही मेकॅनिकल वाल्यांनी नवा कॅमेरा घेतलाय नं?” मोहन रावने आठवण करून दिली.

“हो, घेतलाय. पण त्याचा काय इथे संबंध?” साठेचं तिरसट प्रत्युत्तर.

“अरे मेकॅनिकलचा विभाग प्रमुख म्हणून तुझ्याच नावावर इश्श्यू केला असणार. एका रविवारचाच प्रश्न आहे. सोमवारी परत आणणार आहोत आपण”. मोहन रावचा युक्तिवाद.

दिलीप साठेला ही कल्पना तेवढी पसंत नव्हती. “अरे सत्तेचाळीस हजाराचा एसेलार कॅमेरा आहे तो. काही झालं तर भरपाई करावी लागेल”.

पण शेवटी सर्वाग्रहाला मान देऊन कॅमेरा सोबत घेतला गेला होता आणि मंडळी हायकिंग ला निघाली होती.

सह्याद्रीचाच एक भाग असलेल्या नरसोबाच्या डोंगराने आपलं वेगळेपण राखून ठेवलं होतं. निसर्गाने सौंदर्याची अफाट देणगी त्या परिसराला दिली होती. शहरीकरणाचे वायू त्या दुर्गम कोपऱ्यात अजुन पोहोचले असोत वा नसोत, स्थानिक लोकांना कशाचंच काही वैषम्य वाटलेलं दिसत नव्हतं.    थोड्या कुतुहलाने पण

दुरूनच हाताचा कवडसा करून एक नजर फिरवण्या व्यतिरिक्त या शहरी वाटसरूंकडे कोणी फारसं लक्ष दिलं नव्हतं, कोणी अनाहूत विचारपूस करायला आलं नव्हतं, ना कुणी अन्नाची किंवा कशाचीही भीक मागायला हात पसरला होता. तुम्ही बरे, आम्ही बरे, अशी विचारसरणी वाटली.    आणि त्या दूरच्या कोपऱ्यातही अख्ख्या देशाला एकत्र जोडणारा, मन अचंबित करून सोडणारा एक दुवा आपल्या शहरी पाहुण्यांना सापडला होता. नरसोबाच्या डोंगराच्या पठाराच्या मध्यभागी, नयनमनोहर धबधब्यापासून एका हाकेच्या अंतरावर, झाडाच्या वाकड्या तिकड्या तीन काटक्या जमिनीत खुपसून सात आठ पोरं तन्मयतेने क्रिकेटचा खेळ खेळत होती. म्हटलं तर क्रिकेट, म्हटलं तर बॅट-बॉल. दोन्ही एकमेकांचे सख्खे कजिन ब्रदर.

"विटि दांडू पासून क्रिकेटकडे उत्क्रांती झालेली दिसते". जरा छद्मीपणे किंवा एका त्रयस्थ पातळीवरून मोहन रावने उद्गार काढले.

"कसली रे उत्क्रांती? पोरं आहेत की वानरं, हे ही कळत नाही." संजीव पत्कीचा चेष्टेचा सूर.

"असंस्कृत समाजाला सुसंस्कृतीचं ठिगळ". संदीप जावडेकरने आणखी तारे तोडले.

खेळणाऱ्या मुलांना मात्र बॅट बॉल आणि काटक्या रूपी स्टम्प्स याव्यतिरिक्तं कुठेही लक्ष द्यायला वेळ नव्हता.

पाहुण्यांना समोरच एक प्रशस्त वृक्ष दिसत होता. तिथे गर्द सावलीत मुक्काम ठोकायला सर्वांचीच मूक संमती पुरेशी होती.

"काय दाट सावली आहे या झाडाची!" मोहन रावने उद्गार काढले.

a

"औदुंबर वृक्ष आहे हा. साक्षात्कार होतात याच्याखाली बसलं तर". साठेने माहिती पुरवली. सगळेच मनमोकळेपणे हसले.

जेवणानंतरची विश्रांती आटोपून इकडेतिकडे पहात, रमतगमत, काठ्या आपटत, बुटानी खडे लाथाडत मंडळी पुढे पठाराच्या कडेपर्यंत पोहोचली, आणि एका बेसावध क्षणी साठेचा पाय घसरला. पार तोल गेला. भक्कम आधाराच्या शोधात साठेचे हात हवेत उडाले. पाण्याची बाटली, बॅग पॅक, कॅमेरा सगळया गोष्टी चार दिशांना उधळल्या गेल्या. साठेने जमिनीवर जोरात बसकण मारली आणि त्या उतारावर आणि ओलसर गवतावर घसपटत साठे पाच सेकंदांच्या आत, पठाराच्या अगदी कडेवर येऊन पोहोचला.

काही घटना अशा निमिषार्धात घडतात की त्यांच्या आवेगावर कुठल्याही प्रकारे लगाम घालणं शक्य होत नाही. आरडाओरडा करत, उतारावर घसपटत चाललेल्या साठेकडे सगळेचजण जागेवरच खिळून, स्तंभित होऊन पहात राहिले. तेवढ्यात कसाबसा एका झाडाचा आधार घेऊन साठेने आपली घसरंपट्टी थांबवली खरी, पण पुढे जाऊन त्याच्यापर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याची कोणाचीही हिम्मत होईना. काय करावे ते सुचेना.

आणि पुढच्याच एका मिनिटात क्रिकेट खेळणारी वानरसेना तिथे हजर झाली. साठेच्या उघड्या पडलेल्या बॅक पॅक मधुन डोकावणारा दोर एकाने काढून आपल्या कंबरेला बांधला. दोराचे दुसरे टोक मुलांनी साठेकडे फेकले, आणि मग पुढच्या पाचच मिनीटात सावकाशपणे ओढत साठेला सुखरूप ठिकाणी आणून बसवले.

a

सगळयांच्याच जिवात जीव आला. इतस्तत: पसरलेल्या वस्तू सर्वांनी जेमतेम बॅगांमधे भरल्या. साठेला वॉटरबॅग मधुन पाणी ओतून प्यायला दिलं आणि त्याला कुठे गंभीर जखम झाली नसल्याची खात्री करून घेतली. मदत करणारी मुलं आता थोडी लांब सरकली आणि पाहुण्यांना आणखी काही मदत लागेल का याचा अंदाज घेऊ लागली. साठे जरासा लंगडत होता. त्याला संभाळत खाली जायला जास्त वेळ लागणार हे उघड होतं. त्यामुळे तिथे वेळ घालवण्यात काही अर्थच नव्हता. गडबडीने पाहुणे मंडळींनी बॅगा गळयात अडकवल्या आणि निसर्गरम्य दृश्यांकडे पाठ फिरवून सावध पणे डोंगर उतरायला सुरुवात केली.

गाडीत बसल्यावर सगळयानीच हुश्श्य केलं आणि आपापल्या परीने, जमेल त्या पद्धतीने, देवाचे आभार मानले. साठेही जरा सावरला होता. त्याच्या तोंडून शब्द फुटायला लागले होते. कसलीशी आठवण होऊन साठेने आपली बॅक पॅक जवळ ओढली आणि प्रथम एका हाताने आणि नंतर दोन्ही हात आत घालून तो बॅगेचे सगळे खण चाचपून बघायला लागला. सर्वचजण साठेकडे पहात होते. साठे काय शोधतोय ते सगळयांच्याच ध्यानात यायला लागलं होतं. लवकरच साठेची शंका खरी ठरली. बॅगेतले हात बाहेर काढून हताशपणे साठे म्हणाला, “कॅमेरा दिसत नाही माझ्या बॅगेत. कुणाच्या बॅगेत आलाय का पहा जरा!”

सर्वांनी आपापल्या बॅगा चाचपल्या. कॅमेरा कोणाच्याच बॅगेत नव्हता. सुखरूप परत चालल्याच्या आनंदाला परत विरजण पडलं.

घरी पोचल्यावर, रात्री, विलक्षण थकव्यामुळे दिलीप साठे गाढ झोपला खरा, पण दुसऱ्या दिवशी डोळे उघडल्यापासूनच कॅमेऱ्याची आठवण त्याला सतावायला लागली.

अंग थोडं ठेचाळल्यासारखं झालं होतं पण जास्त दुखत नव्हतं. चहा, आंघोळ आटोपून साठे ऑफिसला जायला तयार झाला. ड्रायव्हर रामचंद्र आला. गाडी काढली. आज रोजच्यापेक्षा तब्बल दहा मिनिटे उशीर झाला होता. गाडी हायवेला लागल्यावर रामचंद्रने चौकशी केली, "साहेब कशी झाली ट्रिप तुमची?"

"बरी झाली". त्रोटक उत्तर. विषय तिथेच संपला.

लंच टेबलवर आल्यावर कुजबुजत साठेनं विचारलं, "काय रे, मी पडलो तेव्हा कॅमेरा दरीत फेकला गेला असेल का?"

"शक्यच नाही. दरी जराशी लांबच होती." संजीव पत्की लगेच म्हणाला.

"मला वाटतं, हातातून उडुन तिथल्याच गवतात कॅमरा पडला असणार". मोहन रावचा तर्क.

"तसं असेल तर दोन शक्यता आहेत." साठेने चर्चेचे समालोचन केले. "एक तर तिथे गवतात अजूनही पडला असेल किंवा त्या बॅट बॉल खेळणाऱ्या पोरांपैकी कुणी हडपला असेल."

समालोचन तर्कशुद्ध असल्यामुळे सर्वांनीच माना डोलावल्या.

"तिकडे कोणालातरी कॉन्टॅक्ट केल्या शिवाय खरं काय ते कळणार नाही." मोहनचं म्हणणं.

"अरे पण कसं आणि कोणाला कॉन्टॅक्ट करणार?" संजीवने मुद्दा काढला. "त्या खेळणाऱ्या मुलांनी आपल्याला मदत केली पण आपण त्यांची नावंही विचारली नाहीत की धड आभारही मानले नाहीत. "

"सत्तेचाळीस हजारांचा फटका बसतोय नं त्यामुळे". साठे विव्हळला.

लंच ब्रेक संपला आणि मंडळी आपापल्या कामाला गेली.

संध्याकाळी घरी जाताना, ट्रॅफिक मुळे गाडी अगदी सावकाश चालली होती. रामचंद्र ड्रायव्हर गप्पांच्या मूडमध्ये होता.

“साहेब, आमचा मुलुख आवडला की नाही आपल्याला? केसोळीच्या दोन कोस पुढे आहे आमचं पिरंगुळं गाव. तिथपर्यंत नसाल गेलात आपण”. रामचंद्र आदबशीरपणे विचारत होता.

साठेच्या मनात आशा पालवली. “केसोळीला कोणाची ओळख आहे का रे रामचंद्र?”

“आता कुठली हो कुणाची ओळख? खूप वर्षं झाली मला गाव सोडल्याला. त्या वेळी आमची टीम चँपियन होती. “रामचंद्र सांगत होता.” क्रिकेटचं फार वेड तिथं सगळयाना. केसोळी, पिरंगुळं आणि चाकोती, तिन्ही गावात अटीतटीच्या क्रिकेट मॅच व्हायच्या आणि चँपियन टीम नुसता दंगा धुडगुस घालायची. फार धमाल उडवायचे आम्ही”.

रामचंद्र जुन्या आठवणींनी रंगात आला होता, पण साठेला त्यात फारसं स्वारस्य नव्हतं. बॅट-बॉल खेळणाऱ्या त्या चमूला टीम म्हणण्याची कल्पनाही साठेला वेडगळपणाची वाटत होती.

दिलीप साठे घरी आला. हात पाय धुतले आणि विषण्णपणे बसला. कपातला चहा निवून गेला. बिस्कीटांचा तुकडाही मोडला गेला नाही. एकूण प्रकरणाचा सुखांतिकेत शेवट होण्याचं कुठलंही चिह्न साठेला दिसेना. हरवलेल्या कॅमेऱ्याची भरपाई तर करून द्यायलाच लागणार होती, आणि तीही काही बोभाटा होण्याच्या आत, अगदी पंधरा दिवसात.

कसे उभे करायचे सत्तेचाळीस हजार! फ्लॅटसाठी बिल्डर ला देण्याच्या सव्वा लाखाच्या मासिक हप्त्याची तरदूत तर झाली होती. त्यातलेच तूर्त काढावेत, की बॅन्केच्या फ्लेक्सी अकाऊंट मधून ओव्हर ड्रॉ करावे, की कार्ड पेमेंट करून आजचे मरण उद्यावर ढकलावे? काही निर्णय होईना.

जेवतानाही मनात तेच विचार. भात भाजी चिवडली, थोडी खाल्ली. रेखाच्या काही प्रश्नांकडे दुर्लक्ष केले, काहीना तिरसटपणे उत्तरं दिली. अशी अस्वस्थ संध्याकाळ कशीबशी पार पडली. रात्र तळमळतच गेली. सगळीकडूनच कोंडमारा.

दुसऱ्या दिवशी लंच टाईम मधे पुन: अनौपचारिक बैठक भरली. साठेला कशाही प्रकारे मदत करण्याची सर्वांचीच तयारी होती, पण योग्य दिशा सापडत नव्हती.

संजीव पत्कीने घसा खाकरला. "मला वाटतं, त्या बॅट-बॉल खेळणाऱ्या मुलांपैकीच कोणाकडे तरी कॅमेरा असणार. आपल्याला तो मुलगा शोधुन काढावा लागेल आणि मग काहीतरी बारगेन निगोशिएट करायला लागेल."

"स्पष्ट सांग जरा, संजीव". साठे म्हणाला.

"असं पहा", संजीव स्पष्ट करून सांगू लागला. "आपल्याला त्या मुलांना धाक दपटशा देऊन तर काही उपयोग नाही. मधाचं बोटंच लावावं लागेल. त्याना पटवून द्यायचं, की कॅमेरा ही काही रोजच्या उपयोगातली गोष्ट नाही. त्याचबरोबर त्याना एखाद्या चांगल्या उपयोगी गोष्टीची लालुच दाखवायची. जास्त महागड्या नाही, साधारण किमतीच्या. अशी एक विन विन सिच्युएशन तयार करायची की त्यानी आपली ऑफर स्वीकारायलाच पाहिजे." संजीवचं मॅनेजमेंट सोल्यूशन.

एक दोन मिनिटं विचार केल्यावर सगळयानाच वाटलं, की हाच एक रामबाण उपाय होऊ शकेल.

मग चर्चा सुरु झाली. परवडणाऱ्या किंमतीत कोणत्या उपयुक्त गोष्टी येऊ शकतील, याची.

मोहन रावने लगेच सुचवले, “पाचशे जीबी चा लेटेस्ट पेन ड्राईव्ह पाहिला मी परवा. आठशे सत्तर किंमत आहे. त्याचबरोबर एक ऑफ-लाईन बॅटरी-चार्जरही इन्क्लूडेड आहे. सर्व मिळून हजार पर्यंत जाईल.”

संजीव पत्की म्हणाला “आठशे वीसला एक लेटेस्ट ज्यूसर मिक्सर पाहिला मी. सायट्रस फ्रुट ची पण ॲटॅचमेंट आहे त्याला.”

साठेला आठवलं, “लाइफस्टाईल मधे एक छत्तीस पीसेस चा कटलरी सेट आणि सहा मेलामिन प्लेट्स असं कॉम्बिनेशन पाहिलं मी नउशे सत्तावीस ला. गुड बारगेन.”

चर्चा चालली होती. प्रॉब्लेमच्या गाडीला, चार सशक्त हात त्यांच्या परीने, सोल्युशनच्या दिशेने ढकलत होते.

चर्चेतून अगदी काही ठोक निष्पत्ती त्यावेळी तरी होऊ शकली नाही. पण आपण योग्य दिशेनं पावलं टाकतोय या विचारानेच अर्धं दडपण उतरलं.

संध्याकाळी संजीव पत्की आणि साठे एकत्र घरी परतत होते. रामचंद्र गाडी चालवत होता.

संजीव म्हणत होता, “दिलीप, आपण असं करू. या रविवारी आपण केसोळीला जाऊ. आणि जसं दुपारी ठरवलं होतं, त्याप्रमाणे आपल्या बरोबर एक

कटलरी कॉम्बो, एक ज्यूसर, एक नवा पेन ड्राईव्ह आणि चार्जर सेट अशा दोन चार वस्तू घेऊन जाऊ. एक हजार पर्यंत बजेट ठेवायचं. सत्तेचाळीस हजाराचा कॅमेरा सोडवून घ्यायचाय. आणि हो, परतीच्या बोलीने आणू सगळया गोष्टी. फॉरेन सारखं इथेही चालतं हल्ली, आठवड्याच्या आत परत करू. "

साधक बाधक चर्चा झाली. संजीवचं घर आलं. संजीव उतरून गेला.

"साहेब रविवारी परत केसोळीला जाणार का तुम्ही?" रामचंद्राने चाचपडले. "काही हरवलंय का मागच्या ट्रिपमधे?"

मनाच्या त्या विमनस्क अवस्थेत साठेने रामचंद्राला त्रोटकपणे आपला प्रॉब्लेम सांगितला. "आलं लक्षात," अशा अर्थाची रामचंद्राने मान डोलावली.

साठेचं घर आलं. खाली उतरून रामचंद्राने नेहमीप्रमाणे गाडीचा दरवाजा उघडला. रामचंद्राने अदबीने साठेला विचारलं, "साहेब रविवारी मी येऊ तुमच्या बरोबर केसोळीला? कित्येक वर्षांत गावाकडे गेलो नाही मी, आणि साहेब काही सामान वगैरे उचलायचं असेल तर मदत करीन ना मी."

"ठीक आहे". साठेने मोघमपणे उत्तर दिलं.

रविवार आला आणि परत एकदा हायकिंग क्लबचे मेम्बर आणि रामचंद्र ड्रायव्हर, भल्या सकाळी केसोळीला निघाले.

आता काय, वाट पायाखालची झाली होती आणि त्यामुळे चालण्यात, बोलण्यात आणि एकंदर प्रवासात सरावाचा सहजपणा आला होता. तरीसुद्धा डोंगर चढून केसोळीला पोहोचेपर्यंत शहरी मंडळींची चांगलीच दमछाक झाली होती.

रामचंद्राचं गावरान पाणी त्यातल्या त्यात वेगळं दिसतच होतं. आणखी दोन चारदा डोंगर चढायचा दम असल्याइतपत फ्रेश तो दिसत होता.

केसोळी गाव जवळ आलं. ओळखीचा औदुंबर वृक्ष समोर दिसू लागला. औदुंबराच्या छायेत सर्वांनी बसकण मारली, सामानाच्या पिशव्या, बॅक पॅक खाली ठेवले आणि सगळेच जण घटा घटा पाणी प्यायले. जेवणाचे डबे, पाण्याच्या बाटल्या, तसंच, ज्यूसर, मेलामिन डिशेस असं बरंचसं वजन वर पर्यंत वाहून आणलं गेलं होतं. सकाळची तुटपुंजी न्याहरी केव्हाच भूतकाळाचा भाग झाली होती. सगळयांच्याच पोटातले कावळे मोठ्याने ओरडून शरिराच्या थकव्याची ग्वाही देत होते.

दिलीप साठेने विचारांना वाचा फोडली. "इथपर्यंत आलो तर खरे, पण पुढचा ॲक्शन प्लॅन काय? खेळणाऱ्या मुलांशी निगोशिएट करायचंय , पण इथे तर कोणीच दिसतात नाही. मुलं काय, माणसं काय, एखादं कुत्रंसुध्दा आसमंतात दिसत नाही."

"साहेब तुम्ही विश्रांती घ्या जरा. जेवण पण करून घ्या, मी बघतो जरा गावात". असे म्हणून, आपली पिशवी उचलून रामचंद्र समोर दूरवर दिसणाऱ्या कौलारु घरांच्या दिशेने चालू लागला.

डबे उघडले गेले. भाज्या, उसळी बरोबरच सांबाराचा मसालेदार वास आणि साजुक तुपातल्या शिऱ्याचा वास, एकात एक मिसळून हातात हात अडकवून औदुंबराच्या झाडाभोवती फेर मारू लागले. मांडी ठोकून सगळी मंडळी बसली आणि पुढच्या अर्ध्या-पाऊण तासात, फक्त भुरके मारून जेवण्याचा आवाज तिथल्या नीरव शांततेचा भंग करत होता.

तोंडाला लावलेली पाण्याची बाटली संजीवने खाली ठेवली.

तोंड नॅपकिनला पुसत संजीव म्हणाला, “चला आपणही गावाकडे जाऊ या का? जरा दोन चार ठिकाणी विचारावं लागेल, पण काहीतरी सुगावा लागेल.”

“सगळेचजण एकत्र राहूया. चोरांची रिॲक्शन काय होईल ते सांगता येत नाही.” मोहन रावने सूचना केली.

सगळेच जण चरकले. गावकऱ्यांबरोबरची बोलणी हाणामारी पर्यंत जाऊ शकतील ही कल्पना मोहनच्या सूचनेतून डोकावत होती. उचललेल्या पिशव्या, बॅगा परत खाली ठेवल्या गेल्या. पाण्याच्या बाटल्या काढून परत मंडळी ढसाढसा पाणी प्यायली.

“अरे, तो बघा रामचंद्र येतोय”. साठेने गावाकडे बोट दाखवलं.

“हातात काळं काय आहे त्याच्या? “ संजीव डोळे बारीक करून निरखून पहात होता.

अर्ध्या पाव मिनीटात रामचंद्र जवळ आला.

“साहेब हा घ्या तुमचा कॅमेरा. बरोबर आहे नं”? रामचंद्राने साठेसाहेबांच्या हातात कॅमेरा ठेवला.

“काय, कॅमेरा मिळाला? कुठे होता? कोणाकडे होता? कसा मिळाला तुला?” रामचंद्रावर प्रश्नांना भडिमार झाला. या भडिमाराने रामचंद्र गांगरल्यासारखा झाला.

साठेने कॅमेरा हातात घेतला, वरून खालुन पारखून पाहिला आणि आपलाच असल्याची खात्री करून घेतली.

“रामचंद्र, जेऊन घे आधी “. साठे म्हणाला.

a

“जेवलो साहेब गावातच. इथला सरपंच माझ्या जुन्या ओळखीचा निघाला. मी गेलो तर जेवायला बसत होता. मलाही मग हात धरून जेवायला बसवलं”. रामचंद्रने सांगितलं.

“आणि हा कॅमेरा! तो कुठे मिळाला तुला?” साठे ने विचारले.

“अहो साहेब, ज्या पोरानं तुम्हाला वर ओढून काढलं नं, त्यालाच तुमचा कॅमेरा सापडला होता. त्याने त्याच्या कॅप्टनकडे दिला. तुमचं नाव, पत्ता काहीच माहिती नव्हतं. ते तरी तुम्हाला कुठे शोधणार? तुम्ही परत याल तेव्हा देऊ म्हणून ठेवून दिला. तुम्ही मला जे काही सांगितलं त्यावरून मला अंदाज आला होता की असंच काहीतरी झालं असेल म्हणून.” रामचंद्र सांगत होता.

रामचंद्राने बाटली उघडून पाण्याचा एक घोट घेतला आणि तो पुढे सांगू लागला. “सरपंचाकडे बसलो, थोडं खाऊन हात धुतल्यासरशी कॅप्टनला बोलावलं तिथंच. दोन मिनिटांत आणून दिला कॅमेरा त्यानं”. रामचंद्रने समग्र माहिती पुरवली.

“पण असाच दिला कॅमेरा त्यानं? काही मागितलं नाही त्याच्या बदल्यात?” संजीवने विचारलं.

“अहो साहेब, कसलं बदल्यात घेऊन बसलात? योग्य माणसाला त्याची वस्तू परत मिळाली याचाच आनंद झालाय त्याना. आणि साहेब तुमच्याकडून, आभार मानायला म्हणून, मी त्या पोराला आणि टीमच्या कॅप्टनला सचिनचे दोन मोठे पोस्टर्स दिले, भिंतीवर लावायला. असे खूष झालेत सगळे, साहेब, तुमच्यावर! तिकडे बघा, अख्खी टीम उभी आहे गावाच्या बाहेर. संकोच वाटतोय त्याना जवळ यायला”. रामचंद्र सांगत होता.

गावाच्या दिशेला सगळयानी नजर फिरवली, आणि खरोखरच, रामचंद्र सांगत होता त्याप्रमाणे अर्ध्या चड्डीतली, फाटके, मळके शर्ट घातलेली आठ दहा मुलं रांगेत उभी होती आणि पाहुण्यांकडे पाहात जोरजोराने हात हलवत होती.

पाहुणे मंडळी मंत्रमुग्ध होऊन पहातच राहिली.

एकंदर परिस्थिती नीट समजून घेण्यातली आपली असमर्थता, परिस्थिती हाताळण्यातला असंमजसपणा, साध्या ग्रामस्थांना राक्षसांचे बेगडी मुखवटे लावण्याचा खोटा अट्टाहास, या कशाचाच जे दृश्य समोर दिसत होते त्याच्याशी मेळ बसेना. औदुंबराच्या छायेत हा एक नवाच साक्षात्कार शहरी पाहुण्यांना होत होता.

"साहेब, तेवढे चाळीस रूपये द्याल ना, दोन पोस्टरचे". रामचंद्र हळुच साठेला सुचवत होता.

----X---

# ३

# एका दगडात तीन पक्षी

सकाळची आठ सव्वा आठची वेळ. भावे साहेब मेन्टेनन्स वर्कशॉप मधे एका वर्कबेंचला रेंगसून उभे होते. त्यांच्या आजूबाजूला कामगारांची, सुपरवायझर लोकांची नेहमीचीच सकाळची लगबग, गडबड चालू होती. काही कामगार लॉकर रूम मधे कपडे बदलत होते, काहीजण आपल्या टूल बॅग तपासून पहात होते, काही फिटर्स आपल्या हेल्परला कामाविषयी सूचना देत होते तर काही जण काही-बाही गोष्टी शोधत इकडे तिकडे फिरत होते.

वरुन कंट्रोल रूम कडून डिफेक्ट नोट्स चा एकत्रित जुडगा आला होता आणि सर्वांना ज्यांच्या त्यांच्या कामाच्या विभागणी प्रमाणे डिफेक्ट नोट्सचं वाटप करून झालं होतं. फिटर ग्रुप्स आणि त्यांचे सुपरवायझर आपापल्या डिफेक्ट नोट्स वाचून कामाचा अंदाज घेत होते.

पाच दहा मिनीटातच गलका कमी झाला. डिफेक्ट नोटवाल्या फिटर्सनी कामाचा अंदाज घेऊन मग त्यांच्या कामाला योग्य अशी स्पेशल टूल्स आपापल्या नावांवर इश्शयू करून घेतली. ज्यांची रूटीन कामं चालू होती त्यांनी एव्हाना खांद्यावर टूल बॅग टाकल्या होत्या. कामं सुरु करायची सगळ्यानाच आता घाई झाली होती.

आपली वर्क बेंचला रेंगसलेली पोज टाकून भावे साहेब ताठ उभे राहिले. भावे साहेबांनी एकदा घसा खाकरला आणि एक हात वर करून सगळ्यांना जवळ

बोलावलं. मंडळी थांबली. जवळ आली. सगळ्या मंडळीनी भावे साहेबांभोवती अर्ध वर्तुळ केलं आणि ते काय सांगतायत अशा अपेक्षेने त्यांच्याकडे सर्वजण पाहू लागले.

"ऐका रे सगळे", भावे साहेब म्हणाले, "आज सहाशे मेगावॅट यूनिट नंबर दोनचं कमिशनिंग आहे. आहे नं माहिती सर्वांना? नवीन युनिट अजून प्रॉजेक्ट ग्रुपच्या ताब्यात आहे, पण कंट्रोल रूम तर सामायिकच आहे नं! आज चीफ इंजिनियर साहेब स्वत: कट्रोल रूम मधे असणार आहेत. त्यांच्या हस्तेच बरोबर साडे बारा वाजता युनिट कमिशनिंग आहे. कंपनीच्या दृष्टीने आणि आपल्या राज्याच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची घटना आहे. तेव्हा सगळ्या मेन्टेनन्स ग्रुपनी काळजीपूर्वक काम करायचं आहे. बिनमहत्वाची कामं नाही हातात घेतली तरी चालेल पण युनिट कमिशनिंग मधे कुठल्याही तऱ्हेची बाधा येता कामा नये. सांगून ठेवतो."

सर्वाना कडक शब्दात सुनावणी देऊन भावे साहेब वर्कशॉप मधून निघाले. फोरमन गोविलकर बरोबर होतेच. बोलत बोलत दोघेही दरवाज्या पर्यंत पोहचले देखील. तेवढ्यात भावे साहेबांना काहीतरी आठवण झाली आणि जागीच थबकले.

"गोविलकर, देवराम कोठे आहे?" भावे साहेब किंचाळले.

"साहेब, आज देवरामला टूल्स कॅबिनेटचा चार्ज देऊन वर्कशॉपमधेच ठेवलंय मी." भावे साहेबांना आपल्या शांत सुरात गोविलकर आश्वासन देते झाले. "त्याची नका काळजी करू तुम्ही. देवराम सेफ आहे".

"अहो गोविलकर, देवराम स्वत: नेहमीच सेफ असतो हो! आज देवराम पासून आपण सुरक्षित रहाणं खरं महत्त्वाचं आहे." भावे साहेब म्हणाले. "अगदी पूर्ण

a

काळजी घ्या, आज वर्कशॉप मधून बाहेर पाऊल टाकायचं नाही म्हणून सांगा त्याला.”

भावे साहेब देवरामला एवढे घाबरून असायला कारणं ही तशी बरीच होती.

देवराम तसा अनुभवी कामगार होता. आपल्या कामात बऱ्यापैकी वाकबगारही होता. पण धांदरटपणात त्याचा हात पंचक्रोशीत कुणी धरला नसता. एखाद्या मशिनचे पूर्ण सर्विसिंग करून बाॅक्स अप केल्यानंतर आतमधे पुसण्याचे फडके राहिल्याची आठवण होणे, मॅनहोल कवरचे सगळे चोवीस बोल्ट लावून टाइट केल्या नंतर त्या सगळयांमधे स्प्रिंग वॉशर टाकण्यासाठी परत उघडत बसणे, स्विचबोर्ड मेन्टेनन्स करताना भलताच स्विच ऑफ करून सगळीकडे अंधार पसरवणे वगैरे प्रकार देवरामने अनेकदा केलेले होते.

आता म्हणूनच आजच्या अतिमहत्वाच्या दिवशी आणि येणाऱ्या महत्त्वाच्या क्षणी भावेसाहेबाना देवरामच्या तडाख्यातून पावरहाउस सुरक्षित ठेवण्यासाठी ठोस पावलं उचलणं जरूरीचं होतं.

देवराम वर्कशॉपच्या चार भिंतीं मधे बंदिस्त आहे या शाश्वतीने भावे साहेब निश्चिंत झाले आणि मग स्वतःवर आणि जगावर खूष होऊन मान डोलावत भावे साहेब वरती आपल्या ऑफिसकडे चालू लागले.

-----------------

तिकडे कंट्रोल रूम मधे नवीन युनिटच्या कमिशनिंगची तयारी भन्नाट वेगाने चालली होती. ऑपरेशन ग्रूप नव्या युनिट चा ताबा घेणार होता आणि बाॅयरलवर, तसेच टर्बाइनवर, आणि मागच्या इन्सट्रुमेंटेशन पॅनेलला अजूनही चिकटून बसलेले

a

इरेक्शन , कमिशनिंग ग्रुपचे इंजिनियर हुडकून काढून त्याना दिलेल्या कार्यमुभा क्लियर करून घेण्याचं अवघड काम त्यांनी सुरु केलं होतं.

गेले दोन चार वर्षे दिवस रात्र काम करून नवीन युनिट ला इरेक्शन ग्रुपने या तारुण्यावस्थेपर्यंत आणललं होतं. कमिशनिंग ग्रुपने नाना प्रकारचे परिक्षण, टेस्टिंग करून, इंन्सट्रुमेंटेशन सिस्टिमचं सेटिंग करून युनिटला हुश्शार केलं होतं. साहजिकच नव्या युनिटच्या प्रत्येक मशिनरीचा त्याना सर्वांना एकप्रकारचा लळा लागला होता आणि आता ऑपरेशन ग्रुप रूपी अक्रूर या युनिट ला त्यांच्यापासून ओरबाडून घेत होता.

मुलीला सासरी पाठवणं काय किंवा श्रीकृष्णाला अक्रुराने मथुरेला नेणं काय, जितकं अपरिहार्य आहे, तितकंच इरेक्शन आणि कमिशनिंग ग्रूप्सनी कमर्शिअल- ऑपरेशन-डे ला आपलं चंबूगबाळं आवरतं घेणं आवश्यक आणि अपरिहार्य आहे, हे सर्व जण जाणत होते. त्यामुळे मग एक एक करून मन घट्ट करून सर्वांनी आपापली कामं संपवली आणि सर्व कार्यमुभा क्लियर केल्या.

ऑपरेशन ग्रुपने युनिटचा पूर्ण ताबा घेतला. बॉयलर लाइट अप झाला. हळूहळू सक्त देखरेखीखाली प्रेशर, टेम्परेचर वर येऊ लागले. एच्पी आणि एल्पी बायपास उघडे असल्यामुळे उच्च दाबाच्या वाफेचा कानठळया बसवणारा आवाज सर्व परिसरात घुमुन राहिला. पाण्याचे, वाफेचे, ड्रेनिंगचे, बायपासचे असे वेगवेगळे व्हाल्व उघडण्याची, बंद करण्याची ऑपरेशन ग्रुपची शिस्तबध्द धावपळ सुरु झाली.

युनिट स्टार्टपचा रंगतदार आणि रोमहर्षक प्रोसेस सुरु झाला.

------------

a

वर ऑफिसमध्ये इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स चीफ भावे साहेब आणि मेकॅनिकल मेन्टेनन्स चीफ चाटी साहेब, डेप्युटी चीफ इंजिनियर देशपांडे साहेबांच्या केबिनमधे बसले होते. स्पेशल चहा आणि टोस्ट रिचवले गेले होते आणि आता तासा दोन तासात होणाऱ्या युनिट कमिशनिंगच्या सोहळ्याबद्दलच चर्चा चालली होती.

"देशपांडे साहेब, चहा झकास होता हं", भावे म्हणाले, "तुमची नवी सेक्रेटरी दिसते झकास आणि चहा पण करते झकास. "

"अहो भावे, जरा जपुन बोला", देशपांडे साहेब दबलेल्या आवाजात बोलले. "अहो भिंतीलाही कानाला असतात. त्या इन्स्ट्रुमेंटेशनच्या चितळेचं प्रकरण विसरलात काय? लिफ्ट मधे जरा कुठे सोबतच्या लेडी इंजिनियरला 'तू आज छान दिसतेस', म्हणायला गेला काय, तिने लगेच तक्रार केली काय आणि त्याला तडकाफडकी राजीनामा द्यावा लागला काय!"

चितळेचं नाव ऐकल्यावर चपराक बसल्या सारखे भावे साहेब चुप झाले.

वरून कंट्रोल रूम मधून फोन आला. देशपांडे साहेबांनी फोन उचलला, ऐकून घेतलं आणि फोन खाली ठेवला.

"चला. प्रेशर, टेम्परेचर ठीकपणे वर येतायत." देशपांडे साहेब म्हणाले, "कंट्रोल रूम मध्ये एक चक्कर मारून मग खाली पोर्चमधे जाऊया. साठे साहेब पोहोचतीलच अर्ध्या तासात".

"चला". भावे साहेब म्हणाले. चहाचे कप बाजुला सारले गेले आणि त्रिकूट लिफ्टकडे चालू लागले.

शिफ्ट चार्ज इंजिनियर गुप्ते आणि त्यांची टीम आपल्या कामात मग्न होते. आज राज्यात विजेचा तुटवडा असल्यामुळे युनिट नंबर एक वर फुल लोड होतं.

a

फ्रिक्वेन्सी सुध्दा जेमतेमच होती. अशा अवस्थेत चालते युनिट संभाळून ब्रँड न्यू युनीट कमिशन करायचं, म्हणजे नाही म्हटलं तरी तारेवरची कसरतच होती. गुप्तेंनी साहेबांनी वरिष्ठांकडे पाहुन जरासं हसल्यासारखं केले आणि ते परत आपल्या कामाला लागले.

“गुप्ते,” देशपांडे साहेब म्हणाले, “तुम्ही युनिट चालू करून रन अप करा, पण सिंक्रोनाइज करू नका बरं का. ते काम आपले चीफ इंजिनियर साहेब करणार आहेत.”

“सर, माहिती आहे मला”, गुप्ते म्हणाले, “पण चीफ इंजिनियर साहेबांनाही जास्त काही करायचं नाही. युनिट तर ऑटो कंट्रोल वरच आहे. स्पीड गवर्नर आणि व्होल्टेज रेग्युलेटर आपलं काम करतील, आणि मग साहेबांनी फक्त हे हिरवं बटण दाबून ऑटो सिंक्रोनायजर ऑन करायचा आहे. मग पाच मिनिटांत जाइल युनिट लाईनवर. तासाभरात दोनशे मेगावॅट लोडही मिळेल. मख्खन जैसा स्मूद हो जायेगा सब!”

देशपांडेसाहेबांनी मान डोलावून गुप्ते साहेबांच्या म्हणण्याला दुजोरा दिला. मग दहा मिनिटं कंट्रोल रूम मधे काढून सगळं काही ठीक चाललंय असं पाहून देशपांडे साहेब, भावे साहेब आणि चाटी साहेब खाली पोर्चकडे निघाले.

“आज काही बरा दिवस दिसत नाही नवीन युनिटच्या कमिशनिंगला”. देशपांडे साहेब मान हलवत पुटपुटले. “ग्रिडची फ्रिक्वेन्सी अगदिच काठावर आहे. काही चूक झाली तर फट् म्हणता ब्रह्म हत्या व्हायची.”

पोर्चमधे पोहोचल्यावर देशपांडे साहेबांनी परत फोन लावला. चीफ इंजिनियर साहेब अगदी पाचच मिनिटांवर आहेत हे कळल्यावर मेन गेट ला योग्य त्या सूचनाही दिल्या.

चीफ इंजिनियर साहेबांची गाडी आली. हस्तांदोलनं झाली. मागच्या दोन गाड्याही आल्या. नमस्कार चमत्कार पार पडल्यावर सर्व मंडळी दुसऱ्या मजल्यावरच्या कॉनफरन्स रूमकडे चालू लागली.

कॉनफरन्स रूम मधे चहापानाची जय्यत तयारी होती. खारे काजू, बदाम, काजू कतरी बशा भरभरून समोर आल्या. चहाचे कप किणकिणले. मंडळी सुखावली.

“पंधरा एक मिनीटात जाऊया कंट्रोल रूमला”. देशपांडे साहेब चीफ इंजिनियर साठे साहेबांना म्हणाले. “लोड डिस्पॅचरने सव्वा बाराचा टाईम दिलाय युनिट लाईनीवर आणायला. ग्रिड कंडिशन जरा क्रिटिकल आहे आज. शेजारच्या राज्यात काही प्रॉब्लेम आहे म्हणतात, त्यामुळे लो फ्रिक्वेन्सीची परिस्थिती निर्माण झाली आहे.”

साठे साहेबांनी प्रसंगाचे गांभीर्य जाणून चेहरा लांब केला.

---------------

तिकडे खाली वर्कशॉप मधे फिटर शेळके अस्वस्थपणे येरझारा घालत होता. त्याच्या मामीला हॉस्पीटल मधे अत्यवस्थ अवस्थेत हलवल्याची बातमी नुकतीच मोबाईल वरून त्याला मिळाली होती आणि त्याला एक क्षणही इथे वाया न घालवता मामीला भेटायला जायचं होतं.

"देवराम, ही एकच डिफेक्ट नोट आहे माझ्याकडे गड्या. दहा मिनिटांचंच काम आहे पण कोणीही फिटर स्पेअर नाही". शेळके देवरामला म्हणाला. "करशील का हे छोटं काम?"

"काय काम तरी काय आहे?" देवरामने विचारले.

"कंट्रोल रूमच्या पॅन्ट्रीमधे जे पावर पॉइंट आहेत त्यांचा सप्लाय गेलाय. त्याचा स्विचबोर्ड तिथेच कॉरिडॉर मधे आहे. त्यातला थर्मल रीले जळलेला आहे. तो बदलायला हवा. काम सोपं आहे. स्विचबोर्ड ऑफ करायचा, उघडायचा, रीले बदलायचा आणि मग सगळं पूर्ववत करायचं. दहा मिनिटांचं काम, जास्तीत जास्त." शेळके काकुळतीला येऊन पुढे म्हणाला, "मला जायलाच पाहिजे ताबडतोब. आणि हो, देवराम, लंचला मी मच्छी फ्राय बुक केलं होतं, त्याचं हे टोकन तुला घे. कुपन दिलंय मी आधीच. त्याची काही काळजी नाही".

देवरामचं मन हेलावून गेलं. मच्छी फ्राय चा वास नाकावाटे मेंदूत शिरला. देवरामकडे टूल्स कॅबिनेट चा चार्ज होता खरा, पण आता तर सगळे जण कामावर गेलेले. आता टूल्स मागायला कोण येणार! आणि हो, मित्राला त्याच्या संकटकाळी मदत करायची नाही तर ती मैत्री कसली?

"आण ती डिफेक्ट नोट इकडे आणि तू पळ. जा." देवराम ने उदारपणे शेळकेला जाण्याची मुभा दिली. ताबडतोब शेळके बॉयलर सूटची बटणे काढत काढत कपडे बदलण्यासाठी लॉकर रूमकडे पळाला. "हाफ डे ॲप्लीकेशन मी उद्या टाकतो असं गोविलकर साहेबांना सांग", शेळके म्हणाला.

कपडे बदलून शेळके दोन मिनिटात आला आणि जाता जाता वर्कशॉपच्या दारातच अडकला.

“आणि हो, देवराम, तिथे कॉरिडॉरमधे दोन स्विचबोर्ड आहेत बरं का.” शेळके दारातून ओरडला. “डावीकडचा बोर्ड कंट्रोल रूमच्या लाईटस् चा आहे. त्याला हात नाही लावायचा, लक्षात ठेव, गोंधळ होईल नाहीतर. डावीकडचा. डावीकडचा.”

देवरामने कपडे बदलले. शेळकेचा हेल्पर टूल बॅग घेऊन उभा होता. दोघं मिळून मागच्या सर्विस लिफ्टनी वरती आले. कंट्रोल रूमकडे जाण्याच्या कॉरिडॉर मधले लाइट स्विचबोर्डच्या प्रॉब्लेम मुळे ऑफ झाले होते. देवराम आणि त्याचा हेल्पर कॉरिडॉरच्या दरवाज्याने आत आले. देवराम स्विचबोर्डच्या समोर उभा राहिला.

“शेळके काहीसे बोलला होता. यातला एक स्विचबोर्ड पॅन्ट्रीच्या पावर पॉइंटसाठी आणि एक कंट्रोल रूम लाइटसाठी.” देवराम विचार करत होता. “टॉर्च तर टूल बॅग मधे नाही, अंधारामुळे नेमप्लेटही नीट दिसत नाही. हां, शेळके डावीकडचा, डावीकडचा म्हणत होता खरा, तेव्हा पॅन्ट्रीचा स्विचबोर्ड बहुतेक डावीकडचा असणार”.

असा विचार करून देवराम ने डावीकडचा स्विचबोर्ड ऑफ करण्यासाठी हात पुढे केला.

----------

इकडे, चहापान आणि अल्पोपहार आटपून मंडळी कंट्रोल रूममध्ये पोहोचली होती. गुप्ते चीफ इंजिनियर साहेबाना समजावून सांगत होते.

“सर मशिन फुल स्पीडला आलं आणि जनरेटर व्होल्टेज बिल्डअप झालं की हे बोर्डवरचं हिरवं बटन आपण दाबावं म्हणजे ऑटो सिंक्रोनायजर ऑन होईल

a

आणि पाच मिनिटांत युनिट लाईनवर जाऊन लोड घ्यायला लागेल. पण सर," गुप्ते पुढे म्हणाले," त्या हिरव्याच्या जवळच हे मशरूम सारखं लाल बटन आहे, त्याला मात्र हातात लावायचा नाही. ते इमर्जन्सी शट डाऊन बटन आहे. ते दाबलं तर बॉयलर, टर्बाईन, जनरेटर सगळं शट डाउन होईल. मग मात्र परत श्री गणेशा करावा लागेल".

साठेसाहेबांनी मान डोलावली. एकदा गुप्तेंकडे बघुन सुहास्य केलं. कॅमेरावाल्याने तो क्षण बरोबर टिपला. साठे साहेबांच्या मनात आत्मविश्वासाची लहर उठली.

लोड डिस्पॅचर कडून परवानगी आली. "शेजारच्या राज्यात पावर पोजिशन क्रिटिकल आहे. पंधरा मिनिटांच्या स्लॉट मधे सिन्क्रोनायजिंग आटपा".

गुप्तेंनी त्वरित प्रोसेस सुरु केला.

पाच मिनिटांनी गुप्तेनी साठे साहेबांना खूण केली. साठे साहेब पुढे सरसावले आणि बोर्ड वरचं हिरवं बटण दाबायला त्यांनी आपला उजवा हात पुढे केला.

-----------

त्याच क्षणी देवरामने बाहेरच्या कॉरिडॉर मधला डावीकडचा स्विचबोर्ड ऑफ केला.

----------

कंट्रोल रूमचे लाईटस् विझले. कंट्रोल रूम अंधारली. जमलेल्या सर्वांच्या तोंडून "आह", असा मोठ्याने उद्गार आला. दुसऱ्या क्षणी इमर्जन्सी लाईटस् पेटले.

भोंगा वाजायला लागला कंट्रोल रूम अर्धवट उजळली. आवाक् झालेले ऑपरेशन्स इंजिनियर भानावर आले. धावपळ करू लागले.

एक दोन सेकंदात घडलेल्या या सर्व प्रकारामुळे साठे साहेब गांगरून गेले. मागे बघायला त्यांनी झटक्यात मान वळवली. त्या गडबडीत त्यांचा पुढे केलेला उजवा हात लाल बटणावर गेला आणि लाल बटण दाबलं गेलं.

मग तर कल्लोळ आणखीच वाढला. युनिट नंबर दोनला शट डाऊन ची आज्ञा मिळाली आणि दिलेल्या सेटिंगप्रमाणे सर्व यंत्रणेने इमाने इतबारे शट डाऊन प्रोसेस चालू केला. ॲनन्सिएशन सिस्टिमचे बरेचसे दिवे डोळे मिचकावयला लागले. मॉनिटर्स वर भराभरा संदेश यायला लागले. भोंगे वाजायला लागले. एकच गोंधळ उडाला. गुप्ते साहेबांचा अनुभव आणि ट्रेनिंग आता कामाला आलं. युनिट नंबर एक च्या आणि दोनच्या ऑपरेशन ग्रुपला ते भराभर मार्गदर्शन करू लागले.

साठे साहेब किंकर्तव्यमूढ झाल्यासारखे उभे होते. त्याना बऱ्याच गोष्टी समजावून घ्यायच्या होत्या. साठे साहेबांच्या मनातली घालमेल देशपांडे साहेबांना उमगली. देशपांडे साहेबांनी चाटींना हळूच खूण केली.

मग दोघांनी मिळून साठे साहेबांचा कबजा घेतला आणि सावकाशपणे त्याना कंट्रोल रूमच्या बाहेर काढले. साठे साहेबांना आपल्या केबिनमधे नेऊन बसवण्याची आणि सॅन्डविच वगैरे मागवण्याची सूचना चाटीना देऊन देशपांडे साहेब कंट्रोल रूममध्ये परतले.

-----------

झाल्या प्रसंगाला दोन एक तास होऊन गेले. देशपांडे साहेब, भावे आणि चाटी, साठेसाहेबांसमवेत आपल्या केबिनमधे बसले होते. सर्वचजण आता पूर्णपणे

सावरले होते आणि आपापल्या मनात, आपण स्वतः झाल्या प्रसंगाच्या दोषारोपण सत्रात कितपत गोवले जाऊ शकतो, याचा आढावा घेत होते.

साठे साहेब डोक्याला हात लावून बसले होते. कारण काहीही असो, नवीन युनिटचा शट डाऊन प्रोसेस त्यांच्याच हाताने चालू झाला होता. रिटायरमेंटच्या सहा महिने आधी एवढं मोठं लान्छन आयुष्यभरची सोन्यासारखी कारकीर्द मातीमोल करायला पुरेसं होतं.

नव्या युनिटच्या स्टार्ट-अपचा सोहळा लेखांकित करण्यासाठी आलेले पत्रकार अजून बाहेरच रेंगाळत होते. त्याना बातमीचा सुगावा लागला तर अनर्थ होणार होता. सगळं खापर आपल्या डोक्यावर फोडलं जाणार आणि आपल्या नावाला मोठा डाग लागणार. असल्या डागाळलेल्या चेहऱ्याच्या, डागाळलेल्या हाताच्या माणसाला रिटायरमेंटनंतर कोण कन्सल्टन्सीची कामं देणार आणि कोण राज्य स्तराच्या उच्चाधिकार समिती वर नेमणार. गॅस भरलेल्या फुग्याप्रमाणे ही स्वप्नं आपल्या आवाक्याबाहेर चालली आहेत असं चित्र साठे साहेबांना स्पष्ट दिसायला लागलं.

“देशपांडे, आयत्या वेळी दिवे घालवून टाकणारा कोण आहे तो बदमाश कामगार? त्याला जन्मभर अद्दल घडेल अशी शिक्षा करा. एक चौकशी समिती नेमा आणि लवकरात लवकर त्याला नोकरी वरून बडतर्फ करून टाका. त्याची ग्रॅच्युईटी वगैरे काही असेल ते अडकवून ठेवा आणि कुठे नोकरीसाठी सर्टिफिकेट मागेल तर बिलकुल देऊ नका”. साठे साहेब अगदी पोटतिडकीने देशपांडेना सूचना देत होते. “काय, नाव काय म्हणालात त्या हरामखोराचं?” साठे साहेब पुढे विचारते झाले.

"नाव त्याचं देवराम, साहेब. देवराम सावतेकर". देशपांडे साहेबांनी माहिती पुरवली.

"सावतेकर?" साठे साहेब जरा सावरून बसले." नामदार सावतेकरांचा तर कोणी नातलग नाही ना?"

"तोच तर प्रॉब्लेम आहे साहेब. नामदार साहेबांचा चुलत भाऊ आहे तो. म्हणून तर आम्हाला त्याचे नव्याणव अपराध पोटात घालावे लागतात. "देशपांडे म्हणाले.

साठे साहेबांनी लक्षात आल्यासारखी मान हलवली.

जरा धीर येऊन देशपांडे पुढे म्हणाले, "आणि साहेब, मनाने तसा सरळ आहे आणि मदत करायला तत्पर असतो".

साठे साहेब आपल्याच विचारात गढले होते. नामदार सावतेकर म्हणजे साठे साहेबांचं एकुलतं एक आशास्थान होतं. सहा महिन्यांनी रिटायर झाल्यावर आयुष्यात जी भयानक पोकळी निर्माण होणार होती ती भरून काढण्यासाठी, झाली तर नामदार सावतेकरांचीच मदत त्यांना होणार होती. लहाणपणच्या तुटपुंज्या ओळखीच्या जोरावर साठेंनी नामदार सावतेकरांशी संधान जोडलं होतं, एकदोनदा त्यांच्याबरोबर बैठकीत उठबस केली होती आणि हळुच आपल्या मतलबाची अर्जी दाखल केली होती. दोन महिन्यांपूर्वी नामदार साहेबांनी एका खुशीच्या क्षणी साठेंना आश्वासनही दिलं होतं, की राज्य ऊर्जा समितीवर एक खुर्ची त्यांच्यासाठी नक्की राखुन ठेवली जाईल.

पण नंतर मात्र नामदार साहेब जरा थंडावले होते. मागच्याच आठवड्यात साठेंशी बोलता बोलता ते म्हणाले "काय सांगू राजकारणातले खाचे खोचे साठे

तुम्हाला! अहो परवाच्या अधिवेशनात आमच्या हितशत्रूंनी मुख्य मंत्र्यांचे कान फुंकलेले दिसतात आमच्या विरुद्ध. काल फंक्शनला भेटले तर माझ्याकडे बघायला तयार नव्हते मुख्य मंत्री महाशय''!

नामदार साहेबांची स्वतःचीच व्यथा ऐकून साठेंना धसकाच बसला होता. ''यांचंच बूड ठिकाणावर नसेल तर आपला तर प्रश्नच नाही'', असे निराशाजनक विचार साठेंच्या मनात यायला लागले होते. आणि दुष्काळात तेरावा महिना आल्या सारखा त्यांच्या हातून नकळत का होईना हा युनिट शट डाऊनचा प्रमाद घडला होता. त्यातून, या भानगडीला कारणीभूत झालेला मनुष्य नामदार सावतेकरांचा भाऊ निघाला. गुंतागुंत वाढतच चालली होती आणि सुटकेचा काहीच मार्ग दिसत नव्हता.

वातावरण फारच विषण्ण झालं होतं. देशपांडेसाहेबांनी सेक्रेटरीला बोलावलं आणि सगळ्यांसाठी चहा बिस्किटे आणायला सांगितलं.

केबिनच्या दरवाज्यावर टक टक आवाज आला आणि दरवाजा उघडून गुप्ते आत आले.

''चला युनिट शट डाऊन अगदी सुरक्षितपणे झालं. कुठेही डॅमेज नाही. टर्बाईन सरळ टर्निंग गियर वर गेलं. अगदी मख्खन जैसा, सर.'' गुप्ते स्वतःवर , नव्या युनिटवर आणि एकुण जगावर खुष होऊन उत्साहाने सांगत होते. आणि त्या उत्साहाचा संसर्ग हळूहळू इतरांनाही होऊ लागला होता.

एक मोबाईल फोन तेवढ्यात किणकीणला.

''एक्सक्यूज मी सर'', गुप्ते म्हणाले, त्यांनी आपला चेहरा थोडा फिरवला आणि खिशातला वाजणारा फोन त्यानी आपल्या कानाला लावला. फोनवरच्या

व्यक्तीचं बोलणं ऐकता ऐकता गुप्तेंचा चेहरा फुलत गेला आणि शेवटी, “ओके सर, हो सर, थॅंक्यू सर”, असं म्हणून त्यांनी फोन बंद करून खिशात ठेवला.

गुप्तेंनी चेहरा वळवला. तीन चेहरे त्यांच्याकडे प्रश्नार्थी नजरेने पहात होते.

“लोड डिस्पॅच कडून फोन होता. मगाशी नवीन यूनिटचं सिंक्रोनायजिंग वेळीच थांबवल्या बद्दल धन्यवाद देत होते”. गुप्ते म्हणाले.

“काय, धन्यवाद? कशाबद्दल? “ तिघंही एकदमच विचारते झाले.

“सर, आपण युनिट लाईनवर आणत होतो त्याचवेळी शेजारच्या राज्यातलं मोठं युनिट डाऊन झालं आणि ग्रिड फ्रिक्वेन्सी आणखी घसरली. सुदैवाने दोन राज्यातली लिंक ओपन झाली आणि आपल्या राज्यातली जनरेटिंग युनिटस् त्या आपत्तीत ओढली गेली नाहीत. पण जर आपण त्या सुमारासच नवीन युनिट सिंक्रोनाइज करायचा प्रयत्न केला असता तर मात्र काय झालं असतं ते सांगता येत नाही. आता सगळी स्थिती पूर्ववत झाली आहे आणि आता आपल्या नव्या युनिटला रात्रीच्या साडे बाराची वेळ दिली आहे.” गुप्तेनी एका दमात सगळी माहिती दिली.

“चला, माझी शिफ्ट संपलीय सर, आता निघू का मी?”. गुप्ते पुढे विचारते झाले आणि सगळ्यांची मूक संमती प्रमाण मानून त्यांनी काढता पाय घेतला.

तीन आश्चर्यचकित चेहरे स्तंभित पणे एकमेकाकडे पहात राहिले.

“हा हा हा”, साठे साहेबांनी हास्याचा मोठा फवारा सोडला. “द्या टाळी देशपांडे, सगळी प्रमेयं सुटलीत आता!” साठे साहेब उद्गारले. “आता बोलवा त्या पत्रकारांना आणि द्या मी सांगतो तशी बातमी “

“मथळा द्या, ‘सावतेकरांमुळे राज्य वाचले’, आणि पुढे लिहा म्हणावं,” साठे सांगत होते. “आज सहाशे मेगावॅट शक्तीचे नवीन युनिट चीफ इंजिनियर साठेंच्या

a

हस्ते राज्याला अर्पण करण्याचा आनंद सोहळा योजला होता. पण हीच आनंदाची घटिका राज्यासाठी काळ घटिका झाली असती. अनर्थाची सुरुवात शेजारच्या राज्यापासून झाली आणि आपल्या राज्यालाही जोरदार फटका बसला असता. फक्त एका जागृत इसमाच्या प्रसंगावधानाने राज्य मोठ्या आपत्ती पासून वाचले. अगदी अखेरच्या क्षणी इशारा करून सावतेकरांनी नव्या युनिटचा स्टार्टअप सोहळा थांबवला आणि राज्याला अंधाराच्या खाईत जाण्यापासून वाचविले. श्री देवराम सावतेकर हे नामदारअशोक सावतेकरांचे चुलत भाऊ आहेत. सावतेकरांच्या प्रसंगावधानाचे चीफ इंजिनियर साठेंनी तोंड भरून कौतुक केले आहे.''

''अरे वा: साहेब, आपण तर कमालच केली.'' देशपांडे म्हणाले, ''एक तर युनिट शट डाऊनच्या झाल्या चुकीवर पूर्ण पांघरूण घातलंत, दुसरं म्हणजे सावतेकरांचं नाव पेपरमध्ये मोठे मथळे देऊन एका चांगल्या कामगिरीशी जोडून दिलंत आणि त्याना लोकप्रियतेच्या कळसावर पोहोचवलंत आणि तिसरं म्हणजे या सगळ्या चांगल्या प्रसिध्दी च्या मागची सूत्रधार व्यक्ती कोण आहे हे नामदार साहेबांच्या निदर्शनाला आणवून आपल्या भविष्याची चिंता दूर केलीत.''

''द्या टाळी मग'', साठे साहेब म्हणाले, ''यालाच म्हणतात, एका दगडात तीन पक्षी''.

-----X-----

४

# सामाजिक मिसळ

"या ताई." लक्ष्मी कोळिणीनं रेखाताईंचं अगदी तोंडभर हसून स्वागत केलं. "ताई खूप दिवसांनी आलात. या. काय देऊ. कोलंबी फ्रेश आहे. बोंबिल फ्रेश आहेत."

रेखाताई आणि वसंतराव रहायला बोरिवली-पूर्वच्या डायमंड सोसायटीत. तसं गोराईपासून दूरच. पण तरीही रेखाताईंना रविवारी सकाळी गोराईच्या मच्छी मार्केटला फेरी मारायला फार आवडायचं. दोन महिने भारताबाहेर असल्यामुळे त्यांची ही मच्छीमार्केटची फेरी बऱ्याच दिवसात झाली नव्हती खरी.

मार्केटच्या बाहेर बसलेल्या ताज्या भाज्या, शहरातल्या इतर मार्केटमधे कुठे सहजपणे न मिळणारी गावठी मेथी, गोल वांगी, ही रेखाताईंची पहिली अॅट्रॅक्शन्स. ती खरेदी झाल्यानंतर मात्र आत जायचं आणि लक्ष्मी कोळिणीसमोर जाऊन उभं रहायचं. रेखा ताईंनी, मार्केटभर फेरी मारायचा, सगळीकडे मासळी हाताने दाबून बघायचा, किमती विचारायचा, परिपाठ ठेवलाच नव्हता. त्यांची एकच ठराविक कोळीण. लक्ष्मीकडे मासळीच्या किंमतीबद्दल घासाघीस नाही, ताजेपणा बद्दल शंका नाही. कोणी म्हणायचे, "अहो ती तुम्हाला फसवते." पण रेखा ताईंना काही ते पटायचं नाही.

वसंतराव रेखाताईंबरोबर नेहमीच असायचे. या मासळी बाजाराच्या फेरीत वसंतरावांचा भाग फक्त पिशव्या धरणे, रेखाताई सांगतील तेवढे पैसे देणे, इतपत

a

मर्यादित असे. बऱ्याचदा वसंतरावांना त्यांचे मित्र, ओळखीपाळखीचे लोक भेटायचे आणि मग बायकांची मासळी खरेदी होईपर्यंत पुरुष मंडळींच्या गप्पा चालायच्या.

लक्ष्मी कोळिणीच्या शेजारी वसंतरावांना आज एक नवीनच तरुण कोळीण बसलेली दिसली. असेल विशीतली. तिच्या समोर एक सावळासा प्रौढ इसम उभा होता. अंगात रंगीबेरंगी बुशशर्ट आणि गळ्यातील जाडशी सोन्याची साखळी बघुन वसंतरावांनी खुणगाठ बांधली की हा इसम काही चाकरमान्या पांढरपेशा नसावा. मोठ्या सलगीने त्या तरुण कोळिणीशी तो काहीतरी बोलत होता. थोड्या वेळाने तो इसम निघून गेला आणि वसंतरावांनी उगीचच सुटकेचा निःश्वास सोडला.

इकडे रेखाताईंचे कोलंबी आणि बोंबिल लक्ष्मी कोळिणीने साफ केले होते. “पिशवी द्या तिला”, असं रेखाताईंनी म्हटल्यावर तत्परतेने वसंतरावांनी पिशवी पुढे केली.

“सुरमई आहे का गं तुझ्याकडे?” रेखाताईंनी लक्ष्मीला विचारले.

“माझ्याकडे नाही पण इकडे पियुकडे आहे बघा”. लक्ष्मी शेजारच्या तरुण कोळिणीकडे हात दाखवत म्हणाली. “ही पियू, म्हणजे प्रियंका, माझी भाची आहे. शिकतेय कालेजात. सुट्टी पडलीय, तेव्हा मीच घेऊन आले तिला, मला मदत करायला. आणि मघाशी बोलत होते तिच्याशी ते गोराडे, कोपऱ्यावरच्या समुद्र सेतू हॉटेलचे मालक. हिच्या मागे आहेत, त्यांच्या मुलासाठी.”

या सगळ्या अनाहूत माहितीकडे दुर्लक्ष करून रेखाताई प्रियंका कोळिणीकडे वळल्या आणि तिने दाखवलेल्या सुरमईचं दाबून, कल्ले उघडून निरिक्षण करून लागल्या.

तेवढ्यात वसंतरावांना त्यांच्या परिचयाचे बारटक्के भेटले. मग सुरमईवरची आणि प्रियंकावरची नजर काढून वसंतरावांनी बारटक्केंशी शेअर्सच्या चढ उताराच्या गप्पा चालू केल्या. जाता जाता बारटक्के म्हणाले, “वसंतराव रोजा बॅन्क चांगली आहे. वर चाललाय शेअर. घेऊन टाका. रोजा बँक.”

वसंतरावांनी त्यांना हसून निरोप दिला.

दोन मिनिटातच रेखाताईंकडून ऑर्डर आली, “पिशवी द्या तिला”. वसंतरावांनी प्रियंकाकडे सुरमईच्या कापलेल्या तुकड्या टाकायला पिशवी दिली.

वसंतरावांना पिशवी परत करताना त्यांच्या नजरेला नजर भिडवत प्रियंका कोळीण म्हणाली, “रोजा बँक चांगली नाही सर. रोजा बँकेची पुढच्या आठवड्यात सो जा बँक होईल सर. घेऊ नका ते शेअर. गैरव्यवहार सापडलेत आर बी आय ला”.

चकित होऊन वसंतराव म्हणाले, “तुला कसं माहीत?”

“याच विषयात एम बी ए करते नं मी!” प्रियंका म्हणाली आणि तिथुन जाणाऱ्या गिऱ्हाइकाला उद्देशून पुढचं वाक्य, “दादा, सुरमई देऊ?” वसंतरावांकडे पूर्ण दुर्लक्ष.

“सहाशे रुपये द्या”. आज्ञा आली. वसंतरावांनी पैसे दिले आणि रेखाताईंबरोबर तिथुन ते बाहेर पडले. डोक्यात प्रियंकाबद्दल विचार येत होते पण रेखाताईंबरोबर चर्चा करायला हा विषय वसंतरावांना सुरक्षित वाटला नाही.

पुढचा आठवडा आला. रोजा बँक कोसळली. तिचे शेअर मातीमोल झाले. वसंतरावांना संकटातून सुटल्याचा आनंद झाला. गोराईच्या पुढच्या ट्रिपच्या वेळी लक्ष्मीच्या भाचीला थँक्स द्यायचं त्यानी मनोमन ठरवलं.

a

एक महिन्या नंतर एका रविवारी सकाळी रेखाताई आणि वसंतरावांची जोडी गोराई मच्छी मार्केट मधे आली. रेखाताई नेहमी प्रमाणे लक्ष्मी कोळिणीच्या समोर येऊन ठाकल्या. वसंतरावांनी निरिक्षिलं, शेजारची जागा रिकामी होती. मासळी निवडता निवडता रेखाताईनी लक्ष्मीला विचारलं, “तुझी भाची दिसत नाही आज?”

“तिला बँकेत नोकरी लागली. ट्रेनिंगला पाठवलंय तिला.” लक्ष्मी म्हणाली.

विषय तिथेच संपला. मासळी, भाजी खरेदी झाल्यावर दोघं घरी परतले.

असेच काही महिने गेले. धाकटा राजीव केमिकल इंजिनियरींगच्या तिसऱ्या वर्षापासून हॉस्टेलला रहायला गेला. जावई बापूंची पुण्याला बदली झाली आणि त्यामुळे मोठी मुलगी आणि सर्व फॅमिली पुण्याला निघून गेले. रेखाताईंच्या आणि वसंतरावांच्या गोराई मासळीबाजारच्या खेपा कमी झाल्या, बंदच झाल्या. लागेल तेव्हा जवळच्या कोल्ड स्टोरेज मधुन मासळी घेऊ लागले.

दिवस पुढे सरकले. राजीव केमिकल इंजिनियर झाला. इंजिनियरींग पास झाल्यानंतर, राजीवने दोन वर्षं, हीना सेंटस् मधे नोकरी केली. अत्तर, स्प्रे, आफ्टर शेव्ह अशा कॉस्मेटिक्ससाठी लागणारे मूलभूत द्रव तयार करण्याचा अनुभव घेतला. मग त्याच्या मनात स्वतःचं स्वतंत्र युनिट काढण्याचे विचार यायला लागले. कंपनीनेही त्याला प्रोत्साहन दिलं. सुरुवातीला हीना सेंटस् ला संलग्न आणि नंतर मार्केट वाढेल तशी हळूहळू पूर्ण स्वतंत्र कंपनी, अशा व्यावसायिक अटी. भांडवलाच्या तीस टक्के इक्विटी हीना घालणार आणि भांडवलाच्या सत्तर टक्के कर्ज मात्र राजीव ने आणायचं. हीच एक जरा ग्यानबाची मेख होती.

एवढं कर्ज आणायचं कुठुन आणि त्यासाठी अटी काय असतील? स्वतंत्र व्यवसाय, बँकेचं कर्ज, या गोष्टींशी ना कधी वसंतरावांचा संबंध आला होता, ना

कधी त्यांच्या जवळच्या नातलगांचा किंवा स्नेही मंडळींपैकी कुणाचा संबंध आला होता. सगळेचजण समाजाच्या उच्चभ्रू, पांढरपेशा, चाकरमान्या व्यवसायातले. वसंतरावांनी हात वर केले आणि राजीवला, आहे ती नोकरी पुढे चालू ठेवण्याचा सल्ला दिला.

मग एका दिवशी सकाळी राजीव वसंतरावांना म्हणाला, “बाबा माझा मित्र शशिकांत आहे नं, तो उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेलाय बघा, आणि आता तिथेच नोकरी करतोय, त्याने एका बँकेचा रेफरन्स दिलाय. दहिसरला आहे ब्रँच. तिथल्या ऑफिसर आपल्याला चांगलं गाईड करतील म्हणतोय. जाऊया का आपण?”

वसंतरावांनी होकार दिला. बाप लेक गेले दहिसरच्या बँकेत, इंन्डस्ट्रिअल लिएजन ऑफिसर प्रियंका खरडेना भेटायला. आत चिठ्ठी पाठवली. शशिकांतचा रेफरन्स लिहिला. ऑफिसर मॅडमनी लगेच त्याना आत बोलावलं. “होय, शशिकांत हॅज टॉकड् टु मी”. मॅडम म्हणाल्या आणि सरळ कामालाच हात घातला.

पंधरा मिनिटं झाली, वीस मिनिटं झाली, तीस मिनिटं झाली. तब्बल एक तास राजीव आणि ऑफिसर मॅडममधे चर्चा चालली होती. राजीवचं प्रॉजेक्ट पूर्णपणे समजावून घेतल्यावर मुख्य कंपनीने घातलेल्या व्यावसायिक आणि व्यापारी अटींची चर्चा झाली. प्रश्न उपस्थित केले गेले, उत्तरे शोधली गेली. बोलण्यात मधून मधून शशिकांतचं नाव येत होतं. एक तासानंतर मॅडमनी चर्चा आवरती घेतली आणि मंडळींना आठवड्यानंतर यायला सांगितलं.

वसंतराव राहुन राहुन विचार करत होते, कि एवढा विस्तृत, सुखवस्तू कुटुंबांचा आपला गोतावळा, एवढे स्नेही संबंधी, पण कोणी कधी इंडस्ट्री काढली

नाही, मग त्यासाठी बँकेची पायरी चढणं, कर्ज काढणं दूरच्या गोष्टी. समाजाच्या एका विशिष्ट पातळीवर विखुरलेली गोतावळ. नाही वरच्या स्तराशी संबंध, की नाही खालच्या स्तराशी. फक्त नाकासमोर चालणं माहिती. चाकोरीतून बाहेर येणायाचा प्रयत्न करणाऱ्या धाडसी तरुणांना विरोध होत नसला, तरी तसं मोठं सहाय्यही होत नाही.

आठवड्यानंतर वसंतराव आणि राजीव परत बँकेत गेले. आज ऑफिसर मॅडम थोड्या मोकळया असाव्यात. अर्धा तास चर्चा झाली. मॅडमनी राजीवला तीन सोपे पर्याय सुचवले. या पर्यायांपैकी जो काही फायदेशीर वाटेल, ज्याच्यामुळे प्रॉजेक्टच्या व्यावसायिक धारणेमधे कमीत कमी फेरफार करावे लागतील तो राजीवने स्वीकारावा असं त्यानी राजीवला सुचवलं. हे काम राजीवचं. इथपर्यंत मजल आल्यामुळे राजीव खूश झाला.

खरडे मॅडमनी चहा मागवला. वातावरण जरा रिलॅक्सड झालं.

चहा पिता पिता वसंतरावानी खरडे मॅडमना मागच्या भेटीपासून मनाच्या खोलवर डाचत असलेली शंका बोलून दाखवली. “मॅडम पूर्वी आपण कधी भेटलो आहोत का? आपल्याला आधी बघितल्यासारखं वाटतंय.”

मॅडम जरा हसल्या आणि म्हणाल्या, “तुम्हाला मी आठवत नसले तरी मला तुम्ही स्पष्ट आठवताय. रोजा बँकेचे शेअर घ्यायला निघाला होतात नं तुम्ही?”

रोजा बँक? मग वसंतरावांना हळूहळू आठवलं. ती बारटक्क्यानी दिलेली चुकीची टिप आणि नंतर त्या कोळिणीच्या भाचीने नजरेला नजर भिडवून दिलेला सल्ला, सगळं सगळं आठवलं.

a

“म्हणजे तू, तुम्ही गोराईच्या लक्ष्मी कोळिणीची भाची की काय!” डोळे विस्फारून वसंतराव उद्गारले.

खरडे मॅडम मंद स्मित करत होत्या. राजीव आ करून नुसतं ऐकत होता.

वसंतरावानी चहा संपवला. कप खाली ठेवला. काहीतरी बोलायचं म्हणून म्हणाले, “लक्ष्मी भेटली नाही बरेच दिवसात, गोराई मार्केट मधे जात नाही नं हल्ली आम्ही.”

“गोराईला गेलात तरी लक्ष्मी मावशी भेटायची नाही आता तिथे. माझ्या आईने आणि लक्ष्मी मावशीने भागिदारी मधे एक ट्रॉलर घेतलाय. मासळीचा ठोक व्यवहार करतात त्या. तिकडे वरसोव्याला ऑफिस केलंय त्यानी, खलाशी ठेवलेत, ऑफिस स्टाफ ठेवलाय नोकरीला.” खरडे मॅडम म्हणाल्या.

“आणि तुमचे वडील? ते नाहीत या बिजिनेस मधे?” वसंतरावांनी धीर करून विचारलं.

“नाही.” मॅडम म्हणाल्या, “बाबा गोराडे साहेबांबरोबर समुद्र सेतू हॉटेलचे भागिदार आहेत. त्याना खूप काम असतं. गोराडेसाहेब म्हणजे माझे होणारे सासरे.”

वसंतरावांच्या डोळ्यासमोर गोराई मार्केट मधे ओझरता पाहिलेला तो गळ्यात सोन्याची जाड साखळी घातलेला इसम उभा राहिला.

“आणि माझ्या होणाऱ्या सासू बाईंचा वरळीला डिस्को आहे.” खरडे मॅडम पुढे सांगत होत्या.

वसंतरावांचं डोकं गरगरायला लागलं. पण एक महत्त्वाचा प्रश्न राहिलाच होता.

वसंतरावांनी विचारलं, “आणि तुमचे होणारे पति?”

a

मॅडम एकदम हसल्या, "अहो, तो तर शशिकांत! असं काय करता? त्याने सांगितलं नाही वाटतं तुम्हाला?"

हे तर वसंतरावांच्या कल्पनेबाहेर होतं.

नवरा केमिकल इंजिनियर, बायको बॅन्कर, सासरे हॉटेल वाले, सासू डिस्कोवाली, आणि या मुलीची आई ट्रॉलर मालकिण.

केवढी ही सामाजिक मिसळ.

हे आपल्या सामाजिक स्तरातलेच लोक म्हणायचे, की आपल्या सामाजिक स्तराच्या वरचे हे लोक, की खालचे म्हणायचे? वसंतरावांना काहीच कळेना.

मीटिंग संपली. खरडे मॅडमना थँक्स देऊन बाप लेक घरी गेले.

पुढच्या एका वर्षात अनेक घडामोडी घडल्या.

कळत नकळत वसंतराव त्यात ओढले गेले. बरेच जुने विचार, आडाखे बदलले गेले.

राजीवने बँकेच्या बऱ्याच फेऱ्या केल्या. खरडे मॅडमशी आणि दुसऱ्या ऑफिसरांबरोबर मीटिंग झाल्या. खूप उहापोह झाला.

शशिकांतचा तिकडून फोनवर मिळालेला सल्ला आणि प्रियंका खरडे मॅडमची इथली खटपट, याना शेवटी यश मिळालं. राजीवचं बॅन्क लोन सँक्शन झालं. त्याचं स्वतःचं छोटं युनिट कार्यरत झालं. यशस्वी झालं. मुख्य कंपनीला संलग्न अतिशय उत्तम तऱ्हेने चालू लागलं.

आणखी सहा महिने गेले.

शशिकांत गोराडे अमेरिकेहून आला. प्रियंका खरडे आणि शशिकांत गोराडे यांचा दणक्यात विवाह झाला. विवाहाची बरीच फन्क्शन्स होती. राजीव सगळ्या

समारंभांत गळ्यापर्यंत गुंतला होता. रिसेप्शनला राजीव बरोबर वसंतराव आणि रेखाताई गेले होते.

स्टेजवर नवपरिणीत वधूवर होते, त्यांचे आई वडील होते आणि प्रियंकाच्या बाजूलाच एक चुणचुणीत मुलगी उभी होती.

प्रियंकाने ओळख करून दिली. “ही माझी धाकटी बहीण अलका.”

मुलीने वसंतराव रेखाताईंना नमस्कार केला आणि राजीवकडे हसून पाहून डोळे मिचकावले. वसंतरावांनी ते पाहिलं. त्यांच्या मनात धस्स झालं. पण ते काही बोलले नाहीत.

एक महिना होऊन गेला. राजीव खुशीत होता. फॅक्टरी युनिट फारच छान चाललं होतं आणि वाढवण्याचे विचार चालले होते.

आणि एका रविवारी राजीव अलकाला घेऊन घरी आला. रेखाताईंना थोडीशी कल्पना असावी, कारण एकतर वसंतरावांएवढ्या त्या धास्तावलेल्या दिसल्या नाहीत आणि दुसरं म्हणजे, चहा पाण्याची साधारण तयारी त्यानी आत करून ठेवली होती.

“हो, भेटलोत आम्ही हिला, प्रियंकाच्या लग्नात.” रेखाताई राजीवला म्हणाल्या.

“काय करतात या?” वसंतरावांनी विचारलं.

“बाबा, ही टीव्ही सिरअल मधे काम करते, छोट्या मोठ्या. आणि मॉडेलिंग सुध्दा करते. बिझी असते खूप.” राजीव म्हणाला.

जाताना अलकाने रेखाताई वसंतरावांना वाकून नमस्कार केला.

रेखाताई अलकावर खूश दिसल्या.

वसंतराव विचार करू लागले, आपला मुलगा होतकरू इंडस्ट्रीयालिस्ट; सूनबाई टीव्ही तारका; व्याही हॉटेल आणि बार मधे भागिदार; विहिणबाई मासळीच्या ठोक व्यापारात;

आणि आपण...

आपण कॉरपोरेट कंपनीतून निवृत्त एच आर मॅनेजर.

हे कसलं सामाजिक समीकरण! ही तर सामाजिक मिसळ. शेव, कुरमुरे, कांदा उसळ यांचं मिश्रण.

मग आपलं स्थान काय या सामाजिक मिसळीत? आपण शेव, कुरमुरे, कांदा की वरून चुरा करून टाकलेले पुरीचे तुकडे.

वसंतरावांना सामाजिक मिसळीचं समीकरण समजेना, पण एक खरं, शेवटी चव मात्र उत्तम. जिभेवर रेंगाळणारी.

दोन एक आठवडे गेले. वसंतरावांनी आणि रेखाताईंनी खरडे लोकांची भेट घेतली. हस्तमिलाप झाले.

"वर्ष सहा महिन्यात कार्य उरकायला पाहिजे." रेखाताई म्हणाल्या.

वसंतराव बँक बुकं उघडून बसले.

आणि मग एक दिवशी राजीव सांगत आला, "बाबा, पुढच्या महिन्यातला मुहूर्त धरायचाय."

वसंतराव आवाक् झाले. "अरे पंचवीस तीस दिवसात तयारी कशी होईल!" वसंतराव उद्गारले.

"बाबा काळजी नको त्याची." राजीव म्हणाला. "इट्स ऑल प्लॅन्ड. हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनचा हॉल आपल्याला मिळणार आहे. केटरर आणि

डेकोरेटर तिथलाच. लग्न आणि रिसेप्शन तिथे होईल, आणि लग्नानंतर आपल्या नातेवाईकांना तिखटी पार्टी वरसोव्याला अलकाची आई अॅरेंज करणार आहे. ट्रॉलर मधलं फ्रेश फिश. आणि बाबा, संगीत आणि मेहंदी कार्यक्रम वरळीच्या डिस्को मधे. बाबा तुम्ही फक्त भटजी शोधा."

वसंतरावांनी मान डोलावली. सगळ्या समीकरणांना सोपी उत्तरं होती. जीवनाच्या गणितात ती सामावून गेली होती.

थोडं थांबून राजीव म्हणाला, "ऐका तरी बाबा, आमची प्रिन्सिपल कंपनी स्वित्झरलंडची दोन तिकिटं देणार आहे, हनिमूनसाठी गिफ्ट."

"अस्सं, छान छान" वसंतराव म्हणाले.

"हो नं. हे तर फारच छान झालंय बाबा. राजीव म्हणाला, "त्याच वेळी डॅव्हॉसला एक इन्टरनॅशनल कॉन्फरन्स आहे, ती मी अटेन्ड करीन आणि अलकाच्या पण स्वित्झरलंड मधल्या शूटिंगच्या तारखा त्याच सुमाराला लावल्यात."

वसंतरावांनी जो आ केला तो अजून मिटला नाही. आतापर्यंतची सगळी सामाजिक मिसळ त्यानी पचवली होती. सगळी कॉम्प्लेक्स समीकरणं व्यवस्थित सोडवली होती. पण मीटिंग आणि शुटिंगचं समीकरण त्याना हनिमूनच्या गणितात अजूनही बसवता आलेलं नाही.

------X-----

५

# पोहोचलेले लोक

"देशमुख साहेब, आज संध्याकाळी मोकळे असाल तर या आमच्याकडे. बसुया जरा." बी विंग मधुन डिकोस्टाचा फोन आला.

सध्या देशमुख साहेबांसमोर, दिवसभरात वेळ कसा घालवायचा हाच एक मोठा प्रश्न असल्यामुळे त्यांनी चटकन होकार दिला.

"आणि हो." डिकोस्टा पुढे म्हणाले, "आमच्या बी विंगमधे ते वर्मा आलेत नवीन रहायला, त्यांनाही बोलावले आहे. म्हटलं सगळयांची ओळख होईल त्यांच्याशी."

बी विंग मधे नवीन राहायला आलेल्या वर्मा कुटुंबाबद्दल सोसायटी मधे सर्वांनाच कुतुहल होतं. चोवीसाव्या मजल्यावरचे तीन बेडरूमवाले दोन फ्लॅट घेऊन ते एकत्र जोडणाऱ्या, दोन मोठ्या एस यू व्ही गाड्या आणि एक बीएमडब्ल्यू बाळगणाऱ्या, दोन राहते घरगडी ठेवून असणाऱ्या आणि तरीही कोणाच्या अध्यात मध्यात नसणाऱ्या नवीन कुटुंबाबद्दल कोणाला कुतुहल नाही वाटणार? अगदी सनशाईन सोसायटी सारख्या उच्चभ्रू लोकांच्या सोसायटीतही या नवीन आलेल्या वर्मा कुटुंबाने खळबळ माजवली होती.

संध्याकाळी सात वाजता देशमुख आपल्या डी विंग सातव्या मजल्यावरच्या फ्लॅटमधून बाहेर पडले. जेवणाबद्दल काही डिकोस्टा बोललेला नसल्याने हेवी स्नॅक्स असतील असा देशमुखांनी होरा बांधला होता आणि घरातून

निघताना, “जेवायला माझी वाट पाहू नका”, असे मोघम सांगून त्यानी पायात चपला चढवल्या. “जास्त पिऊ नका,” असा सौम्य इशारा देत मिसेस देशमुखांनी आपल्या फ्लॅटचं दार बंद केलं.

दहा एक मिनिटांनी देशमुख डिकोस्टाच्या बी विंग एकवीसाव्या मजल्यावरच्या फ्लॅटवर येऊन पोहोचले. आतून बोलण्याचे आवाज येत होते. डिकोस्टाने दार उघडून देशमुखांना आत घेतलं. रेगे, गुरुनाथ, व्यास, उतेकर सगळी मंडळी आधीच आली होती आणि जोरात गप्पा चालल्या होत्या.

दोन नवखे गृहस्थ, एक प्रौढ आणि एक तरुण, एका बाजूच्या खुर्च्यांवर शांतपणे बसले होते. रॉ सिल्कचा झब्बा आणि मॅचिंग सुरवार, गळ्यात जाडसर सोन्याची चेन असा वेष परिधान केलेल्या प्रौढ गृहस्थाचं व्यक्तीमत्व कोणावरही छाप पाडेल असंच होतं. त्यांच्या बरोबर आलेला तरुण गृहस्थ जीन, टी शर्ट अशा साध्या कपड्यात होता आणि मारुन मुटकुन तिथे आणून बसवल्यासारखा दिसत होता.

डिकोस्टा आणि त्याचा मुलगा कामाला लागले. कोण काय घेणार याची विचारणा केली. प्रत्येकाच्या आवडीनिवडी प्रमाणे प्रत्येकाच्या हातात ग्लास दिले. व्हेज, नॉन व्हेज स्नॅक्स आल्या, फिरवल्या गेल्या. मंडळी जरा रिलॅक्स्ड झाली. डिकोस्टा जरा मोकळे झाले. रेगेनी उठुन जाऊन डिकोस्टाच्या हातातही एक ग्लास आणून दिला.

डिकोस्टानी एक हात वर केला. “मंडळी, ओळख करून देतो. हे आपले नवे शेजारी देवेश्वर वर्मा आणि हे त्यांचे चिरंजीव राजेश. सर्वांनी “हॅलो”, “आपल्याला भेटून आनंद झाला”, वगैरे उद्गार काढले. थोड्याच वेळात देवेश्वरजी बरेच मिसळले. इतर समवयस्कांशी हसून बोलू लागले. डिकोस्टाचा मुलगा

a

काहीतरी आणायला बाहेर गेला होता. त्यामुळे वर्मांचा राजेश एकटाच पडला. तो बिचारा बाहेर गॅलरीत जाऊन लांब दिसणारा हायवेचा ट्रॅफिक बघत बसला. मिसेस डिकोस्टानी एकदा जाऊन त्याची विचारपूस केली, पण बाकी कोणी फारसं लक्ष दिलं नाही.

आणखी एक राउंड झाली. देवेश्वर वर्मा बरेच मिसळले होते. गुरुनाथच्या विनोदाला हसत होते, व्यासला टाळी देत होते. पण तरीसुद्धा त्यांच्या भोवती जरा रहस्याचं वर्तुळ असल्यासारखं वाटत होतं.

शेवटी न राहवून उतावळ्या उतेकरने एक स्टार्टर खडा टाकला. “वर्मासाहेब कसं वाटतंय मुंबईला, आवडतंय का?”

वर्मा म्हणाले, “अहो, मुंबईला बरीच वर्ष राहतोय मी. अंधेरीला फ्लॅट होता आमचा. तो लहान पडायला लागला. मग तो फ्लॅट विकून इथे आलो आम्ही.” मग स्वतःहूनच वर्मा पुढे म्हणाले, “तसे मूळचे आम्ही अजमेरकडचे. वडिलांची गावाबाहेर जागा होती, तिथे फार्म होतं आमचं. शेळ्या मेंढ्या पाळायचे आमचे वडील. जेमतेम चालायचं. त्याचा पाठपुरावा करण्यात अर्थ वाटेना मला. निघालो तिथून मी बाहेर. घर सोडल्यावर इंडियन नेव्हीत करीअर केली मी. आय ॲम अ नेव्ही मॅन.”

इंडियन नेव्ही! अरे वा! ऐकणारे सगळेच इम्प्रेस्ड झाले. नेव्हीचा हिरो आपल्यामध्ये आहे या कल्पनेनेच सर्वजण मोहोरून गेले. नेव्ही कमांडरना बराच पगार असतो, भरपूर पेन्शन असतं असं काहीसं लोकांनी ऐकलं होतं. त्यामुळे हाय स्टाईल राहणी काही प्रमाणात सुसंगत वाटत होती.

“कंमाडर होता का आपण?” जरा चाचरतच व्यासने विचारले.

“नाही. कमांडरच्या हुद्द्यापर्यंत नाही पोहोचलो मी.” वर्मा म्हणाले. “इंजिनियरींग साईडला होतो मी. मशीन रूम मेकॅनिकल मेंटेनन्स, आरमामेंट मेंटेनन्स वगैरे. मोठ्या मोठ्या गन्स रिपेअर केल्यात मी. अगदी फुल्ल एक्सपर्टाइज.”

सगळेच जरा गप्प झाले. नाहीतरी गन्स वगैरे शब्द ऐकल्यावर पांढरपेशा लोकांना अंगावर जरासे शहारे येतातच.

बेल वाजली. डिकोस्टाचा मुलगा बाहेरून पॅकेज घेऊन आला. अॅल्युमिनियमच्या वेष्टनात बांधलेली पुडकी उघडली गेली. गरम गरम स्नॅक्सचा सर्वांना आग्रह सुरू झाला. ड्रिंकच्या राउंड बद्दल विचारणा केली गेली. वर्मांचा राजेश, डिकोस्टाच्या मुलाच्या पाठोपाठ आइस बकेट घेऊन फिरत होता, पडेल ती मदत आनंदाने करत होता.

“वर्मा साहेब, आपल्या नेव्हीतल्या काही गमती, काही मजेदार आठवणी ऐकू द्या आम्हाला”. देशमुख म्हणाले.

“ऐकण्यासारख्या बऱ्याच गमती आहेत. सांगतो एक गंमत”. वर्मा म्हणाले.

“आमची नेव्ही फ्रिगेट बऱ्याचदा भारताच्या मित्र राष्ट्रांना मैत्रीभेट देत असे. अशाच एका मैत्रीभेटीसाठी आम्ही एका अरब देशातल्या पोर्ट मधे नांगर टाकला होता. त्यावेळी आमच्या कमांडरने तिथल्या सुलतानाला बोटीवर येण्याचं आमंत्रण दिलं.

“सुलतान आले आपला लवाजमा घेऊन. कमांडरने सगळी बोट फिरुन दाखवली त्यांना. सगळंच चकाचक. त्यातही, आमच्या गन्सची अपटुडेट कंडिशन पाहून ते फार खुश झाले. त्याना त्यांच्या स्वतःच्या राज्याच्या फ्रिगेटची, तिच्यावर फिट केलेल्या गन्सची विदारक अवस्था डोळयासमोर आली. मग त्यांच्या विनंती

वरून, आणि भारत सरकारची मान्यता घेऊन, त्यांच्या राज्याच्या फ्रिगेटवर बसवलेल्या गन्स दुरुस्त करायला, त्यांचा रूटीन मेन्टेनन्स करायला आमच्या कमांडरने मला त्यांच्याकडे सहा महिन्यांसाठी पाठवून दिलं.

मी दोन माणसं घेऊन तिकडे गेलो. मन लावून आम्ही काम केलं. माझ्या कामावर सुलतान एवढे खूष झाले की मी काम संपवून परत जाताना त्यानी बक्षीस म्हणून त्यांच्या राज्यातली मोटरगाड्या वितरणाची वीस टक्के भागिदारी मला देऊ केली. पण माझी नेव्हीतली चांगली नोकरी सोडून मी कुठे तिकडे जाणार! त्यांचं बक्षीस पत्र मी घेतलं खरं, पण तसंच आपलं बॅगेत ठेवलं आणि मी परतलो आपल्या इंडियन नेव्हीच्या सेवेला.”

ऐकणाऱ्यांपैकी बहुतेक जणांनी सहानुभूतीने माना हलवल्या. डिकोस्टाच्या मुलाला मात्र कपाळावर हात मारून घेताना देशमुखांनी डोळयांच्या कोपऱ्यातून पाहिले.

वर्मा कुटुंबाला कुठे घबाड मिळालं ते अजून तरी कळलं नव्हतं. मंडळींचं कुतुहल शीगेला पोहोचलं होतं. रेगे नी आणखी एक खडा टाकून पाहिलं. “नेव्हीमधून माणसं खूप लवकर रिटायर होतात असं आम्ही ऐकलंय”. रेगे म्हणाले.

“ठराविक ग्रेड प्रमाणे वयोमर्यादा ठरवून दिलेली आहे. मी स्वतः वयाच्या पन्नासाव्या वर्षी नेव्हीतून रिटायर झालो. त्यानंतरचा एक किस्सा ऐकण्यासारखा आहे”. वर्मा म्हणाले आणि सर्वांनी कान टवकारले.

“मुंबई पोर्ट मधे सोराबजी कंपनीचा ड्रेजिंगचा व्यवसाय आहे. ड्रेजिंग मशिनरी वापरून बंदरातले नको त्या ठिकाणी जमलेले वाळूचे ढीग उपसायचे आणि

तिथल्या तिथेच बाजूला टाकून द्यायचे. नेव्हीतून रिटायर झाल्यानंतर मी त्यांच्याकडे सुपरवायझर म्हणून कामाला लागलो.”

“बंदर भागातल्या पाण्याच्या प्रहावांमुळे वाळूचे डोंगर जागोजागी सतत साठत असतात. त्यामुळे मोठ्या मोठ्या पंपिंग स्टेशनची ॲपरोच चॅनेल, बोटींचे येण्याजाण्याचे मार्ग, यामध्ये ड्रेजिंगचं सत्र सतत चालू ठेवावं लागतं. मला आमच्या ड्रेजरवरच्या मशिनरीचा मेंटेनन्स नीट करून ती कायम उपलब्ध ठेवायला लागायची. समुद्री वातावरणात माणसांकरवी मनधरणी करून, धाक दपटशा करून दिवस रात्र काम चालू ठेवायला लागायचं. तसं सोपं नव्हतं काम माझं.”

“कंपनीच्या सिनियर पार्टनर सोराबजीला माणसाची कदर होती. तो नेहमी मला फोन करायचा, प्रोत्साहन द्यायचा, खूप कौतुक करायचा. घरी बोलवायचा. आमची चांगली दोस्ती झाली. या दोस्तीतूनच एक वेगळी डेवलपमेंट झाली.”

आता काहीतरी मुद्द्याचं नक्कीच येणार म्हणून सगळेजण परत सरसावून बसले.

“हां. सिनीयर सोराबजीची आणि माझी चांगली दोस्ती.” वर्मा पुढे बोलू लागले. “त्याच्या घरी काही समारंभ असेल तर मला तो आवर्जून बोलावायचा. मीही आनंदाने जात असे. एकदा अशाच एका समारंभात सोराबजी ने मला विचारलं, ‘बावा, दरवेळी ही वेगळी वेगळी स्टाईलिश जाकिटं तू घालून येतोस, ती आणतोस कुठून?’

“मी त्याला अभिमानानं सांगितलं, ‘माझ्या बायकोने टेलरिंग डिप्लोमा ॲडव्हान्स कोर्स केलाय. ती घरीच बनवते ही जॅकेटस माझ्यासाठी.’

a

“दोन दिवसांनी सोराबजीचा फोन, ‘बावा, तुझ्या मिसेसना विचार की माझ्यासाठी आणि माझ्या तीन मित्रांसाठी जाकिट बनवाल का?’

“आणि मग सोराबजीच्या मित्रमंडळींच्या ऑर्डर येतच राहिल्या आणि मिसेसला चांगली कमाई व्हायला लागली. माझं ड्रेजिंगचं काम संभाळून मीसुद्धा मदत करायचा तिला. किफायती दरात कापड आणायचं, कशीदा करायला जाकीटं न्यायची अशी बाहेरची कामं करायचा मी.

“मग राजेशचं शिक्षण संपलं तसं त्यालाही हाताशी धरलं. माझ्या सगळ्या कामात चांगली मदत व्हायची त्याची. बाहेरची धावपळीची कामंही तो करायचा. चांगलं चाललं होतं.”

डिकोस्टाचा मुलगा आणि वर्मांचा राजेश बिर्याणी आणि रायतं घेऊन बाहेर आले. सगळ्यांनी बशा पुढे केल्या. गरम बिर्याणीच्या फ्लेवरने सगळ्यांनाच धुंदी आली. हसत खेळत वाढणी झाली.

“तर मी काय सांगत होतो?” वर्मा पुढे म्हणाले, “हां, सगळं बरं चाललं होतं, पण दहा वर्षापूर्वी माझा ॲक्सिडेंट झाला. ड्रेजरच्या केबलमधे पाय अडकून मी पडलो आणि पायाला दुखापत झाली. धड चालता येईना.”

“मग राजेश म्हणाला मला, ‘बाबा, तुम्ही विश्रांती घ्या थोडे दिवस, मी बघतो सगळं.’ घेतलं त्यानं सगळं खांद्यावर आणि आणून पोहोचवलं इथपर्यंत.”

सगळेजण राजेशकडे चमकून बघायला लागले. या रायतं वाढणाऱ्या जीन टीशर्टमधल्या तरुणाला वर्मा साहेब आपल्या वैभवाचं सगळं श्रेय देतायत? काही तरी चुकतंय किंवा दिलेली माहिती कमी पडते.

राजेश हसत म्हणाला, “काय बाबा, तुम्हीच तर भक्कम पाया रचलाय. मला कसलं श्रेय देताय!”

वर्मा म्हणाले, “राजेश, तूच सांग पुढची तुझ्या कर्तृत्वाची कहाणी. मग मंडळी स्वतःच ठरवतील.”

राजेश टेबलाला टेकून उभा राहिला आणि बोलू लागला. “तसं काही वेगळं सांगण्यासारखं नाही, बाबांचं काम मी पुढे चालू ठेवलं. आईने बनवलेली जॅकेट चांगली खपत होती, पण मी बघितलं की लग्नसमारंभात वगैरे घालण्यासाठी रुबाबदार पारंपारिक लांब कोटांना, अंगरख्याना चांगली मागणी होती. आईला विचारलं, तुला हे बनवायला जमतील का? तिने ट्रायलसाठी दोन कोट बनवले. अंधेरीच्या एका प्रख्यात दुकानदाराला दाखवले. त्याने ते कोट चटकन विकले आणि आणखी सहा कोटांची ऑर्डर दिली. मग पुढे मागे न बघता आईला तिथे अंधेरीलाच एक वर्कशॉप काढून दिलं. दोन कारागिर ठेवले. आईचं काम फारच वाढलं. सहा महिन्यात आणखी मोठ्या वर्कशॉप मधे शिफ्ट झालो. स्वतःचा ब्रँड काढला. आता आईचं फारच छान चाललंय. तिकडे जुहुला स्वतःचं दुकानही आहे.”

राजेश जरा थांबला. वर्मांकडे निर्देश करून म्हणाला, “सगळं श्रेय बाबांचं. सुरूवातच चांगली करून दिली त्यांनी.”

सगळेच शांत होते. डिकोस्टाने राजेशकडे एक खुर्ची सरकवली. बसायला खुणावलं. राजेश बसला. डिकोस्टाचा मुलगा आईस्क्रीमचा ट्रे घेऊन आला. राजेश त्याला मदत करायला उठणार तेवढ्यात वर्मा म्हणाले, “राजेश, ते सुलतानाचं सांग ना”.

a

राजेश परत बसला. जरासा हसला. "हो". त्याने सुरूवात केली. "रिटायर झाल्यानंतर एक दिवस बाबांनी सुलतानाचं बक्षीस पत्र दाखवलं. मी वाचलं. बाबांना म्हटलं, 'चला'. मग पुढच्याच आठवड्यात आम्ही दोघं तिकडे सुलतानाकडे गेलो. तीन चार ऑफिसमध्ये फिरावं लागलं, पण शेवटी काम झालं. गाड्यांच्या दोन ब्रँडचं वितरण आम्हाला दिलं. दुकानही उघडून दिलं.'

"रिटेल आऊटलेट तर उघडलं, पण आमची फारशी विक्री होईना कारण त्या गाड्या तेवढ्या पॉप्युलर नव्हत्या. मग आम्ही एक शक्कल लढवली. मुंबईहून दोन मेकॅनिक नेले आणि गाड्यांची रिपेअर सर्विस सुरु केली. बिघडलेला पार्ट रिपेअर करण्याची पध्दतच नव्हती तिथे. बिघडलेला पार्ट काढायचा, नवा घालायचा. फार महाग पडायचं ते. त्या मानाने रिपेअर सर्विस स्वस्त होती. लोकांनी चांगला प्रतिसाद दिला. नंतर आम्ही आणखी ब्रँड्सची एजन्सी घेतली. रिपेअर सर्विस दिली. खूप पसारा वाढलाय तिथलाही. मुख्य पार्टनर तिथलाच आहे पण बाबांचं नावही झालंय तिथे."

सारेच स्तब्ध होते. मग रेगे म्हणाले, "राजेश, वर्मा साहेबांनी जरी मजबूत पाया बांधला असला तरी वर इमारत तुम्ही बांधलेली आहे. तुम्हालाही श्रेय आहेच."

राजेश हसला. काही बोलला नाही.

थोड्या वेळाने वर्मा साहेबांकडे पाहून राजेश म्हणाला, "बाबा, चला आता. उद्या कांडलाची व्हिजिट आहे नं!"

"अरे हो. निघायला पाहिजे." वर्मा म्हणाले. "फार मजा आली डिकोस्टासाहेब, सगळ्यांना भेटून आनंद झाला. सकाळची फ्लाइट घेऊन कांडला बंदराला जायचंय. त्याचं काय आहे, सिनियर सोराबजी वारल्यावर सोराबजीचा

ड्रेजिंगचा बिझिनेस राजेशने विकत घेतला, वाढवला. नवे ड्रेजर घेतले. आता उद्या कांडला पोर्ट मधे काम सुरू करायचंय “.

“हो, तीन नवे ड्रेजर घेतलेत कांडलाच्या कामासाठी.” राजेश म्हणाला. “बाबांच्या हस्ते नारळ फोडायचाय.”

“या आता, थँक्यू. आलात बरं झालं”. डिकोस्टा म्हणाले. “लगेच परवा मुंबईला परतणार असाल नं?” डिकोस्टाने आपला सहज प्रश्न टाकला.

वर्मा जाता जाता थबकले. “नाही हो.” वर्मा म्हणाले. “पुढे अजमेरला जायचंय. आमचा वडिलोपार्जित शेळया मेंढ्या पाळायचा उद्योग होता नं, तिथे राजेश ने गोट फार्म केलंय. त्याबाजुला जोरात चालतो हा पशुपालन उद्योग. माझ्या हस्ते उद्घाटन करायचं म्हणतोय.”

सर्वांचा निरोप घेऊन वर्मा साहेब पुढे आणि राजेश त्यांच्या पाठोपाठ, अशी बापलेकांची जोडी निघून गेली. सामान्य कुटुंबातून वर येऊन असामान्य काम करताना, यशाचे श्रेय मात्र स्वतःकडे न घेण्याच्या त्यांच्या एकमेकांशी चाललेल्या स्पर्धेने सर्वांनाच मोहित केले.

बाकीची मंडळी थोडा वेळ बसली. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. आणि मग सगळेच उठले. डिकोस्टा कुटुंबाचे आभार मानून घरोघर निघुन गेले.

मिस्टर देशमुख, वर्मा बापलेकांचा, त्यांच्या कर्तृत्वाला विचार करत होते. देशमुखांना काहीतरी खटकायला लागलं. बापलेकांच्या आर्जवी वागण्यात, गोड बोलण्यात देशमुखांना कृत्रीमतेचा वास यायला लागला. काय करावं आपल्या संशयाची शहानिशा कशी लावावी, देशमुख विचार करू लागले. अचानक त्याना

मधूची आठवण झाली, त्यांचा सख्खा चुलतभाऊ, सहा महिन्यापूर्वी एका लग्नात भेटला होता, पोर्ट मधे ऑफिसर आहे म्हणाला होता.

देशमुखांना राहवेना. सकाळी दहा वाजताच त्यांनी मधूला फोन लावला.

"सोराबजी कंपनी? ते ड्रेजिंगवाले?" मधू एकदम गप्प झाला. "पोहोचलेले आहेत ते लोक. काही न बोललेलं बरं". असं तिरस्काराने म्हणून मधूने फोन खाली ठेवला.

देशमुख आणखीच बुचकळ्यात पडले. 'पोहोचलेले' म्हणजे काय ते मधूने नीट सांगितलं नव्हतं, पण 'पोहोचलेले' लोक आपल्या कॅटेगरीत बसत नाहीत असं कुठेतरी मनाच्या एका कोपऱ्यात देशमुखांना वाटत होतं; आणि इमानेइतबारे काम करून कोणी एवढा पैसा करू शकेल थोडाच! काहीतरी काळंबेरं असणारच.

मधूचा दृष्टीकोन तर गढुळ नसेल नं! त्याची काही चूक तर होत नसेल नं!

ते नाही शक्य!

ही शक्यता देशमुखांनी झटकुन टाकली, आणि म्हणूनच, या वर्मा कुटुंबापासून जरा लांबच राहण्याची देशमुखांनी मनाशी खुणगाठ मांडली.

दिवस जात होते. वर्मा कुटुंबातले सर्वचजण भल्या सकाळी उठुन त्यांच्या एस यू व्ही गाड्यांमधून निघून जात असत, रात्री उशीरा परत येत असत. कुणाच्याच अध्यात मध्यात नसल्याने त्यांच्या पासून लांबचे-जवळचे अंतर ठेवण्याचा तसा प्रश्न येत नव्हता, तरीसुद्धा वरून खिडकीतून पहाताना, देशमुखांच्या मनात वाभरे विचार यायचे, "कुठली काळी कामं करतायत हे पोहोचलेले लोक कोण जाणे! किती काळा पैसा करत असतील, किती लोकांना फसवत असतील, देव जाणे."

दिवस जात होते. शाळा कॉलेजांचे रिझल्ट लागले. एक चांगली गोष्ट घडली. देशमुखांची अपर्णा, निर्मला निकेतनचा ड्रेस डिजायनरचा कोर्स पहिल्या वर्गात पास झाली. कॉलेजमध्येच जॉब इन्टरव्ह्यू झाले. एका इन्टरव्ह्युमधे निवड झाल्यावर अपर्णाला सांताक्रुझच्या एका कंपनीत पुढच्या इंन्टरव्हयुला बोलावलं होतं. तिकडून परत आली ती नाचतच. "बाबा, जॉब मिळाला मला. तीन महिन्याची अप्रेंटिसशिप आणि तीस हजार महिना स्टायपेंड देऊ केलंय. आणि बाबा, ही डिजायनर कंपनी कोणाची आहे माहिती आहे का? अहो आपल्या बी विंग मधल्या मिसेस वर्मांची. छान बोलत होत्या माझ्याशी, एवढ्या मोठ्या मॅडम, हिंदी मधे सॉफ्टली बोलत होत्या".

"अजिबात घेऊ नकोस हा जॉब. सगळेचजण पोहोचलेले आहेत त्या कुटुंबातले". देशमुख ओरडले.

"पण बाबा, वातावरण किती छान होतं तिथलं. दर्जेदार वाटली कंपनी मला. पगारही चांगला आहे." अपर्णा समजावणीच्या सुरात बोलली.

"मला तर काही वावगं दिसत नाही यात. कसले पोहोचलेले आणि कसले काय. तुमचं आपलं काहीतरीच असतं. ॲक्सेप्ट कर गं तू हा जॉब". मिसेस देशमुख म्हणाल्या.

मिस्टर देशमुखांनी हार खाल्ली.

एका आठवड्यानंतर अपर्णा कामावर जाऊ लागली. आनंदाने जायची, संध्याकाळी दमून पण खुशीत यायची. मिस्टर देशमुखांचा वर्मा कुटुंबाबद्दलचा दूषित पूर्वग्रह अजून दूर झाला नव्हता. रोज रात्री जेवताना अपर्णाची कसून चौकशी

व्हायची. दिवसभरात काय झालं? कोण काय बोललं? ऑफिसमध्ये कोण आलं, कोण गेलं. पण देशमुखांना काहीच वावगं चाललेलं आढळत नव्हतं.

तीन महिने गेले. अपर्णा स्वतंत्र पणे जबाबदारी हाताळू लागली होती. मॅडम तिला व्यवस्थित मार्गदर्शन करायच्या, काही शंका असेल तर त्यांचं निरसन करायच्या. अप्रेंटिसशिप संपल्यामुळे पगारही वाढला होता.

आज सकाळी अपर्णा नेहमीपेक्षा जरा लवकरच निघाली होती. मिस्टर देशमुखांनी भृकुटी उंचावल्यावर मिसेस देशमुखांनी स्पष्टीकरण दिलं, “फॉरेनची काही महत्त्वाची ऑर्डर आली आहे, म्हणतेय.”

तो आठवडा असाच गडबडीत चालला होता, आणि शुक्रवारी तर कहरच झाला. अपर्णा सकाळी लवकर तर गेलीच होती, पण चार वाजता फोन आला तिचा, की प्रेझेंटेशन संपवून घरी यायला बराच उशीर होईल म्हणून.

काय बोलणार? “काळजी घे”, असं बोलून मिसेस देशमुखांनी फोन खाली ठेवला.

संध्याकाळी साडेसातच्या सुमारास अपर्णाचा फोन आला, “आई मी निघतेय आता. लिफ्ट मिळाली आहे मला. मॅडमबरोबरच येतेय त्यांच्या गाडीतून.”

मुलीला घरपोच आणून सोडतायत म्हटल्यावर मिसेस देशमुखानी सुटकेचा निःश्वास सोडला.

मिस्टर देशमुखांच्या कपाळावर एक बारिकशी आठी उमटली.

रात्री नऊच्या पुढेच बेल वाजली. अपर्णा आली. बाहेर तिच्या मागेच वर्मांचा राजेश उभा होता. देशमुखांनी दार उघडल्यावर राजेश म्हणाला, “आज उशीर झाला अपर्णाला. मम्मीने तुम्हाला सॉरी म्हणून सांगायला पाठवलंय मला.”

मिस्टर देशमुखांना काय बोलावे ते सुचेना.

मिसेस देशमुख तेवढ्यात म्हणाल्या, “अहो, कामात कधीतरी उशीर व्हायचाच. त्यात कसलं सॉरी म्हणताय? या. आत या. बसा घटकाभर.”

राजेश आत आला. शिष्टाचार म्हणून देशमुखांनी त्याला या, बसा केलं. नंतर शिष्टाचार म्हणूनच विचारलं, “तुमचं ऑफिस तिथेच जवळ आहे का?

“हो,” राजेश म्हणाला, “आमचं ग्रुप हेड ऑफिस तिथेच वर आहे. मी ऑफिसमध्ये असलो की मम्मी बरोबरच येतो जातो.”

“काका, बऱ्याच दिवसांपासून तुम्हाला विचारायचं होतं,” राजेश पुढे म्हणाला. “पोर्ट ऑथॉरिटीमधे नोकरी करणारे मधुकर देशमुख कोणी नातेवाईक लागतात का आपले? त्यांच्या चेहऱ्याचा प्रोफाईल खूपसा आपल्या सारखा आहे. चष्मा नाहीत लावत म्हणा, ते”.

मिस्टर देशमुखांना काय उत्तर द्यावे ते समजेना. ते गप्पच बसले.

“मला वाटलंच होतं की ते तुमचे कोणी लागत नसावे”. देशमुखांच्या गप्प बसण्याचा सोईस्कर अर्थ लावत राजेश म्हणाला, “अगदी पोहोचलेला माणूस हो!”

मिस्टर देशमुखांनी आ वासला.

“अहो काका, हा मधुकर देशमुख म्हणजे पोर्ट वर्कर्सचा युनियन लीडर. अगदी करप्ट. पोर्ट मधल्या काही कंत्राटदारांची टोळी बनवून ऑफिसर लोकांना पैसे चारायचे आणि सगळ्या कंत्राट कामांची मक्तेदारी त्या टोळीकडे ठेवायची हा त्याचा उद्योग. पण आम्ही या उद्योगाना बधलो नाही. पोर्ट मॅनेजर पर्यंत गेलो सगळे पुरावे घेऊन आणि मोडून काढले त्यांचे उद्योग.” राजेश पुढे म्हणाला, “काका या

पोहोचलेल्या माणसांना खंबीरपणे असाच बडगा दाखवावा लागतो. ते पोहोचलेले तर आपण त्यापुढे पोहोचलेले. खरं नं?"

मिस्टर देशमुख राजेशकडे पहातच राहिले. विचारात पडले. कोण कुठे पोहोचलेला आहे याचा अंदाजच त्यांना लागेना. एक दूरवर डावीकडे पोहोचलेला तर एक दूरवर उजवीकडे, आणि आपण? आपण मधेच. घसटत राहायचं, कधी डावीकडे, कधी उजवीकडे, सोईप्रमाणे.

"येतो मी". देशमुख लोकांचा निरोप घेऊन राजेश लिफ्टच्या दिशेने चालू लागला.

दिवस गेले, महिने गेले. आणि एक दिवस मिस्टर आणि मिसेस वर्मा देशमुखांच्या दारात उभे राहिले. मिस्टर वर्मांनी टोपी घातली होती. मिसेस वर्मांच्या हातात केशरी पेढ्यांचा बॉक्स होता.

सुहास्य वदनाने दोघंही आत आले. मागून राजेश ही आला. मिसेस वर्मांनी मिसेस देशमुखांसाठी आणि अपर्णासाठी पैठणी साड्या आणल्या होत्या.

तासभर बसल्यावर वर्मा मंडळी निघाली. जातांना मिस्टर देशमुखांचे हात हातात घेऊन मिस्टर वर्मा म्हणत होते, "देशमुख जी, आमच्या काही अपेक्षा नाहीत. तुम्ही कसलीही काळजी करू नका."

दोन दिवसांनी खाली बागेत कारंज्यासमोरच्या बाकावर बसून मिस्टर रेगे गुरूनाथला सांगत होते, "आपला देशमुख म्हणजे अगदी पोहोचलेला माणूस हो! एवढं सगळं ठरेपर्यंत अगदी या कानाचा त्या कानाला पत्ता लागू दिला नाही."

----X----

a

६

# मॅनेजमेंट गुरु

जानेवारी महिन्यातली हलकीशी थंडी. रवी ऑफिसला निघाला होता. वाट ओळखीची, अगदी पायाखालची.

त्या छोट्याश्या घाट रस्त्याचं शेवटचं वळण रवीने भर्रकन घेतलं आणि उताराची पुढची वाट धरली. एरवी सकाळी कॉलनीतून निघून या डोंगरी रस्त्याने खाली उतरताना रवी हमखास या वळणावर थांबत असे आणि समोर पसरलेला देखावा मनात साठवून घेत असे. तिकडे डावीकडे डोंगरांची उंच भिंत, त्यात मधेच उंचावरून खाली सरळ रेषेत येणारी वीजकेंद्राची पाईपलाईन, इकडे उजवीकडे सपाटीवरून सरळ मुंबईकडे जाणारा राजमार्ग आणि मधे हे सकाळच्या धुक्याचं ब्लँकेट पांघरून पहुडलेलं खोपोली गाव. रवीला रोज या देखाव्यात काहीतरी नवी नवलाई आढळून यायची.

पण आजचा दिवस अपवादात्मक होता.

रवीचं मन दुसऱ्याच विचारांच्या ओझ्याखाली दबून गेलं होतं. उद्या घरी सत्यनारायणाची पूजा ठरवली होती आणि रवीच्या बायकोने म्हणजे स्वातीने रवीवर कामगिरी सोपवली होती, प्रसादासाठी मोतीचूर लाडवांची चांगल्या दुकानात ऑर्डर देण्याची. खरं तर खोपोली गावात चांगलं स्वीटस् चं दुकान कुठलं, याबद्दल फारसा प्रश्न नव्हता. बालाजी स्वीटस् हेच गावातलं एकमेव, वरच्या दर्जाचं म्हणता येईल

असं हलवायाचं दुकान होतं. प्रश्न होता तो स्वातीने आवर्जून सांगितलेल्या स्पेसिफिकेशनचा. लाडू साजुक तुपातलेच हवेत आणि त्या व्यतिरिक्त दुसरा कसलाही वास त्याना येऊ नये. स्वातीने वारंवार बजावून सांगितल्यामुळे साजूक तुपाचा घमघमाट आत्तापासूनच रवीच्या नाकात घुमायला लागला होता.

तीन महिन्यापूर्वीच रवी आणि स्वाती ने मुंबईहुन खोपोलीला स्थलांतर केले होते. त्या दोघा पक्क्या मुंबईकरांना सुरुवातीला हा मोठा फरक पचवणं अवघड वाटलं होतं, पण हळूहळू खोपोलीच्या शांत आणि निसर्गरम्य वातावरणाने दोघांनाही जिंकून घेतलं होतं. डोंगरी रस्ता चढून गेल्यावर एका पठारी जागेत टुमदार बंगल्यांची आणि छोटेखानी घरांची असलेली कंपनीची कॉलनी, माफक दरात इलेक्ट्रिसिटी, पाणी, तसंच केबल टी व्ही, जिम, रिक्रिएशन क्लब वगैरे शहरी सुखसोयी उपलब्ध असल्याने दोघांनाही तिथे रुळायला जास्त वेळ लागला नाही.

स्टार इंजिनियरींग फॅक्टरी खाली डोंगराच्या पायथ्याला सपाटीवर होती, गावाच्या एका टोकाला. एक विशिष्ट प्रकारची टेक्सटाइल मशीनं त्या फॅक्टरीत बनवली जात असत. बाहेरून ऑर्डर देऊन तयार पार्ट आणले जात आणि फॅक्टरीत जोडणी होऊन एकेका मशिनची उभारणी होत असे.

स्टार इंजिनियरींग मधे रवीची ह्युमन रिलेशन मॅनेजर, एच आर मॅनेजर म्हणून नेमणूक झाली होती. कामावर रूजु झाल्यावर पहिले काही दिवस कंपनीतलं शांत आणि खटके तंटे नसलेलं वातावरण पाहुन रवीला खूप बरं वाटलं होतं. पण थोडं खोलात गेल्यावर, सर्व थरातल्या नोकर वर्गाशी, ऑफिसर्सशी औपचारिक, अनौपचारिक चर्चा केल्यानंतर रवीला लक्षात आलं की असेच दडपून ठेवलेले प्रॉब्लेम बरेच आहेत. रवीला त्या सगळ्या प्रॉब्लेम्सचा एक एक करून अभ्यास

a

करायचा होता आणि मग पाठ्यपुस्तकामधे दिल्याप्रमाणे त्यांची प्रमेये सोडवायची होती.

पण ते सगळं नंतर. आजच्या दिवसाचा कार्यक्रम ठरला होता. लंच ब्रेक झाला की लवकर जेवण आटपायचं आणि पत्त्याचा डाव टाकायला न थांबता सरळ बालाजी स्वीट्सकडे जाऊन उद्याच्या साजुक तुपातल्या मोतीचूर लाडवांची ऑर्डर द्यायची. हे काम फोनवर होण्यासारखं नव्हतं. समक्ष बोलूनच नीट समजावून सांगणं रवीला योग्य वाटत होतं.

रवी फॅक्टरीत पोहोचला. त्याने स्टॅन्डवर स्कुटर लावली. हेल्मेट काढून हातात घेतलं. बॅग नीटपणे खांद्याला अडकवली आणि उजवीकडच्या रस्त्याने तो अॅडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डींगकडे चालू लागला. डावीकडे थोड्या अंतरावर फॅक्टरीची इमारत दिसत होती. फॅक्टरी मधून ठोकाठोकीचे, ग्राइंडिंग-मशिनिंगचे, मेटल कटिंगचे असे विविध आवाज येत होते. नेहमी प्रमाणे पहिली शिफ्ट सकाळी आठलाच सुरू झाली होती.

रवी ऑफिसमधे पोहोचला. आपल्या क्युबिकल मधे जाऊन बॅग, हेल्मेट जागेवर ठेवले. दोन क्युबिकल पुढे चीफ इंजिनियर जोशीची जागा होती. रवीने पाहिलं, जोशी आपल्या टेबलापाशी बसला होता. खिडकीतून बाहेर शून्यात पहात होता. जोशीच्या चेहऱ्यावर चिंतेचं जाळं पसरलेलं दिसत होतं. लहान मोठ्या अडचणी फॅक्टरीच्या कामात नेहमीच असायच्या. पण त्यातूनही, रवीला माहित होतं की जोशीपुढे सगळ्यात मोठी काळजी उत्पादनाची होती. वास्तविक पाहता दिवसाला दहा टेक्सटाइल मशिन्स बनवण्याची फॅक्टरीची उत्पादन क्षमता होती, पण दिवसाला जेमतेम सहा मशिन्सच्या वर उत्पादन होत नसे.

a

रवीने पाहिलं होतं की उत्पादन वाढविण्यासाठी जोशीने बरेच प्रयत्न केले होते. कामगारांसाठी त्याने स्वतः ट्रेनिंग क्लास घेतले होते. कामगारांच्या छोट्या मोठ्या बॅचेसना बाहेर ट्रेनिंगसाठी पाठवलं होतं. श्रमाची कामं सोपी करण्यासाठी जरूर तेथे अद्ययावत मशिन टूल्स बसवली होती. पण उत्पादनात फारशी वाढ झाली नव्हती.

विचारपुस करण्यासाठी जोशीच्या टेबलाजवळ रवी पोहोचला. रवी आलेला लक्षात आल्यावर जोशीने आपली शून्यातली नजर काढली. रवीकडे पाहून जोशी जरासे शुष्क हसला.

"आलास का रवी, बरं झालं. मोठा प्रॉब्लेम आलाय बघ. अरे आज भल्या सकाळीच मुंबईहून फोन आला. एम डी साहेब स्वतः बोलत होते. जरा रागातच होते. दिवसाला दहा मशिन्सच्या जागी जेमतेम सहा मशिन्स रोज बनतात म्हणून माझ्यावरच साहेब घसरले. आता काही करून उत्पादन वाढलं पाहिजे, नाहीतर माझी कंबख्ती."

जरासा श्वास घऊन जोशी पुढे म्हणाला. "उत्पादन वाढविण्यासाठी मी काय काय प्रयत्न केलेत ते मी सांगितलं त्यांना. मग नरमले जरा. आता त्यांनीच सुचवलंय की वाढीव उत्पादनासाठी कामगारांना बोनस ऑफर करा म्हणून."

रवी ऐकत होता. बरोबर आहे. वाढत्या कामासाठी जास्त पैसे किंवा बोनस रक्कम देणे हा एक स्टॅन्डर्ड उपाय गणला गेला आहेच. रवीला त्याच्या क्रमिक पुस्तकातली शिकवण आठवली.

"रवी, मी पडलो टेक्निकल माणूस. कामगारांबरोबर पैशांची बोलणी करणं मला काही जमणार नाही. तुला हे छान जमू शकेल. आपण असं करू. आज लंच

टाईमच्या जरा आधी आपण दोघं वर्कशॉप मधे जाऊया. तिथे गेल्यावर मी कामगारांना एकत्र बोलावीन, सगळ्यांना नाही, लीडर लोकांना. मग त्याना उत्पादन वाढविण्याबद्दल तांत्रिक गोष्टी मी सांगेन आणि त्या पुढे, वाढीव उत्पादनावर माझ्या कडून मिळू शकणाऱ्या बोनस बद्दल तू बोल". जोशी म्हणाला.

रवीला जोशीने सांगितलेला प्लॅन ठीक वाटला आणि तो होकारार्थी मान डोलावणार तेवढ्यात त्याला आठवलं, आज लंच टाईम मधे तर बालाजी स्वीट्सकडे जाउन मोतीचूर लाडवांची ऑर्डर द्यायची होती. हे तर सगळ्यात महत्वाचं टॉप प्रायॉरिटी काम.

"आज लंच टाईम मध्ये मला नाही जमणार". रवीने सांगून टाकलं.

जोशीने थोडा विचार केला आणि पर्याय सुचवला. "मग असं करू, दहा वाजायच्या त्यांच्या मॉर्निंग ब्रेकफास्ट टाईमच्या पंधरा मिनिटं आधी जाऊया. जमेल नं?"

रवीने ताबडतोब होकार दिला.

"साडेनऊ वाजत आलेत", जोशी घड्याळाकडे पहात म्हणाला. "वर्कशॉप पर्यंत जायला पाच सात मिनिटं लागतीलच. चल निघुया."

जोशीने ड्रावर लॉक केला आणि दोघंही ताबडतोब वर्कशॉपकडे निघाले. वाटेत कॅन्टिन समोरून जातांना किचनमधून येणारे तेलाच्या तळणाचे वास बेचैन करत होते. मान वळवून बघितलं तर आत एक आचारी गोलगोल बटाटेवडे वळताना दिसला. लांबून अगदी लाडू वाटत होते. रवीला आठवण झाली की बालाजी स्वीटस् ला बजावून सांगायचंय, मोतीचूर लाडवाना साजूक तुपाशिवाय बाकी कसलाही वास नसावा.

दुक्कल वर्कशॉप मधे पोहोचली. जोशीने फोन करून, माणसांकरवी निरोप पाठवून प्रत्येक विभागातले चार पाच लोक वर्कशॉपच्या प्रवेशदालनात बोलावले. सगळेजण जमल्यावर जोशी बोलू लागला. उत्पादनाच्या आजच्या स्थितीबद्दल जोशीने आढावा घेतला आणि त्यामधे वाढ करण्याच्या निकडीबद्दल सर्वांना जाणीव करून दिली. सुमारे पाच एक मिनिटं जोशीचं चिरक्या आवाजात भाषण चाललं होतं. बहुतेक कामगार भाषणाकडे फारसं लक्ष न देता हातातल्या घड्याळाकडे पहात होते. एका सुरात चाललेल्या त्या भाषणामुळे रवीचे विचारही भरकटायला लागले.

तेवढ्यात जोशीने रवीला हळुच कोपराने ढोसलं आणि मानेनेच खूण केली. गडबडीने रवीने स्वतःला सावरलं आणि आपल्या भरघोस आवाजात सुरुवात केली. “मित्रानो, जोशी साहेब बोललेत त्याप्रमाणे उत्पादनात वाढ करायला पाहिजे. आपला सर्वांचा या प्रयत्नाला हातभार लागला पाहिजे. उत्पादनात वाढ झाली तर जोशीसाहेब सर्वांना लाडू देणार आहेत.”

समोर उभ्या असलेल्या कामगार वर्गात एकदम शांतता पसरली. सगळेजण चकित होऊन दोघा अधिकारी मंडळीकडे पाहू लागले.

“लाडू!!!!”

रवीने जीभ चावली. त्याच्या भरकटलेल्या मनाने चुकुन डोक्यातले विचार जिव्हेवर आणून सोडले आणि “बोनस” च्या ऐवजी रवी “लाडू” म्हणून बसला.

रविने स्वतःला सावरलं आणि तो चुकीची दुरुस्ती करणार तेवढ्यात वर्कशॉप मधे घंटा वाजली. सर्वांचे चेहरे उजळले. डोळे भिंतीवरच्या घड्याळाकडे गेले आणि “नास्ता आला”, “ब्रेकफास्टची गाडी आली”, असे म्हणत, अबाउट टर्न करून सगळेच लगबगीने निघून गेले.

a

"ब्रेकफास्ट ची गाडी आली की ब्रह्मदेवही या लोकांना थांबवू शकत नाही. अगदीच फज्जा झाला." मान हलवत जोशी म्हणाला आणि मोठ्या ढांगा टाकत वर्कशॉप मधल्या त्याच्या केबीनकडे निघुन गेला.

जोशीच्या एकंदर अविर्भावावरून त्याची नाराजी रवीला स्पष्ट दिसत होती. खरोखर सगळाच फज्जा झाला होता. कामगारांना बोनस मिळेल म्हणून सांगण्याऐवजी मनात सकाळपासून भिरभिरणारे विचार तोंडावाटे बाहेर आले होते. जोशी रागावला होता. या घोटाळ्याची बातमी वरपर्यंत गेली तर कदाचित कायमची सुट्टी मिळणे ही शक्य होतं.

अत्यंत खजील अवस्थेत पाय ओढत रवी ऑफिसकडे चालू लागला. लंच ब्रेक पर्यंतचा वेळ रुटिन कामं करण्यात रवीने काढला. जोशी तिकडे वर्कशॉप मधेच असावा. जेवणही त्याने बहुतेक तिथेच घेतलं. इकडे ऑफिसमध्ये आपल्या टेबलवरच रवी जेवला आणि स्कुटर घेऊन पटकन बालाजी स्वीटस् ची ट्रिप केली. स्वातीने बजावून सांगितल्याप्रमाणे मोतीचूर लाडवाच्या सर्व स्पेसिफिकेशनस् रवीने बालाजीच्या मनावर बिंबवण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला आणि काम झाल्यावर तो ऑफिसमध्ये परत आला.

संध्याकाळी जरा लवकरच रवी ऑफिसमधुन बाहेर पडला. निघण्यापुर्वी प्लँट मॅनेजर भिसे साहेबांना रवी भेटला. उद्या घरी सत्यनारायणाची पूजा ठरवली असल्यामुळे पूजा झाल्यावर लंच ब्रेक नंतर ऑफिसला येण्याची सवलत मिळावी अशी रवीने साहेबांना विनंति केली. भिसे साहेब स्वतः धार्मिक प्रवृत्तीचे गृहस्थ होते, त्यामुळे आनंदाने त्यानी रवीला तशी सवलत दिली.

दुसरा दिवस उजाडला. रवीच्या घरी पूजेचे गुरुजी सकाळी आठ वाजता हजर झाले. बालाजी स्वीट कडून स्वातीला हवे तसे मोतीचूराचे लाडू आले. पूजा व्यवस्थित पार पडली. नैवेद्य, आरती वगैरे झाल्यावर गुरुजींबरोबरच जेवून रवी बाहेर पडला आणि स्कूटरवर टांग मारून ऑफिसला निघाला. फॅक्टरी च्या गेटवर वॉचमनने सलाम ठोकून लगबगीने गेट उघडुन दिलं. रवीला हायसं वाटलं.

रवीने स्कुटर स्टँडला लावली. हेल्मेट काढलं आणि खांद्यावर बॅग टाकून चालू लागणार तेवढ्यात तो थबकला. फॅक्टरीच्या बाजूने ठोकाठोकीचे, घासण्या कापण्याचे आवाज येत होतेच पण त्याबरोबरच सिनेमातल्या किंवा टीव्ही मधल्या सारखे एका सुरात कोणी कोरस गीत गात असल्यासारखाही आवाज येत होता. रवीला फारच आश्चर्य वाटलं. असा आवाज वर्कशॉप मधून कधीच आलेला नव्हता. रवीने हेल्मेट आणि बॅग तिथेच टाकले आणि काय प्रकार आहे हे पाहण्यासाठी जवळ जवळ धावतच तो वर्कशॉपच्या प्रवेश दालनाशी पोहोचला.

रवीने आत डोकावून पाहिलं. मशीनस् बनवण्याचा प्रत्येक विभागातला कार्यभाग व्यवस्थित चालू होता, जरा जास्तच वेगाने चालू होता; आणि सगळ्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे काम करताना एक सुरात सर्व जण गात होते,

हाथ जल्दी चलायेंगे,
जोशी साब लड्डू देगे.

थोड्या वेळाने दुसरं गाणं सुरू झालं,

मशीन बनवा रे, बनवा रे
लाडू बक्षीस घेऊ रे, घेऊ रे

हा प्रकार रवीला नवीनच होता. काल घेतलेल्या मीटिंग नंतर प्रकरण चिघळलं तर नाहीच पण काहीतरी चांगली गोष्ट झालेली आहे, असं तर नाही ना! ऑफिसमध्ये जास्त उलगडा होईल म्हणून रवी तिथून परत फिरला, स्टँड पाशी येऊन हेल्मेट आणि बॅग उचलले आणि झराझर पावलं टाकत तो ऑफिसजवळ पोहोचला. जोशीचा मोठ्या मोठ्याने बोलण्याचा आवाज रवीला बाहेरही ऐकू येत होता. जराशा साशंक मनानेच रवी ऑफिसमध्ये शिरला. जोशीने रवीला पाहिलं आणि धावतच तो रवीजवळ आला.

रवीचे दोन्ही हातांनी खांदे पकडून हसत हसत जोशी रवीला म्हणाला, “आलास रवी? कमाल केलीस गड्या. अगदी भन्नाट आयडिया. आऊट ऑफ बॉक्स थिंकिंग म्हणतात ते हेच. अरे जादू केली तुझ्या लाडू देण्याच्या चॅलेंजने. अरे सगळ्या कामगारांनी अगदी मनावर घेऊन काम केलं आज, अगदी ब्रेकफास्ट टाईम मधे पण. कँटीन बॉयने प्रत्येक विभागात चहा- नास्ता काढून ठेवला आणि मग पाळी पाळीने कामगारांनी जाऊन घेतला. मशीन बनवण्याचं काम फारसा व्यत्यय न येता चालूच राहिलं.”

जोशी बोलत होता आणि रवी आश्चर्याने डोळे विस्फारून ऐकत होता.

“बरं का रवी”, जोशी पुढे सांगत होता. “आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, आजचं मशीनस् चं उत्पादन किती माहिती आहे का? एरवी सहाच्या वर

a

व्हायचं नाही, पण आज आत्ता पर्यंत दहा मशिन तर टेस्ट वगैरे होऊन पूर्ण झालीच आहेत आणि शिवाय आणखी दोन अॅसेम्ब्ली लाईनवर आहेत. संध्याकाळ पर्यंत तीही पूर्ण तयार होतील. एकुण बारा मशिन आज तयार होतील. बारा. विक्रमी उत्पादन”.

जोशीने उड्या मारायचंच तेव्हढं बाकी ठेवलं होतं.

“फारच छान!” रवी उद्गारला.

“आता कबूल केल्या प्रमाणे उद्या सगळ्यांना लाडू वाटायला पाहिजेत.” जोशी म्हणाला. “मी सांगितलंय आपल्या अॅडमिनिस्ट्रेटिव्ह मॅनेजरला, उद्या सकाळी नऊ वाजेपर्यंत इथे पोचते व्हायला हवेत पाचशे लाडू. करतो काहीतरी, म्हणाला तो. अगदी लोणावळ्यापासून खालापूर पर्यन्त सगळीकडे ऑर्डर टाकतो म्हणाला “.

रवी आपल्या टेबलावर जाऊन विचार करू लागला. त्याने आत्तापर्यंत केलेल्या अभ्यासात लाडूप्रयोग कोठेही उल्लेखलेला नव्हता. धाक दपटशा, बोनस रुपाने पैशाची लालूच, सगळं सगळं पुस्तकात होतं. पण लाडू प्रयोग! नो.

जोशी म्हणतो तसं हे आऊट ऑफ बॉक्स म्हणजे भन्नाट कल्पनेचं यश आहे. चाणक्य नीति म्हणतात ती हीच की काय!

काम करून लाडू मिळवण्याची कल्पना कामगारवर्गाला आवडली होती. पुढे युनियनने मॅनेजमेंटशी बोलणी करून लाडूंबरोबर रोख बोनस रक्कम ही सामावून घेतली. कामगार खुष आणि वाढीव उत्पादनामुळे कंपनीची मॅनेजमेंटही खुष.

जोशीच्या पाठीवर शाबासकीची थाप पडली. त्याचबरोबर या यशोगाथे मागील भन्नाट कल्पनेचा जनक म्हणून रवीचाही हेड ऑफिस पर्यंत बराच बोलबाला झाला.

a

या एका प्रसंगातून रवी खूपच शिकला. नंतरच्या काही महिन्यांत पुस्तकी ज्ञान वापरण्याऐवजी वरकरणी टाकाऊ, कुचकामी वाटणाऱ्या भन्नाट कल्पना राबवून अगदी जुने जुने महिनेन महिने भिजत पडलेले वादग्रस्त प्रश्न रवीने यशस्वी रीतीने सोडवले, अगदी जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे.

रवीला बढती मिळाली.

रवीची मुंबईला हेड ऑफिसमध्ये बदली झाली.

रवी चा रविराज झाला.

प्रॉब्लेम सॉल्व्हिंग सेमिनार, सिनियर मॅनेजर लोकांसाठी वर्कशॉप, वगैरे घेऊ लागला.

“रविराज, दी मॅनेजमेंट गुरु” च्या यशस्वी करियरची सुरुवात ही अशी झाली.

----x----

# ७

# बापुसाहेबांचा वारसा

बापुसाहेब देशमुखांचं अल्पशा आजारानंतर निधन झालं. दहा दिवस होऊन गेले होते. क्रिया कर्म झाले. शोकसभा झाल्या. जवळचे लोक सावरले. दुखवट्यातून बाहेर पडले. आता पुढचं कार्य अपरिहार्यच होतं. बापुसाहेबांच्या मृत्यूपत्राचं वाचन.

पटेल-गोस्वामी सॉलिसिटर फर्म फार पूर्वी पासून बापुसाहेब देशमुखांचं कायदेविषयी कामकाज पहात असे. आज बापुसाहेबांच्या मृत्युपत्राचं वाचन करायचं होते. मंडळी पटेल-गोस्वामी सॉलिसिटर्सच्या कॉन्फरन्स हॉल मधे जमली होती. कॉन्फरन्स टेबलाच्या एका बाजुला बसली होती गंभीर चेहऱ्याची वकील मंडळी आणि पलीकडच्या बाजूला बसले होते उत्सुक चेहऱ्याचे बापुसाहेबांचे वारस आणि लाभार्थी.

समोरच्याच खुर्चीवर बापुसाहेबांच्या विधवा पत्नी रेखाताई बसल्या होत्या आणि त्यांच्या शेजारी त्यांचा भाऊ संजय. पलिकडच्या खुर्च्यांवर बसले होते बापुसाहेबांचे चार भाऊ, सुरेश, रमेश, विकास आणि दीपक. शेवटच्या दोन खुर्च्यांवर होत्या बापुसाहेबांच्या बहिणी, आशा आणि निशा.

बापुसाहेब निपुत्रिक होते. त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या कमावलेल्या मिळकतीवर रेखाताईंचा कायदेशीर हक्क होता. पण भावंडांना थोडी आशा होती, की त्यांच्या वडील भावाने त्याच्या गडगंज मिळकतीचा थोडाफार भाग तरी सहा

a

भावंडांसाठी ठेवला असेल. बापुसाहेबांनी आपल्या हयातीत चांगलीच कमाई केली होती. वडिलोपार्जित कन्सट्रक्शन बिझिनेस तर त्यांनी यशस्वीपणे चालवलाच पण त्याचबरोबर आपल्या व्यवहाराला संलग्न दोन छोट्या फॅक्टऱ्याही चालवल्या. सामाजिक कार्यांतही त्यानी भाग घेतला. मोठ्या मोठ्या जिमखाना क्लब्सच्या मॅनेजिंग कमिटीपासून ते देवळांच्या ट्रस्टी कमिटीपर्यंत अनेक जबाबदारीची पदं बापुसाहेबांनी भुषवली, मान सन्मान मिळवला आणि जमेल तसा वैयक्तिक फायदाही करून घेतला. बाकीची भावंडं आपापल्या परीने कमावत होती. सुरेश आणि रमेश नोकरी पेशात होते, तर विकास आणि दीपकनी स्वतंत्र व्यवसाय स्थापन करण्याचा प्रयत्न केला. बापुसाहेबांनी सगळयांवर लक्ष ठेवलं होतं आणि प्रत्येकाच्या डोक्यावर छोटं काही होईना छप्पर असेल, दिवसाचे दोन घास मिळण्याइतपत तरी महिन्याची स्थिर स्वरुपाची आमदनी असेल याची काळजी घेतली होती. त्यामुळे आपल्या वडील बंधूंबद्दल कोणालाही काही तक्रार अशी नव्हती. पण रेखावहिनींची ओंजळ भरल्यानंतर जे काही खाली पडेल ते झेलायच्या तयारीने ही मंडळी आली होती.

फर्मचे सिनियर पार्टनर अॅडव्होकेट पटेल आले, स्थानापन्न झाले. मृत्युपत्राचं वाचन सुरु झालं.

सुरुवातीचे, आपल्या कुटुंबाबद्दल, जवळच्या स्नेही मंडळी बद्दल, बापुसाहेबांनी लिहिलेले कृतज्ञतेचे शब्द ऐकून सगळयांनाच गहिवरून आले. रेखावहिनी तर हमसाहमशी रडू लागल्या. आशा आणि निशा त्यांच्या जवळ गेल्या, रेखावहिनींच्या पाठीवर हात फिरवून त्यांना शांत केले. वकील साहेबांनी वाचन पुढे चालु केले.

भावंडांच्या आशा फोल ठरल्या नाहीत. रोख रक्कम, सरकारी रोखे, म्युच्युअल फंड वगैरेंच्या गोळाबेरजने प्रत्येकाच्या नावे बापुसाहेबांनी सुमारे वीस वीस लाख रुपये ठेवले होते. एवढंच नव्हे तर सुरेशची मुलगी मितालीला बापुसाहेब आपली मुलगी मानत असत, म्हणून तिच्यासाठीसुध्दा वीस लाख रुपयांची तरतूद केली होती.

वकील साहेबांनी वाचन पुढे चालू ठेवले. धर्मादाय संस्थांना, हॉस्पिटलना दिलेल्या देणग्यांचे वाचन झाले आणि ॲडव्होकेट साहेब जरा थांबले. पाण्याचा घोट घेतला आणि सर्वांना उद्देशून सांगितलं की बाकी रोकड रक्कम, रोखे, ठेवी, शेअर्स वगैरे वगैरे रेखावहिनींच्या नावे आहेत. त्यांची यादी वेगळी केलेली आहे.

वीस वीस लाख प्रत्येकी मिळाल्याच्या आनंदात रेखावहिनींसाठी ठेवलेल्या इस्टेटीमधे कोणालाही फारसं गम्य नव्हतं. विकास आणि दीपक तर घड्याळाकडे पहात उठण्याची तयारी करु लागले.

ॲडव्होकेट पटेल साहेबांनी हातानेच सर्वांना शांत बसण्यासाठी खुणावते, घसा खाकरला आणि म्हणाले, “आता पुढचा आयटेम आहे जुहूचा बंगला.”

सर्वजण शांत झाले. कान टवकारले गेले. जुहु बंगला म्हणजे तर बापुसाहेबांचं घर. जुहु विलेपार्ले स्कीममधल्या घरात बापुसाहेबांचा आणि आता पर्यायाने रेखावहिनींचा हक्क असणार याबद्दल कोणालाही शंका नव्हती आणि वाद असेलसं वाटलंही नव्हतं. मग आता काय?

वकीलसाहेब पुढे बोलू लागले, “जुहू बंगला बापुसाहेबांचे वडील नानासाहेब देशमुख यांनी बांधला. नानासाहेबांच्या पत्नी म्हणजे बापुसाहेबांच्या आई, नानासाहेबांच्या आधीच निधन पावल्या होत्या. नानासाहेब मृत्यूपत्र केल्या

शिवाय निधन पावले. त्यामुळे या बंगल्यावर सर्व भावंडांचा आणि रेखाताईंचा समान हक्क पोहोचतो.”

स्तब्धता. पिन ड्रॉप शांतता. सुरेश-रमेश, विकास-दीपक, आशा-निशा एकमेकांच्या तोंडाकडे पहायला लागले. रेखावहिनींना बहुतेक कल्पना असावी. त्या शांत बसल्या होत्या. नाकासमोर पहात होत्या.

सुरेश भानावर आला. त्याच्या मनात एक विचार आला होता, “आणि आमची मिताली, तिला बापू आपल्या मुलीसारखीच मानत होता, मग तिचाही शेअर असेल नं बंगल्यामधे.”

वकीलसाहेबानी सुरेशकडे रोखुन बघितलं, “कायदेशीर दत्तकविधान झालं होतं का? नाही ना? मग तिला नाही यात हक्क.”

प्रश्न मिटला.

“पण आम्हा सात जणांचा बंगल्यावर समान हक्क असेल तर वाटणी कशी करायची? दोन मजले, दिवाणखाना, खाली वर खोल्या, पुढचं मागचं लॉन, नारळ. अवघड काम आहे.” रमेश म्हणाला.

सगळेच शांत झाले डोक्यात विचारयंत्रं टिकटिकत होती. जुहु बंगल्याचे आपण मालक आहोत ही कल्पनाच सर्वांना सुखावह वाटत होती. मग सगळयांनीच एकदम बोलायला सुरुवात केली. कॉन्फरन्सरुममध्ये एकच कोलाहल माजला. ॲडव्होकेट पटेल साहेबांनी दोन्ही हात वर केले. “शांत व्हा, शांत व्हा, सायलेन्स!” ते ओरडले. सर्वजण शांत झाले. आपापल्या खुर्च्यांमधे चुळबुळत बसले.

a

“आणखी एक शेवटची गोष्ट “, वकीलसाहेब पुढे म्हणाले, “या सहामाहीचे बंगल्याचे सर्व टॅक्स बापुसाहेबांनी भरलेले आहेत. पुढच्या सहामाहीपासून तुम्हाला भरावे लागतील.”

वकील साहेबांच्या बोलण्याने सर्व जण खाडकन जमीनीवर उतरले. बंगल्याच्या मालकीपणाचा हर्षवायू थोडा कमी झाला.

सुरेश सगळ्यांना उद्देशून म्हणाला, “बरंच काही आपल्याला ठरवायला लागेल. रेखावहिनी, तुमची हरकत नसेल तर उद्या सकाळी नऊ वाजता भेटायचं का आपण सगळ्यांनी, बंगल्यावर?” रेखावहिनींनी होकारार्थी मान हलवली. बाकी सगळ्यांनी, “ठीक आहे”, म्हटलं.

मीटिंग संपली. वकील साहेबांचा निरोप घेऊन सर्वजण बाहेर पडले.

त्या रात्री घरोघर याच विषयावर आपापल्या परीने विचारविनिमय झाले, खोलवर चर्चा झाली.

आशाला काळजी होती की जुहुला जवळ डी मार्ट असेल की नाही. किराणा मालाचं दुकान असेल की नाही. रमेश विचारात होता की विक्रोळीला फॅक्टरीत जायला जुहूपासून डायरेक्ट बस असेल का. दीपकला बंगल्याच्या जवळपास मोटरबाईक रिपेरवाला पाहिजे होता. प्रत्येकाचे वेगवेगळे विचार.

पक्के गृहपाठ करून सर्वजण सकाळी जुहू बंगल्यावर जमले. प्रशस्त दिवाणखान्यात रेखावहिनींनी गोलाकारात बसण्याची सोय केली होती. चहा बिस्किटे झाली. सुरेशने आपला घसा साफ केला आणि रेखावहिनींना उद्देशून म्हणाला, “या बंगल्याचे टॅक्स, वरखर्च, नोकरांचे पगार मिळुन दरमहा खर्च किती होतो हो वहिनी? आपलं साधारण अंदाजे?”

a

रेखावहिनी म्हणाल्या, “टॅक्स, पाणी पट्टी, बाल शिक्षण सेस, सुका-ओला कचरा भार वगैरे मिळून महिन्याला सुमारे सत्तर हजार होतात, मग झालच तर इलेक्ट्रीसिटी बिल, बगीचा, नोकरमाणसं, बारिकसारिक रिपेरी असे सगळे मिळून आणखी सव्वा लाख, असे साधारण दोन लाख होतात महिन्याचे.”

सर्व मंडळी चुप बसली. डोक्यात शिरलेला उरलासुरला हर्षवायू तर उडुनच गेला, पण छातीतला ऑक्सिजनही फस्सकन निघुन जायची वेळ आली.

सुरेशने मग वडिलकीचा पुढाकार घेतला. सगळ्यांना उद्देशून सुरेश म्हणाला, “हा बंगला तर आपल्यासाठी पांढरा हत्तीच दिसतोय. आपल्याला सर्वांना आपापले फ्लॅटस् आहेत. रेखावहिनींनाही त्यांचा अंधेरीचा प्रशस्त फ्लॅट आहे. मग हा बंगल्यात राहण्याचा नसता सोस कशाला पाहिजे? तेव्हा मला तरी वाटतं की हा बंगला आपण भाड्याने द्यावा.”

“अरे पण कोण मिळणार भाडेकरू एवढ्या मोठ्या बंगल्याला? “निशाने विचारलं.

सुरेश एक मिनिट विचारात पडला.

“अगं शारुक बिरुक सारखा एखादा मोठा नट पकडायचा किंवा कुठल्यातरी कॉन्सुलेटचा मोठा ऑफिसर गाठायचा. या लोकांना सहज परवडतं अशा बंगल्यात राहणं. मुंबईत खूप सापडतील, शोधायला गेलं तर.” सुरेश म्हणाला.

“खूप सापडतील खरे, पण शोधायला नक्की जायचं कुठे?” विकास म्हणाला.

सुरेशकडे उत्तर नव्हतं.

a

विकासने आपलं घोडं पुढे दामटलं, “त्यापेक्षा आपण असं करू, इथे एक हॉटेल काढू, फक्त फॉरेनर्ससाठी. एक छानशी स्मार्ट रिसेप्शनिस्ट कम् केअरटेकर ठेवू, गेस्ट लोकांना वेलकम करून त्यांच्या सोयी पाहण्यासाठी.”

“त्यांची सोय की तुझी सोय?” दीपकने टोमणा मारला.

“त्या बंगल्यावर हॉटेल कसं काढता येईल विकास,” सुरेश म्हणाला, “या दर्जाच्या हॉटेलमधे, प्रत्येक रुमला एक बाथरूम संलग्न असावी लागते. या बंगल्यात रुम्स आहेत आठ आणि बाथरुम आहेत तीन. म्हणजे पाच नव्या बाथरूम बांधाव्या लागतील. ते काही जमायचं नाही. हॉटेल बिटेल काही होऊ शकणार नाही तिथे.”

सुरेशने हॉटेल चा विषय संपवला.

“आपण एखादं रेस्टॉरंट काढू या, मोगलाई चायनीज, कॉन्टिनेन्टल आणि सी फूड. फार डिमांड आहे. करोडपती होवू सगळे.” विकासने परत एक प्रयत्न केला.

“खूप खर्च येईल, फर्नीचर, किचन मधली यंत्रं, वाकबगार स्वैपाकी. बॅन्केकडून लोन मिळवावं लागेल, आपल्यालाही खिशातून पैसे टाकावे लागतील, आणि त्यातून ही रेसिडेन्शिअल एरिआ. रेस्टॉरंट नाही चाललं किंवा जम बसायला फार वेळ लागला तर करोडपतीच्या ऐवजी कर्जबाजारी होऊन बसू सगळे.” सुरेशने परत वडिलकीच्या पोजिशनमधुन धोक्याची सूचना दिली.

“मी सुचवू का एक.” निशा म्हणाली. “यांचा एक बालमित्र आहे, टीव्ही-सिनेमा व्यवसायात, जनार्दन त्याचं नाव. क्रिएटिव टीम लीडर आहे तो. मागच्या आठवड्यातच आमच्या घरी आला होता. खूप गप्पा मारत होता. त्याना म्हणे टीव्ही सिरिअलच्या लोकेशन शूटिंगसाठी असे रेडीमेड बंगले, हवेल्या पाहिजे असतात, म्हणजे सेट बनवायचा खर्च नाही. विचारू का त्याला?”

a

कल्पना चांगली होती. थोड्या विचारविनिमयानंतर सगळ्यांनाच पटली.

“मात्र बजाऊन सांग त्याला निशे, यात भांडवल वगैरे घालायला आपल्याला नाही जमणार म्हणून”. रमेश गुरकावला.

रेखावहिनींनी या सर्व चर्चेत काहीच भाग घेतला नव्हता.

मीटिंग संपली. मंडळी उठली. घरोघर गेली.

निशाच्या नवऱ्याने रात्री जनार्दनना फोन केला. जनार्दन एका नव्या सिरिअलसाठी बंगल्याच्या शोधातच होते. त्यांनी लगेच दुसऱ्याच दिवशी यायचं कबूल केलं. सगळ्या भावंडांमधे फोनाफोनी झाली. रेखावहिनींनाही फोन झाला आणि सकाळी दहा वाजता बंगल्यावर सर्वांनी भेटायचं ठरलं.

जनार्दन त्यांच्या कॅमेरामनला आणि वकीलालाही घेऊन येतो म्हणाले. सगळे गुण जमले तर लगेच करारनामा ड्राफ्ट करू, दुसऱ्या दिवशी सह्या आणि दोन दिवसात शूटिंग सुरु, असा जनार्दनांचा प्लॅन दिसला.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता बंगल्यावर सगळे जमले. रेखाताईंनी नोकरमंडळींद्वारे सगळ्यांची बसण्याची, चहा बिस्कीटांची सोय केली होतीच.

साडेदहापर्यंत जनार्दन, शंकर कॅमेरामन आणि यादव वकील बंगल्यावर येऊन पोहोचले.

जनार्दन आणि शंकर, वर खाली अख्ख्या बंगलाभर फिरले. पुढचं लॉन, मागची नारळीची बाग, काही काही सोडलं नाही. सुरूवातीला विकास आणि दीपक त्यांच्या बरोबर फिरत होते, पण मग तेही कंटाळले. सगळयांसोबत बाहेर येऊन

बसले. यादव वकीलही कोपऱ्यात एका खुर्चीत बसले होते, दर पंधरा मिनिटांनी एकेक बिस्कीट तोंडात टाकत होते.

तासाभराने जनार्दन-शंकरची जोडगोळी बाहेर आली, खुर्च्या ओढून सर्वांबरोबर बसली. त्यांच्यासाठी आणि सगळ्यांसाठी रेखावहिनींनी फ्रेश गरम चहा मागवला.

"सर्व लोकेशन बघितली आम्ही", जनार्दन चहा पिता पिता म्हणाले. "आता जाऊन लेखकाशी आणि प्रोड्युसरशी आम्ही चर्चा करतो आणि उद्या काय ते सांगतो."

यादव वकिलांकडे हात दाखवत जनार्दन पुढे म्हणाले, "ऑफर तुम्हाला पटली तर वकील साहेब करारनामा करतील तयार. त्यांची निम्मी निम्मी फी वाटून घेऊ आपण."

एवढे बोलून जनार्दन उठले. सगळ्यांना नमस्ते करून म्हणाले, "उद्या सकाळी दहा वाजता येतो आम्ही, आजच्या सारखंच", आणि मग आपली बटालियन घेऊन निघुन गेले.

पुढे काय होणार हे माहिती नसलं तरी, काहीतरी घडतंय, एवढं सगळ्यांच्या लक्षात आलं होतं. निशाला तर आताच लढाई जिंकल्यासारखं वाटत होतं.

रेखाताई गप्पच होत्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजेपर्यंत बंगल्यावर मंडळी जमली. सगळेच नोकरी पेशातले किंवा छोटे मोठे व्यवसाय करणारे लोक होते. गेले तीन चार दिवस सर्वांनाच आपली कामं बाजुला ठेवून मीटिंगला यावं लागत होतं, पण कोणीही तक्रार करत नव्हतं.

a

साडे दहा वाजता जनार्दन, आणि यादव वकील आले. रेखावहिनींनी सगळ्यांसाठी गरम चहा आणायला सांगितले. चहा आला आणि त्याबरोबर आज स्पेशल क्रीम बिस्कीटंही आली. सर्वांनी चहाचे कप हातात घेतले खरे पण चहाचे घुटके घेतानाही सर्वांच्या प्रश्नार्थक नजरा जनार्दनकडे लागल्या होत्या.

जनार्दननी शेवटचा घुटका घेतला, कप खाली ठेवला. देशमुख भावंडांमधे टीमलीडर कोण आहे हे माहीत नसल्याने सगळ्यांकडेच एक मोघम नजर टाकून जनार्दन म्हणाले, "चांगला आहे बंगला. मी बोललो आमच्या लोकांशी. आमच्या नवीन सिरिअलसाठी आम्हाला तीन महिन्यासाठी लागेल, एक्सटेंडेबल बाय थ्री मोअर मंथस्, मग पुढचं पुढे बघता येईल. सिरिअलला चांगला रिस्पॉन्स मिळाला तर वर्ष भरासाठीही कॉन्ट्रॅक्ट वाढवावं लागेल. महिन्यातून साधारणपणे दहा दिवस या लोकेशनवर शुटिंग होईल. सगळं फर्नीचर आमचं असेल, तुमचं फर्निचर काढावं लागेल कारण सिरियलच्या थीमला सूट होत नाही ते. सगळं लिहितीलंच वकील साहेब करारनाम्यात, पण आपलं सांगुन ठेवलं."

जनार्दन जरा थांबले, आणि चष्मा रुमालाने पुसत म्हणाले, "तुम्हाला कॉम्पेन्सेशन म्हणून दर दिवसाचे आम्ही एक लाख रुपये देऊ. इलेक्ट्रीसिटी, वॉटर, बंगल्याचा मेन्टेनन्स खर्च तुमचा. शुटिंगला लागेल तसं बगीच्यात फेरफार करुन घेऊ आम्ही, आमचा हॉर्टिकल्चरिस्ट आणून."

देशमुख भावंडं ऐकत होती. ऐकता ऐकता सगळ्यांच्याच मनात गणित चालू होतं, त्यामुळे अर्धं एक मिनिट कोणीच काही बोललं नाही. अपेक्षित रकमेच्या कितीतरी पटींनी ही रक्कम जास्त होती. शेवटी सुरेश च्या तोंडातून अस्फुट उद्गार आले, "दिवसाचे एक लाख!" परत शांतता.

a

जनार्दन ऐकत होते. ते सुरेशकडे वळून म्हणाले, “देशमुख साहेब, तुमच्या भावना मी समजू शकतो. पण आम्हालाही बजेटचे निर्बंध आहेत. जास्तीत जास्त मी तुम्हाला दर दिवसाचे दीड लाख ऑफर करू शकतो. हे मात्र लिमिट आहे माझं.”

हे तर सोन्याहून पिवळं. जनार्दन साहेबांचं मन पालटण्याच्या आधी होकार द्यायला पाहिजे असं सुरेशला मनोमन वाटलं. एकदा रेखा वहिनींकडे त्याने पाहिलं, पण त्या सरळ नाकासमोर पहात होत्या.

“तसं ठीक दिसतंय, पण बघुया, सांगतो तुम्हाला”. सुरेश म्हणाला.

सुरेश चे दोन्ही हात पकडून जनार्दन म्हणाले, “थँक्यू, थँक्यू देशमुख साहेब. वकील साहेबांनी करारनाम्याचा ड्राफ्ट बनवला आहे, तो जरा बघुन घ्या. त्यात तुमच्या कडच्या लोकांची नावं, रक्कम आणि मोजमापं घालायचं तेवढं बाकी आहे. वकील साहेबांची फी वीस हजार, आपण शेअर करायची आहे. फायनल सह्या होण्यापूर्वी त्याना द्यावी लागेल. सह्या झाल्यावर तुम्हाला पाच लाखांचा ॲडव्हान्सचा चेकही मी रिलीज करीन”.

जरा थांबून जनार्दन म्हणाले, “मोजमापं घेण्यासाठी मी सर्वेअरला बोलावलंय. अकरा वाजेपर्यंत येतो म्हणाला होता. अजून आला नाही म्हणजे कुठेतरी अडकलेला दिसतोय. उद्या घेऊन येतो मी त्याला. अकराच्याच सुमाराला येईन.”

जनार्दन आणि यादव वकील निघुन गेले.

देशमुख भावंडं त्यांच्या सर्वांवर लक्ष्मीच्या दोन्ही हातांनी चाललेल्या या उधळणी खाली गुदमरून गेली होती.

a

सुरेश विचार करत होता, आपल्या घाटकोपरच्या रहात्या फ्लॅट मधलं सगळं फर्नीचर आता बदलता येईल. नवा सोफा सेट, नव्या डायनिंग चेअर्स, सगळं पॉश करुन टाकू. रमेश सिटी जिमखान्याच्या लाईफ मेंबरशिपचा विचार करत होता. आशा-निशा सर्व फॅमिली सकट युरोप ट्रिप, अलास्का क्रूझ घ्यायचा विचार करत होत्या. दीपकने हार्ले डेव्हिडसन मोटरसायकलचे डीलर कोण आहेत ते शोधायला सुरुवात केली होती. विकासचे विचार तर भलत्याच दिशेला भन्नाट चालले होते. सर्व देशमुख भावंडं आपापल्या स्वप्नांत रंगली होती.

“मला नाही वाटत बंगला या लोकांना द्यावा”.. रेखा वहिनी बोलत होत्या.

सर्वांनी चमकून वर पाहिलं

“सुरेशभाऊ, रमेश भाऊ,” रेखाताई म्हणाल्या, “या बंगल्यावर बापुसाहेबांनी जिवापाड प्रेम केलं होतं. इथलं फर्नीचर स्वतः मेहेनत घेऊन यांनी बनवून घेतलं होतं. बगीचात तर कुठुन कुठुन रोपं आणवून लावली होती. फुलझाडं, फळझाडं वेगवेगळे प्रकार. ते तर सगळं जाईलच. आपला गणपती उत्सव, दिवाळी, मुलांचे वाढदिवस सगळं आपण वर्षानुवर्षं एकत्र या बंगल्यावर साजरे करायचो. तेही बंद होईल. आम्ही दोघं या बंगल्याला देशमुख कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारी वास्तू मानत आलो. देशमुख कुटुंब कायम एकत्र रहावं हीच यांची भावना होती. हा बंगला दुसऱ्या कोणाच्या हातात गेला तर मला वाटतं की आपल्या कुटुंबाच्या पायाभूत मूल्यांनाच तडा बसेल.”

पण वहिनी, या बंगल्याचे टॅक्सेस, मेन्टेनन्सचा खर्च, हे सगळं कसं भागणार? “ सुरेश ने विचारलं.

"त्याची नको काळजी भाऊ. यांनी उभारलेला कन्सट्रक्शन व्यवसाय, दोन छोट्या फॅक्टऱ्या अगदी भक्कम पायावर उभ्या आहेत आणि त्या पेलतील हा सगळा खर्च. आपण ही कुटुंबाची वास्तू कुटुंबातच ठेवू. सण, वाढदिवस आणि पुढच्या पिढीचे विवाहसमारंभही इथेच साजरे करु. आपल्या कुटुंबाची नैतिक मूल्ये जतन करु आणि मुलांनाही शिकवू, त्यांच्या मनात रुजवू."

सुरेश, रमेश, विकास, दीपक, आशा, निशा, सगळी देशमुख भावंडं विचार करू लागली. विचार वेगवेगळे, पण त्यांची दिशा एक. प्रत्येकाला हव्या हव्याशा वाटणाऱ्या सुखसोयी मिळवण्याची वाट मोकळी करून घ्यायची की तूर्त त्यांचा विचार बाजूला ठेवून एकत्र कुटुंबाची नैतिक मूल्यं जतन करायची!

भौतिक सुखं कि नैतिक मूल्यं!

भौतिक सुखं कि नैतिक मूल्यं!!

---X---

# ८

# संशयित

मुंबईहुन पुण्याला एक्सप्रेस हायवेने जायचं. एक्सप्रेस हायवे संपल्यावर पुढे सातारा रोड ने चांदणी चौकापर्यंत जाऊन मग उजवीकडे वळायचं. रस्त्याखालचा बोगदा वापरून सातारा रोड ओलांडायचा. बावधन मागे टाकून आणखी थोडं पुढे जायचं आणि "लिटल स्टार गार्डन सोसायटी" असा मोठा फलक दिसला की मेन रोड सोडून उजवीकडे वळायचं, गेटमधून आत जायचं. आत आत जात रहायचं आणि पुढे डोंगराच्या कुशीत तुम्हाला दिसेल टुमदार बंगल्यांची वसाहत.

सुंदर, सुबक दुमजली बंगले. सगळे एकसारखे. सैन्यातून निवृत्त झालेल्या मराठी मातीतल्या ब्रिगेडियर, कर्नल लोकांचे बंगले. आणि त्यांच्या खांद्याला खांदा लावून उभे, अस्सल पांढरपेशा पीढीजात पुणेकरांचेही बंगले. दहा वीस वर्षांपूर्वी बहुतेक सर्वच पुणेकर, कोथरुड रस्त्याचा कचरा डेपो म्हणजे पुण्याची फायनल हद्द समजत होते, पण नंतर पुण्याच्या रोज दुपटी तिपटीच्या वेगाने होणाऱ्या वाढीपुढे सगळ्या सीमा धडाधड कोलमडून पडल्या. धाडसी वृत्तीचे पुणेकर बाहेर पडले आणि नंतर अगदी सदाशीव पेठेतल्या, रास्ता पेठेतल्या पुणेकरांनीही थोडं चाचरत का होईना, सिमोल्लंघन केले.

"ए" मालिकेमधल्या बंगल्यांच्या रांगेतला तिसरा बंगला बावडेकरांचा आणि चौथा ब्रिगेडियर काटदरेंचा. दोन्ही कुटुंबं फार पूर्वी पासून पुण्यात सोमवार

पेठेतले रहिवासी. मधुसूदन बावडेकरांची सोमवारातच प्रिंटिंग प्रेस होती आणि ब्रिगेडियर अनिल काटदरे आर्मीतून नुकतेच रिटायर झाले होते. दोघंही एकमेकांचे शाळासोबती आणि जीवश्च कंठश्च मित्र. शांत निसर्गरम्य वातावरणात बांधल्या जाणाऱ्या प्रशस्त बंगल्यांच्या लिटल स्टार गार्डन सोसायटीबद्दलची माहिती कानावर आल्याबरोबर दोघांनीही तिथे शेजारी शेजारी बंगले बुक केले, आतल्या सुखसोई, सुशोभित फर्नीचर याकडे जातीने लक्ष घातलं आणि दोन वर्षात आपापल्या सोमवारातल्या जागा सोडून बंगल्यांवर रहायला गेले सुध्दा.

नवीन ठिकाणी रहायला गेल्यावर मधुसुदन बावडेकरांची आणि अनिल काटदरेंची, तसंच सौ लीलाताई बावडेकरांची आणि मंजूताई काटदरेंची एकमेकांशी गट्टी अधिकच वाढली. नाही म्हटलं तरी लिटल स्टार गार्डन सोसायटीचा परिसर तसा निर्जनच. त्यामुळे वसाहतीतले रहिवासी एकमेकाला धरुन असायचे. संध्याकाळी क्लब मधे सोसायटी मधल्या सर्व रहिवाशांची हजेरी असायचीच आणि प्रत्येकाचे वाढदिवस सगळे मिळून हौसेने साजरे करायचे, कोणी सोशल फंक्शनमधे गैरहजर असेल तर सगळे आवर्जून चौकशी करायचे आणि पुणे ट्रिप कार्यक्रम कार पूलिंगने करायचे.

ब्रिगेडियर काटदरेना दोन मुलं. संजीव आणि राजीव. दोन्ही मुलानी आर्मीमधे करिअर केली नाही आणि ब्रिगेडियर साहेबांनीही दोघांना कधी आग्रह केला नाही. दोघंही सॉफ्टवेअर इंजिनियर झाले आणि परदेशी निघून गेले.

बावडेकरांचीही अशीच काहीशी परिस्थिती होती. त्यामुळे बावडेकरांच्या बंगल्यात काय आणि ब्रिगेडियर साहेबांच्या बंगल्यात काय, दिवस रात्र तशी सामसूमच असायची.

a

ब्रिगेडियर काटदरेसाहेबांना वयोमानानुसार जिना चढायला त्रास होत असल्यामुळे त्यांचा वावर बंगल्याच्या तळमजल्यावरच असायचा. वरच्या मजल्यावरच्या दोन्ही खोल्या त्यांनी त्यांच्या परदेशाहून कधीकाळी येणाऱ्या दोन मुलांसाठी आणि त्यांच्या फॅमिलींसाठी सुसज्ज करून ठेवल्या होत्या. गेल्या दोन वर्षांत तिथे कोणी रहायला आलं नव्हतं हे मात्र खरं.

एका महिन्यापूर्वी ब्रिगेडियर साहेबांना त्यांच्या पुतण्याचा गोव्याहून फोन आला.

“काका मी समीर बोलतोय, घरून, गोव्याहून. काका, तुम्ही कसे आहात, काकी कशा आहेत?”

सर्वजण ठीक आहेत असं काकांकडून कळल्यावर समीर पुढे म्हणाला, “काका, माझे दोन मित्र आहेत, संतोष आणि राजेश. दोघंही अमेरिकेतच जन्मलेत. न्यूयॉर्कला रहातात. ते दोघंच हिच- हायकिंग करत जगप्रवासाला निघालेत. फिरायचं, देश बघायचे, वेगवेगळ्या संस्कृतींचा अभ्यास करायचा असा त्यांचा विचार आहे म्हणतायत. काका, भारतामधे पुणे, दिल्ली आणि कोलकाता असे त्यांचे प्रवास टप्पे आहेत. पुढे जाणार आहेत बँकॉकला. तर काका, पुण्यात त्यांच्या रहाण्याची आणि फिरण्याची, माफक दरात पण खात्रीची सोय होऊ शकेल का?”

ब्रिगेडियर साहेबांनी मंजुताईंशी थोडा विचार विनिमय केला, आणि मग दोघांची एकवाक्यता झाली, की “ही बिचारी आपल्या संजू राजूसारखी मुलं आहेत. करू त्याना जमेल ती मदत. राहतील इथे तीन दिवस, नाहीतरी रिकाम्याच पडल्यात वरच्या खोल्या दोन वर्षं. आपल्यालाही जरा सोबत मिळेल.”

समीरला ब्रिगेडियर साहेबांनी कळवून टाकलं की मुलं त्यांच्या बंगल्यात तीन दिवस राहू शकतील आणि आपली गाडी, ड्रायव्हर त्याना प्रेक्षणीय स्थळं पहायला, फिरायला उपलब्ध असेल.

समीरने काकांना तीन चारदा थँक्यू थँक्यू म्हणून फोन खाली ठेवला.

एका आठवड्यात पाहुणे मंडळी येणार होती. ब्रिगेडियर साहेबांनी बंगल्याचा पत्ता त्यांना व्यवस्थित कळवला आणि "वाट पहातोय तुमची", अशी पुस्ती जोडली.

एक प्रॉब्लेम आला.

पाहुणे येण्याच्या एक दिवस आधी ब्रिगेडियर साहेबांना सरकार दरबारच्या महत्त्वाच्या कामांसाठी मुंबईला जायला लागलं. पण जाण्यापूर्वी मंजुताईना, दत्तू गड्याला आणि शंकर ड्रायव्हरला पाहुण्यांच्या सरबराईबद्दल सखोल सूचना द्यायला ब्रिगेडियरसाहेब विसरले नाहीत.

"आणि हो मंजू", ब्रिगेडियर साहेब मंजुताईना म्हणाले, "अडीच तीन दिवसासाठीच मुलं इथे असतील. त्याना फार कमी वेळ हातात आहे. दिवसभर बाहेर फिरतील. दुपारी बाहेर काहीतरी अरबट चरबट खाऊन आजारी पडू नयेत. हे माझं पुणे जिम क्लबचं कार्ड दे त्याना. पुणे जिम क्लबमधे चांगलं खात्रीचं स्वच्छ जेवण तरी मिळेल त्याना. आपल्या मुलांसारखीच आहेत. पुण्यात असताना, 'बी माय गेस्ट', म्हणाव त्यांना".

मंजुताईनी मान डोलावली आणि कार्ड घेतलं.

a

गुरुवारी दुपारी ब्रिगेडियर काटदरे साहेब मुंबईला गेले. रोज रात्री घरी फोन करून ब्रिगेडियर साहेब मंजुताईना दिवसभराची हालहवाल विचारत असत, योग्य सूचना देत असत.

पाहुणे आले. मंजुताईनाही काहीतरी उद्योग मिळाला. नवीन विषय, नवीन माहिती ऐकण्यात आली. पाहुण्या मुलांच्या आत्मविश्वासाने, आर्जवी, नम्र वागण्याने मंजुताई आणि सर्व नोकर मंडळी खुष दिसली.

इकडे मुंबईला, रविवार पासून पुढचे चार दिवस ब्रिगेडियर साहेबांच्या टीमच्या राज्यपालांच्या टीमबरोबर, खूप उशीरापर्यंत बैठकी चालल्या होत्या. एक मीटिंग संपली की लगेच विचार विनिमय आणि पुढच्या मीटिंगची तयारी. त्यामुळे मंजूताईना फोन करायला त्याना फुरसत मिळाली नाही. आणि मंजुताईंचाही फोन आला नाही.

शनिवारी सगळी बोलणी संपली आणि ब्रिगेडियर काटदरे समाधानाने पुण्याला परतले. टॅक्सी पुण्याजवळ आली. वाकड नाक्यावर ब्रिगेडियर साहेबांचे दोन सहकारी उतरले आणि रिक्षा घेऊन आपापल्या घरी गेले. ब्रिगेडियर काटदरे टॅक्सीमधे एकटेच पॅसेंजर. ब्रिगेडियर साहेबांनी मंजुताईना फोन लावला आणि बोलले, “हॅलो मंजू, मी पोहोचतोय अर्ध्या तासात. घरी सगळं ठीक आहे नं?”

मंजुताई म्हणाल्या, “अहो कसलं सगळं ठीक? काल सकाळी पोलीसची टीम आणि पांढऱ्या गणवेशातले काही ऑफिसर आपल्या बंगल्यावर आले आणि मला आणि आपल्या सर्व नोकरांना आतच अडकवून ठेवलंय. आम्हाला बाहेर जाऊ देत नाहीत की कोणाला आत आम्हाला भेटायला येऊ देत नाहीत. पांढऱ्या

गणवेशातला एक ऑफिसर बाहेर कोणालातरी सांगत होता की आम्ही संशयित आहोत आणि म्हणून अलिप्त ठेवलंय".

हे ऐकून ब्रिगेडियर साहेब खवळले आणि फोनमधे ओरडले, "संशयित? कसला गुन्हा केल्याचा आरोप ठेवतायत तुमच्यावर? मी आत्ताच्या आत्ता पोलीस कमिशनरना आणि कलेक्टरना फोन करतो आणि जाब विचारतो."

"कमिशनरच्या आणि कलेक्टरच्याच सहीची आहे आम्हाला पकडून ठेवायची ऑर्डर." मंजुताई म्हणाल्या. "अगदी नकोसं झालंय. रस्त्यावरून जाणारा एकही जण आपल्या बंगल्याकडे डोळे वर करून बघत नाही. लीलाताई आणि मधुभावजीसुध्दा माझा फोन उचलत नाहीत."

"बरं. बघतो मी". असे म्हणून ब्रिगेडियर साहेबांनी फोन खाली ठेवला. ब्रिगेडियर साहेब विचार करू लागले. पण खूप विचार करूनही मंजुताईचा आणि नोकरांचा काय गुन्हा असेल आणि त्याना नजर कैदेत का ठेवलं असावं याचा त्याना अंदाज बांधता येईना.

टॅक्सी पुढे जात होती. कोथरुड रोडचं जंक्शन आलं. टॅक्सी वळण घेऊन बावधनच्या दिशेने धावू लागली. टॅक्सी लिटल स्टार गार्डन सोसायटी च्या मेन गेट पाशी आली. सोसायटीचा सिक्युरिटी ऑफिसर गेटवरच उभा होता. ब्रिगेडियर साहेबांना पाहून त्याने सॅल्यूट ठोकला. ब्रिगेडियर साहेबांनी काच खाली केली. सिक्युरिटी ऑफिसर म्हणाला, "सर, क्लब हाऊस मधे कलेक्टर साहेब आणि पोलीस कमिशनर साहेब आपली वाट पहात आहेत, तिकडे आपण जाऊया."

a

ब्रिगेडियर साहेबांच्या उत्तरांची वाट न पाहता पुढचं दार उघडून सिक्युरिटी ऑफिसर टॅक्सीत ड्रायव्हर जवळ बसला आणि ड्रायव्हरला त्याने टॅक्सी क्लब हाऊसकडे घेण्याची सूचना दिली.

टॅक्सी क्लब हाऊसला पोहोचली. ब्रिगेडियर साहेब उतरून तावातावाने आत गेले. कलेक्टर मोंडकर आणि पोलीस कमिशनर थोरात ब्रिगेडियर साहेबांना पाहून उभे राहिले. ब्रिगेडियर साहेब ओरडले, “मोंडकर, थोरात, हा काय प्रकार आहे? माझ्या मिसेसना आणि नोकरमंडळीना नजर कैदेत का डांबून ठेवलंय?”

कलेक्टर मोंडकर दिलगिरी च्या सुरात अगदी खालच्या पट्टीत म्हणाले, नजर कैदेत नाही सर, ते लोक सुरक्षा क्वारंटाईनमधे आहेत?”

“क्वारंटाईनमधे?” ब्रिगेडियर साहेब आश्चर्याने उद्गारले, “ते कशासाठी? त्याना कसलाही रोग झालेला नाही.”

“सर, बसा इथे, मी स्पष्ट करतो” कमिशनर थोरात म्हणाले.

सर्वजण बाहेरच्या डेक वर टेबलाभोवती बसले. चहा मागवला गेला.

“सर, मागच्या आठवड्यात दुबईहून मुंबईला आलेल्या विमानातला एक प्रवासी मुंबईला उतरल्यावर दुसऱ्या दिवशी हॉस्पिटल मधे ॲडमिट झाला. तो करोना व्हायरसने आजारी असल्याचे निदान झालं. त्या रुग्णावर उपचार तर चालू केले गेलेच, पण त्याच बरोबर त्या विमानाने भारतात आलेल्या इतर उतारूंचा शोध घेण्याचं आणि त्यांच्यावर करोना रोग निदान चाचण्या करण्याचं काम सरकारने हाती घेतलं. यातले कोण निरोगी आहेत किंवा नाहीत हे सिद्ध होईपर्यंत सगळेच संशयित रूग्ण.”

a

थोडा दम खाऊन कमिशनर थोरात म्हणाले, “त्या विमानातून आलेले तीनशे चारशे उतारू सर्व भारतभर पांगले होते. तरीसुद्धा सरकारी यंत्रणेने जेवढ्या वेगाने काम करता येईल तेवढ्या वेगाने काम केलं. त्या दरम्यान असं कळलं की त्या विमानातले श्री. संतोष आणि श्री. राजेश असे दोन संशयित रुग्ण पुण्याला आले आणि तीन दिवस तुमच्याकडे राहिले. आम्ही येथे पोहोचेपर्यंत तुमच्या कडून ते निघून गेले होते. त्यांचा मागोवा काढायला आम्हाला पुढे तीन चार दिवस लागले. सापडली ती दुक्कल दिल्ली मधे. हॉस्पिटल मधे ठेवलंय त्याना आणि चाचण्या चालू आहेत त्यांच्यावर. आज उद्या पर्यंत येईल रिझल्ट. तुमच्या कुटुंबियांना, नोकरांना या संशयित करोना रुग्णांकडून संसर्ग पोहोचला असण्याची शक्यता लक्षात घेऊन सोसायटी मधल्या आणि शहरामधल्या लोकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आम्हाला त्यांना जनसंपर्कापासून दूर म्हणजेच क्वारंटाईन करावं लागलं.”

कमिशनर थोरातांच्या अशा व्यवस्थित समजावून सांगण्यामुळे ब्रिगेडियर साहेब जरा शांत झाले, विचार करु लागले.

ब्रिगेडियर साहेब आल्याचे कळल्यामुळे त्यांचे शेजारी श्री बावडेकर आणि सोसायटीमधले इतरही काही मित्र क्लबहाउसमधे त्यांच्या भोवती जमले होते.

बावडेकर म्हणाले, “बरं झालं कमिशनरसाहेब, तुम्ही एवढं सविस्तरपणे सांगितलं. आमच्या सुरक्षिततेबरोबरच आम्हाला मंजुताईंच्या सुरक्षिततेचीसुध्दा काळजी आहे. तुमच्या कडून ऑल क्लिअर चा मेसेज येईपर्यंत आम्ही त्यांना लांबून का होईना, धीर देऊ, सोबत देऊ.”

“त्या दोन संशयित रुग्णांना करोना व्हायरसची बाधा झाली असण्याची शक्यता कितपत आहे”? ब्रिगेडियर काटदरेनी विचारलं.

“ते आत्ता तरी सांगता येत नाही”. कमिशनर थोरात म्हणाले. “आमच्या हातात बातमी आली की कळवू आम्ही ताबडतोब, सर. ऑल क्लिअर असेल तर आनंदच आहे, पण जर त्या दोन संशयित रुग्णांना करोनाची बाधा झाल्याचं निश्चित झालं तर तुमच्या कुटुंबियांना चाचण्यासाठी ताबडतोब सरकारी हॉस्पिटलात हलवावे लागेल.”

हा तर फारच गंभीर इशारा होता.

ब्रिगेडियर काटदरेंचं डोकं विचारांनी भणभणायला लागलं. सगळीच अनिश्चितता.

त्या संशयित रुग्णांवरच्या चाचणीचा निकाल हा स्टार्टिंग पॉईंट. जर ते करोनाग्रस्त निघाले तर मंजूला सरकारी हॉस्पिटलात हलवावे लागेल.

आर्मी हॉस्पिटल मधे सोय होऊ शकते का, ते पहायला पाहिजे.

जर मंजूपण करोनाग्रस्त निघाली तर मग उपचार?

या रोगावर उपचार करणारे निष्णात डॉक्टर गाठायला लागतील.

हातात वेळ कितीसा मिळणार आहे कोण जाणे.

रक्त द्यावं लागलं तर मंजूच्या रक्त गटाप्रमाणे ब्लडबॅन्कला कळवून ठेवावं लागेल.

उपचाराना यश यायला किती दिवस लागतील कोण जाणे.

यश येईल नं ,पण उपचारांना!

आणि यश नाही आलं तर... तर!

ब्रिगेडियरना पुढे विचार करवेना.

पण परत तोच विचार भेडसावायला लागला. खरंच, उपचारांना यश नाही मिळालं तर?

पॉइंट ऑफ नो रिटर्न...!

मग आपल्याकडे कोण बघणार?

जेवण खाण, औषध पाणी सगळं प्रेमाने कोण करणार?

संमिश्र भावना.

अचानक ब्रिगेडियर साहेबांच्या नजरेसमोर डी- बावीस नंबरच्या बंगल्यात एकट्याने राहणाऱ्या प्रिया राघवन् ची छबी आली.

ब्रिगेडियर साहेब चपापले. एकदम खजील झाले. विचारांच्या या शृंखलेत तरी प्रिया राघवनची आठवण यायला नको होती असं त्याना वाटलं.

ब्रिगेडियर साहेबांनी इकडे तिकडे पाहिलं. जणू आपल्या मनातील विचार कोणाला कळतायत का याचा अजमास घेतला.

आजुबाजुला सगळं सुरक्षित दिसलं.

मित्रमंडळी आपापसात कुजबुजत होती. हलक्या आवाजात बोलत होती.

कमिशनर थोरात आणि कलेक्टर मोंडकर जायला उठले. ब्रिगेडियर साहेबांशिवाय बाकी सर्व मंडळी उठली. कमिशनर साहेबांनी सहानुभूती पूर्वक ब्रिगेडियरना थोपटलं आणि साहेब लोक निघुन गेले.

बावडेकर ब्रिगेडियरसाहेबांच्या जवळ आले आणि म्हणाले, “अनिल, आज तू आमच्या घरी रहा. मंजुताईशी लांबून का होईना संपर्क राहिल आणि संसर्गही टाळता येईल.”

ब्रिगेडियर साहेबांनी जरा विचार केला. "नको मधू". ब्रिगेडियर म्हणाले, "त्यापेक्षा मी कोरेगाव पार्क मधल्या माझ्या क्लबला जातो. तिथे सिव्हिल सर्जन, आर्मी चे लोक भेटतील. काही इमर्जन्सी येणार असली तर प्राथमिक तयारी करून ठेवता येईल. जेवण तिथेच घेईन आणि फारच वेळ आली तर क्लबमधेच रूम घेईन रात्रीसाठी."

ब्रिगेडियर साहेबांनी घरी फोन लावला, मंजुताईना शक्य तेवढी हकीकत सांगितली, त्यांना धीर दिला, की त्या काही संशयित रुग्ण नाहीत पण सुरक्षा बंदीवासात आहेत आणि संध्याकाळ पर्यंत किंवा उद्या सकाळपर्यंत ऑल क्लीअरचा संदेश येईल.

मंजुताईना, "टेक केअर", असे सांगून ब्रिगेडियर साहेबांनी फोन खाली ठेवला आणि क्लबच्या स्टुअर्डला त्यांच्यासाठी टॅक्सी बोलवायाला सांगितलं.

अर्ध्या तासात टॅक्सी आली. ब्रिगेडियर साहेब टॅक्सीत बसले आणि पुणे जिम क्लबमधे पोहोचले. त्यांची आर्मीची मित्रमंडळी एक एक करून जमा झाली. कोपऱ्यातल्या नेहमीच्या टेबलावर मंडळी बसली.

सुरूवातीला नेहमी प्रमाणे हास्यविनोद चालू झाले, पण लवकरच ब्रिगेडियर साहेबांचा गंभीर मूड सर्वांच्याच लक्षात आला. ब्रिगेडियर साहेबांनीही मग नमनाला घडाभर तेल न ओतता थोडक्यात पण स्पष्ट पणे आपला प्रॉब्लेम मित्रमंडळीनाही सांगितला. करोना व्हायरस आजाराचं गांभिर्य सगळयांनाच पूर्ण पणे ठाऊक असल्याने ब्रिगेडियर साहेबांबद्दल सर्वांनाच सहानुभूती वाटायला लागली.

विचारचक्रे सुरु झाली. विचारविनिमय सुरू झाला. ओळखी पाळखी, कॉन्टॅक्ट्स, सगळयांची उजळणी झाली. ब्रिगेडियर साहेबांच्या मदतीसाठी सगळेजण

कंबर कसून ठाकले. समस्त इंन्डियन आर्मीची शक्ती आपल्या बरोबर आहे या विचाराने ब्रिगेडियर साहेबांनाही दिलासा मिळाला.

"धिस राउंड इज ऑन मी", असे म्हणून उभ्या असलेल्या वेटरला त्यानी योग्य त्या सूचना दिल्या.

"हाय गाईज", आवाज आला. सर्वांनी माना वर केल्या. कर्नल सीतारामन् टेबलाजवळ उभे होते.

"कसे आहात सगळे? कसं चाललंय?" कर्नल साहेबांनी विचारलं.

काही उत्तर देण्याची गरज नव्हती, अपेक्षाही नव्हती. सर्वांनी माना डोलावल्या.

"ही माझी कझिन, प्रिया राघवन". कर्नल साहेबांनी त्यांच्या बरोबर आलेल्या मध्यमवयीन महिलेची ओळख करून दिली.

प्रिया मॅडमनी सगळ्यांना "हॅलो", केलं.

ब्रिगेडियर काटदरे साहेबांकडे निर्देश करून प्रिया मॅडम म्हणाल्या, "मी ओळखते ब्रिगेडियर साहेबांना. आमच्या सोसायटीतच राहतात."

"ओ, जग किती लहान आहे". कर्नल सीतारामन् म्हणाले.

थोड्या इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्यानंतर कर्नल साहेबांनी सगळ्यांना "बाय" केलं आणि प्रिया राघवन् ला घेऊन पूलसाईड टेबलाच्या दिशेला चालू लागले.

a

ब्रिगेडियर साहेबांच्या मनात पाल चुकचुकली. मघाशी संभाव्य करोनाग्रस्त मंजूबद्दल विचार करताना त्यांना प्रिया राघवन् आठवली होती आणि दोन तासात समोर ती उभी! विचित्र योगायोगच की हा!

अतिशय हडबडून गेलेल्या ब्रिगेडियर साहेबांनी ताबडतोब स्वतःसाठी एक लार्ज पेग, ऑन द रॉक मागवला.

मंडळींची चर्चा चालूच होती. ब्रिगेडियर साहेबांच्या मदतीसाठी एक इमर्जन्सी प्लॅन साकार होत होता. पोटात थोडं खाणं पिणं गेल्यामुळे ब्रिगेडियर साहेबही जरा शांत झाले होते.

रात्री नऊच्या सुमारास कमिशनर थोरातांचा फोन आला. “ब्रिगेडियर साहेब, गुड न्यूज आहे. त्या दोन्ही संशयित रूग्णांच्या चाचण्या निगेटिव्ह रिझल्ट दाखवतायत. त्याना दोघांनाही करोना व्हायरसची बाधा झालेली नाही. त्यामुळे तुमच्या कुटुंबियाना आणि नोकरमाणसाना करोनाचा संसर्ग झालेला असण्याची शक्यता नाही. त्यांचा सुरक्षा बंदीवास मी ताबडतोब उठवायला सांगतोय.”

“थँक्यू कमिशनर,” ब्रिगेडियर साहेब म्हणाले, “आणि त्या दोन संशयित रुग्णांच्या बंदिवासाचं काय?”

“दिल्लीहून मेसेज आलाय”. कमिशनर थोरात म्हणाले, “त्या संशयित रुग्णांनाही मुक्त करण्याची प्रक्रिया चालू झाली आहे. दोन तीन तासात त्यांचीही मुक्तता होईल.”

ब्रिगेडियर साहेब खुश झाले. टेबलावर सर्वांना त्यांनी ही गुड न्यूज सांगितली.

a

“धिस राउंड इज ऑन मी”, असे म्हणत उभ्या असलेल्या वेटरला त्यांनी योग्य त्या सूचना दिल्या.

तासाभराने मंडळी उठली. बिलांवर सह्या खरडल्या आणि मंडळी डायनिंग हॉलच्या बाहेर आली.

क्लब मॅनेजर लाऊंजमध्येच उभा होता. रिटायर्ड आर्मी ग्रुप ला त्याने सुहास्य वदनाने “गुड नाईट”, केलं. मग थोडेसे मागे राहिलेल्या ब्रिगेडियर साहेबांकडे त्याचं लक्ष गेलं.

“हॅलो ब्रिगेडियर साहेब,” मॅनेजर म्हणाला, “कशी झाली दिल्लीची ट्रिप?”

ब्रिगेडियर साहेबांनी कोऱ्या चेहऱ्याने मॅनेजरकडे बघितलं.

“आणि हो ब्रिगेडियर साहेब”, क्लब मॅनेजर पुढे म्हणाला, “ते दिल्लीचे ॲरिअर्स लवकर क्लिअर झाले तर बरं होईल. सव्वा दोन लाखांचं बिल आहे, क्लबमधे राहण्या-जेवणाचं आहे आणि क्लबच्या दुकानात स्कॉच बाटल्या, नेकलेस वगैरे खरेदीचंसुध्दा बिल आहे, पेमेंटला उशीर झाला तर उगीच इंटरेस्ट सुध्दा द्यावं लागेल.”

“अरे फर्नांडिस, कुठचं बिल, कुठले ॲरिअर्स?” ब्रिगेडियर काटदरे क्लब मॅनेजरच्या अंगावर ओरडले. “मी दिल्लीला गेलोच नव्हतो तर कुठलं बिल?”

क्लब मॅनेजर बुचकळ्यात पडला. जवळच्या फाईलमधुन त्याने एक बिल काढलं. “हे बघा ब्रिगेडियर साहेब, या आठवड्यातलंच बिल आहे. दिल्लीच्या डिफेन्स कॉलनी क्लबने पाठवलं आहे. आपल्या क्लबला संलग्न आहे तो क्लब. हा क्लब कार्ड नंबर पहा सर, आपलंच कार्ड आहे नं हे?”

ब्रिगेडियर साहेबांनी बिल हातात घेतलं आणि वाचलं. “थांबा जरा, माझ्या कार्डवर काय नंबर आहे ते पहातो”, असे म्हणत ब्रिगेडियर साहेबांनी आपल्या पँटच्या बॅक पॉकेटमधून आपलं पाकिट काढलं आणि क्लब कार्ड शोधू लागले. सगळी क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड मिळाली पण क्लब कार्ड काही मिळेना.

कुठे ठेवलंय बरं मी? ब्रिगेडियर साहेब विचारात पडले, आणि लवकरच ब्रिगेडियरना आठवलं. सगळं प्रकरण त्याना स्वच्छ दिसायला लागलं. ब्रिगेडियर साहेबांनी केलेल्या आदरातिथ्याचा, दिलेल्या सवलतींचा चक्क गैरफायदा उठवला गेला होता. उघड उघड फसवणूक. संशयाला जागाच नव्हती.

“अरे चोरांनो”, ब्रिगडियर साहेब गरजले. “तुम्हाला राहायला जागा दिली, खाऊ पिऊ घातले, तुमची पोटे बिघडू नयेत म्हणून क्लब मध्ये व्यवस्था केली, त्याचे पांग असे फेडता काय? दाखवतोच आता तुम्हाला इंडियन आर्मीचा इंगा”

ब्रिगेडियर साहेबांनी झटक्यात पोलीस कमिशनर थोराताना फोन लावला, “हॅलो थोरात, त्या दोन संशयित रुग्णांना सोडलं का तुम्ही? पुन्हा पकडा त्याना, असतील तेथे. पण यावेळी संशयित रुग्ण म्हणून नाही, तर संशयित गुन्हेगार म्हणून.”

---X---

a

# ९

# कोकणातले तीन दिवस

“नितीनसाठी एक छान मुलगी सुचवलीय ह्यांच्या मित्रांनी, गुप्ते आडनाव आहे, पण हा शहाणा म्हणतोय, घाई काय आहे! ऑफिस संपल्यावर टेनिस, मित्रमंडळी आणि शनिवार रविवारी ट्रेकिंग याशिवाय सुचतंय काय त्याला!” मीनाताई चिटणीस त्यांच्या मैत्रिणीला, शोभाताई परबना सांगत होत्या.

“अगं आमच्याकडे पण हाच प्रॉब्लेम आहे.” शोभा ताई म्हणाल्या. “सुहास ऐकतच नाही. अगदी नितीन सारखं चाललंय त्याचंही. ह्याना परवा दरेकर नावाचे गृहस्थ भेटले होते, आमच्यापैकीच आहेत. त्यांची मुलगी आहे. फार चांगलं स्थळ आहे. आणि आम्हालाही तुमच्याप्रमाणेच परजातीतली सून शक्यतो नको आहे.”

“खरं आहे. हल्ली आपल्या मुलांचं परजातीत लग्न करायचं प्रमाण एवढं वाढलंय, की काही वर्षांनी नुसती आपली आडनावं तेव्हढी राहतील, घरातले आचार संस्कार अगदी झीरो होतील”. मीनाताई म्हणाल्या.

“अगदी खरं बोललीस”. शोभाताईनी दुजोरा दिला.

मुख्य गोम अशी होती, की आई वडिलांच्या मते मुलांची लग्नाची वयं झाली होती, आणि मुलांच्या मते, अजून त्याना थोडी हुंदडण्याची मोकळीक हवी होती. आणि जातीपातीचा तर त्यांना विधिनिषेधच नव्हता.

a

चिटणीस कुटुंब अंधेरीला आणि परब कुटुंब सांताक्रुझला रहाणारे. आणि जशा मीनाताई चिटणीस आणि शोभाताई परब मैत्रिणी होत्या तशीच त्यांची मुलं, नितीन चिटणीस आणि सुहास परब जीवश्च कंठश्च दोस्त होते.

या दोन्ही कुटुंबाना सांधणारा एक मोठा दुवा म्हणजे कोकणातलं मुरुडजवळचं सातपाडीचं राममंदीर.

सातपाडीचं राम मंदिर कोणाला माहीत नाही! मुरुड जंजिरा भागातलं एक नावाजलेलं देवस्थान. रामजन्मोत्सव या मंदिरात दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा होतो. चिटणीस कुटुंब आणि परब कुटुंब गेल्या शंभर वर्षांपासून त्या देवस्थानाचे मानकरी आहेत. आणि या दोन्ही परिवारातली बाहेरगावी स्थाईक झालेली मंडळी सुद्धा मुलांना बाळांना घेऊन या समारंभासाठी अगदी आवर्जून येतात; कीर्तनात, समुहभोजनात आणि जन्मोत्सवाच्या सोहळयात भरभरून सामिल होतात.

यावर्षी देखील मधु चिटणीस आणि जयंत परब एक आठ सीटस् ची ट्रॅव्हलर बस भाड्याने घेऊन आपल्या कुटुंबियांसह मजेत गप्पा गोष्टी करत, खात पीत मुरुडला चालले होती.

“चला, नागांव गेलं आता दोन तासात मुरुड.” मधु चिटणीस म्हणाले. जयंत परबनी मान हलवली.

समुद्राच्या काठाकाठाने जाणारा मोकळा रस्ता, मधुनच छोटे घाट, वळणं, नारळांच्या बागा, सुपारीच्या बागा, कोकणपट्टीचं निसर्ग सौंदर्य मनाला हरखून टाकत होतं.

मधु चिटणीसांचं मन चाळीस वर्षे मागे गेलं आणि पूर्वीचा तो मुंबई मुरुड खडतर प्रवास आठवला. सकाळी लवकर उठून आईबाबांबरोबर भाउचा धक्का.

बोटीचा प्रवास. नंतर कसरत करत पडावात उतरायचं, त्यात दोनचार जणं हमखास पाण्यात पडायचे आणि नंतर टांग्याने किंवा रिक्षाने मुरुडच्या घरी. दोन दिवस उत्सवाची धमाल. देतील ते काम करायचं, कुठे तरी झोपायचं, खूप दिवसांनी भेटलेल्या चुलत -आते भावंडांबरोबर खेळायचं. वडिल मंडळींच्या स्पेशल अड्ड्याला लागेल ती मदत करायची आणि तिसऱ्या दिवशी दमून भागून आलं तसं मुंबईला परत.

आताचा हा पोटातलं पाणीही न खळता सृष्टी सौंदर्य पहात चाललेला प्रवास आणि पूर्वी चा बोटीचा प्रवास यांची तुलनाच होऊ शकत नव्हती.

“काशिदचा बीच गेला. चला आता अर्ध्या तासावर आपलं सुदर्शन रिसॉर्ट.” मधु चिटणीसानी सुवार्ता सांगितली.

पूर्वी सगळे चिटणीस परब कुटुंबीय स्थानिक नातेवाईकांच्या घरी किंवा मंदिरा लगतच्या खोल्यांमधे रहायचे. पण ते दिवस गेले. गेली काही वर्षं, मुरुडच्या या ट्रिपसाठी मधु चिटणीस आणि जयंत परब कुटुंबानी सुदर्शन रिसॉर्टला मुक्काम कायम ठेवला होता. रिसॉर्टची मेंबरशिप घेतली होती. बराच डिस्काउंटही मिळायचा आणि तिथला खालपासून वर पर्यंत सर्व स्टाफ ओळखीचा झाल्यामुळे हवी तशी सर्विसही मिळायची.

दुपारचे दोन वाजेपर्यंत गाडी सुदर्शन रिसॉर्टला थडकली. रिसॉर्टची होस्टेस मृदुला सामोरे आली. वेलकम ड्रिंक मागवलं, प्रवास कसा झाला वगैरे चौकशी केली. नेहमीच्या प्रशस्त खोल्या मिळाल्या. जेवणही तयारच होतं.

“आज अगदी रिलॅक्स व्हा सगळे, उद्या पूजेची गडबड आहेच”. मधु चिटणीस म्हणाले. वास्तविक कोणाला काही सांगण्याची गरजच नव्हती. सर्व

वातावरण एवढं शांत, संथ होतं की पहिला दिवस सर्वांनी पूर्ण आरामात काढला. रात्री ताऱ्यांच्या विस्तीर्ण छताखाली टेबल खुर्च्या टाकून समुद्राच्या लाटांचे आवाज ऐकत आणि तिथेच खमंग जेवणाचा स्वाद घेत मंडळी आणखी सुखावली. तिथून उठायला कोणाचं मन घेईना. शेवटी मधु चिटणीसानी सर्वांना समज दिली, “उद्या सकाळी आठ वाजता ब्रेकफास्टसाठी सर्वांनी डायनिंग हॉल मध्ये हजर व्हायचंय. साडेनऊ पर्यंत मंदिरात पोहोचायलाच पाहिजे आपल्याला.”

दुसऱ्या दिवशी सकाळी ठरल्याप्रमाणे लवकर उठून, तयार होऊन, साडेनऊला मंडळी मंदिरात पोहोचली. चिटणीस आणि परब परिवार मोठ्या सख्येने हजर होता. अगदी घरच्या मंगल कार्याचं वातावरण होतं. कथेची तयारी चालली होती. देवासमोर दोन तरतरीत मुली अतिशय सुंदर रांगोळी काढत होत्या. नव्या दिसल्या म्हणून मीनाताईनी स्थानिक यजमानणीला विचारलं, “प्रभाताई, कोण हो या मुली? किती सुंदर रांगोळी काढतायत!”

प्रभाताई म्हणाल्या, “मुंबईच्या आहेत, आपल्या भाईकाकांच्या ओळखीच्या. एक नीला गुप्ते आणि दुसरी शीला दरेकर. इथल्या शाळेत आठवडाभरासाठी कसलासा आर्ट क्लास घ्यायला अनायासे आलेल्या आहेत, भाईकाका त्याना घेऊन आले आपला उत्सव बघायला.”

मुलींची नावं ऐकल्यावर मीनाताई आणि शोभाताई जरा चमकल्याच आणि एकमेकींशी काही बोलणार तेवढ्यात तिकडे कथेकरी बुवांनी कथा सुरू केली आणि हा विषय इथेच राहिला.

सुहास आणि नितीन तिथेच उभे होते, पण रांगोळी काढणाऱ्या आणि आर्ट शिकवणाऱ्या मुली म्हणजे, “नॉट अवर टाईप”, असे मनात म्हणून दोघांनीही

डोळयांवर काल्पनिक का होईना, फिल्टर भिंगं बसवली आणि तेथून काढता पाय घेतला.

कथा संपली. राम जन्म झाला. आरती झाली.

मधु चिटणीस, मीनाताई, जयंत परब, शोभाताई आपल्या नातेवाईकांशी खूप दिवस राहून गेलेल्या गप्पागोष्टी करण्यात रमले.

“चला जेवण तयार आहे” प्रभाताईनी सर्वांना सूचना दिली. जेवण साधं होतं पण अतिशय रुचकर. जेवणं झाल्यावर निरोप घेताना मीनाताई प्रभाताईना म्हणाल्या, “जेवण छान होतं हं प्रभाताई. एवढे सगळे नैवेद्याचे प्रकार बारा वाजायच्या आत तयार ठेवण मोठं अवघड काम आहे.”

जवळच उभ्या असलेल्या शीला आणि नीलाकडे हात दाखवत प्रभाताई म्हणाल्या, “या दोघींची खूपच मदत झाली मला यावेळी. पहाटे पाच पासून माझ्या बरोबर उभ्या आहेत स्वैपाक घरात “.

“अरे वा” मीनाताई आणि शोभाताई कौतुकाने म्हणाल्या.

“घरगुती मुली”, नितीन पुटपुटला. आणखी एक काळं भिंग डोळयांवर चढलं.

रात्री जरा उशीराच मंडळी जेवायला रिसॉर्टच्या डायनिंग हॉलमधे आली. एका बाजूच्या टेबलावर नीला आणि शीला बसलेल्या शोभाताई ना दिसल्या. शोभाताईनी थांबून सहजच विचारलं , “तुम्ही पण इथेच उतरला आहात का? आज तुम्हालाही उशीर झालेला दिसतो”.

आम्ही क्लबमधे जातो संध्याकाळी बॅडमिंटनसाठी “.

a

सुहास मनात म्हणाला, “खेळून घ्या, खेळून घ्या. मुंबई ला मिळत नसेल.”

मीनाताईनी विचारलं, “मुंबईला पण खेळता का तुम्ही? “

“हो”. नीला म्हणाली, “वरळीच्या स्पोर्टस् क्लबची ऑनररी मेंबरशिप आहे आमची दोघींची, स्टेट लेव्हलसाठी”.

“आँ”? नितीन आणि सुहासच्या डोळयावरचं एक काळं भिंग खळळकन निखळून पडलं.

जेवणं झाली. सगळेच दमलेले होते. लवकर झोपाझोप झाली.

दुसऱ्या दिवशी लवकर उठून पंचवीस किलोमीटर दूर असलेल्या कुलदेवतेच्या मंदिरात जाण्याचा कार्यक्रम झाला.

कोकणातले नवे रस्ते आणि त्यामुळे आलेली सुबत्ता उघड दिसत होती. सपाट किनारा, किनाऱ्याने जाणारा नागमोडी रस्ता, मधेच दिसणारे काळेशार खडक, नारळ सुपारीच्या बागा याबरोबरच जागोजागी दिसणारी कोकणमेवा विक्री केंद्रं प्रत्येकाला वेगवेगळया तऱ्हेने प्रभावित करत होते.

मधु चिटणीस आणि जयंत परब लहानपणच्या आठवणीना उजाळा देत होते तर नितीन आणि सुहास इथे वॉटर स्पोर्टस् रिसॉर्ट काढायला कितपत स्कोप आहे, काय खर्च येईल याचा आढावा घेत होते.

देवदर्शन झालं. परतीचा प्रवास करताना वाटेतच अस्सल कोकणी जेवणाचा कार्यक्रम झाला. रिसॉर्टला परत आल्यावर ए सी लाऊन मस्तपैकी झोपही झाली.

सुर्यास्ताची वेळ आली होती. नितीन आणि सुहास बीचवर फिरायला, अंग मोकळं करायला बाहेर पडले. पायऱ्या उतरून खाली आले. आलटुन पालटुन ब्रिस्क

वॉक, जॉगिंग अशी रपेट त्यानी सुरु केली. तेवढ्यात नीला शीलाची जोडी एका खडकावर बसलेली त्याना दिसली. सुर्यास्ताची शोभा स्तब्ध पणे दोघी नजरेत साठवून घेत होत्या. जॉगिंग करता करता नितीन आणि सुहासने हात हलवला, त्यांनीही हात हलवून प्रत्युत्तर दिलं.

अर्धा तास निघून गेला. नितीन आणि सुहास गप्पा मारत, संथपणे चालत परतत होते. संधीप्रकाशाची वेळ होती. लवकरच गडद काळोख पडणार हे निश्चितच होतं. शीला आणि नीला तिथेच त्या खडकावर बसलेल्या त्याना जेव्हा दिसल्या तेव्हा आश्चर्यच वाटले. त्या दोघी गप्पामधे आणि सुरेल आवाजात गाणी म्हणण्यात एवढ्या रंगून गेल्या होत्या की नितीन आणि सुहास अगदी जवळ आल्यावर त्यांना चाहूल लागली.

“काळोख पडायला लागलाय. इट इज नॉट सेफ हियर. चोऱ्यामाऱ्या इथेही व्हायला लागल्यात असं ऐकतो”. सुहास म्हणाला.

“इथे इतका संथ गार वारा वाहतो आहे आणि शांत वातावरण आहे की इथुन हलावसंच वाटत नाही. वरळी सी फेसलाही आम्ही कित्येकदा सुर्यास्त पाहतो पण ही मजा तिथे बिलकुल नाही”, नीला म्हणाली.

नितीन आणि सुहासही दमलेले होते. तिथेच खडकावर तेही टेकले. कोणीच काही बोलत नव्हते.

इतक्यात दरडावणीचा सूर कानावर आला, “पैसा पाकीट खाली करो नही तो जानको खतरा है”.

चौघांनी वळून पाहिलं तर दोन काळया आकृत्या समोर उभ्या. नितीनला आणि सुहासला अशा प्रसंगाला कधीच तोंड द्यावे लागले नव्हते. त्यातून या चोरांचं

a

येणं इतकं अनपेक्षित होतं की दोघांची मती अगदीच गुंग झाली. ओरडण्याचा काही फायदा नव्हता कारण हाकेच्या अंतरावर कोणीही नव्हतं. पैशाची पाकिटं, घड्याळं, मोबाईल यावर बहुतेक डोळा असणार चोरांचा, देऊन टाकावं आणि जीव वाचवावा, असे साधारण विचार नितीन आणि सुहासच्या मनात येत होते.

पण पुढच्या तीन सेकंदात अतिशय वेगाने घटना घडल्या. आदेश मिळालेल्या सैनिका प्रमाणे विजेच्या गतीने नीला आणि शीला उठल्या आणि त्याच वेगाने त्यांनी हालचाली केल्या. चौथ्या सेकंदाला ते दोन्ही चोर जमिनीवर विव्हळत पडले होते. शीलाने परत एक पवित्रा घेतला आणि दोन्ही चोर उठून धूम पळत सुटले.

नितीन आणि सुहास मंत्रमुग्ध झाल्या प्रमाणे बसले होते. हात झटकत शीलाने दोघांना गदागदा हलवले आणि म्हणाली "चला".

"हो, हो. चला" दोघंही म्हणाले आणि खडकावरुन उठले.

बीचवरुन रिसॉर्टच्या पायऱ्या चढता चढता नितीनच्या मनात एक विचार आला. पुढे चालणाऱ्या दोघींना उद्देशून त्याने विचारले, "शाळेत कोणत्या आर्टचे क्लास घेता तुम्ही? शिवण टिपण किंवा चित्रकला नसणार बहुतेक!"

"खरं आहे". शीला म्हणाली. "आम्ही मार्शल आर्टस् चे क्लास घेतो. कराटे आणि तायक्वान्डो. आम्ही दोघीही ब्लॅक बेल्ट आहोत."

नितीन आणि सुहास नी माना हलवल्या. डोळ्यावरची उरली सुरली काळी भिंगं, फिल्टर जे काही असतील ते खणखणत निखळून गेले. चक्काचूर झाले.

रिसॉर्टच्या केबिनची रांग जवळ आली. चौघेही थांबले.

"अर्ध्या तासात डायनिंग हॉल?" नीतिनने नीलाला विचारलं.

a

दोघींनी एकमेकींकडे पाहिलं. निशःब्दपणे संदेशांची देवाणघेवाण केली. नीलाने होकारार्थी मान हलवली.

नितीन आणि सुहास आपापल्या केबिनमधे गेले. आंघोळी आणि स्वच्छता आटोपून दोघंही अर्ध्या तासात डायनिंग हॉलमधे पोहोचले. सिनियर मंडळी त्या आधीच आली होती. त्यांच्या बरोबर न बसता नितीन आणि सुहास वेगळ्या टेबलवर बसले. पाच दहा मिनिटांतच नीला आणि शीला आल्या. सर्वांना हॅलो करुन दोघीही मुलांच्या टेबलाकडे गेल्या. वेटरने खुर्च्या अॅडजस्ट केल्या आणि दोघी बसल्या. थोड्या वेळापूर्वीचा तणाव आता निघुन गेला होता. सुरुवातीला जरा अवघडून पण नंतर मोकळेपणाने गप्पा सुरू झाल्या.

तिकडे सिनियर टेबलवर मधु चिटणीस आणि जयंत परबच मुख्यत्वे बोलत होते. मीनाताई आणि शोभाताई तशा शांतच होत्या. मधुन मधुन "हुं हुं" करत होत्या. मीनाताई चिटणीसांचं सगळं लक्ष नीला गुप्ते कशी बोलते, वागते, हसते याकडे होते तर शोभाताई परब त्याचप्रमाणे शीला दरेकरकडे नजर ठेऊन होत्या.

कोकणची तीन दिवसांची ट्रिप संपली. चिटणीस, परब मुंबईला आले, आपापल्या कामाला लागले.

मीनाताईनी नितीनला एकदोनदा नीला गुप्ते बद्दल विचारायचा प्रयत्न केला पण उडवाउडवीची उत्तरे मिळाली. तिकडे शोभाताईनीही सुहासला शीला दरेकर बद्दल विचारायचा प्रयत्न केला पण त्यांनाही तशीच उडवाउडवीची उत्तरं मिळाली.

पुढचा एक महिना नितीन आणि सुहास दोघंही बरेच बिझी होते. रात्री दोघांनाही यायला बराच उशीर व्हायचा. रात्री डिनर टेबलवर नितीन ने बाबाना स्पष्टीकरण दिलं होतं, "इयर एन्डिन्गाची कामं असतात बाबा. सगळ्या सिस्टिम

बदलतायत. कायद्यातली कलमं बदलतायत. आयएसओ चौदाहजारच्या कम्पलायन्सचंही चाललंय. मीटिंग, ट्रेनिंग सेशन्स असतात त्यासाठी. आणि हो, वरळीच्या स्पोर्टस् क्लबमधे राज्यस्तरीय चाचणी मॅचेसही चालू आहेत. फार चुरशीची चढाओढ आहे तिथेही. मजा येते बघायला. व्हेरी इंटरेस्टिंग.''

मधुदादानी मान डोलावली. मीनाताई ऐकत होत्या. नितीनने दिलेल्या लांबलचक कारणावळीतलं शेवटचं कारण त्यांनी बरोबर टिपलं आणि दुसऱ्या दिवशी दुपारी शोभाताई बरोबर फोनवर बोलताना त्या एका छोट्याशा वाक्याचं मोठं विश्लेषणही केलं.

''कशा असतीला हो, या नीलाच्या आई, गुप्ते बाई? तुमच्या सारखी त्यांच्याशीपण मैत्री व्हायला पाहिजे माझी.'' मीनाताई चिटणीस म्हणाल्या.

''मीही तोच विचार करते.'' शोभा ताई परब म्हणाल्या '' शीलाच्या आईशी, त्या देरेकर बाईंशी जमलं पाहिजे माझं''.

महिना संपला. सुहासचा वाढदिवस आला. आणि पुढच्याच आठवड्यात नितीनचा वाढदिवस. एक सोईस्कर रविवारचा दिवस ठरवला गेला. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे चिटणीस कुटुंबीय दोन्ही वाढदिवस एकत्र साजरा करायला सांताक्रुझला परबांच्या घरी जमले.

मीनाताईनी फर्मास सीकेपी स्टाईलची बिऱ्याणी केली होती. शोभाताईनी मालवणी पध्दतीने चिकन बनवलं होतं. आणि हो, चिकन टिक्का, चिकन विंग्ज वगैरे स्टार्टर्स बाहेरुन मागवले होते. आत निर्मलाबाई गरम गरम पुऱ्या तळून देणार होत्या.

दोघांचे दोन केक आणले होते. आता सगळी तयारी झाली की मेणबत्त्या पेटवायच्या.

सगळी तयारी तर होती, पण कुठेतरी खोळंबा होता.

मधु चिटणीस आणि जयंत परब ग्लास घेऊन सोफ्यावर बसले होते. त्याना जॉइन होण्याऐवजी नितीन आणि सुहास गॅलरीतच घुटमळत होते.

हे दोघं कोणाचीतरी, किंवा कसलीतरी वाट पहातायत हे मीनाताईनी आणि शोभाताईनी मनोमन ताडलं होतं.

तेवढ्यात गॅलरीत एक्साइटमेंट झाली. “आल्या, आल्या” असे शब्द ऐकू आले.

डोअरबेल वाजली. नितीन आणि सुहास दोघंही दाराकडे धावले. दारात नीला आणि शीला उभ्या.

“या, या” नितीन आणि सुहास म्हणाले.

“या, या” मीनाताई आणि शोभाताई म्हणाल्या.

नीला आणि शीला आता आल्या. सँडलस् बाहेरच काढून ठेवले. दोघींच्याही हातात वाढदिवसाच्या प्रेझेंटस् ची रंगीबेरंगी वेष्टनातली पॅकेटस् दिसत होती.

“आई, बाबा ओळखताना तुम्ही याना”, सुहास म्हणाला.

“आई ओळख करून देतो” नितीन मीनाताई गुप्तेना म्हणाला, “ही शीला दरेकर तुझी भावी सून”.

“आणि आई, मी ओळख करून देतो”, सुहास शोभाताई परबना म्हणाला, “ही नीला गुप्ते, तुझी भावी सून”.

मीनाताईनी आ वासला. शोभाताईनी आ वासला.

मीनाताई आणि शोभाताई एकमेकींकडे पाहू लागल्या.

डोळ्याला डोळे भिडले. काहीतरी संदेशांची देवाणघेवाण झाली.

दोघीही हसल्या. अगदी तोंडभर हसल्या.

जातपातीची, समजूतींची, सगळी पटलं दूर झाली.

अपेक्षांच्या शृंखला गळून पडल्या.

समोर वाकलेल्या भावी सुनांना दोघींनी भरभरून आशिर्वाद दिले, “आयुष्यमान व्हा”.

कोकणातले ते तीन दिवस बऱ्याच जणांना बरंच काही शिकवून गेले, घड्या विस्कटत गेले, घड्या घालत गेले.

-----X-----

a

# १०

## गरज

(भाग – १)

नवी पेठ म्हणजे सोलापूरचं कमर्शियल सेंटर. आझाद हिंद चौकापासून ते दत्त मंदिर चौका पर्यंत पसरलेल्या या लांबलचक रस्त्यावर सोलापुर चादरीं पासून ते बाटा शूज पर्यंत आणि मेडिकल कॅालेजच्या पुस्तकांपासून ते सोलापुरी चिवड्या पर्यंत नाना प्रकारच्या वस्तूंची छोटी मोठी दुकानं आहेत. आणि रात्री तर काय, रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दुकानांमधल्या दिव्यांच्या झगमगाटात अख्खी पेठ उजळून निघते. जुळं सोलापूर आलं, तिकडे मोठ्या मोठ्या शो रूम्स आल्या, पण नव्या पेठेचं महत्त्व काही कमी झालं नाही.

मंगळवार सकाळचा अकराचा सुमार होता. नवी पेठ नेहमी प्रमाणे गजबजली होती. पायी चालणाऱ्या माणसांच्या थव्यांना चुकवत सायकलस्वार, स्कुटरवाले, कुशलतेने मार्ग काढत होते. पेठेतील बहुतेक दुकानं उघडली होती आणि काही दुकानांमध्ये गिऱ्हाईकांची तुरळक गर्दीही होती.

याच गर्दीतून वाट काढत, गप्पा मारत हातवारे करत चालणाऱ्या लोकांना चुकवत, झपाझप पावलं टाकत शांती महावीर बुक डेपो च्या दिशेने चालली होती.

“शांती!”

a

एके काळच्या अतिपरिचित आवाजातली हाक ऐकून शांती जराशी चमकलीच.

खरं तर आठ दिवसांपूर्वीच शीलाने फोन करून सांगितलं होतं, “शांती, श्रीराम आलाय”.

तो कुठे राहतोय, काय करतोय वगैरे बद्दल शीलाला काहीच कल्पना नव्हती. पण सोलापूर काही अवाढव्य शहर नाही. त्यामुळे शहरात आला असेल तर कुठे न कुठे श्रीराम भेटणार हे नक्कीच होतं.

शांती ने आवाजाच्या दिशेने मान वळवली. रस्त्याच्या पलीकडच्या बाजूला सुरेश क्लॉथ स्टोअरच्या पायऱ्यांवर श्रीराम उभा होता.

पायऱ्या उतरुन श्रीराम खाली रस्त्यावर आला आणि दोन स्कूटर, एक कार, नव्या पेठेत आरामात फिरणारे माणसांचे दोन चार ग्रुप मोठ्या शिताफीने चुकवत त्याने रस्ता ओलांडला आणि तो शांतीच्या समोर येऊन उभा राहिला.

“कशी आहेस शांती”? श्रीरामने विचारलं. “खाऊन पिऊन खुशीत आहेस नं?”

कोणाचीही विचारपुस करण्याची श्रीरामची ही नेहमीची पध्दत, आणि इतक्या वर्षात ती बदललेली नाही हे पाहून शांतीला बरं वाटलं. पाच वर्षांपूर्वी रोज हे शब्द शांतीच्या कानावर पडायचे. असेच प्रत्यक्षात, समोरासमोर.

तो काळच वेगळा होता, दिवस वेगळे होते. सुनहरे दिन. संध्याकाळी शांतीची शाळा सुटल्यावर आणि श्रीरामचं कलेक्टर कचेरीतलं दिवसाचं काम संपल्यावर, त्या काळात, शांती आणि श्रीराम अगदी रोज भेटायचे, किल्ल्या

जवळच्या बागेत, नाहीतर पार्क मैदानावर बसायचे, शेंगा खायचे, खूप गप्पा मारायचे. विषयाना कधी त्यांच्याकडे कमतरताच नव्हती.

त्यांच्या नकळत, त्या दोघांतली मैत्री, त्यांच्या मधली जवळीक कणाकणानी वाढत होती. एका बेभान क्षणी ते एकमेकाच्या खूपच जवळ आले, मैत्री जास्तच उत्त्कट झाली, भविष्याचे आडाखे बांधण्याचा ते प्रयत्न करू लागले, एकमेकाच्या आवडी निवडींची ते जपणूक करु लागले.

पण अचानक हे सर्व संपलं होतं. एका बेजबाबदार क्षणी दोघांनीही एकमेकाना झटकून टाकलं होतं.

एकमेकांकडे पाठ फिरवली होती आणि त्या तिरीमिरीतच श्रीराम सोलापूर सोडून निघूनही गेला होता. त्याने अवघड पोस्टिंगच्या जागी आपली बदली करून घेतली होती. कोणी म्हणायचे तो जालन्याला गेलाय, कोणी म्हणायचे गडचिरोलीला गेलाय. नक्की कोणालाच ठाऊक नव्हतं.

आता इतक्या वर्षांनंतर दोघांच्याही मनात जुन्या आठवणी जाग्या झाल्या, दोघांच्याही मनातले रागाचे स्फुल्लिंग आता विझले होते. पाच वर्षात दोघांनीही बरेच टक्के टोणपे अनुभवले होते. ज्या कारणावरून पाच वर्षांपूर्वी त्यांच्यामधे एवढा बेबनाव झाला होता, ते कारण दोघांनाही क्षुल्लक वाटायला लागलं होतं आणि त्यानी उठवलेल्या त्याकाळच्या चक्री वादळाला अगदी चहाच्या पेल्यातील वादळाचा दर्जा द्यावंसं वाटत होतं. त्यामुळेच की काय, इतक्या वर्षांनी परत भेटल्या नंतर, उन्हाळ्यात सुकलेल्या विहिरी प्रमाणे आपुलकीचा थोडासा ओलावा मनात खोलवर दोघांनाही जाणवत होता.

“मी बरी आहे, तू कसा आहेस”? शांतीने विचारपूस केली.

श्रीराम तिच्याकडे पहात होता. तिच्या गळयावरून फिरणारी, तिचा ओका बोका गळा टिपून घेणारी त्याची नजर शांतीला बोचली आणि नकळतच तिचा हात तिच्या गळयाकडे गेला.

“काय करतेस हल्ली? अभिनव विद्यामंदिरातच शिकवतेस कि आणखी कुठे”? श्रीराम विचारत होता.

“अरे तिथेच आहे मी, आणखी कुठे जाणार”? शांतीने उत्तर दिलं आणि पुढे विचारलं, “पण तू कसा सोलापुरात, इतक्या वर्षानंतर”?

“अगं, बदली झालीय माझी इथे”. श्रीरामने संक्षिप्त उत्तर दिले.

“अरे वा!” शांती उद्गारली. मग दोघेही गप्प झाले.

थोडा वेळ कोणीच काही बोललं नाही. काही सुचंतच नव्हतं बोलायला.

“इथे मोरारजी पेठेतच राहतेस का अजून?” श्रीरामने विचारलं.

“हो. आणि तू?” शांती चा प्रश्न ओघानेच आला.

“अगं जुळे सोलापूर मधे राहतोय मी, होटगी रस्त्यावर. सरकारी बंगला आहे”. श्रीरामने माहिती पुरवली.

शांती पुन्हा गप्प झाली.

“चला, निघते आता”. शांती म्हणाली, “ऊन वाढायला लागलंय.”

“मी ही निघतो, ऑफिसला जायचंय. सोडू तुला वाटेत”? श्रीरामने विचारलं.

a

आता, सिध्देश्वर पेठेतल्या भाड्याच्या घरातून जुळे सोलापूरमधल्या सरकारी बंगल्यात रहायला गेलेल्या माणसाकडे सरकारी मोटार गाडी असणारच, असा कयास शांतीने केला होताच.

नम्रतापूर्वक नकार देत शांती म्हाणाली, “अरे राहु दे, इथेच तर जायचंय”.

दोघानाही अवघडल्यासारखं व्हायला लागलं होतं.

“ठीक आहे”. श्रीरामनेही जास्त आग्रह धरला नाही. “पुढच्या आठवड्यात फोन करीन मी, नंबर तोच आहे नं?” श्रीरामने पुढे विचारलं.

जरा अरेरावीचाच प्रश्न वाटला शांतीला, पण तिने मनावर न घ्यायचं ठरवलं आणि नुसती होकारार्थी मान हलवली.

दोघानीही औपचारिकपणे एकमेकाला “बाय” केलं. श्रीरामची गाडी आणि ड्रायव्हर त्याची वाटच पहात होते, आणि चालण्याची दिशा बदलून, घुम जाव करून, नव्या पेठेतूनच वाट काढत शांती पायी पायी घराकडे निघाली.

“शांते, शांते, अगं लक्षं कुठंय? केव्हांची हाक मारतेय तुला.” शांतीच्या पाठीमागून धापा टाकत येऊन शीला तिचा खांदा गदागदा हलवत म्हणाली. “अगं महावीर पाशी भेटायचं ठरलं होतं ना आपलं? मग अशी उलट्या दिशेला काय चाललीस? तू आली नाहीस म्हणून मी शोधत आले. नाहीतर भेटलीही नसतीस”.

अरे हो, महावीर स्टोअरमधे पुस्तकं घ्यायला जायचं ठरलं होतं नाही का, शांतीला आठवलं. पण आताच्या श्रीरामबरोबरच्या भेटीनंतर कुठे जाण्याचा, काही करण्याचा उत्साहच शांतीमधे राहिला नव्हता.

"अगं शीला, इथे गुडलक समोर मावशी राहते नं माझी, तिचा फोन आला अचानक. जाऊन पहाते तिला काय पाहिजे ते". असं शीलाला मोघम उत्तर देत शांतीने आपली सुटका करून घेतली.

दोन दिवस गेले. शुक्रवारची संध्याकाळ आली. शाळेतून घरी आल्यावर चहाचं आधण शांतीने ठेवलं आणि बिस्कीटांचा डबा ती कपाटातून काढत होती, तेवढ्यात मोबाइलची रिंग वाजली. श्रीरामचा फोन. तोच जुना नंबर.

फोन उचलावा की नाही असा विचार करता करता फोन ची रिंग थांबली. शांतीला हायसं वाटलं पण तेवढ्यात पुन्हा रिंग सुरू झाली. आता मात्र फोन उचलणं प्राप्तच होतं.

"हॅलो शांती, मी श्रीराम बोलतोय". फोन मधुन आवाज आला.

"हं". शांतीचा रिस्पॉन्स

"शांती उद्या शनिवार आहे, ऑफिसला हाफ डे. चहाला येशील का संध्याकाळी?" श्रीराम विचारत होता.

"श्रीराम, दोन विद्यार्थिनींना बोलावलंय मी उद्या. सॉरी. नाही जमायचं मला. पुढे बघु कधीतरी". शांतीने काहीतरी सबब सांगत नकार दिला.

अरे, चूकच झाली माझी, तुला जरा आधी विचारायला पाहिजे होतं. पण करणार काय, या कामाच्या व्यापातून माझी मलाच खात्री नव्हती." श्रीराम चुकचुकला.

थोडं थांबून श्रीरामच म्हणाला, "बरं शांती, पुढच्या शनिवारी येशील का? आत्ताच तुझा टाइम बुक करतोय, चालेल नं?"

शांतीला कुठलीही पळवाट समोर दिसेना. ती “हो” म्हणून मोकळी झाली. आणि तिने फोन खाली ठेवला

शांतीने चहा गाळला आणि कप घेऊन ती बाहेर सोफ्यावर येऊन बसली. कप तोंडाला लावता लावता शांतीचं मन भूतकाळात गेलं. पाच वर्षांपूर्वीच्या आठवणींची कवाडं उघडली. संमीश्र आठवणी. काही गोड, काही कटू. मनात आठवणी घोळवता घोळवता हळू हळू शांतीच्या लक्षात आलं की गोड आठवणींचं पारडं खूपच जड होतं.

अगदी सुरुवातीपासून म्हणजे श्रीरामची सोलापूर कॅालेजच्या साहित्य संम्मेलनातली झालेली ओळख. नंतरच्या गाठी भेठी, त्या गाठी भेठीतले हलके फुलके चर्चा विषय, एकमेकांची चेष्टा मस्करी करत केलेले विनोद, यातूनच पुढे झालेले दृढ मैत्री संबंध, सगळ्याच आनंददायी आठवणी.

या गोड आठवणी शांती चघळत राहिली, आठवणींमधे शांती रमून गेली. पुढच्या कटु आठवणींची कवाडं तिने घट्ट बंद करून घेतली. श्रीरामचंही असंच झालं असेल का? गोड आठवणींच्या अल्हाददायक सूर्यप्रकाशात नहाताना वाईट आठवणींच्या लहान सहान सावटांकडे दुर्लक्ष करणंच योग्य ठरेल का? शांती विचार करत होती.

त्या काळी, रोज संध्याकाळी येणाऱ्या श्रीरामच्या फोनमधे, तसंच दर एक दोन दिवसांनी त्याला प्रत्यक्ष भेटण्यामधे अवीट गोडी असायची. फोन खाली ठेवल्यावर किंवा संध्याकाळी, भेट, गप्पा आटोपून परतल्यावर काही तरी हरवल्याची हुरहुर लागायची. चार दिवसांपूर्वी अचानक श्रीराम भेटल्यावर म्हणा, किंवा आताही त्या आठवणी घोळवताना तशी हुरहुर शांतीला जाणवली नाही.

हरवलेला ठेवा सापडल्यावर जसा अंतर्मनातून आनंद होतो तो प्रत्ययही आला नाही. असं का? कुठे काही चुकतंय का? इतक्या दिवसानंतर भेट झाल्यानंतर भावनांचा तोच कल्लोळ पुन्हा अनुभवता येईल का?

हे असेच विचार मनात घोळवत संध्याकाळ गेली. नंतर शिकवणीची मुलं आली. मन भूत काळातून वर्तमान काळात आलं, शांत झालं. रात्री जेवून, भांडी करून, आवरून झोपेपर्यंत मनावरची भूतकाळाची जळमटं पार नाहीशी झाली होती.

(भाग – २)

हा आठवडा असाच संपला. पुढचा आठवडा सुरु झाला. गुरुवार आला. संध्याकाळी श्रीरामचा फोन आला. “शांती, परवा शनिवारी संध्याकाळी भेटायचं लक्षात आहे नं? तू विसरणार नाहीस म्हणा,पण तरी आपला फोन केला, आठवण करुन द्यायला”.

“लक्षात आहे माझ्या. येईन मी. पत्ता टेक्स्ट कर”. शांती म्हणाली.

“अग, टेक्स्ट कशाला? गाडी पाठवतो नं मी.” श्रीराम म्हणाला.

“नको, पत्ता टेक्स्ट कर, रिक्षा करून येईन मी”. शांतीने दृढतापूर्वक सांगितलं आणि फोन ठेवला.

जुने संबंध परत सांधण्याचा हा इतका का आग्रह करतोय? तुटलेले संबंध सांधणं एवढ सोपे आहे का? का समेटाचा हात पुढे केलाय त्यानी, आणि मी तो स्वीकारीन असं गृहित धरलं तरी कसं यांनी? मनात तरी काय आहे याच्या? आणि

हो, याचं लग्न वगैरे काही झालंय की नाही? बायको, मुलंबाळं याबद्दल तर काही विचारलंच नाही.

टेक्स्ट मेसेज द्वारे पत्ता आला. “आशिर्वाद कॅाटेज, सरोवर हॅाटेलच्या पुढे, होटगी रोड, जुळे सोलापूर”. शांतीने पत्ता वाचला, आवाक्यातला वाटला.

शनिवारी शाळा सकाळी. शांती साडे अकरापर्यंत घरी आली. मोरारजी पेठेत शांतीचं घर अगदी हमरसत्यावर. सतत रस्त्यावर रहदारी. येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांचे आवाज, पॅ पॅ वाजणारे हॅार्न यामुळे दुपारी जेवल्यानंतर थोडं पडायचं, डुलकी काढायची वगैरे अगदी अशक्यप्राय.

जेवण झाल्यावर स्वयंपाक घर आवरून शांती पुढच्या खोलीत आली. आराम खुर्चीत बसून तिने पेपर हातात घेतला. शांती बातम्यांवरून नजर फिरवायला लागली, पण एकाही बातमीचा तिला अर्थबोध होईना. कंटाळून शेवटी तिने खुर्ची खिडकी जवळ ओढली आणि खाली रस्त्यावरून चाललेली रहदारी ती विरंगुळा म्हणून पाहू लागली. शांतीचं कशातही लक्ष लागेना. श्रीरामचे, त्याच्याकडच्या संध्याकाळच्या व्हिजिटचे विचार मनात यायला लागले.

का जातोय आपण श्रीरामच्या घरी? का स्वीकारलं आपण त्याचं आमंत्रण? काय संबंध उरलाय, काय नातं उरलंय आपलं आता श्रीरामशी? शांती विचार करू लागली. बंद केलेला, इतिहासजमा केलेला धडा उघडून मागच्या पानावरुन परत सुरू करायचा? इतकं सोपं वाटतंय हे त्याला? आपल्याला एवढं गृहित धरायचा हक्क कोणी दिला याला? या पाच वर्षांमध्ये आपले दुसरे काहीच हितसंबंध जुळले नसतील अशी समजुत याने करून तरी कशी घेतली! पाटील सरांबद्दल सांगावं का

याला? पण सांगणार तरी काय, तसं काहीच सिरियस नाही अजुन तरी. म्युच्वल ॲडमिरेशन च्या पुढे गाडी सरकलीय कुठे अजून!

असे अनेक विचार, अनेक प्रश्न शांतीच्या मनात भिरभिरू लागले. त्यापैकी एकाचंही समाधानकारक उत्तर तिला मिळेना. सगळीकडेच डेड एन्ड.

अजूनही फोन करून ‘‘यायला जमत नाही’’ सांगून टाकावं असंही तिला एकदा वाटलं.

मनातले सगळे विचार शांतीने बाजूला केले आणि ती तयारीला लागली.

उन्हं जराशी कलल्यावर संध्याकाळी साडे चारला शांती खाली उतरली. सुदैवाने पटकन ॲ◌ाटो मिळाली आणि पाच पर्यंत ती श्रीरामच्या सरकारी निवास स्थानावर पोहोचली सुध्दा.

सरोवर हॉटेलच्या जरासं पुढे तो आटोपशीरसा आशिर्वाद बंगला होता. वॉचमनला श्रीरामने आधी सूचना दिली असणार. शांतीला त्याने सलाम केला आणि आत सरळ हॉल मधे नेऊन सोडलं.

श्रीराम तिथेच सोफ्यावर बसला होता टेलिविजनच्या सह्याद्री चॅनेलवर जुन्या गाण्यांचा तराने पुराने कार्यक्रम चालू होता. मुकेश च्या आवाजाने वातावरण धुंद करून सोडलं होतं.

शांती आत आली. श्रीरामने तिच्याकडे हसून बघितलं आणि हातानेच बसण्याची खूण केली.

सोफ्याजवळच्या खुर्चीवर शांती बसली.

मुकेशच्या गाण्याची व्हीडिओ क्लिप संपली. श्रीरामने रिमोट उचलला आणि टी व्ही अॅ◌ाफ केला.

“छान आहे बंगला”. शांती म्हणाली

“आवडला? सरकारी निवास आहे. डागडुजी, रंगरंगोटी अगदी अपटुडेट”. श्रीराम म्हणाला

शांतीने इकडे तिकडे पाहीलं. आत इतर कोणी असल्याची चाहुल लागत नव्हती.

“बाकी कोणीच नाही घरात?” शांतीने विचारलं.

“थांब जरा, मंडळी येतीलच आता”. श्रीराम म्हणाला.

“कोण मंडळी?” जरा बुचकळ्यात पडुन शांतीने विचारलं.

“दिसेल, दिसेल”. श्रीराम म्हणाला.

तेव्हढ्यात बाहेरून छोट्या बुटांचे टप् टप् आवाज आले आणि गोड किलबिल ऐकू आली.

हॅालचा दरवाजा खाडकन उघडला आणि तीन छोटी मुलं आत आली.

डॅडी, डॅडी करत श्रीरामकडे धावायचा त्यांचा विचार असावा. पण शांतीला पाहून तिघेही दारातच थबकले.

ही मंडळी होय? पण एवढे तीन? शांती विचार करू लागली.

शांतीने निरखून पाहिलं. मोठा मुलगा पाच सहा वर्षांचा दिसत होता आणि सुमारे तीन तीन वर्षांची जुळी, एक मुलगा, एक मुलगी.

मुलांच्या मागोमाग एक मध्यमवयीन काळी सावळी पण नीट नेटकी दिसणारी बाई आत आली.

शांतीला पाहून सगळेच दारात थांबले होते. वातावरणात अनिश्चितता होती.

श्रीराम म्हणाला, “अरे या, या. शांती मावशी आहे ही, मी ओळख करुन देतो हं.”

मुलांकडे हात करून श्रीराम म्हणाला, “शांती, हा सगळ्यांचा दादा आहे नं, तो जगु. हा छोटु रोली आणि ही छोटी पॅाली. मुलांनो, ही शांती मावशी. हॅलो म्हणा शांती मावशीला.”

मुलांनी जरा अनिच्छेनेच “हॅलो मावशी”, केलं. “डॅडी बरोबरच्या आपल्या प्रायवेट टाइम स्लॅाटमधे ही कोण घुसली?” असा त्यांचा काहीसा रोख दिसला.

इथे कोणी मुलं असतील याची शांतीला बिलकुल कल्पना नव्हती. त्यामुळे मुलांसाठी चॅाकलेट वगैरे तिने काहीच आणलं नव्हतं. शांतीला जरा अवघडल्यासारखं झालं.

“आणि हो”, श्रीराम पुढे सांगत होता, “या नीलाबाई. आमच्या हाउसकीपर आणि अॅाल ईन अॅाल. आमच्या कुटुंबाचा घटकच आहेत. मुलांकडे छान बघतात या”.

मुलांकडे या बघतात? मग मुलांची आई कुठे आहे? आणि तुझ्याकडे पण या बघतात का? शांती मनात म्हणाली.

a

वरकरणी हसून तिने नीलाबाईना नमस्ते म्हटलं. नीलाबाईंनीही नमस्कार केला. दोघींच्या नजरा एकमेकाना भिडल्या आणि पुढच्या पाच सेकंदांत दोन्ही नजरांमधे बरंच काही संभाषण झालं.

“नीलाबाई, झकास कॉफी द्या हं आम्हाला”. श्रीरामने नीलाबाईना हसत हसत सांगितलं.

“हो, आणते दहा मिनिटात”, नीलाबाई म्हणाल्या, आणि “चला मुलांनो, हात पाय धुवायचे, दूध प्यायचंय”, असं म्हणत मुलांना घेऊन आत गेल्या.

या नीलाबाईचं घरातलं स्थान काय असावं बरं, कुटुंबाचा कोणत्या लेव्हलचा घटक? बोलण्या- चालण्यावरून त्या या भागातल्या असतील असे वाटत नव्हते. मुलांशी एक वेळ ठीक आहे हो, पण श्रीरामशी त्यांचा कितपत घनिष्ट संबंध असेल?

आणि हो, मुलांकडे बघतात म्हणजे इथे घरातच रहात असणार. त्यांना वेगळी सर्व्हन्ट्स क्वार्टर सारखी खोली आहे की मुलांच्या खोलीत झोपतात, की.... आणखी कुठे!

आणि मुलांची आई आहे तरी कुठे?

शांतीला काही समजत नव्हतं. आणि सरळ सरळ विचारणं तर शक्यच नव्हतं.

“काय मग, ॲक्टिव्हिटीज काय चालल्यात अलिकडे? साहित्य सम्मेलनं वगैरेना जातेस की नाही?” श्रीराम विचारत होता.

“नाही रे बाबा, उप मुख्याध्यापिका म्हणून जबाबदारी संभाळायला लागल्यापासून वेळच मिळत नाही इकडे तिकडे बघायला”. शांती पुढे म्हणाली “आणि तुझं काय, नवीन लिखाण वगैरे?”

श्रीराम हसला आणि म्हणाला, “अगं उप जिल्हाधिकारी झाल्यानंतर गडचिरोलीला एवढं काम होतं की लेखन, आवांतर वाचन, काहीच शक्य नव्हतं.”

अशाच हलक्या फुलक्या गप्पा चालल्या होत्या.

नीलाबाई ट्रे घेऊन आल्या. गरम गरम कॉफी बरोबर वेगळ्या बशांमधे बिस्किटं होती, शंकरपाळ्या होत्या. वेगळ्या भांड्यात साखरही होती.

कॉफी छानच झाली होती.

कॉफीचा आणि खाद्यपदार्थांचा समाचार घेण्यात अर्धा तास सहज निघुन गेला.

सोलापुरातल्या जुन्या ओळखीच्या लोकांबद्दल श्रीराम विचारत होता आणि जमेल तसं शांती माहिती पुरवत होती.

नीलाबाई कॉफी ट्रे आवरायला आल्या.

“छान झाली होती हं कॉफी, नीलाबाई”. शांती ने औपचारिक पणे कॉम्प्लिमेंट्स दिले. नीलाबाईंनी किंचितसं हसल्या सारखं केलं आणि कप बशा उचलुन एक शब्दही न बोलता त्या आत गेल्या ही.

शांतीने खिडकीतून बाहेर बघितलं, घड्याळाकडे बघितलं.

निघायला तर पाहिजे होतं, पण इतके अनुत्तरित प्रश्न जिभेवर असताना तिचा पायही निघेना.

a

तेवढ्यात नीलाबाई बाहेर हॉल मधे आल्या आणि बाजुलाच उभ्या राहिल्या. श्रीरामने त्यांच्याकडे वळुन बघितलं.

“मुलांच्या आंघोळी चालल्यात. आजीबाई आल्या आहेत. मी निघू का?” नीलाबाईनी विचारलं.

“हो, निघा तुम्ही. या उद्या सकाळी. बाळूला म्हणावं चांगला अभ्यास करायचा, काही समजलं नाही तर सराना विचारायचं, घाबरायचं नाही. चला, या आता.”

नीलाबाई निघुन गेल्या.

श्रीराम शांतीकडे वळला. तिच्या डोळ्यातलं प्रश्नार्थक चिह्न त्यानं पाहिलं.

“जवळच घर आहे त्यांचं. नीलाबाई आणि त्यांचा नवरा शंकर तिथे रहातात. त्यांचा आठ वर्षांचा बाळू पण आहे त्यांच्याबरोबर”. श्रीराम पुढे म्हणाला, “गडचिरोलीच्या धरणग्रस्त भागातून विस्थापित झालंय ते कुटुंब. त्याना नवीन ठीकाणी जागा मिळेल, पण जरा वेळ लागेल त्याला. तोपर्यंत मी पाहतोय त्यांची सोय. नीलाबाई ईथे काम करतात, शंकरलाही जवळच्या हॉटेलमधे कामाला लावलंय. मॅनेज करतायत बऱ्यापैकी. बाळूलाही शाळेत घातलंय इथल्या. शिकतोय तो पण.”

थोडं थांबून श्रीराम पुढे म्हणाला, “रात्री मुलांबरोबर झोपायला एक आजीबाई येतात इथल्या जवळच्याच. त्याना चार पैसे मिळतात आणि आपलीही सोय.”

चला, एवढी माहिती कळल्यावर नीलाबाईंबद्दल कसलाही संशय बाळगायला जागा राहिली नाही. अगदी निर्दोष सुटका. आता प्रश्न राहिला मुलांच्या

आईचा. पण शांतीला त्याबद्दल काही विचारावं लागलंच नाही. श्रीरामने शांतीच्या चेहऱ्यावरचं प्रश्न चिह्न पाहिलं होतं. तिचा प्रश्न त्याला कळला होता. आपण होऊनच श्रीरामने बोलायला सुरुवात केली.

(भाग – ३)

सोलापूरहून गडचिरोलीला आपण होऊन बदली मागणारा ऑफिसर क्वचितच. त्यावेळी रागाच्या भरात श्रीरामने गडचिरोलीला बदली करून घेतली खरी, पण तिथे कामाचा मोठा डोंगर त्याची वाटच पहात होता. मनाची उद्वीग्न अवस्था, विधायक कामांचा डोंगर, आदिवासी प्रश्न, या सर्वांच्या ओझ्याखाली तो दबून गेला आणि वेड लागल्यागत त्याच्या मनाची अवस्था झाली. अशा परिस्थितीत त्याची असिस्टंट थ्रिसा त्याच्या मागे खंबीरपणे उभी राहिली, त्याला आधार दिला आणि त्या जोरावरच त्याचं "सदैव पराजित" पासून "सदैव विजेता" मधे परिवर्तन झालं, मान सन्मान मिळाला.

थ्रिसाशी लग्न हे ओघानच आलं. काही दिवसांतच.

थ्रिसा श्रीरामची पत्नी म्हणुन घरात आली. बरोबर तिच्या पहिल्या फसलेल्या लग्नाची खूण, तान्ह्या जगू ला घेउन आली. श्रीरामने मोठ्या मनाने जगूचा स्वीकार केला.

आणखी एक वर्ष गेलं. घरात पाळणा, नव्हे पाळणे हलले. रोली पॉली ची जोडी जन्मली. बाहेर प्रचंड प्रमाणात काम, घरात गोकुळ, सगळं छान चाललं होतं. पण दुर्दैवाने घाला घातला आणि एका विचित्र अपघाताचे निमित्त होऊन थ्रिसा हे जग सोडुन गेली. श्रीराम वर आभाळ कोसळलं. तिन्ही मुलं आईविना पोरकी झाली.

श्रीराम तर अनेक अर्थांनी पोरका झाला. एकीकडे दु:खाची दरी, दुसरीकडे सरकारी कामांचे दुर्गम डोंगर आणि त्यातून, आईविना पोरक्या झालेल्या तीन निरागस चिमण्यांची जबाबदारी. कशाचाच समतोल साधेना.

श्रीरामची आई नाशिकहुन आली. घरची फळी तिने पूर्णपणे संभाळली. गाडी बऱ्याच प्रमाणात रुळावर आणली. आईला पण जास्त दिवस श्रीरामकडे राहणं शक्य नव्हतं. तिकडे नाशिकला बाबांची आबाळ व्हायला लागली. दुकानाचा पसारा, घरातली कामं, दोन्हीकडचं पाहतांना त्यांची तारांबळ उडायला लागली. सुदैवाने त्याच सुमारास श्रीरामच्या आईला नीलाबाई भेटल्या. घरातली कामं त्या पटापट शिकल्या. जवळच राहणाऱ्या करुणा बाई नावाच्या ट्रेन्ड नर्सने मुलांची जबाबदारी घेतली आणि मगच श्रीरामची आई नाशिकला परत गेली. सुदैवाने नीलाबाई आणि करुणाबाईनी आपापली कामगिरी चोख बजावली. तक्रारीला काहीही जागा ठेवली नाही आणि म्हणूनच संसाराचा हा एक चाकी गाडा श्रीरामला जेमतेम का होईना पुढे ढकलता आला.

आयुष्यात पुन्हा एक बदल आला. दोन वर्षांनंतर श्रीरामची सोलापूरला बढतीच्या जागेवर बदली झाली. आता मुलांची काय सोय करायची? प्रश्न उभा राहिला.

नीलाबाईंचं कुटुंब अजुन प्रकल्प विस्थापितच होतं. ना धड उपजीविकेचं साधन, ना रहायला चांगली जागा. सरकार दरबारी फायली कूर्म गतीने हलत होत्या आणि श्रीरामही त्यावर लक्ष ठेवून असला तरी आणखी दोन एक वर्ष तरी नक्कीच लागणार होती.

a

गडचिरोली सोडण्याची वेळ आली, तेंव्हा श्रीरामने नीलाबाईना आणि शंकरला बोलावून घेतलं. सगळी परिस्थिती नीट समजाऊन सांगितली. त्याना सरळच सांगितलं, इथे दोन वर्षात भक्कम काही होणार नाही. अलोकेशन झाल्यावर जागा, घर हातात पडायला पुढे आणखी वेळ लागणार. श्रीरामने त्याना सांगितलं, माझ्याबरोबर सोलापूरला चला दोन वर्षांसाठी, छोट्या मुलांनाही बरं होईल. तुमची रहाण्याची, शंकरला काही कामधंदा मिळवून देण्याची, बाळूच्या शाळेची, सगळी सगळी व्यवस्था करीन मी.

शंकर आणि नीलाबाई तयार झाले आणि एक मोठा प्रश्न सुटला होता. इथे सोलापूरला आल्यावर बंगला लगेच ताब्यात मिळाला होता, नीलाबाईच्या कुटुंबाला जवळच दोन खोल्यांचं माफक भाड्याने घर मिळालं. श्रीरामच्या सहीच्या एका चिठ्ठीने बाळूची स्कूल ॲडमिशन झाली आणि छोट्या मुलांसाठी रात्री रहायला गरजू आजीबाईही मिळाल्या.

श्रीराम बोलायचा थांबला. शांती एकाग्रतेने ही सर्व कहाणी ऐकत होती. आपल्या जवळच्या व्यक्तीच्या वाट्याला आलेल्या एवढ्या दु:खाची कहाणी ऐकून कोणाच्याही डोळ्यात पाणी येईल. शांतीच्या दोन्ही डोळ्यातून आश्रुंचे ओघळ वाहत होते. श्रीरामने हात लांब करून टीपॉय वरच्या स्टॅंड मधुन दोन टिश्शु पेपर काढले आणि शांतीला दिले. शांतीने आपले डोळे पुसले आणि बऱ्याच प्रमाणात स्वत:ला सावरलं.

शांतीने घड्याळाकडे पाहिलं. रात्रीचे आठ वाजून गेले होते. बोलता बोलता फारच उशीर झाला होता. बाहेर अंधार पडला होता. तरीही एकदम श्रीरामचा निरोप घेऊन निघणं शांतीला बरे वाटेना. उठून ती श्रीराम जवळ गेली. एका हाताने तिने

त्याचा हात हातात घेतला. दुसऱ्या हाताने त्याचा हात थोपटत आणि नकळत त्याला पूर्वीप्रमाणे संबोधत शांती म्हणाली, "श्री, काळजी नको करूस, वाईट दिवस मागे गेले आहेत. देवावर विश्वास ठेव. सगळं चांगलं होईल आता."

पुढे काही बोलायला तिला सुचेना. तिने श्रीरामचा हात सोडला आणि परत खुर्चीवर येउन बसली.

थोडा वेळ कोणीच काही बोललं नाही.

मग श्रीरामच बोलला, "शांती, बराच उशीर झालाय. मी सरोवर मधुन सॅन्डविचेस मागवतो. आपण खाऊन घेऊ आणि नंतर मी सोडीन तुला. चालेल नं?"

शांतीने नुसती होकारार्थी मान हलवली.

श्रीरामने शेजारच्या सरोवर हॉटेलच्या रेस्टॉरंटला फोन केला आणि दोन ग्रिल्ड चीज सॅंडविचेस, जीरा राईस, डाल तडका आणि दही अशी ऑर्डर दिली. नेटवर्क पेमेंटनी लगेच बिलही देउन टाकलं.

रात्रीचे साडे आठ वाजले. आजीबाई तिन्ही मुलांना घेउन हॉल मधे आल्या.

"गुड नाईट करा डॅडीला, मावशीला" आजीबाईनी चिरक्या थरथरत्या आवाजात मुलांना सांगितलं.

तीनही मुलं जाऊन डॅडीला बिलगली. डॅडीने त्यांचे लाड केले. मुलांनी गोड आवाजात डॅडीला गुड नाईट म्हटलं. शांती मंत्रमुग्ध होऊन पहात होती.

"आता शांती मावशीला गुड नाईट करा". श्रीराम मुलांना म्हणाला.

मुलं डॅडीपासून दूर झाली. शांतीकडे पाहून लांबूनच इवलेशे हात हलवले. औपचारिकपणे ‘‘गुड नाईट’’ म्हणाली आणि आत पळून गेली. आजीबाईही त्यांच्या मागे आत गेल्या.

शांती अजुनही जादूने भारल्यासारखी बसली होती.

नुकताच उलगडलेला हा कौटुंबिक दृष्यपट, त्याच्या मधोमध श्रीराम, सगळंच काही नवीन होतं.

रेस्टॉरंटचा माणुस जेवण घेऊन आला. दाराशी जाऊन श्रीरामने पॅकेजची डिलिव्हरी घेतली आणि दार लाऊन घेतलं.

श्रीरामने आत जाऊन डिशेस आणल्या, पाण्याची बाटली, ग्लास आणले आणि डायनिंग टेबलावर सर्व मांडलं. शांतीने बेसिनपाशी जाऊन हात धुतले. दोघांनीही आपापल्या बशांमधे वाढून घेतलं आणि दोघंही जेवणाचा समाचार घेऊ लागले.

जेवण होईपर्यंत नऊ वाजले. शांतीने श्रीरामच्या मदतीने टेबल आवरलं, साफ केलं.

मग मात्र शांतीने आपली पर्स उचलली आणि निघण्यासाठी तयार असल्याचं सूचित केलं.

श्रीरामही उठला. त्याने गाडीची चावी उचलली आणि दोघंही बाहेर पडले.

ड्रायव्हरची ड्यूटी संपल्यावर तो केव्हांच घरी गेला होता. श्रीराम स्वत:च गाडी चालवायला बसला. शेजारच्या सीट वर शांती बसली. मोरारजी पेठेतल्या

शांतीच्या घरापर्यंतचा प्रवास वीस एक मिनिटात पार पडला. दोघंही गप्प होते, कोणीच काही बोललं नाही. गाडी घरासमोर थांबली.

“श्रीराम, थॅंक यू” शांती म्हणाली.

“नीट जा, खुष रहा” श्रीराम म्हणाला,

शांतीने हात हलवून निरोप दिला. श्रीरामने गाडी गिअरमधे टाकली आणि तो निघून गेला.

शांती वर गेली. घरात शिरल्यानंतर एकदमच तिला शीण जाणवला. हात पाय धुऊन, कपडे बदलून शांतीने बिछान्यावर अंग टाकले.

बिछान्यावर अंग तर टाकलं पण झोप काही येईना. डोक्यात उलट सुलट विचार फिरत होते. परतीच्या प्रवासात दोघेही गप्प होते पण दोघांत खूपच काही बोलणं झालं होतं. त्याला शब्दांची गरज नव्हती.

सोलापूरात आल्याबरोबर, फारसा वेळ न दवडता, त्यांच्या मधला जुना ब्रेक-अप चा इतिहास पूर्ण नजरेआड करून श्रीरामने शांतीशी संपर्क साधला होता. श्रीरामने त्याची संपूर्ण परिस्थिती शांतीसमोर उघड केली होती. त्याची आगतिकता, व्यथा, दिवसेंदिवस ढासळणारी परिस्थिती सावरण्यासाठी उपाय योजनांची गरज. सर्व काही स्पष्ट झालं होतं.

जीवनाचा एक चाकी गाडा श्रीराम कसा बसा ढकलत होता पण आता त्या गाड्याला दुसरं चाक बसवणं, एक समतोल गाडा बनवणं ही श्रीरामची मुख्य गरज होती. श्रीरामला एक सहचरिणी हवी होती. त्याची आणखी एक गरज होती. त्याच्या तीन बछड्याना आई हवी होती. गरजांचा हा मनोरा डोक्यावर यशस्वीपणे पेलवण्याची शक्ती शांतीमधे आहे अशी त्याला खात्री वाटत होती.

पण शांतीचं काय? वयाच्या बत्तीसाव्या वर्षी तिची स्वत:ची गरज काय असेल, याचा कोणी विचारही केला असेल असं वाटत नव्हतं.

विचार करता करता केव्हातरी शांतीला झोप लागली.

(भाग – ४)

रविवारी सकाळी नेहमीच्या सवयीप्रमाणे शांतीने सहा वाजता डोळे उघडले. कालच्या संध्याकाळचा साराच प्रसंग तिला एखाद्या स्वप्नासारखा वाटू लागला. त्या सर्व घडामोडींना कितपत महत्त्व द्यावे ते तिला कळेना. काल खूप धावपळ झाली, आज विश्रांती घ्यायची, शांतीने ठरवून टाकलं.

चहाचा रिकामा कप टेबलावर ठेवायला शांती उठली. तेवढ्यात टेबलावर समोर पडलेल्या साहित्य परिषदेच्या आमंत्रण पत्रकावर तिची नजर पडली आणि शांतीला रविवार संध्याकाळच्या डी ए व्ही कॅालेज मधे आयोजित केलेल्या साहित्यिक परिसंवादाची आठवण झाली. परिसंवादाचे संयोजक पाटील सर होते आणि या आमंत्रणाचे तेच प्रेषक होते.

मागच्या वर्षी शीलाच्या घरीच पाटील सर शांतीला प्रथम भेटले होते. शीलाच्या छोटूचा वाढदिवस होता. संध्याकाळी शीलाने घराच्या मागच्या अंगणात छोटीशी पार्टी आयोजित केली होती. शीलानेच ओळख करून दिली होती, “अशोक, ही माझी प्रिय मैत्रीण शांती साळवे. उप मुख्याध्यापिका आहे अभिनव विद्यामंदिरमधे.” शीला म्हणाली होती. “अन् शांती, हा माझा मावसभाऊ अशोक पाटील. डी ए व्ही कॅालेज मधे मराठी चा एच ओ डी आहे हं! बाहेर सगळे पाटील

a

सर म्हणूनच ओळखतात त्याला. मराठी साहित्यातला दादा आहे, खूप मानतात विद्यार्थीही त्याला." या प्रशस्तीच्या सरबत्तीने पाटील सर जरा संकोचल्या सारखे झाले आणि काही तरी गुळमुळीत बोलून तिथून त्यानी पाय काढता घेतला.

शीला शांतीला म्हणाली होती, "अशोक हुशार आहे गं, पण त्याचा पाय जरा मागेच असतो. चार चौघांत पुढे पुढे करायची सवयच नाही त्याला. हल्ली च्या जगात चालतं का असं मागे मागे राहून? त्याला नं, अशी एक खंबीर बायको मिळाली पाहिजे, की जी दृढ पणे त्याच्या पाठीशी उभी राहील. अडी अडचणीला त्याला धीर देईल, त्याचा आत्मविश्वास वाढायला मदत करील".

आणि मग शीलाने शांतीकडे एक हेतुपुर्वक कटाक्ष टाकला होता.

शांतीला कळेना की ऐन पस्तिशीत या माणसाची नेमकी गरज काय आहे? याला बायको पाहिजे की आई, की दु दु पाजणारी नर्सबाई? पण शांती ने स्वत:ला आवरलं, शीलाच्या संकेताचा अर्थ तिला कळला होता. वयाच्या बत्तीसाव्या वर्षी अविवाहित तरुणीला आपल्या गरजाना, हौशी-मौजीना थोडीशी मुरड घालायची तयारी असायला पाहिजे हे तिलाही कळत होतं.

नंतर दोनदा साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आणि एकदा शीलाकडे घरगूती समारंभात शांतीला पाटील सर भेटले होते. पुढे एकदा शीलाने त्या दोघांनीही आपल्या बरोबर पिकनिकलाही नेलं होतं. दोघाना एकमेकाशी बोलायची, थोड्या कृत्रीमपणे का होईना, संधीही दिली. पण पाटील सर फारच भिडस्त. एक तर "साळवे बाई", "पाटील सर" या संबोधनांपुढे त्या दोघांचीही प्रगती झाली नाही आणि "आजचे मराठी साहित्य" या विषया व्यतिरिक्त पुढे गप्पा मारण्याचे विषयही मिळाले नाहीत.

a

एकमेकांचा परिचय वाढवण्याची प्रगती फारच हळू हळू रखडत होती. वयाची तिशी ओलांडली असली तरी स्वत:च्या लग्नाबाबतच्या रोमॅंटिक कल्पनांना शांतीने मुठमाती दिली नव्हती. पण अशोक पाटील उर्फ पाटील सरांमधेही रोमान्स कसा जागृत करायचा हेच तिला समजत नव्हतं. रोमान्स या मूलभूत गरजेशी तडजोड करायची वेळ अजून तरी आली नाही, असं तिला वाटत होतं.

आज साहित्य सम्मेलन संपल्यावर पाटील सराना एकटं गाठायचं, कॅाफी सॅंडविच च्या निमित्ताने बाहेर जाऊन काही तरी पुढची पायरी घ्यायचीच असा शांतीने प्लॅन केला होता. पण झालं काय, संमेलन संपल्यावर एका विवाद्य मुद्द्यावर हिरिरीने चर्चा करत पाटील सराना त्यांच्या विद्यार्थ्यांनी असा गराडा घातला की त्यातून त्यांची सुटका व्हायचं चिह्नही दिसेना. आणि त्याना लांबून खुणावणंही शक्य नव्हतं, कारण वर डोकं काढायलाच ते तयार नव्हते. जराशा खट्टु मनानेच शांती घरी निघुन आली. रात्री शीलाचा फोन आला. तिलाही उत्सुकता होती. पण हा सगळा वृत्तांत ऐकल्यावर शीलाही जरा निराशच झाली. मग पुढे काहीच बोलणं झालं नाही.

नवा आठवडा सुरु झाला. तीच कामे, कामांची तीच गर्दी, शाळेत मुलांची तीच गडबड, धावपळ, उत्साह. शांती कामात गुंतून गेली.

गुरुवारी श्रीरामचा फोन आला. “शांती, कशी आहेस? खाऊनपिऊन खूष आहेस नं?”

श्रीरामचं नेहमीचं सलामीचं वाक्य.

“ठीक आहे.” शांती ने उत्तर दिलं

“शांती, रविवारी लंच ला येशील का? घरच्या घरी, अगदी फॅमिली लंच, छोट्या कंपनी बरोबर. बाहेरुन काही आणणार नाही. नीलाबाई घरीच करतील साधं काहीतरी. येशील ना?” श्रीराम विचारत होता.

शांतीने थोडा विचार केला. श्रीरामने जरा एकतर्फीच केलेली घोडदौड तिच्या ध्यानात आली.

मागच्या भेटीनंतर बरंच काही त्याने गृहित धरल्यासारखं वाटलं. यात बराचसा धीटपणाही दिसला, पण आर्जवही होतं. पाटील सरां पेक्षा हा पवित्रा खूपच वेगळा होता. पण शांतीला राग नाही आला.

शांती विचार करत होती. तिकडे श्रीरामने आपली खेळी खेळली होती आणि त्याने श्वास रोखुन ठेवला होता.

“मी काही करून आणू का?” उत्तरादाखल शांतीने प्रश्नच विचारला.

श्रीरामला आनंद झाला. त्याने पुढे टाकलेल्या पाउलाला शांतीकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने त्याला बरं वाटलं.

“बाराच्या सुमारास गाडी पाठवतो मी. तयार असशील नं. अॅाटो रिक्षा वगैरे घेण्याच्या फंदात नको पडूस.” श्रीरामने विषयच संपवला.

शुक्रवारचा दिवस. शाळेत मधल्या सुट्टीत शिपाई शांतीच्या केबिनमधे आला आणि शांतीला मुख्याध्यापिका लेले बाईंनी बोलावल्याचा निरोप त्याने दिला. शांतीने तपासत असलेल्या निबंधाच्या वह्या आवरून कपाटात ठेवल्या आणि ती लेले बाईना भेटायला त्यांच्या अॅाफिसमधे गेली. शांतीला पाहून लेले बाई हसल्या आणि त्यांनी तिला बसायला सांगितलं.

"शांती", लेले बाई म्हणाल्या, "एक गुड न्युज आहे तुझ्यासाठी. तुला माहिती असेलच की एक वर्षांनंतर मी इथून निवृत्त होणार आहे. माझ्या निवृत्तीनंतर रिक्त होणाऱ्या पदावर कोणाला नेमायचं याची शाळेच्या विश्वस्तांमधे चर्चा झालेली आहे. विश्वस्त कमिटी तुझ्या कामावर खुश आहे आणि अशाच जबाबदारीने वागणाऱ्या व्यक्तीची संस्थेला गरज आहे. संस्थेची गरज तू उत्तम तऱ्हेने भागवशील असं विश्वस्ताना वाटतंय. म्हणून, मी निवृत्त झाल्यावर, माझ्या जागी, आपल्या शाळेच्या मुख्याध्यापक पदावर तुझी नेमणूक करायचा शाळेच्या विश्वस्तांनी निर्णय घेतलाय. तुझी काही हरकत नाही ना?"

संस्थेच्या विश्वस्तांनी आपल्यावर एवढा विश्वास टाकलेला ऐकून शांती भारावून गेली. संस्थेला आपली गरज आहे, आपल्यावर त्यांची भिस्त आहे , हे ऐकायलाही छान वाटत होतं. त्या आनंदाच्या भरात लेलेबाईंना आपल्याकडून काही उत्तर अपेक्षित आहे, हे तिच्या लक्षातच आलं नाही. तिच्या गप्प रहाण्याचा लेले बाईंनी भलताच अर्थ घेतला.

"तुझी काही हरकत नाही ना." जरा साशंकतेनेच लेले बाईंनी पुन्हा विचारलं

"छे, छे, माझी कसली हरकत असणार, मी तर ही ऑफर म्हणजे माझा गौरव समजते". शांतीने गडबडीने स्पष्ट केलं.

"ठीक तर मग, तसं कळवते मी विश्वस्तांना", लेले बाई म्हणाल्या. "आताच शाळेत वाच्यता नको करु कोणाकडे. साने सरांची सिनिअरिटी डावलून हा निर्णय फायनल करायचाय. कदाचित अडचणी येण्याचा संभव आहे."

शांती खुर्चीवरुन उठली. बाहेर पडली.

a

आपल्याला मुख्याध्यापिका होण्याच्या योग्यतेचं समजलं जातंय, ही तिच्या दृष्टीने फार महत्त्वाची गोष्ट होती. त्यामुळे जणू हवेत तरंगतच शांती आपल्या केबिनमधे पोहोचली.

आपल्या खुर्चीत बसल्यावर डोळे मिटून, हात जोडून शांतीने प्रथम देवाचे आभार मानले. नंतर तिने ड्रावर मधुन मोबाईल बाहेर काढला आणि ही आनंदाची बातमी प्रिय मैत्रीण शीलाला दिली.

शीलाने शांतीचं अभिनंदन केलं, कौतुक केलं पण का कोण जाणे त्या अभिनंदनात शांतीला तेवढा जोर वाटला नाही. फोन ठेवता ठेवता शीला म्हणाली, बघ हं शांती, त्याना तुझी गरज आहे, पण तुला त्यांची गरज आहे का तेही पहा".

शांतीला ही वाक्यं जरा विचित्र वाटली, पण आनंदाचं माप ओसंडून वहात असल्यामुळे त्याकडे शांतीने जास्त लक्ष दिलं नाही.

शनिवारी संध्याकाळी श्रीरामचा फोन आला, रविवारच्या लंच ची आठवण करुन देण्यासाठी.

"बारा पर्यंत गाडी येईल तुझ्याकडे, तयार रहा." श्रीराम म्हणाला.

( भाग – ५ )

रविवारी बाराच्या आधीच शांती खाली उतरली. तिथल्या जनरल स्टोअर मधून शांतीने चार पाच किट कॅटची पाकिटं, मुठभर एक्लेअर चॉकोलेटं विकत

घेतली आणि आपल्या पर्स मधे टाकली. मग तिथेच झाडाच्या सावलीत ती गाडी येण्याची वाट पहात उभी राहिली.

शांतीला जास्त वाट पहावी लागली नाही. ड्रायव्हर लवकरच गाडी घेउन आला आणि शांती साडे बारा पर्यंत श्रीरामच्या आशीर्वाद कॅाटेज वर पोहोचली.

श्रीराम वाटच पहात होता. हॅालमधे शांतीला बसवून श्रीराम आत गेला आणि बच्चे कंपनीला बाहेर घेऊन आला. मुलांनी कर्तवयबुधदीने ‘‘नमस्ते’’ केलं. मग शांतीने पर्स उघडली आणि चॅाकलेटं बाहेर काढली. मुलांचे चेहरे खुलले.

श्रीराम म्हणाला, ‘‘घ्या, घ्या मुलानो’’. मुलं जवळ आली. शांतीच्या जवळ बसली. शांतीने मुलांना जवळ घेतलं, त्यांच्या केसांवरुन हात फिरवत सगळयांना चॅाकलेटं दिली. मुलांनी टराटर चॅाकलेटची वेष्टनं उघडली आणि श्रीराम, ‘‘अरे, अरे’’ म्हणतोय तोपर्यंत तोंडात घातली सुध्दा. दिलखुलास हसत मुलं आत पळाली. श्रीराम आणि शांतीसुध्दा एकमेकांकडे पाहून हसत सुटले.

थोडा वेळ मधे गेला. नीलाबाई ‘‘जेवण तयार आहे’’, असे सांगत बाहेर आल्या. श्रीराम आणि शांती हात धुऊन डायनिंग रूम मधे गेले. नीलाबाई नी सगळी भांडी टेबलावर मधोमध ठेवली होती. मुलांना नीलाबाईंनी बोलावून आणलं, हात धुवायला लावले आणि खुर्च्यांवर बसवलं. नीला बाईनी मुलांना वाढलं. श्रीराम आणि शांतीनीही आपलं आपलं जेवण वाढून घेतलं.

नीलाबाई रोलीला भरवू लागल्या. पॅाली शांतीच्या शेजारच्या खुर्चीवर बसली होती. ‘‘मी भरवू तुला?’’ शांतीनं पॅालीला विचारलं. पॅालीने काहीच उत्तर दिलं नाही. ती शांतीकडे नुसती पहातच राहिली. शांतीने, मग पॅालीची बशी ओढून घेतली, वरण घालून भात कालवला आणि पॅालीला भरवायला सुरुवात केली.

बरोबर हलक्या गप्पाही मारायला तिने सुरुवात केली सुरुवातीला पॉली गप्प होती पण नंतर तिचीही भीड चेपली आणि जुनी ओळख असल्यासारखी ती पण गप्पा मारायला लागली. शांतीने सुध्दा एकीकडे आपलं जेवण सुरु केलं. तिकडे जगू श्रीरामबरोबर बसला होता आणि त्यांच्याही जोरात गप्पा गोष्टी चालल्या होत्या. मुलांच्या किलबिलाटाने वातावरण प्रसन्न झालं होतं.

मुलांची जेवणं झाली. हात धुऊन मुलं निघुन गेली. डायनिंग टेबलावर फक्त श्रीराम आणि शांतीच राहीले. नीलाबाई दोन वाट्यात आटवलेल्या दुधाची बदाम पिस्ते घातलेली खीर घेऊन आल्या. स्वादिष्ट खीरीने दोघांची तोंडे गोड झाली.

श्रीराम शांतीला म्हणाला, "आज घराला घरपण आल्यासारखं वाटलं, आणि शांती, हे केवळ तुझ्यामुळे. शांती हे घरपण कायम. राहील का? मुलांना तुझी गरज आहे, मलाही तुझी गरज आहे. तू हो म्हणशील ना?

शांतीला हे सर्व अनपेक्षित होतं. हा अनुभवच नवखा होता. ती नुसतीच खाली बघत राहिली. मनातली घालमेल तिने डोळ्यात दिसू दिली नाही.

अखेर श्रीरामच म्हणाला, ठीक आहे शांती, तू तुझा विचार करायला वेळ घे. आम्ही वाट पहातो.

श्रीराम उठला, शांतीही उठली. हात धुऊन दोघं बाहेर हॉलमधे आले.

वातावरण जड झालं होतं. शांतीला तिथे थांबणं अवघड झालं. श्रीरामच्या ते लक्षात आलं. त्याने ड्रायव्हरला बोलावलं आणि शांतीला घरी सोडण्याची त्याला सूचना दिली.

शांती घरी आली. तिने दार उघडलं, चपला काढल्या, पर्स खुर्चीवर टाकली आणि सोफ्यावर अंग झोकून दिले. शांतीने डोळे गच्च मिटून घेतले. आत्तापर्यंत

रोखून ठेवलेला भावनांचा ओघ बांध फोडून वहायला लागला. ती हुंदक्यावर हुंदके देऊ लागली. डोळ्यातून अश्रूंचा ओघ सुरु झाला.

विचारांच्या लाटा शांतीच्या डोक्यात थैमान घालू लागल्या.

गरज, गरज, गरज.

शाळेला, तिची एक शिस्तप्रीय, निष्ठावंत शिक्षिका, मुख्याध्यापिका म्हणून गरज होती.

श्रीरामला, त्याच्या घराला घरपण देण्यासाठी तिची गरज होती.

पाटील सराना, त्याना खंबीर आधार देण्यासाठी तिची गरज होती.

पण शांतीची स्वत:ची गरज काय होती याचा कोणी विचारच केला नव्हता. खुद्द शांतीने सुध्दा.

आणि सगळ्याच गोष्टी काय फक्त गरजेपोटी करायच्या असतात? तिथे भावनांना काहीच स्थान नाही का?

या भणभणत्या विचारांमधेच कधीतरी तिला झोप लागली.

शांतीला जाग आली तेव्हां संध्याकाळ झाली होती. ऊन्हं कलली होती. खाली रस्ता गजबजला होता. नाना प्रकारचे वाहतुकीचे आवाज येत होते.

शांतीने टी व्ही लावला आणि तिच्या आवडत्या मालिका पहाण्यात तिने मन रमवलं.

तासाभराने फ्रिजमधुन तिने कढी खिचडी काढली, मायक्रो मधुन गरम करुन घेतली. टी व्ही समोर बसून जेवण केलं आणि मग सगळं आवरून झोपायला गेली. शांतपणे.

सोमवार उजाडला. नवा आठवडा सुरु झाला. नेहमी प्रमाणे साडे दहा पर्यंत शांती शाळेत पोहोचली. शाळा सुरु झाली. आजच्या वेळापत्रकाप्रमाणे शांतीने तिचे दोन वर्ग घेतले आणि आपल्या अॅाफिस मधे ती परत येऊन बसली.

टेबला वरच्या कॅाम्प्युटरने ई मेल आल्याची सूचना दिली. शांतीने ई मेलची इन बॅाक्स उघडली. पाटील सरांची मेल होती. पाटील सरांना म्हणे सांगलीला एका नवीन निघालेल्या कॅालेजमधे उप प्राचार्याच्या पदाची अॅाफर आली होती. पगारही चांगला होता. रहायला कॅालेजचे क्वार्टरही माफक भाड्यात मिळणार होते. पाटील सरानी लिहिले होतं की ती अॅाफर त्याना आवडली होती आणि महिन्याभरात सोलापूरची नोकरी सोडून सांगलीला रुजू होण्याचा त्यांचा विचार होता.

ई मेलच्या शेवटी पाटील सरांनी विचारलं होतं, “साळवे बाई, सांगलीला माझ्या बरोबर पत्नी म्हणून यायला तुम्हाला आवडेल?”

सुन्न डोक्याने शांती थोडा वेळ बसून राहिली.

शाळेचा शिपाई मुख्याध्यापिका बोलावताहेत म्हणून सांगत आला. ताबडतोब उठून शांती लेले बाईंच्या केबिन मधे गेली. लेले बाई काही तरी लिहित होत्या. शांती त्यांच्या समोरच्या खुर्चीवर बसली.

थोड्या वेळाने बाईंनी हातातले कागद खाली ठेवले आणि शांतीकडे बघत त्या म्हणाल्या, “शांती, शाळेच्या विश्वस्तांचा सकाळी फोन आला होता. साने सरांच्या सिनिऑरिटीला डावलू नाही शकणार ते. साने सर माझ्या नंतर आठ महिन्यांनी निवृत्त होतायत. विश्वस्त म्हणतायत, मी निवृत्त झाल्यावर आठ महिने साने सर मुख्याध्यापक होतील आणि त्या नंतर तुझा नंबर.”

a

सुन्न डोक्याने बसायची शांतीची अर्ध्या तासातली ही दुसरी खेप.

शांतीचा खट्टु झालेला चेहरा पाहुन लेले बाई जरा चुटपुटल्या. शांतीला त्या म्हणाल्या, “एवढं नको मनाला लाउन घेउ शांती. अगं तू वयाने लहान आहेस. आठ महिने पटकन निघून जातील”.

शांतीला वाटत होतं, बाईंना सांगावं की साने सरांसारख्या तुसड्या स्वभावाच्या माणसाच्या हाताखाली आठ महिने काय, आठ तासही काढणे तिला जमणार नाही.

शांती आपल्या केबिनमधे परत आली.

टेबला वरच्या कॅाम्प्युटरने परत ई मेल आल्याची सूचना दिली. शांतीने ई मेलची इन बॅाक्स उघडली.

श्रीरामची मेल होती. श्रीरामने लिहिलं होतं, “सॅारी शांती, काल मी चुकीचा शब्द वापरला. गरज हा अगदी चुकीचा शब्द आहे. आम्हाला तू हवी आहेस. मला सहचरिणी म्हणून हवी आहेस आणि तिन्ही छोट्यांना प्रेमळ आई म्हणून हवी आहेस.”

शांतीची नजर मेसेज वरून उठेच ना. ती पहातच राहिली, परत परत वाचत राहिली.

शांती विचार करू लागली, स्वत:बद्दलचे विचार, स्वत:च्या भविष्याबद्दल विचार.

हळू हळू काहीतरी धूसर वाट दिसत होती, पण नक्की काही ठरत नव्हतं.

डोळयावर झापड आल्यासारखं झालं आणि बसल्या बसल्याच शांतीला डुलकी लागली.

“बाळ भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे”. स्पष्ट, धीर गंभीर आवाजातले शब्द शांतीने ऐकले.

तिला खडबडून जाग आली.

शांतीने चहा मागवला. गरम चहा पिऊन तिला खूपच तरतरी आली.

शांती ने कॅाम्प्युटर जवळ ओढला. तीन महत्त्वाचे ई मेल मेसेज पाठवायचे होते.

पहिला ई मेल मेसेज पाटील सरांना.

“सांगली येथिल कॅालेजच्या उप प्राचार्य पदावरच्या नेमणुकीबद्दल अभिनंदन आणि आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी अभिष्टचिंतन. आपल्याबरोबर सांगलीला येण्याच्या सूचनेचा मी स्वीकार करू शकत नाही. क्षमस्व.”

मेसेज एकदा दोनदा वाचून “सेन्ड” केला.

दुसरा ई मेल मेसेज मुख्याध्यापिका लेले बाईना.

“·········.कृपया माझा राजीनामा स्वीकारावा ही विनंती······”

तीनदा वाचून मेसेज “सेन्ड” केला.

तिसरा ई मेल मेसेज श्रीरामला.

a

"प्रिय श्रीराम आणि माझ्या छोट्या लाडक्या बछड्यानो···············
··········"

शांतीने मेसेज एकाग्रतेने टाईप केला आणि लगेच "सेन्ड" केला.

शांतीला तिच्या मनाचा थांग लागला होता. समोरची वाट अगदी स्वच्छ दिसत होती.

--------X-------

a

# ११

# तडजोड

( भाग - १)

“काय मनुकाका, महाबळेश्वर ट्रिप आहे नं दरवर्षीप्रमाणे?”

मोहनने वळून पाहिलं. त्याचा पुतण्या राजीव खुर्च्यांच्या मागच्या रांगेत बसला होता आणि लग्न संमारंभाच्या त्या चाललेल्या गदारोळातही त्याला महाबळेश्वर ट्रिपची चौकशी करायची होती.

“अरे राजीव, आपली महाबळेश्वर ट्रिप आम्हा वयस्कर लोकांची असते. तुझं तर सहा महिन्यापूर्वी लग्न झालंय, जा राजा राणी कुलु मनालीला नाहीतर कोडाईकनालला”. मोहन म्हणाला.

“नाही हं मनुकाका,” राजीवच्या शेजारीच बसलेली प्रीति चिवचिवली, “राजीवने माझ्याकडे देशमुख फॅमिलीच्या वार्षिक महाबळेश्वर ट्रिपचं एवढं कौतुक केलंय की आम्हाला नक्की यायचंच आहे. आणि काका, नेटवर काही बुकिंगस् वगैरे करायची असतील तर मी करीन ना मदत!”

“आता काय सांगायचं या नव्या सूनबाईला, देशमुखांच्या महाबळेश्वर ट्रिपचा स्टॅन्डर्ड फोरमॅट आहे. बस करायची ती सूरज ट्रान्स्पोर्टचीच आणि महाबळेश्वरला रहायचं, हॉटेल सनराइज मधेच. नेट वर बुकिंग नको, काही नको. मॅक्सिमम् डिस्काउंट आणि उत्तम सोय गॅरंटीड.” मोहनचे मनातल्या मनात विचार.

a

लग्न लागलं. मंडळींना जेवायला पाचारण केलं गेलं. जवळचे नातेवाईक, आते मामे भावंडं, वडील मंडळी, सगळ्यांचीच भेट बऱ्याच दिवसांनी होत असल्यामुळे सर्वत्र आनंदाचं वातावरण होतं. त्याही गोंधळात एक दोघांनी मोहनला महाबळेश्वर ट्रिप बद्दल विचारून घेतलं.

देशमुख कुटुंबाच्या वार्षिक महाबळेश्वर ट्रिपचा प्रायोजक म्हणून मोहनची सगळ्यांनी एकमताने निवड केलेलीच होती, आणि का नसावी, महाबळेश्वरच्या बस प्रवासाची, तेथे रहाण्याची उत्तम सोय. ब्रेकफास्ट, लंच, डिनर मेनू अगदी वेगवेगळ्या प्रकारचे आणि दर्जेदार. आणि हे सगळं त्या मानाने माफक खर्चात.

वर्षानुवर्षे महाबळेश्वरला जात असल्याने देशमुख कुटुंबियांना सगळे पॉइंटस्, फिरण्याची ठिकाणं, उत्तम स्ट्रॉबेरी मिल्क शेक, मका पॅटिस मिळवण्याचे धाबे, यांची पूर्ण माहिती होती. त्यामुळे दिवसभर मनमुराद फिरायचं. संध्याकाळी लेकवर बोटिंग किंवा नुसताच फेरफटका, वाटलं तर घोड्याची रपेट, नंतर शॉपिंगसाठी मार्केट रोडवर मोर्चा. मग थंडीचा कडाका सुरू झाला की गरम कपड्यांत लपेटून घेऊन हॉटेलच्या लॉनवर खुर्च्या टेकून पूर्ण रिलॅक्सेशन. हा सगळ्यांच्या पसंतीचा कार्यक्रम.

मुंबईत शेजारी रहात असलं काय, किंवा लांब असलं काय, देशमुख कुटुंबियांना एकमेकांबरोबर मेलजोल करण्याची वर्षातली ही एकमेव संधी असायची. फेब्रुवारीचा दुसरा तिसरा आठवडा सगळ्यांना सर्व दृष्टींनी सोईस्कर पडायचा आणि मग कोणी दोन दिवस, तर कोणी तीन तर कोणी चार दिवसांसाठी या ट्रिप मधे सामिल व्हायचे. यावर्षी सगळ्यात धाकट्या चुलतभावाच्या मुलाचं, गौरवचं लग्न फेब्रुवारीमधे होतं त्यामुळे मग ही महाबळेश्वर ट्रिप फेब्रूवारीमध्ये होऊ शकली नव्हती.

"आज बरेच जण विचारत होते महाबळेश्वर ट्रिप बद्दल." रात्री मोहन उर्फ मनु निर्मला ताईना सांगत होता. "यावर्षी फेब्रुवारीत ट्रिप झाली नाही. आता महिना संपत आला. आत्ता जरी लगेच जुळवाजुळव सुरू केली तर पंधरा मार्च पर्यंत ट्रिप करता येईल. राजसिंगला विचारलं पाहिजे, की पंधरा ते वीस मार्चच्या दरम्यान रूम्स् मिळतिल का एवढ्या, त्याच्या हॉटेलमधे!".

राजसिंग हा महाबळेश्वरच्या हॉटेल सनराइज चा मॅनेजर. मोहनचा दोस्त. राजसिंगला देशमुख कुटुंबिय फार आवडायचे. त्यांचं सभ्य वर्तन, त्यांचे चांगल्या सर्व्हिसला, चांगल्या जेवणाला दाद देण्याचे संस्कार, यामुळे या मंडळींवर हॉटेलचा नोकरवर्गही खूष असायचा. आणि शेवटी जाताना मनुसाहेब भरघोस बक्षीस देणार याचीही सर्वांना खात्री. त्यामुळे देशमुख लोकांना अगदी धावून धावून सर्विस मिळायची.

"राजसिंग काय, तुम्हाला कधी नाही म्हणणार नाही. पण आता तुम्हाला हे सगळं जमणार आहे का? धावपळ आणि अवांतर खर्च किती करता तुम्ही." निर्मला ताई म्हणाल्या. "बस ड्रायव्हरला, हॉटेलच्या स्टाफला दिलेले बक्षीसाचे पैसे तुमच्याच खिशातुन जातात नं? मागच्या वर्षी पर्यंत ठीक होतं, पण आता रिटायर झाल्यावर विचार करायला पाहिजे."

निर्मलाताईंचं बोलणं खोटं नव्हतं. रिटायर झाल्यानंतर गेल्या सहा महिन्यात मोहनचा मुख्य भर होता त्याच्या जीव की प्राण खेळावर, कॅरमवर. स्थानिक संस्थांच्या कॅरम मॅचेसमधे बक्षिसे मिळवणे, होतकरू कॅरम प्लेअरना चॅंपियनशिपसाठी तयार करणे हे त्याने जीवनाचे मुख्य लक्ष्य ठेवले होते. याव्यतिरिक्तच्या मोहनच्या इतर ॲक्टिव्हिटीज म्हणजे, मधुन मधुन औद्योगिक

आणि व्यावसायीक क्षेत्राशी निगडीत ह्युमन रिलेशन्स प्रॉब्लेमबाबत आयोजित केलेल्या सेमिनार मधे तज्ञ पॅनेलिस्ट म्हणून सहभाग घेणे, आणि फावल्या वेळी घरात सुडोकु कोडी सोडवत बसणे. यापलीकडे मात्र इतर कोठलीही इतर जबाबदारी मोहनने हातात घेतली नव्हती. कुठे आपल्याला करण्या योग्य अशी नोकरी किंवा सुयोग्य काम मिळवण्याचा प्रयत्नही मोहनने केला नव्हता. त्यामुळे बरेच अवांतर खर्च निर्मलाताईनी कमी केले होते. स्वत:चा म्युझिक क्लासही निर्मलाताईनी बंद केला होता. थोडा मागचा पुढचा विचार करणे आता खरोखरच आवश्यक झाले होते.

महाबळेश्वरच्या सनराइज हॉटेलच्या रूम बुकिंगसाठी मॅनेजर राजसिंगला टेलिफोन झाला. राजसिंगने मोहनला मार्च सोळा पासून ते एकवीस पर्यंत देशमुख कुटुंबियांसाठी हॉटेल रूम्स् मिळतील, याची ग्वाही दिली आणि मग मोहनने पुढची प्रक्रिया चालू केली.

भराभर सगळ्या भावंडांना, कझिन मंडळींना फोन झाले. कोण येणार, किती दिवस तिथे राहू शकणार याचा अंदाज आला. एकूण खर्चाचा आणि प्रत्येकी खर्च विभागणीचा अंदाज आला.

सुट्टीचा अंदाज घेते वेळी बऱ्याच जणांच्या ध्यानात आलं की मार्च मध्याच्या सुमारास एवढी पाच दिवस सुट्टी मिळणं शक्य होत नाही, आणि मग त्यामुळे सोळा मार्च ते एकोणीस मार्च महाबळेश्वर ट्रिप करायचं ठरलं.

सगळे मिळून सोळा जणांचे होकार आले. आठ कपल्स. आठ खोल्या हव्यात. मोहनने राजसिंगला फोन केला.

“यू आर वेलकम मनुभाई. खोल्या मिळतील.” राजसिंग म्हणाला, “एक रिक्वेस्ट आहे. तुम्ही येताना माझ्यासाठी एक चांगल्या पैकी कॅरम बोर्ड घेऊन या, आणि सोंगट्या पण. मी पैसे देईन मनुभाई. तुम्ही कॅरमच्या व्यवसायात आहात असं काहीतरी बोलला होतात एकदा, म्हणून तुम्हाला रिक्वेस्ट केली.”

मोहनने राजसिंगला समजावून सांगितले की त्याचा कॅरमचा व्यवसाय वगैरे नाही, तर तो कॅरम चांगला खेळतो आणि कॅरमचा स्थानिक चॅंपियन आहे.

“हां तेच ते.” राजसिंग म्हणाला. “ मग आणाल नं कॅरम सेट माझ्यासाठी नक्की? एक काळजी घ्यायची मनुभाई. तुमच्या सामानाच्या मधे घालुन आणा बोर्ड, कोणाच्या नजरेत यायला नको.”

बोरिवली कांदिवलीच्या कॅरमच्या क्षेत्रात मोहनचे नाव आदरपूर्वक घेतलं जातं असे. त्यामुळे तिथल्या कॅरम बोर्ड विकणाऱ्या स्पोर्टस् डीलर्सशी मोहनची बऱ्यापैकी ओळख होती. त्याच्यासाठी ही खरेदी म्हणजे फारशी अवघड कामगिरी नव्हती. मोहनने कबूल केलं आणि पुढच्या दोन तीन दिवसात खरेदी उरकूनही टाकली.

मार्च महिना आला. पहिला आठवडा गेला. महाबळेश्वर ट्रिपच्या खर्चाची तयारी म्हणून मोहनने पन्नास हजार रुपये बँकेतून काढून आणले. ट्रान्स्पोर्टरला बसचा ॲडव्हान्स दिला. वाटेत फूड कोर्टमधे सर्वांसाठी खर्चायला पैसे बाजूला काढून ठेवले. बस प्रवासात, तसंच महाबळेश्वरला मधुन मधुन तोंडात टाकायला ड्राय फ्रुट्स, वेफर्स, बिस्किटांचे पुडे आणले, पाण्याच्या बाटल्यांच्या क्रेटस् आणल्या.

निर्मला सगळं पहात होती. विचार करत होती. वर्षानुवर्षे हेच चालत आलं होतं, त्यामुळे यात आश्चर्य वाटण्याचा प्रश्न नव्हता. पण त्यावेळी नोकरी चालू होती.

गडगंज पगार हातात येत होता. आता ना उद्योग ना पगार. फक्त इन्व्हेस्टमेंटसचा आधार. ही ट्रिपची धूरा कुटुंबातल्या दुसऱ्या कोणाच्या तरी तरूण भक्कम खांद्यावर सोपवण्याची, खरं तर, वेळ आलेली होती.

तयारी चालू होती. निर्मलाताईनी मोहनच्या कानावर घालून ठेवलं. "या वर्षी आपल्या कुलदेवीची, व्याघ्रांबरीची ओटी भरायचं माझ्या मनात आहे. तिकडे गोकर्ण महाबळेश्वर जवळ कुठेतरी ते देवीचं मंदिर आहे म्हणतात. नक्की जायचंच हं आपण. मला वाटतं राजसिंग काढेल शोधून मंदिराचा ठावठिकाणा. "

"ठीक आहे, नक्की जाऊया". मोहनने प्रॉमिस केलं.

सोळा तारखेला बस बोरिवलीहून सकाळी सातला निघाली. सगळ्यांचाच उत्साह दांडगा होता आणि तयारी जय्यत होती. मोहनने आपल्या सर्व सामानाबरोबर राजसिंगसाठी आणलेला कॅरमबोर्डही बॅगेज कंपार्टमेंटमधे चढवला आणि सुरक्षितपणे ठेवून दिला.

मजेत, गाणी गात , चेष्टा मस्करी करत मंडळी महाबळेश्वरला पोहोचली आणि नेहमीचा कार्यक्रम सुरू झाला. वयस्कर मंडळी, तरुण मंडळी, सर्वांनी आपापल्या आवडीप्रमाणे, कुवतीप्रमाणे, ताकदीप्रमाणे जमेल तशी ट्रिप सार्थकी लावली. मार्केटमधे फिरताना मनुभाईने खरेदीखर्चात एरवीपेक्षा आखडून घेतलेला हात बऱ्याच जणांना जाणवला.

महाबळेश्वरच्या मार्केट रोडला रीगल फूटवेअरचे मालक रमेश गोरे दुकानाबाहेरच उभे होते. "अरे मनुभाई, या, या." देशमुख मंडळीना, विशेषकरून मोहनला बघुन, रमेश गोरेंचे डोळे सावज बघितल्यासारखे लकाकायला लागले. पण त्यांना मोहनने लांबूनच हात हलवला. "हे काय अघटित झालंय", असा गोरेंचा

चेहरा झाला आणि मोहन दुसऱ्या कुठल्या दुकानात जातोय का, ते वाकून वाकून बघत राहिले.

दुपारी जेवणाच्या वेळी राजसिंगने बातमी आणली की व्याघ्रांबरी देवीचं मंदिर गोकर्ण महाबळेश्वराच्या दोन किलोमीटर पुढे डोंगरात आहे खरं, पण देऊळ फक्त शुक्रवारी उघडं असतं. अर्धा दिवस जाईल तिथे जाऊन येण्यात.

मोहनने कॅलेंडरमध्ये पाहिलं. शुक्रवार येत होता वीस मार्चला आणि मुंबईला जाण्याची देशमुख कुटुंबाची तारीख होती एकोणीस मार्च. हे गणितच जमत नव्हतं.

शेवटी राजसिंग मोहनला म्हणाला, “मनुभाई, तुमची देशमुख फॅमिली काही एकोणीस तारखेच्या पुढे राहू शकेल असं दिसत नाही. तेंव्हा बस जाऊद्या मुंबईला एकोणीस तारखेला ठरल्याप्रमाणे. तुम्ही दोघं रहा दोन दिवस. शुक्रवारी वीस तारखेला देवीचं दर्शन घ्या आणि एकवीस तारखेला जा मुंबईला, व्हॉल्व्हो बसने आरामशीर, अगदी बोरिवली पर्यंत.”

“मनुकाका तुम्ही काही काळजी करू नका, सगळ्यांना व्यवस्थित न्यायची जबाबदारी माझी”. तरुण पुतण्या सुहासने मोहनला ग्वाही दिली.

निर्मला ताई मनात म्हणाल्या, “कायमचीच ही जबाबदारी घे रे बाबा”.

झालं. तीन दिवस जिवाचं महाबळेश्वर करून झाल्यावर, मोहनला आणि हॉटेल मॅनेजर राजसिंगला भरभरून थँक्स देऊन देशमुख कुटुंबिय एकोणीस तारखेला ट्रॅव्हलर बसने मुंबईला रवाना झाले.

शुक्रवारी व्याघ्रांबरी देवीच्या दर्शनाला जाण्यासाठी राजसिंगने मोहनला स्वतःची गाडी आणि ड्रायव्हर दिला, इतकंच नव्हे तर मिसेस सिंग, म्हणजे शांतीभाभी सुध्दा बरोबर यायला तयार झाल्या. ही तर दुधात साखर झाली.

शांतीभाभींच्या सगळीकडेच ओळखी, त्यामुळे मंदिरापर्यंतचा प्रवास छान झाला आणि देवीचं दर्शनही छान झालं. निर्मला ताईंनी देवीची खणानारळाने ओटी भरली आणि मनापासून प्रार्थना केली, “माते अशीच कृपादृष्टी आमच्या कुटुंबावर असू दे आणि मोहनना काही तरी चांगला व्यवसाय मिळूं दे”.

दुपारी दोनपर्यंत मंडळी हॉटेलमधे परत आली.

राजसिंग वाटच पहात होता.

“मनुभाई”, राजसिंग म्हणाला, “एक समस्या उपटली आहे. हा करोनाचा प्रसार देशभर झपाट्याने होतोय आणि तो रोखण्यासाठी पंतप्रधानांनी देशभर बावीस मार्चला स्वेच्छेची संचारबंदी लागू केली आहे. सगळीच परिस्थिती सध्या त्यामुळे अनिश्चित आहे म्हणतात. उद्याची तुमची बस रद्द केली आहे कंपनीने. आणि सगळ्याच बसेस रद्द झाल्यात चार दिवसांसाठी. ज्यांच्या स्वतःच्या गाड्या आहेत ते सगळे भराभर महाबळेश्वर सोडून चाललेत. बसेस रद्द झाल्यामुळे प्रायव्हेट गाडीवाल्यानी भाडी काहीच्याकाही वाढवलीत. तुम्ही आता थांबा तीन चार दिवस, परिस्थिती कशी काय बदलते ते कळेल तोपर्यंत.”

मोहन आणि निर्मलाला मान डोलावण्याशिवाय गत्यंतर नव्हतं.

संध्याकाळी दोघं मार्केट रोडला गेले. नेहमीची दाट वर्दळ तिथे अजिबातच नव्हती. दुकानदार नुसतेच हात चोळत बसले होते. मुंबई पुण्याच्या गरम खिसे असलेल्या गिऱ्हाईकांनी काढता पाय घेतला होता.

पंतप्रधानांनी बावीस मार्चला राष्ट्रीय स्तरावर स्वेच्छेची संचार बंदी जाहीर केली आणि चोवीस मार्च पासून देशाची चक्रं एकदमच थांबली. लॉकडाउन.

देशात लॉकडाउन झाला आणि त्याचा सरळ परिणाम म्हणजे ट्रान्स्पोर्टच्या पूर्ण अभावामुळे मोहन निर्मला महाबळेश्वरला अडकले. मोहन रोज राजसिंगबरोबर परिस्थितीचा आढावा घेत असे, पण मुंबईला जाण्याचा काही मार्ग दिसत नव्हता.

वास्तविक महाबळेश्वरला करोनाग्रासित एकही रुग्ण नव्हता, पण वाई साताऱ्याकडे साथीने जरा हात पाय पसरले होते. म्हणूनच, महाबळेश्वरच्या नागरिकांना सुरक्षित ठेवण्यासाठी महाबळेश्वरातून आत बाहेर आवक-जावक संपूर्ण पणे बंद करण्यात आली होती.

सुरुवातीचे दोन दिवस मोहन आणि निर्मलाला फारच कठीण गेले. रस्त्यांवर, मार्केटमधे, सनराइज पॉइंट्सना, सनसेट पॉइंट्सना, वेण्णा लेकवर, सगळीकडे शुकशुकाट. महाबळेश्वरचे स्थानिक रहिवासी बहुतेक घरात बसून टी व्ही बघत असावेत. मोहनच्या दृष्टीला महाबळेश्वरचं हे “घोस्ट टाउनचं” स्वरूप नवीनच होतं. फळं, स्ट्रॅाबेरी अगदी नेहमीच्या भावाच्या पावपट भावाने विकायला काढली होती, पण तेही खाऊन खाऊन खाणार किती!

तिसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्ट टेबलवर मोहन सुन्नपणे बसलेला होता. निर्मलाताई विचार करत होत्या कि इतक्या वर्षांनी कुलदेवीच्या पायाशी आपण आलो. देवीची इतकी यथासांग पूजा केली, देवीची ओटी भरली, मनापासून प्रार्थना केली, मग हे काय संकट उद्भवलंय? कशाबद्दल आपल्याला ही शिक्षा मिळतेय? हॅाटेलचं बिल राजसिंगने मैत्री खातर कितीही कमी केलं, तरीही उगाच खर्चापायी खर्च. निर्मलाताईंना उत्तर सापडेना. मनातल्या मनात देवीची प्रार्थना करून निर्मला ताईंनी हात जोडले.

राजसिंग आला. मोहनला सुन्न चेहऱ्याने बसलेलं पाहून तो मोहनला म्हणाला, "मनुभाई, वेळ जात नाही? तुम्ही माझ्यासाठी आणलेला कॅरम बोर्ड आपण बाहेर काढलाच नाही. चला त्याचं उद्घाटन करु या."

कॅरमचं नाव काढल्यावर मोहनचा चेहरा फुलला, आणि मग ब्रेकफास्ट नंतरचे पुढचे दोन तास मजेत कॅरम खेळण्यात गेले.

संध्याकाळी राजसिंगचे दोन मित्र गप्पा मारायला येऊन बसले. राजसिंगने ओळख करून दिली. "हे रीगल शूज चे गोरे". गोरे डोळे मिचकावत म्हणाले, "अरे, मनुभाईला कोण ओळखत नाही? हे मोठे आश्रयदाते आहेत आमचे."

"आणि हे रवि जोशी, हॉटेल गिरिराजचे मॅनेजर". राजसिंगने दुसऱ्या व्यक्तीचीही ओळख करून दिली.

गप्पा छान रंगल्या. मोहनही गप्पामधे सहभागी झाला. तासाभरानंतर पाहुणे जायला उठले.

"उद्या इंटरनॅशनल क्लबची मीटिंग आहे, लक्षात आहे नं?" रवि जोशीनी राजसिंगला आठवण करून दिली.

"अरे वा, इथेही इंटरनॅशनल क्लब आहे वाटतं? मीपण बोरिवलीच्या इंटरनॅशनल क्लबचा मेंबर आहे". मोहन म्हणाला.

"फारच छान. या तुम्ही उद्या." गोरे जाता जाता म्हणाले ," मुंबईचे व्हिजिटिंग मेंबर म्हणून तुम्ही आम्हाला मार्गदर्शन करु शकता. आणि हो, वहिनीनाही बरोबर आणा. इथलं लेडीज विंग सुध्दा समाजकार्यात बरच अग्रेसर आहे ".

a

दुसऱ्या दिवशी मीटिंग ला जाण्यापूर्वी राजसिंगने मोहनला महाबळेश्वरच्या क्लब बद्दल माहिती दिली.

“मनुभाई, आपल्या इथल्या क्लबचे अध्यक्ष आहेत राजे विरेंद्रसिंग. परमनंट अध्यक्ष. खरं तर राजे विरेंद्रसिंगजी महाबळेश्वर चे खरेखुरे राजे आणि पालनकर्ता आहेत. गंमत अशी की तुम्हा व्हिजिटर लोकांना या गोष्टीची आजिबात कल्पना नाही. इथल्या बहुतेक सर्व नामांकित हाॅटेलांमधे आणि मार्केट मधल्या मोठ्या व्यवसायांमधे राजेंची मेजाॅरिटी भागिदारी आहे. अकारण भाववाढ, लाचलुचपत, चोरीमारी यावर त्यांची करडी नजर असते आणि वेळीच योग्य पावलं ते उचलतात. हा परिसर इतका स्वच्छ रहाण्यामधे राजेंचं फार मोठं योगदान आहे.” राजसिंगने सांगितले. “हां पण एक गोष्ट ध्यानात ठेवा मनुभाई, विरेंद्रजींच्या पितामहांचा काही कारणामुळे कॅरम खेळाबद्दल वाईट ग्रह झाला होता. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी महाबळेश्वरला तुम्हाला कॅरम आढळणार नाही. कॅरमवर अलिखित बंदी असल्यासारखी परिस्थिती आहे.”

राजसिंगने सांगितलेली सर्व माहिती मोहनने नीट लक्षात ठेवली.

इंटरनॅशनल क्लबच्या मीटिंग मधे सभासदांनी मोहन आणि निर्मलाताईंचे उत्साहाने स्वागत केले.

शांतीभाभी निर्मलाला महिला सभासदांची ओळख करून द्यायला वरच्या हॉल मधे घेऊन गेल्या.

इकडे खाली क्लबची मीटिंग सुरू झाली.

सेक्रेटरीनी मोहनला दोन शब्द बोलण्यास पाचारण केले. मोहनने विस्तृतपणे बोरिवलीच्या इंटरनॅशनल क्लब मार्फत केल्या जाणाऱ्या समाजकार्यांबद्दल माहिती दिली.

मीटिंग संपल्यावर राजसिंगने मोहनला अध्यक्ष विरेंद्रसिंग राजे ना भेटवायला नेले. अध्यक्षांनी मोहनने दिलेली माहिती लक्षपूर्वक ऐकली होती. इंटरनॅशनल क्लब तर्फे उत्तम सामाजिक कार्य करत असल्याबद्दल राजेंनी मोहनची पाठही थोपटली.

“कुठे सर्व्हिस करता देशमुख तुम्ही” , मोहनच्या हातात का ॅफीचा कप देत विरेंद्रसिंगजी विचारते झाले.

“सर मागच्या वर्षी ऑटोमोबाईल कॉर्पोरेशनमधून रिटायर झालो मी.” मोहनने नम्रपणे सुरुवात केली. मोजून मापून शब्दात तो पुढे म्हणाला, “आता कुठे सर्व्हिस करत नाही मी, पण एक राष्ट्रकार्य विना वेतन करतो. कॅरमच्या वर्ल्ड कप स्पर्धेसाठी भारतीय टीममधले काही खेळाडू माझ्या हाताखाली तयार झालेत.”

“कॅरम वर्ल्ड कप?” राजे कपाळावर आठ्या चढवत म्हणाले, “या खेळाला जागतिक मान्यता मिळाली आहे?”

“होय सर,” त्याच विनम्र सुरात मोहन पुढे म्हणाला “दोन वर्षांपूर्वी कोरिया मधे झालेल्या अंतिम सामन्यात माझ्या खेळाडूने बांगला देशाच्या चँपियन स्पर्धकाला हरवलं. खूप कौतुक झालं त्याचं. सरकारी स्तरावर झालेल्या त्याच्या सन्मान सोहळ्याला मलाही निमंत्रण होतं सर.”

मोहन बोलायचा थांबला. राजेंच्या चेहऱ्यावरच्या आठ्या गेल्या होत्या आणि ते थोड्या विचारात पडल्यासारखे दिसले. मोहनच्या पाठीवर थोपटून, “कीप

इट अप," असं काहीतरी आशिर्वादात्मक पुटपुटत राजेंनी आपला मोर्चा दुसरीकडे वळवला.

राजसिंग कपाळावरचा घाम पुसत होता. त्याने काही न बोलता मोहनचा हात दाबला आणि का◌ॅफीच्या आणखी एका कपासाठी हात पुढे केला.

हा◌ॅटेलकडे परत जाताना कोणीच फारसं बोलत नव्हतं. सगळेजण आपापल्या विचारात मग्न होते. मोहन आणि राजसिंग आताच राजे विरेंद्रसिंगांबरोबर झालेल्या संभाषणाबद्दल आपापल्या दृष्टीकोनातून विचार करत होते. कॅरमचा विषय राजे कसा घेतील, त्यावर त्यांची काय प्रतिक्रिया होईल हे काहीच सांगता येत नव्हतं.

आपली नोकरी जाते की राहते इथपर्यंत राजसिंगची विचारशृंखला येऊन पोहोचली.

निर्मला ताईंना झाल्या प्रकाराची काहीच कल्पना नव्हती. त्या आपल्या नवीन ओळखींबद्दल विचार करत होत्या. स्थानिक महिलांच्या भारी साड्यानी निर्मलाताईना जरा चकितच करून सोडले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी मोहन आणि निर्मला ब्रेकफास्ट घेत होते. मुंबईला परतण्याचा अजून काहीच मार्ग न दिसल्याने दोघेही फारच व्यथित झाले होते. तोच राजसिंग लगबगीने तिथे आला आणि जवळची एक खुर्ची ओढून तिच्यावर धप्पकन बसला. त्याच्या या सगळ्या अविर्भावाकडे पाहून मोहनने अंदाज बांधला की काहीतरी महत्वाचं बोलायचंय.

"आज सकाळीच फोन आला राजे साहेबांचा." राजसिंग म्हणाला. "काहीतरी घडणार म्हणून माझी अपेक्षा होतीच, कारण मधमाशांचं मोहोळ उठवलंत ना काल तुम्ही. राजांनी म्हणे त्यांच्या सूत्रांकडून तुम्ही जे काही सांगितलं त्याची

a

रातोरात पडताळणी करून घेतली. कॅरम या खेळाला जगात मान्यता पावलेली असेल तर त्यांच्या पितामहनी त्या संदर्भात दिलेल्या हुकुमाचा फेरविचार करावा, असा विचार करतायत. या संदर्भात तुमच्याशी बोलायचंय त्यांना.”

“हरकत नाही, बोलूया. बरं ते जाऊ द्या. आमच्या मुंबई प्रवासाबद्दल काही डेव्हलपमेंट?” मोहनने आपल्या प्रायाॅरिटी स्पष्ट केल्या. “तुमचे स्थानिक प्रश्न असेच रेंगाळत राहतील, नाहीतर पटकन सुटुन सुध्दा जातील. आमच्या गाड्या सुरु केव्हा होतायत ते या क्षणी जास्त महत्त्वाचं आहे.”

मोहन वैतागून आणखीही काही बोलणार होता, तेवढ्यात राजसिंगचा मोबाईल वाजला.

“राजेंच्या बंगल्या वरून फोन आहे.” राजसिंग म्हणाला. राजसिंग टेलिफोन वर बोलू लागला.

थोडा वेळ राजे विरेंद्रसिंग बोलत होते आणि राजसिंग ऐकत होता. काही वेळनंतर राजसिंग म्हणाला, “ होय सर, त्यांच्याकडे आहे बोर्ड. त्यांच्या सामानात असतोच नेहमी.” नंतर थोडा वेळ एकतर्फी बोलणं झालं. राजसिंग फक्त हो ला हो लावत होता. थोड्या वेळाने “थँक्यू सर”, असे म्हणून राजसिंगने फोन खाली ठेवला.

पाण्याचा ग्लास उचलून दोन घोट पाणी प्यायला आणि त्याने थोडा वेळ डोळे मिटून घेतले.

“मनुभाई,” राजसिंग म्हणाला, मला वाटतंय की, राजेना वाईट वाटतंय की काही क्षुल्लक कारणामुळे कॅरम मधे महाबळेश्वर मागे राहीलंय. त्याना आता फास्ट ट्रॅकवर या चुकीची भरपाई करायची आहे, आणि एक एक्सपर्ट म्हणून तुमच्याशी या बाबतीत त्याना सल्लामसलत करायची आहे. आज संध्याकाळी बंगल्यावर

a

आपल्याला चहाला आमंत्रित केलंय राजेनी, आणि ललितादेवींनी निर्मलावहिनींनाही अगत्याचे आमंत्रण दिले आहे. तुमच्या वतीने मी स्वीकारलं आमंत्रण. ठीक आहे नं मनुभाई? "

मोहनला त्यात वावगं काहीच वाटलं नाही.

"आणि हो मनुभाई," राजसिंग पुढे म्हणाला, "राजेना तुमच्या खेळाचं प्रात्यक्षिकही बघायची इच्छा आहे. बोर्ड न्यायला लागेल आपल्याला. ठीक आहे नं?"

राजेंसारख्या मोठ्या आसामीसमोर आपले कौशल्य दाखवण्याच्या कल्पनेने मोहनची बोटं आताच फुरफुरायला लागली.

संध्याकाळी साडेचारला राजसिंगने गाडी काढली. वेण्णा लेकच्या पुढे, गाडी पाचगणीच्या रस्त्याला लागली. बरंच पुढे गेल्यावर उजवीकडे लिंगमाळा धबधब्यांकडे जायचा रस्ता लागतो. तिथे गाडी वळली. शांत वनश्रीतून एक किलोमीटर गेल्यावर गाडीने परत डावीकडचा फाटा घेतला. राजसिंग एकाग्रतेने गाडी चालवत होता आणि शांतीभाभी, मोहन, निर्मला, शांत बसले होते.

गाडीने एक वळण घेतलं आणि दरीच्या काठावर, गर्द झाडीत लपलेला राजे विरेंद्रसिंगचा भव्य बंगला समोर उभा राहिला.

राजे विरेंद्रसिंग आणि ललीतादेवी परफेक्ट होस्ट होते. राजेनी पाहुण्यांना बंगल्याचा आसमंत फिरुन दाखवला. नंतर मागच्या अंगणात लॉनवर चहापाण्यासाठी सर्व जण बसले. संध्याकाळच्या वेळी दरीत हळूहळू ढग जमायला लागले होते. हलक्या फूलक्या गप्पांचा ओघ चालू होता आणि पाहुणे मंडळी रिलॅक्स्ड होती.

योगायोग म्हणजे, निर्मलाताईंचं शालेय शिक्षण बडोद्याला झालेलं आणि ललितादेवी बडोद्याच्याच, राजघराण्याशी निगडीत निघाल्या. त्यामुळे खूप समाईक ओळखी निघाल्या. गप्पा संपेचनात.

चहा झाला. मंडळी आत खाजगी बैठकदालनात आली. एका टेबलवर कॅरम बोर्ड मांडण्यात आला. मोहनने हलकासा पावडरचा शिडकावा केला. सोंगट्यांची गोलाकार रचना केली. मोहन आणि निर्मलाताई समोरासमोर बसले.

मोहनने हस्तिदंती स्ट्रायकर घेतला, बोर्डवर ठेवला आणि खेळ सुरू केला. पहिल्याच स्ट्राइकमधे तीन सोंगट्या तीन पॉकेटमधे गेल्या. आणि मग शॉट, रिबाउंड, डायरेक्ट स्ट्राइक सगळी सगळी अस्त्रं मोहन वापरत गेला. निर्मलाताईना खेळायची संधीच मिळाली नाही. अतिशय शिताफीने मोहनने क्वीन घेतली, कव्हर घेतलं आणि पहिला बोर्ड संपला.

दुसऱ्या बोर्डचा स्ट्राइक निर्मला ताईनी सुरु केला. त्या मोहनइतक्या वाकबगार नसल्या तरी त्यांचे कौशल्य वाखाणण्याजोगे होते.

अर्ध्या तासात प्रात्यक्षिक संपले. राजेनी मोहनची पाठ थोपटली. ललितादेवीनी पाहूण्याना आग्रह करून जेवायला ठेवून घेतलं. जेवणापर्यंतचा वेळ काढण्यासाठी राजेंनी ड्रिंकस् काढली. हार्ड ड्रिंकना विनम्र पणे नकार दिल्यावर पाहुण्यांसाठी राजेनी व्हर्जिन मॉकटेल बनवून दिली. हळूहळू बोलत राजेनी मोहनची पूर्ण पार्श्वभूमी विचारून घेतली

जेवण झाल्यावर राजे मोहनला म्हणाले, “मिस्टर देशमुख, इथे महाबळेश्वमधे बारा मुख्य हा ॅटेल्स आमच्या कंपनीच्या, म्हणजे रॉयल हॉस्पिटालिटी लिमिटेडच्या मालकीची आहेत, या कंपनीत माझा सर्वात मोठा हिस्सा

आहे. या सगळ्या हॉटेल्सच्या क्लबहाऊसेस मधे आणि कामगारांच्याकल्याण केंद्रांमधे मला चांगल्या पैकी कॅरमबोर्डची सोय करायची आहे, आणि या प्रत्येक हॉटेलमधला एक स्टाफ मेंबर मला उत्तम कॅरम प्लेअर बनवायचा आहे. ही पूर्ण जबाबदारी मी तुम्हाला देऊ इच्छितो. सुरुवातीला एक वर्षाचा हा ट्रेनिंग प्रोग्राम आपण ठेवू शकतो. या कामात मला तुमचं सहकार्य मिळेल का?"

मोहनचा संभ्रमित चेहरा राजेंनी पाहिला आणि लगेच ते पुढे म्हणाले, "यातून आपल्याला कामगार संबंधांत सुधारणाही साधायची आहे. तुमची स्पेशालिस्ट सर्व्हिस आम्ही फ्री घेणार नाही. माझ्याकडून त्यासाठी महिना पन्नास हजार रुपये मानधन आणि प्रवास, रहाण्या- जेवण्याचा पूर्ण खर्च असं सहा महिन्यांचं पॅकेज मी तुम्हाला ऑफर करू इच्छितो.

"सर आपली ऑफर फारच आकर्षक आहे. पण गेले आठ दिवस आम्ही दोघं इथे अडकुन पडलो आहोत. घरी जाण्याच्या ओढीपुढे दुसरा काही विचार सुचत नाही." मोहन म्हणाला.

"एवढंच ना? त्याची काळजी नको तुम्हाला." राजे म्हणाले. "माझ्याकडे माझ्या स्टाफसाठी दोन पास आहेत, माझ्या इथल्या हॉटेलमधे आणि मुंबईच्या हॉटेलमधे समन्वय साधण्यासाठी ये जा करावी लागते ना, त्यासाठी आमची गाडी दिवसाआड ट्रिप करते. उद्या मी माझ्या ऑफिसला तुमचे ऑफिशिअल आय डी बनवायला सांगतो आणि परवाच्या ट्रिप मधे तुम्ही दोघे मुंबईला जाऊ शकता. ठीक? "

जरा थांबून राजे पुढे म्हणाले, "आता हे सगळं विसरून जा. परवा मुंबईला घरी जा, आराम करा, आणि दोन दिवसांनंतर तुमचा निर्णय मला कळवा."

राजे बोलायचे थांबले. निर्मला ताईनी ललितादेवींचा हात कृतज्ञतेने दाबला.

हॉटेलकडे परतताना निर्मला ताई विचार करत होत्या, "केव्हढ्या या घडामोडी चोवीस तासात! मनाने आणि मानाने मोठ्या लोकांच्या ओळखी झाल्या. मुंबईला जाण्याची खात्रीची सोय झाली, मोहनला त्याच्या आवडत्या खेळाच्या माध्यमातून भरघोस प्रामाणिक कमाई करण्याची संधी मिळाली.

"देवी, तुझी लीला अगाध आहे". मनातल्या मनात निर्मला ताईंनी कुलदेवतेला हात जोडले.

(भाग – २)

महाबळेश्वरहून आश्चर्यकारक रीतीने सुटका होऊन मुंबईला परत आल्याला दोन दिवस झाले होते. बोरिवलीच्या शांत वातावरणात मनावरचा ताण कुठल्या कुठे विरघळून गेला होता. सकाळची वेळ होती निर्मला ताई चहाचे कप घेऊन आल्या.

चहा घेता घेता निर्मला ताईनी मोहनला आठवण करून दिली, "महाबळेश्वरला राजेंना होकार कळवला नं?"

"अं, हो. हो. कळवतो नं". मोहन म्हणाला. "आणि मी काय म्हणते," निर्मला ताई म्हणाल्या, "त्या सहा महिन्याच्या कालावधीत निदान सहावेळा तरी महाबळेश्वरला जाऊन आठवडा आठवडा रहायला लागणार तुम्हाला. तेव्हा त्या पॅकेज मधे दोनचार वेळा तरी माझंही तुमच्याबरोबर जाण्याचं जमेल तर बरं होईल. कंटाळा येईल तुम्हाला एकट्याला तिथे".

"खरोखर. विचारून बघतो मी राजेंना". मोहन म्हणाला.

दहा वाजता मोहनने राजेंनी दिलेल्या डायरेक्ट नंबरवर फोन केला.

"सर, आमची मुंबईच्या प्रवासाची सोय फारच छान झाली. थँक्यू व्हेरी मच सर". मोहन म्हणाला. "आपली कॅरम सल्लागार ऑफर मला अॅक्सेप्टेबल आहे सर. आणि एक रिक्वेस्ट आहे सर, माझ्या या पॅकेज मधे निर्मलाला सुध्दा आपण इन्क्लूड करू या का? तिची मदतही होईल काम ऑरगनाइझ करायला".

"कल्पना चांगली आहे मिस्टर देशमुख, पण आपण पुढच्या एक्सटेन्शन पॅकेज मधे बघु ते. या वेळी नाही जमणार." राजेंनी मोहनची रिक्वेस्ट खोडूनच काढली. "आणि इथे ऑरगनाइझ करायला आमची पूर्ण एस्टॅब्लिशमेंट आहे. त्याची बिलकुल काळजी करू नका."

"ठीक आहे सर, मी कॅरम बोर्ड, सोंगट्या वगैरेसाठी डीलर्सना आपल्याकडे ऑफर द्यायला सांगितलंय. ऑर्डर दिल्यावर पंधरा दिवसात येतील सेटस्. मग आपण लगेच सुरुवात करू." मोहन म्हणाला.

निर्मलाला बरोबर न्यायचं जमत नसल्याने मोहन आणि निर्मला दोघंही जरा नाखूश झाले. पण सहा महिन्यात तीन लाख रूपये विनासायास मिळत असताना थोडी अॅडजस्टमेंट करणं प्राप्तच होतं. आणि निर्मलाच्या प्रवास खर्चासाठी, तिथल्या रहाण्या जेवणासाठी खिशातून पैसे टाकणं दोघांनाही प्रशस्त वाटलं नाही. निर्मलाताईनी म्युझिक क्लासमधे परत नाव घातलं. रोज सकाळी नऊ ते बारा गायनाचा सराव सुरू झाला.

एका महिन्यानंतर राजेंच्या ऑफिस कडून फोन आला की सर्व कॅरम सेटस् डिलिव्हर झाले आहेत. काम सुरू करता येईल. निर्मला ताईनी सुटकेचा निश्वास

a

सोडला कारण मोहनसाठी ब्रेकफास्ट करायचा, जेवण करायचं, म्युझिक क्लास अ‍ॅटेन्ड करायचा, या सगळ्यात त्यांची पुरती धांदल उडून जायची.

राजे विरेंद्रसिंगजींची, म्हणजे रॉयल हॉस्पिटालिटी कंपनी प्रायवेट लिमिटेडची गाडी सोमवारी सकाळी सातला मोहनच्या दारात उभी राहिली आणि दुपारी एक वाजेपर्यंत मोहन महाबळेश्वरला पोहोचला. मोहनच्या राहण्याची सोय राजेंच्या लक्झरी हॉटेलमधे केली होती. बेडरूम, सिटिंग रूम आणि छोटं ऑफिस, अशी योजना होती.

लंच आटोपून मोहनने थोडी विश्रांती घेतली.

राजसिंगला फोन केला. हॉटेलचं नाव ऐकून राजसिंग हसला आणि म्हणाला, "अरे तुम्ही तर मोठी माणसं झालात. गरीबाची आठवण ठेवा".

संध्याकाळी पाच वाजता कोणा मिसेस रायकरचा फोन आला.

"सर, मी मिसेस रायकर बोलते, राजे विरेंद्रसिंगजींच्या ऑफिसमधुन. माझ्याकडे आपल्याला असिस्ट करायची ड्यूटी आहे. उद्या सकाळी नऊला येईन मी तुमच्या ऑफिसला. मग डिस्कस करु आपण आणि त्यानंतर, तुमची इच्छा असेल तर एखादं पायलट प्रॉजेक्टही सुरू करता येईल आपल्याला." मिसेस रायकर थोडा वेळ बोलल्या आणि नंतर फोन बंद केला.

"बाई एफिशिअंट वाटतात. ठीक आहे, काम झटपट उरकायला मदत होईल." मोहनने विचार केला.

सकाळी बरोबर नऊ वाजता मिसेस रायकर आल्या. वय साधारण चाळीस, आकर्षक व्यक्तीमत्व, मेकअप, कपडे अगदी व्यवस्थित. मंद परफ्यूम.

बाईनी आपली ओळख करून दिली. मोहनच्या प्रवासाची, रहाण्या जेवणाची सोय ठीक ठाक असल्याची त्यानी खातरजमा करून घेतली. स्वतःचं कार्ड आणि पर्सनल नंबर दिला. बाईंनी चहा मागवला. साखर किती वगैरे विचारून मोहनचा कप तयार केला आणि त्याच्या हातात दिला.

वातावरण अगदी रिलॅक्स्ड झालं. एकमेकांशी वागण्या बोलण्यात सहजता आली.

चहा झाल्यावर मिसेस रायकरनी एक रायटिंग पॅड काढलं आणि नंतर त्या अर्धा तासभर अगदी सुसंगतपणे मोहनला सर्व बारा हॉटेल्स बद्दल, तिथल्या स्टाफबद्दल माहिती देत गेल्या.

बाईंनी कॉफी आणि बिस्कीटं मागवली. मोहनने प्रश्न विचारले. कामगारांच्या ड्युटी अवर्स बद्दल, त्यांच्या ड्यूटीनंतरचा फावला वेळ घालवण्याच्या सवयींबद्दल तो विचारत गेला आणि मिसेस रायकर उत्तर देत गेल्या. मोहनचा कामगार जगताबद्दलचा अनुभव त्याच्या प्रश्नातून उघड दिसत होता.

“सध्या सगळीकडे लॉकडाउन आहे नं!” मिसेस रायकर म्हणाल्या, “त्यामुळे सगळया हॉटेल्समधे अगदी तुरळक गेस्ट आहेत.आणि म्हणूनच प्रॉब्लेम झालाय. कामगारांना फार कमी काम आहे.”

मिसेस रायकरांच्या सूचने प्रमाणे दोन हॉटेल्स पायलट प्रॉजेक्टसाठी निवडली गेली.

मोहन कामाला लागला.

पुढच्या दोन दिवसात त्या दोन हॉटेल्सना मिसेस रायकरांबरोबर मोहनने भेट दिली. मोहनने कामगारांशी आणि सुपरवायझरी स्टाफशी ओळख करून घेतली.

स्नेहाचे संबंध प्रस्थापित केले, कॅरमच्या प्रात्यक्षिक चाचण्या घेतल्या. मोहनच्या अनुभवी नजरेने कोण खेळामध्ये रस घेतोय, कोणामधे कॅरमचं छुपं टॅलेंट आहे, कोण डेव्हलप होऊ शकेल, ते अचुक ताडलं खरं, पण सर्वांना यामधे सहभागी करणं अत्यावश्यक असल्यामुळे कोणताही भेदभाव त्याने या सुरुवातीच्या टप्प्यामधे दाखवला नाही.

प्रशिक्षणाचा आणि सरावाचा हा कार्यक्रम दोन हॉटेल्समधे उत्तम प्रकारे मार्गरत झाला होता. काही तरी नवीन घडत असल्यामुळे कामगारात आणि स्टाफ मधे चैतन्याचे वारे नसले तरी झुळुका वाहु लागल्या होत्या.

या सराव सेशन्सच्या दरम्यान मोहनने कामगारांशी बऱ्यापैकी हितगुजही साधले आणि दोन चार छोटेखानी प्रॉब्लेमही सोडवले. मिसेस रायकर सर्व पहात होत्या आणि जरी शब्दातून नाही, तरी त्यांच्या एकंदर अविर्भावातून त्याना वाटणारं कौतुक स्पष्ट दिसत होतं.

शुक्रवार उजाडला. आठवडा संपत आला. या मुक्कामातील आखलेलं काम संपलं. शनिवारी सकाळी रॉयल हॉस्पिटालिटीच्या पासवाल्या गाडीतून मुंबईला प्रयाण करायचं.

शुक्रवारी संध्याकाळी परतताना मिसेस रायकर मोहनला म्हणाल्या, ‘‘इथे जवळच बॉंबे पॉईंट आहे. तिथून सुर्यास्त छान दिसतो. वेळही झाली आहे सुर्यास्ताची. जाऊया पाच मिनिटांसाठी, चालेल नं?’’

मोहनने मान डोलावली. मोहनच्या डोळयांसमोर कित्येक वर्षापूर्वी पाहिलेला बॉंबे पॉईंटचा सूर्यास्त उभा राहिला. गर्दी, गजबजाट, छोटी मुलं, त्यांचा

a

हात घट्ट पकडलेले आईवडील, फूगे भिंगऱ्या विक्रेते आणि त्या सगळ्याकडे लक्षही न देता विविध रूपे दाखवत सूर्याचा क्षितीजाकडे चाललेला प्रवास.

पण आज मोहनला बॉंबे पॉईंटचं वेगळंच स्वरूप दिसत होतं. पूर्ण शुकशुकाट, नीरव शांतता. जे काही दोन तीन इतर लोक होते ते स्तब्ध पणे सूर्यास्ताची शोभा पहात होते. क्षितीजावर क्षणाक्षणाला रंग बदलत होते. मावळता सूर्य वेगवेगळे आकार धारण करत होता. अत्यंत विलोभनीय दृश्य होतं. मोहन कठड्याच्या अगदी जवळ सरकला आणि सृष्टीचे बदलते स्वरूप अनिमिष नजरेने पाहू लागला. मिसेस रायकरही पुढे आल्या, मोहनच्या शेजारी उभ्या राहिल्या. सूर्य क्षितीजाला येऊन ठेपला होता. तिळा तिळा ने खाली जात होता. त्या बेभान क्षणी मोहनने नकळत मिसेस रायकरचा हात आपल्या हातात घेतला आणि हळुवारपणे दाबला. काही क्षणातच सूर्य क्षितीजाच्या खाली गेला. सूर्यास्ताचा भव्य सोहळा संपला. मोहन भानावर आला. मिसेस रायकरच्या हातातून त्याने आपला हात सोडवून घेतला. "सॉरी, आय ॲम सॉरी", असे पुटपुटत मोहन वळला आणि गाडीकडे चालू लागला.

मोहन गाडीत बसला. पलीकडचे दार उघडून मिसेस रायकरही गाडीत बसल्या. गाडी हॉटेलला येऊन पोहोचली. मोहन मिसेस रायकरना यथोचित "बाय" कसं म्हणावं याची शब्द योजना करतच होता, तेवढ्यात मिसेस रायकर म्हणाल्या, "चला, आठवडा संपला. झाल्या कामाचा आढावा घेऊन आपल्याला रिपोर्ट लिहायला लागेल. मी आठ वाजता येते, आपण वर टेरेस रेस्टॉरंट मधे बसू आणि फायनलाइझ करू. डिनर तिथेच घेऊया नंतर. ठीक आहे नं" ?

महिना पन्नास साठ हजार रुपये खर्च केल्यावर राजेंना साद्यंत रिपोर्टची अपेक्षा असणारच. मोहनने होकारार्थी मान हलवली. मघाशी अनावधानाने झालेल्या हात धरण्याच्या प्रमादाची मिसेस रायकरानी उदार मनाने क्षमा केल्याचे दिसले, आणि मोहनला हायसे वाटले

मोहन रूमवर आला. टेरेस रेस्टॉरंट हाय क्लास रेस्टॉरंट असल्यामुळे तिथे जायचं तर फ्रेश होऊन, चांगले कपडे घालून जायला पाहिजे. मोहन आंघोळ करण्याची तयारी करू लागला.

बाथरुममधे जाणार तोच निर्मलाताईचा फोन आला. “बिझी होतात का दिवसभर , अगदी फोन नाही केलात!” निर्मला ताईनी प्रश्न टाकला.

“हो नं. आजचा शेवटचा दिवस आहे नं, कामाचा आढावा, रिपोर्ट वगैरेंच्या मागे आहे. आताच रिपोर्ट संबंधातल्या बिझनेस मीटिंगला जायचंय. आठवड्यातलं काम, पुढच्या कार्यक्रमाची रूपरेषा, सगळं राजे साहेबांना व्यवस्थित पाहिजे.”

मग इकडच्या तिकडच्या थोड्या गोष्टी झाल्या.

“वाटेत काही खाऊपिऊ नका बाहेरचं. तिकडूनच घ्या स्वच्छ काहीतरी. आणि मास्क लावा”. फोन बंद करण्यापूर्वी निर्मला ताईनी प्रेमाच्या सूचना दिल्या.

मोहनला उगीचच चोरट्यासारखे वाटायला लागले.

आंघोळ करून, इस्त्रीचे कपडे घालून, भांग पाडून आणि आफ्टरशेव्हचा फवारा मारुन मोहन निघतच होता, तेवढ्यात राजसिंगचा फोन आला.

“काय मनुभाई, झालं या महिन्यातलं काम?” राजसिंग ने विचारलं.

"हो बाबा, बरीच धावपळ झाली पण संपला आठवडा. आता कामाचा आढावा घेण्याच्या बिझनेस मीटिंगसाठी टेरेस रेस्टॉरंट ला बोलावलंय". मोहनने सांगितलं.

"टेरेस रेस्टॉरंट ला बिझनेस मीटिंग? अरे वा!" राजसिंग म्हणाला. "एक सांगतो तुला मनुभाई, तुझ्या कॅरम कौशल्याबरोबरच तुझ्या ह्युमन रिलेशनस् कौशल्यावरही राजेंचा डोळा आहे. विन विन सिच्युएशन आहे मनुभाई. बेस्ट विशेस फॉर बिझनेस मीटिंग. "

राजसिंग ने फोन खाली ठेवला.

"ही मीटिंग प्युअरली बिझिनेस मीटिंग ठेवायची". असं स्वतःशी घोकत मोहन टेरेस रेस्टॉरंट ला पोहोचला. मंद लाईटिंग, मंद म्युझिक, एका बाजूला बार कॅबिनेट , टेरेस रेस्टॉरंट खरंच हाय क्लास दिसत होतं.

थोडा जास्त उजेड असलेलं टेबल पाहून मोहन बसला. पाचंच मिनिटात मिसेस रायकर आल्या. मिसेस रायकरचा मंद परफ्यूम आधी आला आणि त्यामागून मिसेस रायकर आल्या. मिडियम भारी कपडे, साधा पण स्मार्ट मेकअप त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाला उठाव आणत होते.

मोहन उठला. मिसेस रायकर ना वेटरने खुर्ची ओढून दिली. मिसेस रायकर बसल्या. मोहन बसला. मिसेस रायकर हसल्या, कारण नसताना प्रसन्न खळखळून हसल्या.

"आजची डिनर मीटिंग प्यूअर बिझनेस मीटिंग ठेवायची". मोहन मनात म्हणाला.

मोहनने बोलण्यासाठी घसा खाकरला. तेवढ्यात मिसेस रायकर म्हणाल्या, “आताच राजेंचा फोन आला होता. आठवड्याच्या कामाबद्दल मी सविस्तर माहिती दिली त्याना. खूष झालेत राजे तुमच्यावर. वेगळा रिपोर्ट तयार करण्याची जरूर नाही म्हणाले.”

मोहन आ वासून ऐकतच राहिला. बिझनेस मीटिंग सुरू होण्यापूर्वीच संपली होती.

मिसेस रायकर पुढे म्हणाल्या, “तेव्हा सर, आता जरा रिलॅक्स्ड व्हा. खूप हार्ड वर्क केलंयत आठवडाभर. आणि सर, येता येता फोनवरच मी ऑर्डर दिली आहे, इथल्या स्पेशालिटीची. मसाला चिकन कुक्ड इन ब्राऊन रम आणि सोबतीला रोज फ्लेवरड् रेड वाइन. स्टार्टर्स म्हणून फ्रेंच फ्राइज आणि चिकन विंग्ज सांगितले आहेत. हा आलाच वेटर आपली ऑर्डर घेऊन”.

मोहनने मान उचलली. दोन वेटर दोन ट्रॉली ढकलत येत होते. एका ट्रॉलीवर वाइन बॉटल आणि वाईन ग्लासेस. दुसऱ्या ट्रॉलीवर स्टार्टर्सचे सर्विंग बाउल, ड्रेसिंगच्या बशा, कटलरी वगैरे.

वेटरने वाईनची बाटली उघडली आणि दोन्ही ग्लास त्या लालभडक वाईनने भरले. स्टार्टर्स सर्व्ह केले. दोन्ही वेटर निघुन गेले. मिसेस रायकरनी ग्लास उंचावला. मोहनच्या ग्लासला टेकवला. “चीअर्स, आपल्या चिरकालिन मैत्रीसाठी.” मिसेस रायकर म्हणाल्या.

मोहनने हो ला हो जुळवला.

घोट घोट करत एक ग्लास वाईन संपली. हलक्या फूलक्या गप्पा झाल्या.

a

मिसेस रायकरनी खूण करून वेटरला बोलावलं. वेटर आला. मेन कोर्स, चिकन आणि ड्रेसिंग सर्व्ह करून लागला. त्याला मिसेस रायकरनी थांबवलं आणि स्वतःच्या हाताने दोन्ही बशांमधे पदार्थ वाढून घेतले. वाईनचा दुसरा ग्लास भरला गेला. चिकन घेताना, ड्रेसिंग घेताना, वाईनचे ग्लास उचलताना मोहनची बोटं कित्येक वेळा मिसेस रायकरच्या बोटांना स्पर्श करत होती, पण आता सॉरी वगैरे बोलण्याची जरूर मोहनला वाटत नव्हती.

वाईनचा तिसरा ग्लास ओतला गेला. गप्पांमधे थोडासा बालिश खोडकरपणा आला होता. लवचिकता आली होती.

जेवण संपेपर्यंत रात्रीचे दहा वाजले होते.

हवेत गारवा बराच वाढला होता.

“चला, येऊ मी आता?” मिसेस रायकर म्हणाल्या आणि जागेवरून उठल्या. मोहनही उठला. दोघंही लिफ्ट पाशी आले. लिफ्टमध्ये मिसेस रायकरनी ग्राउंड फ्लोअर चं बटन दाबलं. लिफ्ट सरळ खाली आली.

“मजा आली” मोहन म्हणाला.

“हो, खरंच मजा आली.” मिसेस रायकर म्हणाल्या. “आय एन्जॉइड. वेळ कमी मिळाला. पुढच्या वेळी काम रूटिन झालेलं असेल आणि जरा रिलॅक्स्ड व्हायला आपल्याला जास्त वेळ देता येईल”.

“हो. हो”. काही विचार न करता मोहनने दुजोरा दिला.

मिसेस रायकरांनी शेकहँड केला. बाय बाय म्हणाल्या.

गाडी उभी होती. ड्रायव्हर काही दिसला नाही. मिसेस रायकरनी स्टिअरींग व्हील हातात घेतले. मिसेस रायकर निघुन गेल्या.

मोहन वर आपल्या रूमवर आला आणि झोपून गेला.

रात्री दोन वाजता मोहनला जाग आली. वाईनचा परिणाम पूर्ण गेला होता. त्या रात्री पुढे काही मोहनला झोप आली नाही.

मोहन विचार करू लागला.

मोहनच्या मनात मिसेस रायकरचेच विचार येत होते. बॉम्बे पॉईंटवर त्यांचा हात हातात घेणं, नंतर टेरेस रेस्टॉरंट मधे त्यांच्या सहवासात घालवलेले दोन तास, सगळाच अनुभव सुखावह वाटत होता. आणि शेवटचं त्यांचं वाक्य , "पुढच्या वेळी रिलॅक्सेशनला जास्त वेळ देऊ", अजूनही मोहनला गुदगुल्या करून जात होतं.

मोहनचे विचारचक्र चालूच होतं. झालेल्या घटनांची चित्रफीत मोहनच्या डोळ्यांसमोर परत फिरायला लागली.

बॉम्बे पॉईंटला त्याने मिसेस रायकरचा हात धरला खरा, पण अजिबात गर्दी नसताना जवळ येऊन खेटून कोण उभं राहिलं? बिझनेस मीटिंग गुंडाळून ठेवून वाईन अँड डाईन कार्यक्रम कोणी ठरवला? आणि शेवटी रेस्टॉरंट मधून निघाल्यावर ग्राउंड फ्लोअर बटन दाबून लिफ्ट सरळ खाली कोणी नेली? सर्व प्रश्नांचं उत्तर एकच. मिसेस रायकर.

संपूर्ण नाटकाचं सूत्र संचालन मिसेस रायकरच करत होत्या.

जर या नाटकाचं कथानक थोडंसं बदलून मिसेस रायकरनी लिफ्ट पहिल्या मजल्यावर नेली असती, मोहनला रूमपर्यंत सोडायचा आग्रह धरला असता, तर

पुढच्या कथानकात कितपत बदल झाला असता? मोहनचं पांढरपेशी मन विचार करायलासुध्दा कचरायला लागलं.

मिसेस रायकरनी एक अदृष्य लक्ष्मण रेषा मारल्या सारखी दिसत होती खरी, पण ही रेषा अगदी कायम त्याच जागी असेल का?

सकाळ झाली. बरोबर नऊ वाजता रॉयल हॉस्पिटॅलिटी ची गाडी महाबळेश्वरहून निघाली. मोहन मागच्या सीटवर बसला होता. पांचगणी मागे गेलं. गाडी घाट उतरायला लागली. थंडी केव्हाच निघून गेली होती वातावरण तापायला लागलं होतं.

गाडी चालली होती. पुणं मागे गेलं. वाटेत छोटा लंच ब्रेक झाला. गाडी पुन्हा मार्गी लागली. खंडाळ्याचा घाटही गेला. पनवेल गेलं. गाडी खारघरच्या रस्त्याने धावू लागली. मुंबईचा उंबराठा. मोहनला शांत शांत वाटायला लागलं.

मोहन घरी पोहोचला. निर्मला ताईंनी दार उघडलं. मोहन आत आला.

मोहनने निर्मलाताईंचे दोन्ही हात पकडले. “निर्मला, आय हॅव कम होम”. मोहनने आरोळी ठोकली.

मोहनच्या मनावरचं महाबळेश्वरचं उरलंसुरलं दडपण निघून गेलं.

( भाग – ३)

मोहन दमला होता. हात पाय धुवून त्याने गादीवर विश्रांतीसाठी अंग टाकलं. थोडी विश्रांती घेतली.

संध्याकाळचे पाच वाजले. निर्मलाताईंनी चहा केला. मोहनला उठवलं. चहा पिता पिता निर्मलाताईंनी मुंबईच्या आठवडाभराच्या बातम्या मोहनला सांगितल्या. करोना लॉकडाउनमुळे निर्मला ताईंचा म्युझिक क्लास सकाळी दोन तास आपापल्या घरातूनच व्हिडिओ कॉन्फरन्स द्वाराच चालायचा. गेल्या आठवडाभरात म्युझिक क्लासमधे दोन स्पर्धाही झाल्या होत्या. त्यावेळी निर्मलाताईंचं मनिष सरांनी बरंच कौतुक केलं होतं. तो सगळा वृत्तांत त्यांना मोहनला सांगायचा होता. पुढच्या स्पर्धेच्यासाठी ऑर्डर केलेल्या कॉस्ट्यूम ज्वेलरी सेटबद्दलही त्यांना मोहनशी बोलायचं होतं.

बोलता बोलता संध्याकाळ निघून गेली. रात्रीचे नऊ वाजले. पानं वाढली.

संध्याकाळी काय किंवा रात्री काय, निर्मला ताईंच्या अखंड बोलण्यापुढे मोहनला बोलण्याची फारशी संधी मिळाली नव्हती पण तरीही रात्री जेवताना निर्मला ताई म्हणल्याच, “आल्यापासून जरा गप्प गप्पच दिसताय. फार दमलात की काय? झोपा लवकर. फ्रेश व्हाल उठल्यावर. बरं वाटेल.”

“कालच्या रात्रीच्या वाईन अँड डाईन ची आठवण येतेय”, असं सांगण्याची मोहनची छाती झाली नाही.

दुसरा दिवस उजाडला. "अहो उठा, चहा ब्रेकफास्ट घ्या. आज आमचा विडिओ म्युझिक क्लास साडे आठला सुरु होणार आहे. आम्हा तीन टॉप परफॉरमर्सना स्पेशल ट्रेनिंग देणार आहेत मनिष सर, पुढच्या स्पर्धेसाठी.

मोहन उठला. सावकाशपणे त्याने दिनचर्या सुरू केली. निर्मलाताईनी मोहनला चहा बिस्किटे दिली आणि त्यांची वेळ झाल्यावर त्यानी आत जाऊन त्यांचा व्हिडिओ कॉन्फरन्स कार्यक्रम सुरू केला.

मोहन विचार करत होता. हा क्लास, कॉस्ट्यूम ज्वेलरी, इतर देशमुख कुटुंबियांबरोबरचं हाय फाय सोशलायझिंग, सगळे पैशाचे खेळ.

महाबळेश्वरचा जॉब म्हणजे, धरलं तर चावतंय, सोडलं तर पळतंय अशी परिस्थिती झाली होती. राजेंच्या प्रॉजेक्टला रामराम ठोकणं तेवढं सोपंही नव्हतं आणि प्रॉजेक्ट चालू ठेवण्यातले संभाव्य धोके अदृष्य भुतांसारखे दात विचकत होते. कुठेतरी समझोता करायलाच हवा होता. पण तडजोड कुठे, कशाशी आणि कितपत करायची, याला आत्ता तरी उत्तर नव्हतं.

एक आठवडा असाच गेला. निर्मला ताई गायनाच्या क्लास मधे, रियाज, स्पर्धेची तयारी, यात पूर्ण बुडून गेल्या होत्या. मनीष सरांना फक्त देव्हाऱ्यात बसवायचं तेवढं राहिलं होतं.

नव्या जॉबमुळे घराला आर्थिक सुबत्ता नक्कीच आली होती पण घराचं घरपणच कुठे गमावलं होतं.

असेच आठ दिवस गेले.

दुपारी दोन वाजता आतेभाऊ राजीवचा फोन आला. "मनू, तुझं नाव राज्य स्तरावरच्या क्रीडा सल्लागार कमिटीमधे कॅरमसाठी सुचवलं जातंय. पण त्याच्याआधी तुझा होकार आहे की नाही हे बघायला सांगितलंय मला."

"माझं नाव राज्य स्तराच्या कमिटी मधे? अरे वा! पण राजीव , टर्मस् अँड कंडिशन काय आहेत?"

राजीव म्हणाला, "या कमिटी चे अध्यक्ष राज्य सरकारचे क्रीडा सचीव असतील. प्रत्येक खेळाचा एक एक प्रतिनिधी असेल. नेमणूक स्वतः क्रीडामंत्री करतील आणि ही नेमणूक दोन वर्षांसाठी असेल. प्रत्येक प्रतिनिधीला ऑल इन्क्लूजिव महिन्याला पंधरा हजार मानधन मिळेल. एक महत्वाची अट म्हणजे प्रत्येक प्रतिनिधीला या कमिटीवर असेपर्यंत इतर कोणत्याही संस्थेकडून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरुपात त्या त्या खेळाचा प्रशिक्षक अथवा सल्लागार म्हणून पगार अथवा मानधन स्वीकारता येणार नाही."

"अरेच्चा, हे तर मोठंच त्रांगडं आहे. मी विचार करून सांगतो उद्यापर्यंत". मोहन म्हणाला.

राज्य स्तरावरील कमिटीसाठी नामांकन, कमिटीवर प्रतिनिधित्व मिळणे या सन्मानाच्या गोष्टी. पण मानधन अगदीच त्रोटक वाटलं.

संध्याकाळी चहाच्या वेळी मोहनने निर्मला ताईंच्या कानावर ही "गोड बातमी" घातली.

"हे बघा, मोठया सरकारी कमिटी वर गेलात तरी तुम्ही काही लाचलुचपत करणार नाही की आडमार्गाने पैसा कमावणार नाही. तुमचे महिना पंधरा हजार ते पंधरा हजारच राहणार. मान मरातब मिळेल, आमंत्रणं येतील, पण उपयोग काय?

a

तुम्ही राजेंचा जॉब सोडू नका.” निर्मला ताई म्हणाल्या, “चला, मला डुएट गाण्याची तयारी करायची आहे”. असे म्हणून निर्मलाताई आत गेल्या. जाता जाता त्याना आठवलं की नवी ब्लू टूथ माईक आणि ब्लू टूथ स्पीकर सिस्टिम ऑर्डर करण्याबद्दल मोहनशी अजून बोलायचंय. दुपारी जेवताना हा विषय काढायला हवा.

मोहनला ओरडून सांगावंसं वाटलं, “महाबळेश्वरला धोका आहे निर्मला”. पण “कसला धोका”, “कोणाकडून धोका”, असं विचारलं तर काय सांगायचं!

मोहनने बराच विचार केला. आपण मध्यमवर्गीय लोक. जन्मभर आपण सरळ मार्गाने, नीतिमत्तेने वागलो. पैसा, पैसा कधी केलं नाही. पैशासाठी नीतिमत्तेची तडजोड केली नाही, किंवा ती करावीही लागली नाही. पैसा हे दैवत मानणे आणि नीतिमत्तेला डावाला लावणे, तडजोड करणे, हे चुकीचे आहे.

मोहनचे विचारचक्र जोरात चालू होते.

“महाबळेश्वर प्रॉजेक्टचा पाठपुरावा करताना तरी थोड्या पैशासाठी का उगीच तडजोड करायची. निर्मलाला सांगायलाच पाहिजे, कशाला जास्त महत्व आहे ते. महाबळेश्वर प्रॉजेक्ट सोडलंच पाहिजे, याची मोहनला खात्री पटली.

दुपारी जेवायला बसल्यावर निर्मला ताईशी या विषयावर बोलायला जमलं नाही. कॅराओके, म्युझिक स्ट्रीमिंग वगैरे काहीच्या काही विषयांवर निर्मला ताई बोलत गेल्या. मोहनला काही समजत होतं काही डोक्यावरून जात होतं.

संध्याकाळी चार वाजता मोहनने महाबळेश्वरला राजे विरेंद्रसिंगना फोन लावला. राज्य स्तरावरील कमिटीवर आपली नियुक्ती होण्याची शक्यता असल्याची बातमी त्याने राजेंना दिली आणि त्यात असलेल्या अटी त्याने राजेंच्या कानावर घातल्या.

a

मोहन पुढे म्हणाला, “सर, ही नेमणूक माझ्या दृष्टीने फार महत्त्वाची आहे, मी ती नाकारू नाही शकत आणि सर त्यानी घातलेल्या अटींमधे सुध्दा काही तडजोडीची शक्यता नाही. तेव्हा आपलं कॅरम सल्लागार प्रॉजेक्ट...”

“मिस्टर देशमुख, तडजोडीचा प्रश्नच नाही. तुम्ही जरूर ही नियुक्ती स्वीकारा.” राजे म्हणाले. “अहो देशमुख तुमचं क्वालिफिकेशन, तुमच्या केपेबिलिटीज, कॅरम सल्लागरापेक्षा खूपच वरच्या लेव्हलच्या आहेत. ही तर आपली एक सुरूवात होती.”

मोहन म्हणाला, “पण सर, प्लीज अंडरस्टॅंड, मी आपल्याकडून कुठल्याही प्रकारची पगारी नोकरी नाही ॲक्सेप्ट करू शकणार. त्यामुळे नो मोअर महाबळेश्वर ट्रिपस्”.

“ऐका जरा देशमुख, एवढं हातघाईवर येऊ नका”. राजे म्हणाले. “आमच्या हॉटेल समूहाला कामगार विषयक कल्याण योजनांबाबत सल्ला देण्यासाठी आणि नंतर त्या योजना अमलात आणण्यासाठी तज्ञ सल्लागार कंपनीची नेमणूक करायची आहे. तुमच्या नेतृत्वाखाली अशी कंपनी स्थापन करायचा माझा विचार आहे. छोटी प्रायवेट लिमिटेड कंपनी. मॅनेजिंग डायरेक्टर, एक्झीक्यूटिव डायरेक्टर आणि ॲडमिनिस्ट्रेटिव डायरेक्टर”.

राजे पुढे सांगत होते, “मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून मी बिझनेसची बाजू आणि फायनान्स संभाळीन. एक्झिक्यूटिव डायरेक्टर म्हणून तुम्ही सर्व सल्ला मसलतीचा कारभार सांभाळायचा. तुम्ही एक्झीक्यूटिव डायरेक्टर म्हणजे या सल्लागार कंपनी चे मालक. त्यामुळे ती सरकारी अट स्वतःच्या कंपनीकडून येणाऱ्या मिळकतीला लागू नाही.”

मोहन विचार करत होता.

राजे पुढे म्हणाले, "तुम्ही सरकारला कॅरमचा सल्ला देऊ शकाल आणि त्याचबरोबर हूयुमन रिलेशन सल्लागार कंपनी चालवू शकाल, तज्ञ सल्लागार म्हणून वेबिनॉर मधे भाग घेऊन शकाल. तुमची अगदी सर्वांगीण प्रगती होईल."

मोहन काहीच बोलत नाही असं पाहून राजे पुढे म्हणाले, "या कंपनीने पहिल्या वर्षी सुमारे दोन कोटींचा बिझनेस करावा अशी माझी अपेक्षा आहे. म्हणजेच, त्या वर्षात तुमचा एक्झिक्यूटिव डायरेक्टर चा प्रॉफिट शेअर महिन्याला सुमारे एक लाख ते सव्वा लाख येईल."

आता मात्र मोहन उठून बसला. ही तर फारच छान संधी. तीन डायरेक्टरस् ची आटोपशीर कंपनी. त्यातून बिझनेसचा भार संभाळायला राजेंसारखं भक्कम नेतृत्व. निर्मलेला सांगायला पाहिजे.

"आणि सर, ॲडमिनिस्ट्रेटिव डायरेक्टर कोण असणार? " मोहनने विचारले.

"अरे, ते सांगायचं राहूनच गेलं". राजे म्हणाले. "मिसेस रायकर ".

मोहनची हा धक्का सहन करण्याची तयारी नव्हती. मोहन गप्पच झाला. डोक्यात विचाराची चक्रं अति वेगाने फिरू लागली. नाना विचार उमटू लागले.

"हरिदासाची गाथा आली की मूळ पदावर! जे टाळायचंय ते काही टाळलं जात नाही!" पहिला बापुडवाणा विचार.

पण लगेच दुसरा विचार त्यावर कुरघोडी करून गेला

"पण तसं पाहिलं तर जीवनात कित्येक तडजोडी करतोच की आपण!"

a

विचारांची एकच धुम:श्चक्री सुरु झाली.

आणि शेवटी... एक फायनल निष्कर्ष डोके वर काढू लागला,

"सर्वांगीण प्रगतीसाठी थोडी तडजोड ठीक आहे". हाच निष्कर्ष हळूहळू सुस्पष्ट होऊ लागला. नीतिमत्तावाल्या थेरड्याला एक दणका देऊन त्याने झोपवलं.

"हॅलो देशमुख, आहात का लाईनवर", राजे विचारत होते.

"हो सर. कधीपासून काम सुरू करायचं?" मोहनने विचारलं.

-----X-----

# १२

# भरारी

(भाग – १)

“डॅड, मी जॉब बदलतोय”. श्रीकांत शेवडेचे धाकटे चिरंजीव मुंबईहून फोनवर बोलत होते.”

“राजीव हा तिसरा जॉब ना रे तुझा”? श्रीकांतने आपलं असंच विचारलं.

“हो बाबा, पण पॅकेज चांगलं आहे. सुयश केमिकल्स फार नावाजलेली कंपनी आहे. सिनियर मॅनेजरची पोस्ट आहे”. राजीवचं एक्सप्लनेशन.

“एक काम करायचंय, बाबा.” राजीव बोलत होता, “एक कॅरॅक्टर शूअरिटी द्यायची आहे. त्याच्यावर सही करण्यासाठी तुम्हाला मुंबईला यावं लागेल गुरुवारी. आधी ते आमदार किंवा नोटरी कडून आणायला सांगत होते, पण मग एकदमच आतून मेसेज आला, की तुमच्या सहीनेही चालेल म्हणून.”

“ठीक आहे, येतो मी बुधवार पर्यंत”. श्रीकांतने कबूल केले.

दोन दिवस झटकन गेले. बुधवारी, श्रीकांत मॉडेल कॉलनी, पुणे मधल्या आपल्या घरून भल्या सकाळी टॅक्सीने निघाला आणि नऊ वाजेपर्यंत मुंबईला राजीवच्या फ्लॅटवर वरळीला येऊन पोहोचला.

“हं, कुठे आहे ही तुझी नवी फॅक्टरी?” चहाचा कप तोंडाला लावता लावता श्रीकांतने चौकशी केली.

“इथे महाराष्ट्रातच आहे, नागपूर भागातल्या कामटी गावाजवळ. आंघोळीचे साबण, वॉशिंग मशिनला लागणारी वॉशिंग पावडर असं बरच काही उत्पादन करणार आहेत”. राजीवने माहिती पुरवली.

“अस्सं, म्हणजे नवीन फॅक्टरी आहे तर!” श्रीकांतने नेमका पा ॅइंट उचलला.

“अगदीच नवीन नाही,” राजीव म्हणाला, “पण फॅक्टरीची उत्पादन क्षमता वाढवण्याचं आणि आधुनिकीकरणाचं बरंच काम नुकतंच पूर्ण झालंय. काही प्रॉडक्ट्सना फ्रेंच कोलॅबरेशनही मिळालंय. म्हणून आता कामगार, मॅनेजर वगैरे वाढवतायत. इंटरव्ह्यूला वीस केमिकल इंजिनियर आले होते, बाबा. मला अवघड वाटत होतं नंबर लागणं. पण चेअरमन, एन सी जाधव साहेबांच्या रिव्ह्यु नंतर सिलेक्ट झालेल्या तिघात माझा नंबर लागला खरा. उद्या ती कॅरॅक्टर शुअरिटी चेअरमन साहेबांच्या पर्सनल सेक्रेटरीकडेच सबमिट करायची आहे.”

“ठीक आहे, उद्याचं उद्या बघु. मी जरा माझ्या मुंबईच्या मित्रमंडळी पैकी कोणी गप्पा मारायला भेटतंय का पहातो”. असं म्हणून श्रीकांत घराबाहेर पडला.

---------

गुरुवारी सकाळी दहा वाजेपर्यंत दोघेही सुयश केमिकल्सच्या अलीशान ऑफिसमधे पोहोचले. चेअरमनसाहेबांचं ऑफिस पाचव्या मजल्यावर होतं.

सेक्रेटरीने श्रीकांत कडून फॉर्मवर सही घेतली आणि दोघांना बसायला सांगून ती कागद घेऊन आत गेली. एकाच मिनिटात बाहेर येऊन ती म्हणाली, “आत जा, सर बोलावतायत”.

संभाव्य प्रश्नांना द्यायच्या उत्तरांची मनातल्या मनात उजळणी करून दोघंही आत गेले. एका प्रशस्त टेबलाच्या पलीकडे साहेब बसले होते. त्यांच्या समोर एक लॅपटॉप उघडा होता आणि एक असिस्टंट त्यांना काहीतरी समजाऊन देत होता.

श्रीकांतला आणि राजीवला बसायची खूण करून त्यांनी आपलं काम पुढे चालू ठेवलं.

पाच एक मिनिटांतच ॲसिस्टंटने लॅपटॉप बंद केला आणि तो निघून गेला. जाधव साहेबांनी मग आपला मोहरा या दुक्कलीकडे वळवला. सुमारे दहा पंधरा सेकंद श्रीकांतकडे जाधव साहेब रोखुन पहात होते. मग त्यांनी नजर फिरवली आणि आपल्याशीच हसले. “शाम कुंज मधला श्रीकांत शेवडे नं तू, सरस्वती मंदिर चा!” जाधव साहेब एकदम म्हणाले.

फार वर्षांपूर्वी, म्हणजे श्रीकांतच्या लहानपणी, सोलापूरला नव्या पेठेत शाम कुंज बिल्डींमधे शेवडे कुटुंब रहात असे आणि जवळच्या सरस्वती मंदिरमधे श्रीकांतचं शालेय शिक्षण झालं होतं. पण हे सर्व या चेअरमन साहेबांना कसं माहीत?

“मला ओळखलं नसशील तू. मी नारायण जाधव. नाऱ्या.” जाधव साहेब पुढे म्हणाले.

श्रीकांत डोळे विस्फारून ऐकत होता. लहानपणीचा वर्ग मित्र नाऱ्या आणि समोर बसलेले सुयश केमिकल्सचे चेअरमन, एन सी जाधव साहेब, ही एकच व्यक्ती

असेल, अशी शक्यता स्वप्नातही वाटली नसती. विचारांचा ताण जास्त होऊन श्रीकांतला चक्कर आली आणि तिथेच टेबलावर त्याने डोकं टेकलं.

दोन मिनिटांतच श्रीकांत शुध्दीवर आला. आजुबाजुला पाहिल्यावर त्याच्या लक्षात आलं की तिथेच सोफ्यावर त्याला आडवं झोपवलं होतं आणि जाधव साहेब सेक्रेटरीला काही सूचना देत होते. पांढरा डॉक्टरी कोट घातलेला एक इसम बाजूलाच उभा होता.

श्रीकांत उठून बसला. जाधव साहेबांनी हाताच्या इशाऱ्याने सगळयांना जायला सांगितलं. सेक्रेटरी ला सूचना दिली, “माझे आजचे कार्यक्रम रद्द करा, मी या लोकांना घेउन जातोय. गाडी बोलवा.”

सेक्रेटरीने मान हलवली. “ओ के सर”, असं काहीसं पुटपुटली आणि लगोलग फोन करून साहेबांची गाडी मागवली.

जाधव साहेबांनी खुर्चीच्या मागे लावलेला आपला कोट उचलून अंगावर चढवला, टाय ठाक ठीक केली आणि श्रीकांतकडे पाहुन चलण्याची खूण केली.

लिफ्टने खाली येऊन तिघेही पोर्चमधे पोहोचेपर्यंत ड्रायव्हरने गाडी आणली. गाडीत श्रीकांत आणि जाधव साहेब मागे बसले, राजीव पुढे ड्रायव्हर जवळ बसला. जाधवसाहेबांनी ड्रायव्हरला सूचना दिल्या. गाडी जिमखाना क्लबच्या दिशेने धावू लागली. ट्रॅफिक प्रमाणे गाडीचा वेग कमी जास्त होत होता, पण श्रीकांतच्या मनातले विचार भन्नाट वेगाने धावत होते.

नाही म्हटलं तरी चाळीस पन्नास वर्षांपूर्वीच्या या आठवणी. श्रीकांतचं शेवडे कुटुंब सोलापूरला नवी पेठ मधे रहात असे. श्रीकांतची लहानपणची मित्रमंडळी म्हणजे आजुबाजुला रहाणारी मुलं. बहुतेक सर्वचजण जवळच्या सरस्वती मंदिर

शाळेत जायचे. त्या वर्गमित्रांपैकीच एक, नारायण जाधव. नाऱ्याच म्हणायचे सगळे त्याला. अतिशय हुशार, मदतीला सदैव तत्पर. घरची मात्र अतिशय गरीबी. बाकीची बहुतेक सगळी मुलं मध्यमवर्गीय खात्या पित्या घरातली. वर्गात नारायणाचा नंबर नेहमी पहिल्या पाचात असे. सर्वांशी मिळतं घेण्याच्या स्वभावामुळे नारायण वर्गमित्रांत प्रिय होता. त्यामुळे त्याला कुठलीही अडचण आली की इतर मित्र आपापल्या परीने त्याला मदत करत असत.

श्रीकांतच्या वडिलांचं नव्या पेठेतच स्टेशनरी सामानाचं दुकान होतं. नारायणाच्या पूर्ण शालेय जीवनात त्याला वह्या पुरवण्याचं काम श्रीकांतच्या वडिलांनी आनंदाने पार पाडलं होतं. इयत्ता सातवीत असताना, नारायणाची दृष्टी बरीच अधू असल्याचं लक्षात आलं. मग खटपट करून सामाजिक सहाय्य संस्थांकडून नारायणाला मोफत योग्य तो चष्मा मिळवून देण्याचं कामही श्रीकांतच्या वडिलांनीच केलं होतं.

हां हां म्हणता वर्षं गेली. नारायणाच्या घरची सांपत्तिक स्थिती खालावतच गेली. वर्गमित्रांकडून शक्य तितक्या मदतीचा ओघ चालूच राहीला. पुढे शालांत परीक्षा झाली. पुढच्या शिक्षणासाठी सगळेच पांगले. नारायणाला त्याच्या आईने पुण्याला मामाकडे पाठवलं असं ऐकलं. पण पुढे कोणाचाच त्याच्याशी संपर्क राहिला नाही.

श्रीकांतची विचार शृंखला मधेच तुटली. जाधव साहेबांची गाडी जिमखाना क्लबला पोहोचली होती. पोर्च मधे मंडळी उतरली. जाधव साहेबांनी गेस्ट एण्ट्री सोपस्कार पार पाडले.

"चला, वर जाऊ." जाधव साहेब म्हणाले. एका शांत ठिकाणी टेबल गाठल्यानंतर, "काय घेणार?" असे विचारत साहेबांनी तिथेच उभ्या असलेल्या वेटरला काही ऑर्डरही दिली.

मग श्रीकांतकडे वळून जाधव साहेब म्हणाले, "श्रीकांत, किती वर्षांनी भेटतोय आपण. तू इन्जिनिअरिंगला गेला होतास, नाही का? मग एखाद्या नावाजलेल्या कंपनीत मोठी पदं भूषवून आता रिटायर झाला असशील."

"हो", श्रीकांत म्हणाला, "रिचर्डसन इजिनियर्स मधून मी जनरल मॅनेजर म्हणून रिटायर झालो. पण तुझं काय? नाऱ्या जाधवाचा एन सी जाधव, मोठ्या कारपोरेट कंपनीचा चेअरमन, ही फारच मोठी भरारी आहे."

श्रीकांतची भीड बरीच चेपली होती.

"सांगतो." जाधव साहेब म्हणाले.

वेटरने ड्रिंक्स आणि स्टार्टर्स आणले. एक दीर्घ घुटका घेऊन एक मिनिट जाधव साहेब शून्यात बघत राहिले. जणू काही भूतकाळाच्या आठवणींच्या फिती ते एकत्र करत होते.

"तुम्हाला माहीत आहे," जाधव साहेब म्हणाले, "शालांत परीक्षे नंतर मला आईने पुण्याला मामाकडे पाठवलं. मामा, मामी दोघंही अतिशय शांत आणि सुस्वभावी. परिस्थिती साधारणच, पण मला आनंदाने थारा दिला. मामाने मला दोन वर्षांच्या मेकॅनिकल ड्राफ्टमन कोर्सला घातलं. त्याची जुनी सायकल पण वापरायला दिली. दृष्टी अधूच होती. जाड भिंगांचा चष्मा होती, तरीही मन लावून अभ्यास करून मी कोर्स उत्तम तऱ्हेने पार पाडला. कोर्स बरोबरच सायकलचा उपयोग करुन अगदी कुरिअर पर्यंतची कामं केली, पैसे मिळवले आणि मामाचं ओझं थोडं कमी केलं.

a

“चांगल्या मार्कांनी पास झालो खरा पण नोकरी चटकन मिळेना. कुठे रेफरन्स कमी पडतायत म्हणून तर कुठे दृष्टी अधू म्हणून रिजेक्शन व्हायचं. शेवटी सहा एक महिन्यांनी राणा पंप्स मधे नोकरी मिळाली.

“इथे पगार इतर कंपन्यांच्या मानाने खूपच कमी होता पण जॉब तरी मिळाला. जॉईन झालो. काम खूप. वातावरण अगदी शांत. अगदी चुपचाप. खरंतर खूपच नंतर मला कळलं की मॅनेजमेंटने जरबेने वातावरण शांत ठेवलं होते. पण मला कोणी नीट सांगेल तर ना! मी ही आपल्या कामात मग्न.

“असेच तीन महिने गेले. कंपनीमधे एक नाममात्र युनियन होती, त्या युनियनच्या निवडणुका आल्या. कुणीतरी “नवा चेहरा” म्हणून माझं नाव युनियनचा पदाधिकारी म्हणून सुचवलं आणि मला लोकांनी निवडूनही दिलं.

“त्यानंतर आठवडाभराची गोष्ट. माझ्या आयुष्यातला सर्वात मोठा टर्निंग पॉईंट आला.”

जाधव साहेब थोडं थांबले. कबाब चा एक तुकडा तोंडात टाकला. ग्लास उचलून एक मोठा घोट घेतला आणि मग पुढे बोलू लागले.

“त्या दिवशी मी ऑफिसमध्ये माझ्या कॉप्युटरवर काम करत होतो, तेवढ्यात एकजण लगबगीने सांगायला आला कि दिवाळी बोनस ठरविण्यासाठी मॅनेजमेंट बरोबर बोलणी करायचीत, लगेच कॉन्फरन्स रुम मधे बोलावलंय. तुम्हाला बरोबर घेऊन यायलाच सांगितलंय.

“माझी एकच गडबड उडाली. कॉम्प्युटर बंद करायचा, फाईल्स आत ठेवायच्या, एक का दोन कामं.

a

“जाण्यापूर्वी पाणी प्यावं म्हणून पाणी पिण्यासाठी ग्लास शोधत होतो त्या गडबडीत धक्का लागून चष्मा खाली पडला आणि फुटला. महासंकट. चष्म्याशिवाय माझ्या अधू दृष्टीला सगळंच अंधुक दिसत असे. पण आता विचार करायला वेळच नव्हता.

“निरोप घेऊन आलेल्या गृहस्थाबरोबरच त्याच्या सहाय्याने कॉन्फरन्स रुम मधे पोहोचलो. चष्मा नाही, त्यातुन रूम मधलं लाइटिंग जरा कमीच होतं. त्यामुळे जास्तच अंधुक दिसत होतं. सर्व मंडळी आधीच बसलेली होती. युनियनच्या इतर लोकांच्या लाईनीत एक रिकामी खुर्ची दिसली, तिच्यात जाऊन मी बसलो. मग जरा आजूबाजूला नजर फिरवली. अगदीच अस्पष्ट दिसत होतं, तरीपण माझ्या समोरच, टेबलाच्या पलीकडच्या बाजूला जाड्या जुड्या शरीरयष्टीचे आमचे जनरल मॅनेजर बसलेले आहेत हे माझ्या लक्षात आलं.

“जनरल मॅनेजरांच्या डावी उजवीकडे त्यांचे पिस्तूलधारी शरीररक्षक बसले होते. त्यांचे आर्मी फटीग टाईपचे कपडे, डोक्यावर मधेच उभे राहिलेले केस, कमरेची पिस्तूलं असं त्यांचं वास्तविक उग्र रूप होतं. पण असं पहा, माझ्या डोळयाला चष्मा नव्हता, त्यामुळे मला हे काहीच दिसत नव्हतं, उलट, काहीतरी विदुषकी आकृत्या समोर बसलेल्या आहेत असं वाटत होतं.

“माझ्या उजव्या बाजूला अशोक तळपदे बसला होता. त्याला हळूच मी म्हणालो, “साहेबांच्या दोन बाजूंना हे जोकर कोण बसलेत? सर्कसमधे जा म्हणावं त्याना”.

"माझ्या समोर टेबलावर माईक आहे, त्याचं ट्रान्समिशन बटण ऑन असू शकेल वगैरे माझ्या लक्षातही आलं नाही. आणि तसंच झालं. त्या माईकने माझे सर्व शब्द अचुक टिपले आणि अख्ख्या रूममध्ये मोठ्याने घुमवले.

"कॉन्फरन्स रूममध्ये जी काही थोडी कुजबुज चालू होती तीही एकदम थांबली. सन्नाटा. साहेबांचे दोन्ही अंगरक्षक ताडकन उभे राहिले आणि युनियनच्या लोकांकडे खाऊ की गिळू अशा नजरेने बघायला लागले.

"पण मला सगळंच अंधुक दिसत असल्याने माझं विश्वच वेगळं होतं. काही तरी चुकलंय असं वाटलं म्हणा, पण डोक्यात वेगळेच विचार होते. त्याचवेळी मला आठवलं होतं की माझ्या लॉकर मधे एक स्पेअर चष्मा मी ठेवलेला आहे. म्हटलं, तो ताबडतोब आणायला पाहिजे कारण चष्म्याशिवाय मीटिंग मध्ये सहभाग घेणं अवघड. मी आपला कुठल्या खिशात लॉकरची किल्ली आहे ते पाहण्यासाठी सगळे खिसे चाचपत होतो.

"किल्ली सापडली. पण आता पंचाईत अशी, की लॉकर रूम तर तिकडे वर्कशॉपजवळ. इतक्या लांब चष्म्याशिवाय जायचं म्हणजे मदत पाहिजेच. मी उभा राहिलो. अशोक तळपदेचा हात धरून त्यालाही उठवलं आणि त्याचा हात हातात घेऊन दोघंही कॉन्फरन्स रूमच्या बाहेर पडलो.

"अशोक जरा धास्तावलेला वाटला. बाहेर पडल्यावर त्याला सांगितलं की मला लॉकर रुमकडे घेऊन चल, चष्मा आणायचाय."

"ठीक आहे, असं म्हणाला तो. आणि मग आम्ही दोघं, चुपचाप चालू लागलो, तो त्याच्या विचारात आणि मी माझ्या विचारात, असे आपल्या आपल्या विचारात मग्न असलेले."

a

जाधव साहेब जरा थांबले. स्वतःशीच थोडंसं हसले आणि पुढे सांगू लागले , "तिकडे कॉन्फरन्स रुम मधे वेगळंच वातावरण होतं. मागे राहिलेले चार पाच युनियन पदाधिकारी घाबरले. त्यांना वाटलं की उभे राहिलेले हे बंदुकधारी अंगरक्षक आता आपल्याला गोळ्या घालणार. म्हणून तेहि उठून तडक बाहेर पडले आणि आम्ही दोघं कोठे आहोत, याचा शोध घ्यायला लागले."

श्रीकांत आणि राजीव, दोघंही मंत्रमुग्ध होऊन ही रंगतदार गोष्ट ऐकत होते. जाधव साहेब पुढे सांगू लागले.

"तिकडे मॅनेजमेंटच्या गोटातही बराच गोंधळ उडाला होता. त्यांचा असा समज झाला की त्या बंदुकधारी अंगरक्षकांना तुच्छतेने "विदुषक" असं संबोधून माझ्या नेतृत्वाखाली युनियनच्या सर्व सदस्यांनी सभात्याग केला. एवढं मोठं धैर्य सर्वांनी दाखवलेलं पाहून तेही आवाक् झाले होते.

"जनरल मॅनेजर साहेबांनी त्यांच्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन थोडा वेळ खलबतं केली खरी, पण आता काय करावं याबद्दल निश्चित सल्ला त्यांना कोणीही देऊ शकलं नाही. कामगारांनी बंडखोरी दाखवण्याचा प्रसंग तिथे कधी घडलाच नव्हता. रिकामी खोटी पिस्तूलं कमरेला लावून फिरणाऱ्या उग्र चेहऱ्याच्या वॉचमन लोकांच्या देखाव्यावर काम भागत होतं. कंपनीकडे छोट्या मोठ्या पंपांच्या एवढ्या ऑर्डर होत्या की कामकाजात कुठल्याही प्रकारचा खंड पडणं योग्य नव्हतं.

"शेवटी जनरल मॅनेजर साहेबांनी पडतं घ्यायचं ठरवलं. त्यानी पिस्तूलवाल्या दोघांना रूमच्या बाहेर हकाललं, आणि स्वतःच्या पर्सनल सेक्रेटरीला, त्यांच्या स्वतःच्या वतीने माझी माफी मागून आम्हाला सर्वांना कॉन्फरन्स रूममध्ये परत आणायला पाठवलं.

"या सर्व घडामोडींचा बाहेर पडलेल्या आम्हाला काहीच थांगपत्ता नव्हता. सर्वांची मनं अगदीच वेगवेगळ्या दिशांना भिरभिरत होती.

"मी आणि तळपदे माझा चष्मा घेऊन लॉकर रूम मधुन परत येत होतो आणि आमचे युनियन सहकारी आम्हाला शोधत त्याच दिशेने येत होते.

"आम्हाला पाहून त्यांनी हात उंचावून खूण केली आणि ते तिथेच थबकले. आम्हाला बरंच काही एकमेकांना विचारायचं होतं, सांगायचं होतं. निवांतपणे एकत्र बसून बोलावं म्हणून थोडा दम खाण्यासाठी फॅक्टरीच्या दर्शनी भागात असलेल्या बागेत आम्ही शिरलो आणि तिथल्या बाकांवर बसलो.

"आता चष्मा लावल्याने मला इतरांइतकंच सगळं स्वच्छ दिसत होतं. पण सर्वांच्या मनातला वेगवेगळ्या विचारांचा गोंधळ त्यामुळे कमी होत नव्हता. एक्झॅक्टली काय झालंय हे कोणालाच कळत नव्हतं. आम्ही बोलायला सुरुवात करणार तेवढ्यात जनरल मॅनेजर साहेबांचा पर्सनल सेक्रेटरी धापा टाकत तेथे आला.

"आम्हाला पाहून थबकला आणि म्हणाला, "अहो जाधव साहेब, मोठ्या साहेबांनी तुम्हाला सॉरी म्हटलंय आणि त्या पिस्तूलवाल्या अंगरक्षकाना बाहेर हाकलून दिलंय. मीटिंगसाठी सर्वांनी चलावं अशी त्यांची रिक्वेस्ट आहे."

"आम्ही चमकलो. "जाधव साहेब" काय! "अंगरक्षकाना बाहेर हाकलून दिलंय" काय! "रिक्वेस्ट" काय! कोणालाच काही उमजेना. सगळेच चूप बसले. सेक्रेटरी बोलतच राहिला. तेच तेच परत सांगत राहिला. मग त्याच्या बोलण्यातून एक एक उलगडा होत गेला.

"मग मी सेक्रेटरीला सांगून टाकलं, की आम्ही कोणीही सध्या बोलण्याच्या मनःस्थितीत नाही, मीटिंग वगैरे नंतर बघू "

जाधव साहेब बोलायचे थांबले. जाधव साहेबांचा चेहरा गंभीर झाला. थोडं थांबून ते सांगू लागले,

“माझे सर्वच कामगार मित्र गप्प होते. विचार करत होते. मला तर एक नवीनच समज आली होती. जगात वाघासारखे फिरणारे बरेच लोक बेगडी मुखवटे लावून फिरत असतात, आणि तो मुखवटा ओरबाडून काढला तर आत एक मनी माऊ असू शकते, हे माझ्या लक्षात आलं. ज्या दुनियेने आजवर माझ्यावर सक्त नियंत्रण ठेवलं होतं त्या दुनियेला आपल्या तालावर नाचवणे अशक्य नाही हे मला कळलं.

“त्या दिवशी आम्ही फारसे कोणीच कोणाशी बोललो नाही. बराच वेळ तिथे बागेत बसलो आणि नंतर आपापल्या घरी गेलो. घडलेल्या आणि होऊ घातलेल्या नवीन समीकरणांचा अंदाज कोणालाच नीटसा येत नव्हता.

“पण दुसऱ्या दिवसाच्या उगवत्या सूर्याने सर्वच प्रश्न सोडवले. मी फॅक्टरीत पोहोचलो आणि पहातो तर गेटपाशीच मोठा जमाव हार घेऊन माझी वाट पहात होता. सर्वांनाच माझ्याशी हस्तांदोलन करायचं होतं. मी भारावून गेलो खरा, पण वाहवून गेलो नाही. आईची, मामांची, सर्वांचीच शिकवण उपयोगात आली. डोकं शाबूत ठेवून सर्वांना कामावर जायची आणि उत्पादनात कुठल्याही प्रकारचा खंड न पाडण्याची विनंती केली. माझी पायरी, माझी क्षमता आणि केवळ गैरसमजांमुळे उंचावलेली माझी प्रतिमा यांची लगोलग सांगड घालणं शक्य नव्हतं.

“मी आपलं काम नेहमीच्या गतीने सुरू ठेवलं. पण तिकडे घडामोडींना बराच वेग आला होता.

“युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी एक ठराव पास करून मॅनेजमेंटबरोबर बोनसबद्दल बोलणी करण्यासाठी मलाच लीडर बनवलं होतं.

मी आणि लीडर!

जेमतेम घोड्यावर चढवलेलं प्यादं लगोलग शिलेदार होणं अवघडच. काय करावं, कसं करावं, सगळाच मुलुख अपरिचित. घरी जाऊन मामाना सर्व खरं खुरं सांगितलं.

“मामा हसले. मग गंभीर होऊन म्हणाले, “नारायणा, भगवंताने तुझी या कामासाठी निवड केली आहे. त्याची निवड चूक असणार नाही. तू यशस्वी होशील. दोनच गोष्टी लक्षात ठेव. लहानपणापासून जी नैतिक मूल्यं आपल्या कुटुंबात घोटवली गेली आहेत ती सोडू नकोस. आणि दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे, दुष्ट प्रवृत्तींचा सामना करण्यासाठी योग्य ते शस्त्र हाती घ्यायला कचरु नकोस.”

“रात्रभर विचार केला मी, श्रीकांत, या उपदेशावर. आणि एक सर्व साधारण आचारसंहिता ठरवली. त्याप्रमाणे वागत गेलो. मात्र एक खरं, खूप टक्के टोणपे बसले. धक्के बसले. सरळ लोक भेटले तसेच बिलंदर राजकारणीही भेटले वारंवार बसणाऱ्या टक्क्या टोणप्यांना अनुसरून फेरफार करत राहिलो. सगळ्यांना पुरून उरलो.

“बोनसची बाजी मी जिंकलो.

“आणि श्रीकांत, या प्रसंगानंतर मी कधीच मागे पाहिलं नाही. पुढे भरारी मारली. तांत्रिक परिक्षा दिल्या, युनियनच्या आणि नंतर मॅनेजमेंटच्याही हुद्यांवर काम केलं. एका तज्ञ नेत्र विशारदाने छोटी शस्त्रक्रिया करून माझा नेत्रदोषही बऱ्याच प्रमाणात कमी केला.

a

"श्रीकांत, आज सुयश केमिकल्ससह चार मोठ्या कंपन्यांच्या चेअरमन पदावर मी आहे. तुझ्या राजीव सारख्या तरुण रक्ताच्या तडफदार टेक्नॉलॉजिस्ट आणि मॅनेजमेंट एक्सपर्ट मुलामुलींची टीम मी तयार करतोय आणि याच घरट्यातला एकेक पक्षी आणखी उंच भरारी मारणार आहे."

मग राजीवकडे वळून त्याच्या खांद्यावर हात ठेवत जाधवसाहेब म्हणाले, "राजीव श्रीकांत शेवडे, वेलकम टु सुयश केमिकल्स."

(भाग -२)

सुयश ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज, कामटी. संध्याकाळचे साडेचार वाजले होते. ऑफिसर्स क्लब अजुन गजबजला नव्हता.

रॅकेट फिरवत राजीव क्लबच्या पायऱ्या चढून वर आला तोच ओरडत , "शिंदे, साडे चार वाजलेत, अजून नेट लावलं नाही ".

"हे आताच पाठवलंय मी, लक्षुला आणि पांडूला नेट लावायला. बसा जरा. दिवेकर साहेब तरी कुठे आलेत अजून. खेळायला पार्टनर तरी पाहिजे नं तुम्हाला?" क्लब मॅनेजर शिंदे म्हणाले.

"दिवेकरांचा काही भरवंसा नाही. तोपर्यंत तुम्ही चलता का खेळायला, दुसरं काही काम नसेल तर?"

"तुम्ही व्हा पुढे राजीव साहेब, मी येतो पाच मिनिटात, शूज घालून आणि रॅकेट घेऊन".

a

राजीवने मान हलवली आणि रॅकेट हलवत झरझर पायऱ्या उतरून तो टेनिस कोर्टाकडे चालू लागला.

कामटीच्या सुयश केमिकल च्या फॅक्टरीमधे कामाचा चार्ज घेतल्याला राजीव ला वर्ष पुरं होत आलं होतं. सुरुवातीचे सहा महिने फॅक्टरीचा, तिथे बनणाऱ्या प्रॉडक्ट्सचा अभ्यास करण्यात, कामाचा जम बसवण्यात निघून गेले होते. पण नंतर मात्र राजीवने वेळ न दवडता आपल्या शिक्षणाचा आणि अनुभवाचा उपयोग करून फॅक्टरीच्या कामकाजात बऱ्याच सुधारणा सुचवल्या होत्या. त्या पैकी बहुतेक सर्व सुचना अमलातही आणल्या गेल्या होत्या आणि त्यांचा परिणाम म्हणजे सगळयाच प्रॉडक्ट्सच्या किमती कंपनीला पाच सहा टक्क्यांनी कमी करता आल्या. खुद्द चेअरमन साहेबांच्या ऑफिसकडून प्रशंसा पत्र आलं होतं कामटी प्लॅन्टच्या जनरल मॅनेजरच्या नावे, आणि संबंधित अधिकारी वर्गाला म्हणजे राजीव आणि त्याच्या टीमला बोनस रक्कम मिळाली होती.

एकदा फॅक्टरीची घडी व्यवस्थित लागल्यावर राजीव जरा रिलॅक्स झाला होता. संध्याकाळी साडे चारला फॅक्टरीतून बाहेर पडायचं आणि टेनिस रॅकेट घेऊन क्लब गाठायचा असा परिपाठ राजीवने ठेवला होता. टेनिसचे दोन सेट मारायचे, क्लबमधेच शिंदेना सांगून स्पेशल चहा घ्यायचा, घरी जायचं आणि मग आंघोळ वगैरे झाल्यावर जेवणाची वेळ होईपर्यंत वाचन, आई बाबांना फोन वगैरे करणे यामधे वेळ काढायचा असा राजीवचा कार्यक्रम.

राजीवला कामटीचं निरभ्र आकाश फार आवडायचं. रात्री जेवण झाल्यावर बंगल्याच्या मागच्या अंगणात खुर्ची टाकुन बसायचं आणि लखलखणाऱ्या ताऱ्यांशी, नक्षत्रांशी हितगुज करायचं हा त्याचा छंदच झाला होता. पुण्याला

श्रीकांतशी, म्हणजे त्याच्या बाबांशी बोलून राजीवने एक टेलिस्कोप मागवला होता आणि या आठवड्यात तो येणारही होता.

राजीवच्या फॅक्टरीतले बाकीचे ऑफिसर घरी जाऊन, चहापाणी करून सावकाश क्लबमधे येत असत. “सुयश दूध योजने” चे मॅनेजर दिवेकर त्यातल्या त्यात लवकर म्हणजे पावणे पाच - पाचपर्यंत नियमितपणे क्लबमधे येत असत. दिवेकरांच्यमुळे राजीवला खेळायला पार्टनर मिळत असे आणि जरा फॅक्टरी बाहेरच्या जगातल्या त्रोटकपणे का होईना, बातम्याही ऐकायला मिळत असत.

दिवेकर तसे बडबड्या स्वभावाचे नव्हते आणि गप्पिष्टही नव्हते. सुयश दूध योजनेचं ऑफिस कॉलनीच्या मेन गेटच्या जवळच होतं. सकाळी सात पासून नंतरचे दोन तास पर्यंत जवळ पासचे गावकरी दूध घेऊन येत आणि दुधाचे मोजमाप झाल्यावर दुधाच्या दर्जा प्रमाणे गावकऱ्याना रोख पैसे दिले जात. दुधाचे प्रोसेसिंग प्लॅन्ट नंतर सुरू केले जाई आणि योग्य ती प्रक्रिया पार पडल्यानंतर टॅन्करस् द्वारे दूध बाहेर पाठवले जाई. ही सगळी कामं दिवेकर आणि त्यांचे चार सहकारी पार पाडत असत. दिवेकरांचा ड्रायव्हर शंकर आणि सेक्रेटरी परब ही दोन हरकामी माणसं होती त्यांच्या बरोबर.

या दोघांही नोकराना कंपनीने बंगल्याच्या आऊट हाऊस मधे खोल्या दिल्या होत्या आणि त्यांचं जेवणखाणही बंगल्याच्या किचनमधे होत असे.

दिवेकर मुळचे नागपूरचे. ते कामटीला एकटेच रहायचे आणि फॅमिली नागपूरला रहात असे. घरी कोणीच नसल्याने ड्रायव्हर शंकर आणि सेक्रेटरी परब दिवेकरांना घरीही हर प्रकारे मदत करायचे. अगदी टेनिस कोर्टवर येतानाही परब दिवेकरसाहेबांची रॅकेट आणि किट बॅग घेऊन अदबीने त्यांच्या मागोमाग येत असत.

a

दिवेकरांचा बंगला दोन बंगले सोडून रस्त्याच्या पलीकडच्या बाजूला होता. दिवसभर बंगल्यात तशी सामसूमच असायची पण कधी कधी रात्री उशीरा तिकडून वर्दळीचा भास व्हायचा.

दिवेकरांच्या दिमतीला एवढी फौज चोविस तास असल्याचे पाहून राजीवला त्यांचा खूपच हेवा वाटायचा आणि कधी कधी आपल्याकडेही पी जी वुडहाउसच्या जीव्स सारखा हरकाम्या बटलर असता तर काय मजा आली असती, याची कल्पना तो करायचा. पण एक मात्र खरं, एवढं हेवा वाटण्यासारखं नोकरसुख असुनही दिवेकरांच्या चेहऱ्यावर हसू क्वचितच दिसायचं. आपलं वाचन बरं की आपण बरे; आपला खेळ बरा की आपण बरे अशी दिवेकरांची वृत्ती असायची. कधी कोणाशी विशेष जवळीकही ते करायचे नाहीत किंवा गप्पा टप्पा ही मारायचे नाहीत.

आज दिवेकर टेनिस कोर्टवर आलेच नाहीत. त्यामुळे दुसरा कोणी मेंबर येईपर्यंत राजीवने शिंदे बरोबर एक दोन गेम मारले, आणि मग इतर मित्रमंडळी आल्यावर त्यांच्या बरोबरही खेळ झाला. टावेलने घाम पुसला, रॅकेट केस मधे गेली आणि नंतर, राजीवला चहा आणि स्नॅक्ससाठी शिंदेची आठवण झाली.

हळु आवाजात गाण्याची धून गुणगुणत राजीव क्लबहाउसच्या पायऱ्या चढून गेला. पॅन्ट्रीमधे जाउन शिंदेना स्पेशल चहा आणि गरम स्नॅक्सची ऑर्डर देऊन राजीव लायब्ररी रूमकडे वळला. लायब्रेरियन केशवला हॅलो करून रीडिंग रूममध्ये राजीवने पाउल टाकले. आत टेबलवर मासिकं, वर्तमान पत्रं पडली होती आणि सोफावर मासिक वाचत एक कोणी नवीनच तरुण मुलगी बसली होती. नवीन म्हणायचं कारण असं की सुयश ग्रुपच्या त्या छोट्याश्या कॉलनीत रहाणाऱ्या बहुतेक सर्व रहिवाशांची एकमेकांशी तोंडओळख होती, पण ही मुलगी नवीनच दिसत होती.

राजीवने टाईम साप्ताहिक उचलले आणि तो पलीकडच्या सोफावर बसला. दोघांमधील अदृष्य भिंत मोडायची इच्छा होत होती पण धीर होत नव्हता. आता शिंदे चहा आणि स्नॅक्स घेऊन येईल तेव्हा बघू, असा विचार करत राजीव टाईम साप्ताहिकाची पाने उलटत राहिला. तेवढ्यात क्लबचा वॉचमन लायब्ररीत आला आणि म्हणाला, “नीता मॅडम, गाडी आली आहे, लगेच बोलावलंय”.

राजीवने मनातल्या मनात त्या वॉचमनला शिव्यांची लाखोली वाहिली, कारण त्या तरुणीने हातातलं मासिक लगेच खाली ठेवलं, ती उठली आणि बाहेर गेली. मात्र जाता जाता तिने राजीवकडे एक कटाक्ष टाकला. का कोण जाणे, क्षणभरच राजीवला तिच्या कटाक्षात एक प्रकारची आर्तता जाणवली. पण राजीवने तो विचार मनातून झटकून टाकला. कोण कुठली अनोळखी मुलगी, काही संबंध नसताना त्याच्याकडे कशाला आर्ततेने पाहिल!

शिंदे चहा आणि वडे घेऊन आले. चहाचा कप आणि स्नॅक्सची बशी त्यांनी टेबलवर ठेवली.

“शिंदे, मगाशी इथे एक नवीन मॅडम बसल्या होत्या. कोण होत्या त्या?” राजीवने विचारले.

“त्या होय, अहो दिवेकरसाहेबांची मुलगी ती”, शिंदे म्हणाले, “दिवेकर साहेबांची फॅमिली नागपूरला रहाते. त्यांच्या मिसेस आणि मुलगी म्हणजे या नीता मॅडम दिवाळी नंतर दोन आठवडे येतात दर वर्षी. पण या वर्षी नीता मॅडम एकट्याच आलेल्या दिसतात.”

“शिंदे, हिच्या चेहऱ्यामोहऱ्यावरुन ही मुलगी काहीतरी दु:खात असल्यासारखी वाटली. सगळं काही ठीक आहे नं?” राजीवने विचारले.

a

शिंदे जरा चपापले. "अहो राजीव साहेब, काहीतरी घरगुती कारणं असतील. तुम्ही कशाला काळजी करताय?" असे म्हणून शिंदेंनी विषय संपवला आणि तिथून निघून गेले.

राजीवनेही मग विचार सोडून दिला. राजीव घरी गेला. आज सकाळीच टेलिस्कोपचं पार्सल आलं होतं. पार्सल उघडून मागच्या अंगणात टेलिस्कोप सेट अप करायचा होता. सगळं उरकून टेलिस्कोपच्या मागे लागायला रात्रीचे नऊ वाजले. मग मात्र पुढच्या दोन तासात टेलिस्कोप बरोबर आलेल्या सुचनापत्राच्या आधारे राजीवने सर्व जुळवणी तर व्यवस्थित केली पण नंतर आभाळात ढग आले आणि तारे, नक्षत्रे दिसेनासे झाले. टेलिस्कोपवर आच्छादन टाकून राजीव कंटाळून झोपायला गेला.

दुसऱ्या दिवशीही टेनिस कोर्टवर दिवेकर आले नव्हते. महिना अखेरीच्या हिशेबात गुंतले असतील बहुतेक, असं शिंदेचं मत पडलं.

दोन सेटस् झाल्यावर राजीवने खेळ आवरता घेतला आणि आपोआपच त्याची पावलं लायब्ररीच्या रीडिंग रूमकडे वळली. पण निराशेची गोष्ट म्हणजे अगदी आदल्या दिवशीचीच पुनरावृत्ती झाली. दोघांमधील अदृष्य भिंत काही राजीवला ओलांडता येईना. आजही जाता जाता नीताने राजीवकडे जो कटाक्ष टाकला त्यावरुन आता मात्र त्याची खात्री झाली की तिला काहीतरी सांगायचंय, कदाचित काही तरी मदत हवी आहे, पण बोलू शकत नाही.

तिसऱ्या दिवशीही दिवेकर टेनिस कोर्टवर दिसले नाहीत. खेळ संपल्यानंतर राजीव लायब्ररीकडे गेला. आत रीडिंग रूममध्ये नीताला मन लावून मासिक वाचताना त्याने बाहेरूनच पाहिलं.

आज रवीने एक नवी शक्कल काढली. लायब्ररीत शिरता शिरता लायब्रेरीयन केशवशी गप्पा सुरू केल्या. “केशव, ॲस्ट्रॉनॉमी या विषयावर काही पुस्तकं आहेत का आपल्या लायब्ररीत? मी माझा नवा टेलिस्कोप सेट अप करून ठेवलाय माझ्या घराच्या मागच्या अंगणात. गुरूचे उपग्रह, शनि भोवतालची रिंगणं निरखून पहाण्यात तुला काही इंटरेस्ट असेल तर रात्री बारा सव्वा बाराला ये माझ्या घराच्या मागच्या अंगणात. उद्या रविवार, सुट्टीचा दिवसच आहे, नाहीतरी”.

“आपल्याकडे काही पुस्तकं आहेत राजीव साहेब ॲस्ट्रॉनॉमीवर, एकवीस नंबरच्या कपाटात पहा. मला आहे इंटरेस्ट या विषयात, पण मी फार लांब रहातो इथून. मला नाही होणार रात्री यायला.” केशवने सांगितले.

“ठीक आहे”. असे म्हणून राजीव रीडिंग रूममध्ये गेला. नीताची नजर मासिकावरच होती पण तिच्या चेहऱ्यावर स्मिताची एक लकेर उमटल्यासारखं राजीवला वाटलं. तेवढ्यात वॉचमन गाडी आल्याचा निरोप घेऊन आला आणि आज राजीवकडे नजरही न टाकता नीता निघून गेली.

राजीव घरी गेला. जेवण वगैरे झाल्यावर लॅपटॉप उघडला. नेटवर आजचा आकाश तक्ता पाहून रात्री आकाशात कुठे काय दिसेल याचा आदमास घेतला आणि त्याप्रमाणे टेलिस्कोप सेट अप करण्याची खटपट त्याने सुरू केली.

ओरायन म्हणजेच मृग नक्षत्रातला लालभडक बीटलज्यूस तारा पाहिल्यावर आपला टेलिस्कोप त्याने कृतिकाच्या सुंदर रांगोळीकडे वळवला. नुसत्या डोळ्यांनी दिसणाऱ्या सात तारका ऐवजी कृतिकेमधे दुर्बिणीतून दिसणारं शेकडो ताऱ्यांचं कोंडाळं कोणालाही आश्चर्यचकित करेल असंच होतं. बारा वाजण्याच्या सुमारास गुरू आणि शनि ग्रह पुरेसे वर आले आणि राजीवने आपला टेलिस्कोप गुरूच्या

रोखाने सेट अप केला. गुरूचे चार मोठे उपग्रह, युरोपा, गॅनिमीड, आयो आणि कॅलिस्टो टेलिस्कोपमधून स्पष्ट दिसत होते. राजीवला हे दृष्य पाहून खूपच आनंद झाला आणि कोणालातरी सांगावंसं वाटायला लागलं. पण कॉलनीत सामसुम होती. रस्ते अगदी निर्मनुष्य होते. तेवढ्यात अंगणातल्या त्या अंधारात जवळच कोणी असल्याची चाहुल राजीवला लागली. डोळे ताणून अंधारात पहाण्याचा राजीव प्रयत्न करत होता, तेवढ्यात ती व्यक्ती जवळ आली आणि राजीवच्या लक्षात आलं की ती नीता दिवेकर होती. नीताच्या अशा अवेळी येण्याचं राजीवला तेवढं आश्चर्य वाटलं नाही कारण तिची अगतिकता तिच्या नजरेत राजीवला स्पष्ट दिसली होती.

“मिस्टर राजीव,... राजीवच तुमचं नाव नं? शिंदेनी सांगितलं मला.” नीता म्हणाली.

“हो, तुमच्या चेहऱ्या मोहऱ्या वरून तुम्हाला काहीतरी सांगायचंय असं मला वाटलं. काही सांगायचंय का तुम्हाला? बसा जरा, आत जाऊया का आपण?” राजीव ने विचारले.

“नको, इथेच ठीक आहे”. नीता म्हणाली. “माझ्या जवळ अगदी थोडा वेळ आहे. माझे बाबा आणि सर्व कुटुंबच एका दुष्ट फेऱ्यात अडकले आहोत आणि वाच्यता करायचीही चोरी आहे.”

“पण दिवेकरसाहेब तर दुध योजनेचे व्यवस्थापक आहेत नं?” राजीवने विचारले. “आणि मदतीला त्यांनी दोन हरकामे नोकरही ठेवलेत. मग दुष्ट चक्र कसलं?”

"अहो सुयश दूध योजनेत काही प्रॉब्लेम नाही. ती व्यवस्थित नफ्यात चालली आहे, सुयशची मॅनेजमेंट खुश आहे. पण हे दुष्ट चक्र वेगळंच आहे." नीता म्हणाली.

"बाबांचे दोन नोकर तर फारच एफिशियंट दिसतात. अगदी सगळया कामात मदत करतात बाबांना." राजीव म्हणाला.

"अहो कसले नोकर, पहारेकरी आहेत ते." नीता म्हणाली. "या कामटी पासून चंद्रपुर पर्यंतच्या पट्ट्यात कोळशाचं बेकायदेशीरपणे खाणकाम जोरात चालतं. शेजारच्या राज्यांतही हा उद्योग जोरात चालतो. पण या लोकांना तो कोळसा कुठे विकायचा ते कळत नाही. त्या बेकायदेशीर खणलेल्या कोळशाचं बेकायदेशीर वितरण करणाऱ्यांचं दुष्ट जाळं या भागात अस्तित्वात आहे. माफिया. रातोरात ट्रक्समधे कोळसा भरला जातो आणि ट्रक्स रवाना केल्या जातात. या सगळयाचा हिशोब ठेवायचं काम माझ्या बाबांना करावं लागतं. पूर्वी आम्ही मुलं शाळेत असताना बाबानी पैशासाठी या लोकांची कामं केली आणि त्यातूनच ते या दुष्ट चक्रात अडकले. बाबांचं काम चोख, त्यामुळे त्या माफियालाही बाबा हवे आहेत, आणि या कामाची बित्तंबातमी बाहेर जाऊ नये म्हणून शंकर ड्रायव्हर आणि परब सेक्रेटरी हे दोन पहारेकरी ठेवलेत. चोवीस तास पहारा. माझ्या वरही नजर ठेवलेली असते, मी कोणाशी संपर्क साधते का ते बघायला. रोज रात्री बारा ते दोन बाबांना घेऊन जातात त्या माफिया ऑफिस मधे. तेवढा वेळच माझ्यावर पहारा नसतो. म्हणून तर आत्ता तुमच्याकडे येऊ शकले, तेही बेडरूमच्या मोठ्या खिडकीतून".

"पण बाबा सुयश ग्रुपच्या चेअरमनशी का नाही बोलत, पोलीसात का नाही जात?" राजीवने विचारले.

“तोच मोठा प्रॉब्लेम आहे. सुयश दूध योजना ही सुयश ग्रुपने त्यांच्या मुख्य कारभारविश्वापासून जरा लांबच ठेवली आहे. त्यामुळे चेअरमनचं या स्कीमकडे लक्षच नसतं. हेड ऑफिस मधला एक मॅनेजर हाच तेवढा केंद्र बिंदू आहे, आणि त्याला फक्त नफा तोटूया मधे इंटरेस्ट. आणि पोलीसकडे जाणं फार धोक्याचं. जर पोलीसांची तपासचक्रं सुरू झालीत असं या लोकांना कळलं तर माणसाला होत्याचा नव्हता करायला कचरणार नाहीत. कोणी नेमो नावाचा त्यांचा मुख्य सुत्रधार आहे म्हणे. कुठे लांब रहातो. त्यांचे लोक पण घाबरून असतात त्याला, तर आपला काय निभाव लागणार?”

राजीवने थोडा विचार केला. “नीता, तुझ्या बाबांची सुटका करायला कोणीतरी मोठा तालेवार मध्यस्थ हवा. माझ्या बाबांची सुयश ग्रुपच्या चेअरमनशी चांगली ओळख आहे. शाळेतले वर्गमित्र आहेत ते. माझ्या बाबांच्या कानावर घालतो मी हे सर्व. ते रिक्वेस्ट करतील चेअरमनसाहेबाना तुझ्या बाबांची इथुन बदली करायला.” राजीव म्हणाला.

“ठीक आहे. पण ही सगळी माहिती मी दिली आहे. असं कोणालाही सांगू नका. त्या लोकाना समजलं तर आमची गय कोणी करणार नाही. शपथ आहे तुम्हाला.” नीता म्हणाली.

“शपथेची वगैरे गरज नाही, माहिती कोणाकडून मिळाली ते मी कोणालाही सांगणार नाही. त्या नेमोचे हस्तक कोण कुठे असतील ते सांगता येणार नाही.” राजीव म्हणाला.

“जाते मी आता”, नीता म्हणाली. “त्या लोकांची यायची वेळ झाली आहे”. असे म्हणून ती जशी आली तशी अंधारात नाहीशी झाली.

राजीव थोडा वेळ तिथेच अंधारात बसून होता. माफिया काय, नेमो सुत्रधार काय, सगळंच विचित्र. बऱ्याच वेळाने टेलिस्कोप वगैरे आवरून राजीव झोपायला गेला.

रविवारी सकाळी चहा पिताना राजीवला रात्रीच्या घडामोडी आठवल्या. नीताचे येणे, जाणे, तिने सांगितलेली भयकथा, सगळेच स्वप्नवत वाटत होते.

रविवारी संध्याकाळी मित्रमंडळी बरोबर बसून नेहमी प्रमाणे गप्पा, जेवणखाण वगैरे कार्यक्रम झाला. त्यावेळी कोणा मित्रमंडळीना कोळसा माफिया, नेमो वगैरे बद्दल माहिती आहे का याची राजीवने चाचपणी केली. पण, कोणाला माहितीही नव्हती आणि इंटरेस्टही नव्हता.

सोमवार आला. दिवसभराची कामं नेहमीप्रमाणे झाली. संध्याकाळी क्लबमधे टेनिस कोर्टवर दिवेकर आले होते. त्यांच्या बरोबर दोन सेट झाले. पण खेळताना किंवा दोन सेटच्या मधे विश्रांती घेतांना दिवेकरांबरोबर अवांतर काही बोलणं शक्यच नव्हतं कारण त्यांचा सेक्रेटरी तिथेच कायम ठाण मांडून बसलेला होता.

आत लायब्ररीच्या रीडिंग रुम मधे नीता दिसली नाही. राजीवने शिंदेना विचारलं, “शिंदे आज नीता मॅडम आल्या नाहीत वाटतं”?

“अहो त्या अकरा वाजताच्या बसनी नागपूरला गेल्या.” शिंदे उत्तरले. “तुम्हाला सांगितलं नाही का त्यांनी?” शिंदे डोळे बारीक करून राजीवकडे पहात होते.

राजीव एकदम सावध झाला. “अहो शिंदे, त्यांच्याशी एक शब्द सुध्दा मला बोलायला मिळालं नाही, अगदी चान्सच नाही. मग त्यांचं वेळापत्रक मला कसं

a

माहित असणार? चला, चहा बनवा नेहमी सारखा. मी रीडिंग रूममध्ये बसतो.” एवढे बोलून राजीव निघून गेला आणि शिंदेही कामाला लागले.

------------

संक्रांतीच्या दरम्यान राजीव ने आठ दिवसांची रजा घेतली होती. राजीव चे आई बाबा, श्रीकांत आणि सुनिता, पुण्याहून नागपूरला आले. राजीवही नागपूरला त्याना भेटला. नागपूरची सगळी प्रेक्षणीय स्थळं, मंदिरं, स्तूप बघुन झाल्यावर ताडोबा नॅशनल पार्कला आणि पेंच टायगर रिझर्व्हलाही त्यानी भेट दिली. आठ दिवस खूप फिरले. दिवस मजेत गेले.

पुण्याला जाण्यापूर्वी रात्री तिघंही एकत्र बसले होते. श्रीकांत ने राजीवला विचारले.

“राजीव तुझं काम वगैरे ठीक चाललंय नं? काही प्रॉब्लेम नाही नं?”

“बाबा माझं उत्तम चाललंय. अजून दोन एक वर्षं इथे चांगला अनुभव मिळाला की नंतर मुंबई पुण्याकडे हेड ऑफिसला किंवा मोठ्या फॅक्टरीत डेप्युटी जी एम म्हणून बढती मिळेल. पण बाबा इथे कामटीला आजूबाजूला विचित्र उलाढाली चालल्यात”. राजीव म्हणाला.

श्रीकांत जरा चपापलाच आणि त्याने जरा खोदुन खोदुन विचारल्यावर राजीवने त्याला नीता कडून समजलेली सर्व हकीकत सांगितली.

श्रीकांत विचारात पडला. कोळशाचं बेकायदेशीर उत्खनन, बेकायदेशीर वितरण, सूत्रधार नेमो, सर्वच पुणे-मुंबईकराच्या कल्पनेबाहेरचं.

“बाबा, दिवेकर त्यांच्या मनाविरुद्ध या दुष्टचक्रात अडकले असतील तर त्याना आपण मदत केली पाहिजे. चेअरमन एन सी जाधव साहेब काही मदत करू शकतील का?”. राजीव म्हणाला.

कोण कुठले दिवेकर आणि त्यांचा एकाएकी राजीवला कळवळा का यावा ते श्रीकांतला समजेना. श्रीकांतच्या आईने श्रीकांतला बाजूला घेऊन म्हटले, “अहो, मुलगी चांगली असेल आणि राजीवला आवडली असेल तर आपणही जरा हालचाल करायला पाहिजे.”

श्रीकांतच्या डोक्यात प्रकाश पडला. “ठीक आहे, पुण्याला जाण्यापूर्वी मुंबईला दोन चार दिवस थांबू या. उद्याच जाधवला फोन करून अपॉइंटमेंट घेतो त्याची”. श्रीकांतने कबूल केले.

सुट्टी संपली. राजीव कामटीला आणि श्रीकांत सुनिता मुंबईला निघुन गेले.

श्रीकांतला चेअरमन जाधवसाहेबांनी शुक्रवारची सकाळी अकरा ची अपॉइंटमेंट दिली.

ठरलेल्या वेळी श्रीकांत सुयश ग्रुप चेअरमन जाधवसाहेबांच्या ऑफिस मधे हजर झाला.

जाधवसाहेबांनी कॉफी मागवली. कॉफीचे कप सेक्रेटरीने आणले आणि साहेबांच्या परवानगीने ती बाहेर निघून गेली.

“हं, बोल श्रीकांत, काय विशेष? राजीवचं काम चांगलं चाललंय. त्याने केलेल्या सुधारणांमुळे कंपनीचा बराच फायदा झालेला आहे. वी आर प्राउड ऑफ हिम!”

a

"नारायणा तू त्याच्यावर विश्वास ठेवून एवढी जबाबदारी त्याला दिलीस यातच सगळं आलं. तोही खूष आहे तिकडे." श्रीकांत म्हणाला. "राजीवला स्वतःला काहीच प्रॉब्लेम नाही, पण त्याच्या आजुबाजुला चाललेल्या ज्या विचित्र गोष्टी त्याच्या कानावर आल्यात, त्यामुळे त्याला जरा काळजी वाटते, आणि विशेष म्हणजे सुयशचे काही लोक त्यात गोवलेले आहेत म्हणे."

"काय ते जरा स्पष्ट बोल, श्रीकांत". जाधवसाहेब म्हणाले.

"नारायणा, राजीवच्या कुठुन तरी कानावर आलंय कि त्या परिसरात म्हणे कोळशाच्या बेकायदेशीर खाणी आहेत आणि त्या कोळशाचं बेकायदेशीरपणे अगदी पद्धतशीर वितरण चालतं. रात्री बारा ते दोन हा उद्योग होतो म्हणे, आणि सुयशचे कोणी दिवेकर त्यात अडकले आहेत म्हणे. हे सगळं माफिया जाळं कोणी नेमो नावाचा सुत्रधार चालवतोय असंही कानावर आलंय. राजीवला आणि मलाही असं वाटतं की दिवेकर वगैरेसारखी सुयशची माणसं या जाळ्यात मनाविरुद्ध अडकली असतील तर त्यांना त्यातून बाहेर काढावं. कोळसा माफिया पासून आणि नेमो सारख्या भयानक लोकांपासून त्यांना सूखरूप ठेवावं". श्रीकांतने एका दमात सांगून टाकले.

जाधवसाहेब गंभीर झाले. त्यांच्यापर्यंत आपण वस्तुस्थितीचे गांभिर्य पोहोचवू शकलो यामुळे श्रीकांतला बरे वाटले.

थोडा विचार करून जाधवसाहेब म्हणाले, "हे सगळं कोणाकडून समजलं राजीवला? आणि हे सगळं खरं कशावरून?"

"असंच इकडून तिकडून कानावर आलं म्हणतोय. खऱ्याखोट्याची शहानिशा त्याने काही केली असेलसं वाटत नाही. खोटं असेल तर फारच छान, पण

a

खरं असेल तर सुयश ग्रुपला काही इजा पोहोचण्याच्या आधी तुझ्या कानावर घालावं असं वाटलं.” श्रीकांतने सांगून टाकलं.

“चांगलं केलंस”. जाधवसाहेब म्हणाले. “बरं श्रीकांत, आत्ता मला मीटिंग आहे. तू मला सोमवारी दुपारी चार वाजता येऊन भेट. बघीन मी काय ते. आणि हो, मुंबईत वरळीच्या तुझ्या फ्लॅटवरच उतरला असाल नं तुम्ही? त्यापेक्षा असं करा, जिमखाना क्लब मधे माझ्या दोन गेस्ट रूम्स् रिझर्व्ह असतात, त्यातली एक रिकामी आहे. तुम्ही तिथेच शिफ्ट व्हा. जेवणाची सोय तिथेच होईल, आणि एक रेन्टल कार अ‍ॅरेंज करायला सांगतो मी तीन दिवसांसाठी, कुठे शॉपिंग वगैरेला जायचं असेल तर!”

हे ऐकल्यावर श्रीकांतने नकारार्थी मान हरवायला सुरुवात केली. जाधवसाहेबानी त्याला खुणेनेच थांबवलं, आणि खुणेनेच, “या विषयावर आता चर्चा नाही”, असे सांगून त्याचा निरोप घेतला.

श्रीकांतने घरी येऊन सुनिताला घडलेली सर्व हकीकत सांगितली. जाधवने दाखवलेल्या मित्रप्रेमामुळे सुनिताही सुखावली. जाधवच्या सूचनेनुसार दोघंही जिमखाना क्लबमधे शिफ्ट झाले.

पुढचे दोनतीन दिवस मजेत गेले. जिमखाना क्लबमधे करमणुकीसाठी खूपच साधनं होती. मुंबईतल्या रिकामटेकड्या सुखवस्तू लोकांबरोबर वेळकाढूपणा करण्याचा अनुभव श्रीकांत आणि सुनिताला नवीन होता. संध्याकाळी रमीच्या टेबलावर थोडं जिंकायला मिळाल्याने तर श्रीकांत जास्तच खुशीत आला.

सोमवारी संध्याकाळी चार वाजता ठरल्याप्रमाणे श्रीकांत सुयश केमिकल मधे जाधवसाहेबांच्या ऑफिसमध्ये हजर झाला.

“जाधवसाहेब बिझी आहेत, बसा म्हणालेत”, सेक्रेटरीने सांगितलं. श्रीकांत सोफ्यावर बसला. घड्याळाचे काटे सरकत होते. पाच वाजले. साहेबांची परवानगी घेऊन सेक्रेटरी निघून गेली. नंतर सगळं ऑफिसही रिकामं झालं.

साडेपाचच्या सुमारास जाधवसाहेब ऑफिसच्या दरवाजात आले आणि श्रीकांतला आत घेतलं.

श्रीकांतची, सुनिताची हसत खेळत थोडी विचारपुस केल्यानंतर जाधवसाहेब जरा गंभीर झाले आणि म्हणाले, “श्रीकांत, एक डेवलपमेंट अचानक घडली आहे. नुकतंच आम्ही एक ओवरसीज व्हेंचर सुरू केलं आहे, सिडनीला. ऑस्ट्रेलियामधे. दोन वर्षं झाली तरी त्याला. चांगलं चाललंय. अचानक तिथल्या फॅक्टरीच्या जनरल मॅनेजरने काही कौटुंबिक कारणामुळे राजीनामा दिलाय आणि तो निघूनही गेलाय. त्याची व्हेकन्सी ताबडतोब भरायला पाहिजे. ही एक मोठीच आणीबाणी उभी राहिली आहे माझ्या समोर. तेव्हा, राजीवची बदली तिकडे करतोय मी ताबडतोब, जनरल मॅनेजर म्हणून. पुढच्या सोमवार पर्यंत कामाचा चार्ज घ्यावा लागेल”.

श्रीकांतला आश्चर्याचा धक्काच बसला. “नारायण, त्या परक्या देशात राजीवला रहायला, काम करायला कसं जमेल? तसा लहानच आहे तो आणि घरचंही किंवा जवळचंही कोणी नाही तिथे. आम्ही सगळे इकडे शेकडो किलोमीटर दूर पुण्या मुंबईला. त्याला काही लागलं सवरलं तर नाही धावून जाऊ शकणार आम्ही.”

जाधवसाहेबांना श्रीकांतच्या बोलण्यातली अगतिकता जाणवली असावी. अर्धा एक मिनिट जाधवसाहेब श्रीकांतकडे रोखुन पहात होते.

"श्रीकांत, राजीवने सिडनी फॅक्टरीला जाणं जरूर आहे. तुझं म्हणणंही पटतंय मला. त्याला एकट्याला तिथे पाठवणं तितकसं बरोबर नाही. एक मार्ग सुचतोय मला श्रीकांत, अगदी जरूर विचार कर." जाधवसाहेब जरा थांबले. पाण्याचा एक घोट घेतला. श्रीकांत प्रश्नार्थक नजरेने जाधवसाहेबांकडे पहात होता.

जाधवसाहेब पुढे म्हणाले, "श्रीकांत, तू एक अनुभवी मेकॅनिकल इंजिनियर आहेस. तुझ्या अनुभवाचा आम्हाला फायदा होईल. सिडनी फॅक्टरीचा कन्सल्टींग इंजिनियर म्हणून मी तुला ऑफर देतोय. तुम्ही दोघंही राजीव बरोबर तिथे जाऊ शकता. त्याच्या बरोबर राहू शकता. पॅकेज चांगलं असणार आहे. नाकारू नकोस श्रीकांत."

"अरे पण नारायणा," श्रीकांत म्हणाला, "तू मला देऊ केलेलं पॅकेज चांगलं असेलच रे, पण पैशांव्यतिरिक्त इतरही गोष्टी आहेत. आमचे नातेवाईक, मित्रमंडळी, कुटुंबाच्या अपेक्षा, सगळं सोडून कशासाठी जायचं मी आणि सुनितानी"?

"जीव वाचवण्यासाठी " जाधवसाहेब म्हणाले.

"अं?" श्रीकांत ला आपल्या कानावर विश्वासच बसेना.

जाधवसाहेब खुर्चीत पुढे वाकले. दोन्ही ढोपरं टेबलावर ठेवत गंभीरपणे हळू आवाजात म्हणाले, "श्रीकांत, राजीव ने सांगितलेली बातमी खरी आहे. कोळसावितरण करणारं षडयंत्र अस्तित्वात आहे. सूत्रधार नेमोही अस्तित्वात आहे, असं मला कळलंय. ही सगळी गुप्त माहिती तुम्हाला कळली आहे हे जर त्यांना कळलं किंवा असा संशय जरी आला तर तुमची धडगत नाही आणि कोणीही, अगदी कोणीही तुम्हाला वाचवू शकणार नाही. श्रीकांत, तुम्ही सर्व जण डेंजर झोन मधे आहात. विश्वास ठेव माझ्यावर. उगाच रिस्क घेण्यात काय अर्थ आहे? आणि हो

श्रीकांत, आज दुपारीच या सर्व प्रपोजलची राजीवबरोबर चर्चा केली मी. तो खुष आहे यावर. चॅलेंज स्वीकारायची तयारी आहे म्हणतो. मी तुला ऑफर देणार आहे हेही सांगितलं मी त्याला. आई बाबा आपल्या बरोबर असणार या कल्पनेने तो जास्तच खुष झाला.”

श्रीकांत चकितच झाला. “काय राजीव तयार आहे?” श्रीकांतने विचारले.

“श्रीकांत, तुच पहा, का तयार नसणार?” जाधवसाहेब म्हणाले, “राजीव सारख्या होतकरू मुलाला ऑस्ट्रेलिया सारख्या प्रगत देशात एवढ्या जबाबदार पदावर काम करण्याची संधी मिळाली आणि त्या संधीचं तो चीज करू शकला तर ती एक मोठी गरूडझेपच होईल आणि पुढे भरारी मारायला त्याच्या पंखांना शक्ती मिळेल. तुम्ही काय, एक दोन वर्षांनी या परत. तोपर्यंत इथे सगळं स्थीरस्थावर झालेलं असेल.”

“पण प्रवासाची व्यवस्था...:” श्रीकांतने प्रश्न उभा केला.

“काळजी करू नका. प्रायॉरिटी बेसिस वर तुमचे व्हिसा तयार होतील. तुम्ही फक्त बॅगा भरा”. जाधवसाहेब पुढे म्हणाले, “श्रीकांत, पन्नास वर्षांपूर्वी तुझ्या कुटुंबाने मला मानाने जगायला, भरारी घ्यायला मदत केली होती, आज मला थोड्याशा का प्रमाणात होईना, परतफेड करण्याची संधी मिळते आहे. बरं वाटतंय मला.”

श्रीकांतला आठवण झाली.

“नारायणा, त्या दिवेकरांचं काय, नेमोच्या कचाट्यातून त्यांनाही सोडवायला पाहिजे “. श्रीकांत म्हणाला.

“अरे दिवेकर माझा लांबचा मावसभाऊच आहे. तो तिकडे मजेत आहे असं वाटून माझं दुर्लक्ष झालं त्याच्याकडे. पण जर तो कंटाळला असेल तर कामटीहून

त्यालाही हलवायला पाहिजे. कष्टाळू आहे आणि कामाला चोख आहे तो. सुयश ग्रुपचा सिडनीलाच दुग्धव्यवसाय केंद्र स्थापन करण्याचा विचार आहे. तिथे मी त्याला हलवू शकतो. फॅमिली सकट जाईल तोही सिडनीला". जाधवसाहेब म्हणाले. "चला आता पुण्याला जाऊन शक्य तेवढी आवरा आवर करा, पुढच्या सोमवारी निघायला पाहिजे. "

श्रीकांत उठला. अजूनही तो जरा संभ्रमावस्थेतच होता. इतक्या वेगाने घटना घडत होत्या की त्याला चक्रावायलाच झाले होते. एका गोष्टीची मात्र त्याला खात्री होती कि जे होत होतं त्यातून चांगलीच निष्पत्ती होणार होती. कामटीमधल्या कोळसामाफिया च्या भयानक सावटातून राजीवची सुटका होत होती आणि मोठ्या भरारीला तो सज्ज होणार होता.

श्रीकांत गेल्यावर जाधवसाहेब केबीन मधल्या साईबाबाच्या मूर्ती जवळ गेले आणि त्यांनी लवून नमस्कार केला.

प्रसिध्द उद्योगपती एन सी जाधव उर्फ माफिया सूत्रधार नेमो, भगवंतासमोर नतमस्तक झाला, हात जोडले आणि म्हणाला, "देवा, माझ्या भरारीची दिशा जरा चुकल्यासारखी झाली आहे. या मुलावर मात्र कृपा दृष्टी असू दे तुझी. त्याच्या भरारीची दिशा कायम सरळ असू दे. "

----x----

**ई साहित्य प्रतिष्ठानचे सोळा वर्षांचे होत आहे.**

**श्री. सुधीर कारखानीस यांचे हे ई साहित्यवरील पहिले पुस्तक.**

श्री सुधीर कारखानीस हे एक ज्येष्ठ इंजिनियर व तंत्रज्ञ आहेत. त्यांची यापूर्वी तंत्रज्ञानावरील पुस्तके प्रकाशित झाली आहेत तसेच एक कथासंग्रहही आहे. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले.

श्री सुधीर कारखानीस यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता

a

देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी, यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।